
4

आर्थिक व्यक्तिमत्त्व

•

करीअरचं नियोजन



अनिल भागवत

वैवाहिक आणि कौटुंबिक समुपदेशक

जीवनसाथ

दुसरी आवृत्ती

जीवनसाथ - 12 पुस्तकांच्या संचापैकी

पुस्तक क्र. 4

आर्थिक व्यक्तिमत्त्व

•

करीअरचं नियोजन

जीवनसाथ

जीवनभर स्पष्ट विचारांची साथ म्हणजे जीवनसाथ

अनिल भागवत

वैवाहिक आणि कौटुंबिक समुपदेशक

प्रकाशक
अनिल भागवत
ई 3/21 गिरिजा शंकर विहार
कर्वे नगर, पुणे 411052


प्रथम आवृत्ती : 27 डिसेंबर2015

मुखपृष्ठ : आभा भागवत

टाइपसेटिंग
स्मिता टाईपसेटर्स
1120, सदाशिव पेठ,
पुणे 411030

मुद्रणस्थळ
स्मिता प्रिंटर्स,
1019, सदाशिव पेठ,
पुणे 411030

किंमत 250 रुपये



अनिल भागवत – ओळख

- बांधकाम व्यवस्थापनाचं अमेरिकेत शिक्षण आणि नोकरी
- अमेरिकन ग्रीन कार्ड होल्डर असूनही भारतात परत येण्याचा निर्णय
- 8 महिने 50,000 कि.मी. आणि 35 देशांचा स्वतः गाडी चालवत बायकोबरोबर प्रवास
- भारतात अतिजलद आणि दर्जेदार बांधकाम व्यवस्थापनाचा अनेक वर्षं व्यवसाय
- तत्त्वज्ञान, मानसशास्त्र आणि व्यवस्थापनशास्त्र यांचा रोजच्या आयुष्यात उपयोग करण्याविषयी खास अभ्यास
- 'वैवाहिक आणि कौटुंबिक समुपदेशन' या विषयात डॉक्टरेटचं काम पूर्ण
- इंग्लंड आणि अमेरिकेत पालक-शिक्षण आणि विवाह-शिक्षणाच्या कार्यशाळा
- विवाह-शिक्षणाचे 500 च्या वर कार्यक्रम (1997 ते 2015)
- पालक-शिक्षणाचे 300 च्या वर कार्यक्रम (1980 ते 2015)

सामाजिक कामं -

- जीवनसाथ अभ्यासमंडळ – प्रमुख सल्लागार
- जीवनसाथ समुपदेशन केंद्र – प्रमुख समुपदेशक
- पालक विद्यापीठ – सल्लागार
- इंग्लिश संभाषण वर्ग – प्रमुख शिक्षक
- रोजच्या आयुष्याचं व्यवस्थापन – डायरी प्रशिक्षण – प्रमुख प्रशिक्षक
- सुंदर हस्ताक्षर वर्ग – प्रशिक्षक

- लेखन – वर्तमानपत्रांतून, नियतकालिकांतून अनेक वर्षं लिखाण

पुस्तकं -

1. घर पाहावं बांधून (5व्या आवृत्तीत)
2. लग्न पाहावं करून (उपलब्ध नाही)
3. व्यवस्थापनशास्त्र तुमच्यासाठी (2री आवृत्ती)

●



शोभा भागवत – ओळख

- मराठी, संस्कृत, इंग्लिश भाषेत पदव्या
- अमेरिकन ग्रीन कार्ड होल्डर असूनही भारतात परत येण्याचा निर्णय
- 8 महिने 50,000 कि.मी. आणि 35 देशांचा स्वतः गाडी चालवत नवऱ्याबरोबर प्रवास
- 2 वर्षं युनिसेफसाठी शैक्षणिक सल्लागार
- गरवारे बालभवन, सारसबाग, पुणे. च्या संचालक (1985 ते 2015)
- भारत सरकारतर्फे शैक्षणिक कार्यक्रमासाठी ब्राझिलला भेट
- इंग्लंड आणि अमेरिकेत पालक-शिक्षण आणि विवाह शिक्षणाच्या कार्यशाळा
- विवाह-शिक्षणाचे 300 च्या वर कार्यक्रम (1997 ते 2015)
- पालक-शिक्षणाचे 1000 च्या वर कार्यक्रम (1980 ते 2015)

सामाजिक कामं -

- पालक विद्यापीठ – प्रमुख सल्लागार
- जीवनसाथ अभ्यासमंडळ – सल्लागार
- अक्षरनंदन शाळा – सल्लागार
- महाराष्ट्र पालक शिक्षक संघ – कार्याध्यक्ष
- डॉ. स्नेहल अशोक स्मृती न्यास – विश्वस्त
- हुजूरपागा नियामक मंडळ – सदस्य
- लेखन – वर्तमानपत्रांतून, नियतकालिकांतून सातत्यानी लेखन

पुस्तकं

1. आपली मुलं (राज्य पुरस्कार प्राप्त)
2. गारांचा पाऊस (राज्य पुरस्कार प्राप्त)
3. मूल नावाचं सुंदर कोडं
4. दिवास्वप्न (अनुवाद)
5. दलित पुरुषांच्या आत्मचरित्रातील स्त्री प्रतिमा
6. बहुरूप गांधी (अनुवाद)
7. आनंदाच्या पाऊलवाटा
8. देणारं झाड (अनुवाद)
9. मांजरांची वरात (अनुवाद)
10. गंमत जत्रा
11. विश्व आपलं कुटुंब
12. स्त्रियांचे प्रश्न
13. खेळण्यांचा जादूगार - अरविंद गुप्ता
14. सिंह आणि चिंगुली लाल चिमणी (अनुवाद)
15. खट्याळ उंदीर (अनुवाद)
16. अमरपत्र (अनुवाद)
17. शहाणी मुलं छान मुलं (अनुवाद)
18. बियांचे प्राणी (अनुवाद)
19. अंगठ्याची चित्रं (अनुवाद)
20. बोलणारे दगड (अनुवाद)

आगामी पुस्तकं

21. सारं काही मुलांसाठी
22. शिक्षण आणि शांती (अनुवाद)

नाटक – आम्ही घरचे राजे (थिएटर अकादमी)

अनेक लेख, कविता, आकाशवाणी आणि दूरदर्शनवर कार्यक्रमांचं लेखन आणि सादरीकरण

●

प्रस्तावना – शोभा भागवत

अनिलनी बऱ्याच वर्षांपूर्वी अमेरिकेत व्यवस्थापनशास्त्राचा कोर्स केलेला होता. त्यात माणसाचं आर्थिक व्यक्तिमत्त्व याविषयी त्याचा बराच अभ्यास झाला होता.

आमचं 'जीवनसाथ विवाह अभ्यास मंडळ' 1997 मधे सुरू झालं. आमची दोन्ही मुलं तेव्हा लग्नाच्या वयाची होत होती. अनिलला तेव्हा असं सारखं वाटत होतं की, आपण दोघांशी लग्नाबद्दल सूत्रबद्ध बोलायला हवं, पण या वयातली मुलं कुठं आई-वडलांचं ऐकण्याच्या मनःस्थितीत असतात? त्यांच्या मित्र-मैत्रिणींचा गट जमवणं, त्यांच्या पालकांनाही बोलावणं आणि दर रविवारी 2-3 तास एकत्र चर्चा करणं ही कल्पना मात्र त्यांना आवडली, आणि आमच्या घरीच 'जीवनसाथ' सुरू झालं.

'जीवनसाथ' म्हणजे स्पष्ट विचारांची जीवनभराची साथ. खूप जणांना असं वाटतं की, अविवाहित मुला-मुलींसाठी हे गट चालवतात, म्हणजे हे वधूवरसूचक मंडळ आहे. पण असं लग्न जमवण्यासाठी मंडळ चालवण्यात आम्हा दोघांनाही रस नाही. अर्थात, मंडळाच्या निमित्तानी एवढ्या वर्षांत लग्नाचा अभ्यास करता करता परिचय होऊन बरीच लग्नं ठरली, झाली, टिकली आणि ती विचारपूर्वक झाली याचं आम्हाला समाधान वाटतं.

18 वर्षांच्या अनुभवानं आम्हाला असं वाटतं की, तरुण मुली लग्नाबद्दल खूप विचार करतात. कारण, त्यांना जाणीव असते की, लग्नानंतर पुरुषाचं आयुष्य फार बदलणार नाही, पण बाईचं सगळंच बदलून जातं. या उच्चशिक्षित मुली असं म्हणतात की, लग्न हे काही आयुष्यभराचं 'अल्टिमेटम' नाही हे आमच्या पिढीला कळलेलं आहे. त्याचप्रमाणे, एका व्यक्तीशी आयुष्यभर आपण

जोडले जाणार, तर ती कशीतरी उरकून टाकायची पण गोष्ट नाही. लग्नानंतर आपलं आयुष्य घडूही शकतं किंवा बिघडूही शकतं. त्यामुळं स्वतः विचार करून स्वतःच निर्णय घ्यायचा.

ठराविक 'कांदापोहे' कार्यक्रमाचं स्वरूप बदललं आहे. तरीही अजून परिचयात मोकळेपणा नसतो. शिक्षण, पगार, घरदार, दिसणं या व्यावहारिक गोष्टींकडेच झुकतं माप असतं. माणूस म्हणून एकमेकांची ओळख होत नाही.

आर्थिक व्यक्तिमत्त्व हा व्यवहारातला महत्त्वाचा भाग आहे. त्याविषयी मात्र बोललं जात नाही.

एखाद्या जोडीत कुटुंबातल्या पार्श्वभूमीमुळे, वातावरणामुळे मनमोकळा संवाद असला, तरीही लग्नाच्या वेळी विचार नेमका कशाकशाचा करायचा याबाबतीत पालकांना काही कल्पना नसते. मुलांना वाटतं पालक काहीतरी सांगू शकतील. त्याचवेळी पालकांना वाटतं, आजकालच्या मुलांना सगळं माहिति असतं. शेवटी दोघांकडून मिळून आवश्यक असलेला स्पष्ट विचार कमी पडतो.

आज प्रत्येक व्यक्तीला स्वातंत्र्याचा ध्यास आहे. अशा वेळी वरवर भेटून, बोलून आयुष्यभराचा निर्णय कसा घ्यायचा? लग्न म्हणजे काय एक दिवसाचा सोहळा आहे

का? ती आयुष्यभराची दोघांनी केलेली 'कमिटमेंट' आहे.

लग्नाच्या वयात घरून प्रचंड मानसिक दबाव असतो, असंही मुली सांगतात. त्यात घरात आई-वडलांचंच आयुष्य अत्यंत असमाधानी पाहिलेलं असलं, घरात आई-वडलांची एकमेकांना, मुलांना मारपीट पाहिलेली असली, तर लग्नाबद्दल प्रचंड साशंकता असते. अनेक कुटुंबांत दुर्दैवानी तरुण मुलांना मोकळेपणानी बोलता येत नाही. अनेकदा पालकांशी संवादच तुटलेला असतो.

याला उपाय म्हणून, आपल्या समाजात या मुला-मुलींसाठी काय सोयी उपलब्ध आहेत? वधू-वर सूचक मंडळं आहेत, ती पालकांना जेवढी आकर्षक वाटतात, तेवढी मुला-मुलींना वाटत नाहीत. मेळाव्याचा अनेकांनी धसका घेतलेला आहे. इंटरनेटचा आधार अनेकजण घेत आहेत, पण त्याची विश्वासार्हता अजून सिद्ध व्हायची आहे. इंटरनेटवर माहितीचा धबधबा असतो, पण त्यातली बरीचशी पाश्चात्त्य असते. स्वतःला उपयोगी असं फारच कमी सापडतं.

अशा वेळी परिचयोत्तर विवाह असा काही कुठे पर्याय आहे का, मैत्रीतून विवाह असा काही 'प्लॅटफॉर्म' आहे का, या शोधात तरुण आहेत. त्यामुळेच

जिथे केवळ पैशांसाठी काम चालत नाही, पण जिथे समाजकार्य असाही आव नाही, जिथं कुणाचं दडपण विचारांवर नसेल आणि निर्णयासाठी दबाव नसेल, जिथे तरुणांचा सन्मान जपला जाईल आणि मार्गदर्शन म्हणून उपदेशांचे डोस नसतील, अशा विवाह अभ्यास मंडळाच्या शोधात मुलं-मुली आहेत. ही गरज ओळखून 'जीवनसाथ'ची सुरुवात झाली.

'जीवनसाथ' सुरू केल्यापासून अनिलनी वैवाहिक जीवनात येणाऱ्या प्रश्नांची यादी करून अभ्यासाला सुरुवात केली. विवाह अभ्यासाचा अभ्यासक्रम तयार केला. त्याचं 'मॅनेजमेंट' या विषयाचं शिक्षणही आहे आणि तोच त्याचा व्यवसायही आहे. त्यातली तत्त्वं वैवाहिक जीवनात उपयोगी आहेत. आपण कसे आहोत हे कळणं आणि दुसऱ्याला पारखता येणं, यासाठी त्यानी व्यक्तिमत्त्वाच्या प्रकारांचा अभ्यास केला आहे. विवाहासाठी काय प्रकारची प्रगल्भता हवी हे शोधण्याचं त्याचं काम चालू आहे. त्याचं मानसशास्त्राच्या अंगानी 'वैवाहिक समुपदेशन' या विषयातलं डॉक्टरेटचं काम पूर्ण आहे. पीएच.डी. हातात मिळणं बाकी आहे. क्रिटिकल ॲनॅलिसिस या पद्धतीनी तो तरुण मुला-मुलींना आपले प्रश्न सोडवण्याचा आत्मविश्वास देतो आहे. अतिशय सातत्यानी 'ग्रुप काउन्सेलिंग' आणि 'इंडिव्हिज्युअल काउन्सेलिंग' करतो आहे. त्याची अभ्यासू वृत्ती, शिस्त, चिकाटी, तरुणांशी संवाद साधण्याचं कौशल्य, हे काम करण्यासाठी 'ट्रेनर्स' तयार करणं, हे सगळं पाहणं, त्यात मदत करणं हा माझ्या आनंदाचा भाग आहे.

'जीवनसाथ'मधे अविवाहित तरुण-तरुणी तर येतातच, पण नवविवाहित, मध्यमवयीन विवाहित जोडपी, घटस्फोटित व्यक्ती, अविवाहित राहण्याचा निर्णय घेतलेली मंडळीही येतात. त्यांच्यामधल्या विचारांच्या देवाण-घेवाणीचा सर्वांनाच उपयोग होतो. इथल्या काहींच्या प्रतिक्रिया बरंच काही सांगतात.

'जीवनसाथ'मधे येणारी कॉम्प्युटर इंजिनिअर मुलगी एकदा सांगत होती–

''माणसाच्या दिसण्यापेक्षा माणसाचं असणं महत्वाचं असतं, ते कसं पारखावं याचं सहज, सोप्या शब्दांत मार्गदर्शन तुम्ही करता, ते मला आवडलं. केवळ नवरा-बायको या नात्यातच नव्हे, तर इतरही नात्यांत प्रत्येकाला 'स्पेस' देऊन जे नातं जोपासलं तर ते अधिक सशक्त ठरतं, हे मला इथं कळलं. लग्न करायचं तर अफाट अपेक्षा ठेवून कसं चालेल? आपल्याला आयुष्यात काय चालणार नाही, पेलणार नाही, कोणाला नाही म्हटलं पाहिजे याबद्दलचे माझे विचार इथेच स्पष्ट झाले. लग्न या प्रक्रियेकडेच जाणीवपूर्वक पाहण्याचा मार्ग

मला इथे सापडला.''

चर्चेत एकदा एक मुलगा म्हणाला होता, ''एखाद्या सुंदर, मादक मुलीशी लग्न आणि मग हनिमून इथपर्यंतचा मुलग्यांचा 'प्लॅन रेडी' असतो, पण पुढं सगळी गडबड गडबड असते. खरं म्हणजे लग्न या विषयाच्या अभ्यासाची सुरुवात शाळेत आणि महाविद्यालयातच व्हायला हवी.''

एक मध्यमवर्गीय घरातला खूप न शिकलेला मुलगा. तो सांगत होता –

''आमच्या घरात जे विषय उच्चारले सुद्धा जात नाहीत त्यावर इथे मोकळेपणानी बोलतात हे पाहून मी चक्रावूनच गेलो. पैशाविषयीच्या विचारसरणीच्या इतक्या पोटात शिरता येतं हे मला माहिती नव्हतं. मित्राच्या सांगण्यावरून मी इथे आलो आणि मला कळलं की, इथे केवळ लग्नाविषयी नाही, तर इतर खूप विषयांबद्दल चर्चा होते. आयुष्य स्वस्थ आणि समाधानी कसं होईल हे कळतं. 'ग्रुप डिस्कशन'मधे अनेक माणसांचे विचार कळतात. इतरांच्या प्रश्नांची कल्पना येते.''

मॅनेजमेंटचा अभ्यास करणाऱ्या अतिशय संवेदनक्षम मुलीला काही वेगळेच फायदे जाणवले. ''प्रश्नाच्या मुळापर्यंत जाणं आणि मूळ प्रश्नाचं उत्तर शोधणं यांचे संस्कार इथे माझ्यावर झाले. वास्तवाची जाण आली आणि अपेक्षांचा क्रम लावता आला. त्यातला क्रम लावण्याचा एक्झरसाइज काय जादू करतो ते इथे मला कळलं. इथल्या 'प्रेझेंटेशनचा' मला माझ्या 'मॅनेजमेंट स्टडीज'मधे उपयोग झाला.'' दुसरी एकजण म्हणते, ''विवाहबाह्य संबंधांवरच्या चर्चा बैठक संपल्यावरही मनात ठसठसत राहिल्या. घटस्फोट होऊ नये यासाठी काय करावं, झालाच तर काय करावं, किती मुलं हवीत, संगोपन कसं करावं, आपलं मरण, जोडीदाराचं मरण, आप्तजनांचं मरण या अत्यंत अप्रिय अशा विषयांवरच्या चर्चांनी मनोधैर्य वाढलं. प्रत्येक बैठकीला येताना, आज काय नवीन शिकायला मिळेल अशी उत्सुकता असते.''

एक अतिशय गंभीर मुलगी आहे. तिनं अतिशय विचारपूर्वक लग्न केलं आहे. ती एकदा चर्चेत सांगत होती–

''लग्न म्हणजे तडजोड आणि ती बाईलाच करावी लागते. पण 'जीवनसाथ'मधे येऊन मुलांमधेही तडजोडीची जाणीव आणि इच्छा निर्माण होते. एकमेकांत खेळीमेळीचं वातावरण असण्यासाठी वैचारिक पातळी जुळणं आवश्यक आहे. विचार जुळले तर 'कम्फर्ट लेव्हल' वाढते. एकमेकांचे दोष स्वीकारणं सोपं जातं. प्रत्येक माणसात दोष असणारच, मतभेद असणारच, पण ते कमी कसे करायचे

ते इथे आल्यावर उमगलं.'' ''आम्ही दोघं लग्नापूर्वी एकमेकांशी करिअर, पैसे, मित्रमैत्रिणी, कुटुंब यांविषयी बोललो. आमचे बरेच विचार जुळत होते. यावेळी निर्णय घेताना आम्हाला अनिलदादांनी सांगितलेली 'क्रिटिकल ॲनॅलिसिस'ची पद्धत उपयोगी पडली. आता लग्न झाल्यावर हा विचार किती महत्त्वाचा होता, ते लक्षात येतं आहे.''

एक रोखठोक मुलगी सांगते, ''मी 'हेडस्ट्राँग' आहे. पटल्याशिवाय काही करणार नाही. मुलं बघताना मी खूप विचार करत होते. पण मुलगे 'टिपिकल माइंडेड' असतात. मग नकार सुरू झाले. बाबांना त्याचा त्रास होऊ लागला. अजूनही मला जे हवंय ते मला सापडत नाही. जीवनसाथमधे लग्न जमलं तर मला आवडेल, पण इथे स्वतःला समजून घेण्याचा आणि इतरांना समजून घेण्याचा एक दृष्टिकोन मिळाला. तो मला उपयोगी पडतो आहे. सर्वांना मतं असतात. ती एकमेकांवर लादू नयेत, हे मी इथं शिकले. आपल्या समाजात मुलग्यांची मतं खूप पारंपरिक आहेत. माझ्यासारख्या मुलींना फार निराशा येते. अशा वेळी जीवनसाथचा मला खूप आधार वाटतो. जीवनसाथ हा एक सपोर्ट ग्रुपच आहे.''

आमच्या एक घटस्फोटित सभासद म्हणतात ते मला फार महत्त्वाचं वाटतं–

''सध्या विवाहसंस्थेला आलेलं बाजारी बजबजपुरीचं स्वरूप घातक आहे. नको त्या गोष्टी लग्नसंस्थेत घुसून मूळ मूल्यांनाच छेद देत, पार बोजवारा उडवत आहेत. अनेकांना लग्न करण्याची चक्क भीतीच वाटायला लागलीय.

लग्नाच्या निमित्तानी एकूण मानवी सूक्ष्म, नाजूक, तरल नाती आणि भावभावना यांचा हळुवार गोफ गुंफला जात असतो. त्याचा नितांत सुंदर अभ्यास या मंडळात होतो. आजच्या नव्या विचारांनी कालचा मनस्ताप पुसता येतो, हे मला या अभ्यासाचं सामर्थ्य वाटतं.''

जीवनसाथमधे सातत्यानी गेली पाच वर्षं येणाऱ्या एक मध्यमवर्गीय पालक म्हणतात : ''लग्न ठरवताना पत्रिकेवर अनावश्यक भर असतो, पण मुलामुलींच्या गाठीभेटी, चर्चा जास्त आवश्यक असतात. दोन कुटुंबांच्या परिचयासाठी वेळ देणं आवश्यक असतं, ते होत नाही. जीवनसाथमधे येण्यापूर्वी माझी मतं पक्की नव्हती. 50-50 टक्के दोन्ही बाजू खऱ्या वाटायच्या. पण आता मी योग्य

शब्दांत माझा मुद्दा पटवून देऊ शकते. पालकांनाही या अभ्यासाची गरज आहे. लग्नात पालकांचा पुढाकार नसावा. मुला-मुलींनीच पुढे जबाबदारी पेलायची असते. त्यामुळे मुलांचा पुढाकार आणि पालक फक्त सल्लागार असं व्हायला हवं. पालकांनी योग्य गोष्टींना प्रोत्साहन द्यावं, अयोग्य गोष्टी स्पष्ट, योग्य शब्दांत त्यांच्यासमोर मांडाव्यात, निर्णय मात्र मुलांचाच असावा. ही गोष्ट अनिलदादांकडून एवढ्या स्पष्ट शब्दात मी प्रथम ऐकली. मला ती पूर्णपणी पटली.

जीवनसाथमधे नकारात्मक गोष्टींचा विचारही करण्याचं तंत्र कळलं. म्हातारपण, आजारपण, मृत्यू यांबद्दलचे विचार पक्के झाले; अनेक अंधश्रद्धा गेल्या, साधी राहणी उच्च विचारसरणी म्हणजे काय हे कळलं. सर्वांत महत्त्वाचं म्हणजे इथे मुलांबरोबर पालकांनाही आपल्या वैवाहिक आयुष्यातल्या समस्या सोडवता येतात, याचा दिलासा वाटला. आमचंही आयुष्य 'जीवनसाथ'नी समृद्ध केलं.''

स्वतः अनेक प्रकारची प्रशिक्षणं देणारं आमचं एक अत्यंत उत्साही, कृतिशील सभासद जोडपं म्हणालं, ''वैचारिक देवाणघेवाण फार कमी ठिकाणी होते. इथलं पद्धतशीर विश्लेषण आम्हाला खूप गोष्टी शिकवतं. अनिलदादांचे खास खेळ गमतीबरोबर महत्त्वाचे संदेश सहज देतात. तुम्ही दोघं आधी भेटला असतात तर आम्हाला अधिक चांगले नवरा-बायको होता आलं असतं आणि अधिक चांगले पालकही.'' लग्न आणि मुलांना वाढवणं हे प्रत्येकाच्या जीवनातले महत्वाचे प्रकल्प; पण लोक त्यांच्याकडे पुरेशा गांभीर्यानी पाहात नाहीत. आज झट लग्न पट घटस्फोट ही पद्धत होऊ पाहते आहे. अशा वेळी अशी मंडळं समाजात काही नवं घडवत आहेत ही समाधानाची गोष्ट आहे.

तरुणपणी योग्य वयात जीवनसाथमधे नियमितपणे यायला सुरुवात केली तर फारच छान; पण समजा तसं नाही जमलं तर काय करायचं? ताण आधीच निर्माण झाले असले तर? मला वाटतं 'बेटर लेट दॅन नेव्हर.' मध्यमवयीन, वयस्कर असलं म्हणून काय झालं? दोघांची इच्छा असली तर ताण नक्की कमी करता येतील. घालवताही येतील कारण 'विवाहाचं बिघडलेलं यंत्र कुठच्याही अवस्थेत दुरुस्त करायचा प्रयत्न करता येतो.'

अनिल त्याच्या वैयक्तिक समुपदेशनाच्या कामातही खूप व्यस्त असतो. लोकांना केवढ्या प्रकारचे किती प्रश्न आहेत हे त्यामुळे कळतं. अनेक प्रश्नांच्या मुळाशी आर्थिक असतं. ते अनिल त्यांना उलगडून सांगतो. जेवढे करावेत तेवढे प्रयत्न कमीच पडतील इतकी आपल्या समाजाला समुपदेशनाची गरज आहे हे

लक्षात येतं.

असं हे जीवनसाथचं काम, वातावरण आणि फलितं! यातला अभ्यास, वाचन, चिंतन, आचरणाचा आग्रह यातला पुढाकार अनिलचा. माझी इतर कामं सांभाळून मी साथीला असते एवढंच. लोक रविवारच्या या कृतिसत्रांची वाट पाहात असतात याचं फार समाधान वाटतं.

आमची मुलं लहान होती तेव्हा आम्ही दोघांनी पालक-शिक्षणाचा अभ्यास केला. बऱ्याच पालकांपर्यंत तो पोहोचवला. ती वाढत असताना मला बालभवनच्या निमित्तानी चांगलं काम करता आलं. ती लग्नाची झाल्यावर अनिलनी विवाह-अभ्यास पुढं नेला. आता आम्हाला तीन छोटी नातवंडं आहेत. लहान मुलांची काळजी घेण्याची अधिक चांगली सोय समाजात व्हावी यासाठी खूप काही करायचं आहे. त्या त्या वेळी आपल्या समाजातले जे प्रश्न जाणवतात त्यासाठी काम करणं, हे आम्हाला आमचं कर्तव्य वाटतं. इतरांच्या कामाशीही आमचा त्यामुळे भरपूर संपर्क असतो. त्या नेटवर्कचा खूप फायदा होतो.

अनिल व्यवसाय म्हणून 'व्होकेशनल गाइडन्स' देणारा नाही. 'इन्व्हेस्टमेंट कन्सल्टंट' नाही, पण तरी पैशाची बचत आणि करीअरबद्दलचं मार्गदर्शन यात त्याला सल्ला विचारणारे खूप आहेत. समुपदेशन करताना या विषयांचा संबंध येतोच.

अनेक वर्षं परदेशात राहिल्यामुळे आणि अनेक परदेशी मित्रमंडळींमुळे परदेश या विषयावरही तो अधिकारानी सल्ला देऊ शकतो. त्याच्या वास्तववादी चित्रणामुळे लोकांना खूप फायदा होतो.

आम्ही दोघं गेली अनेक वर्षं पुण्यातच राहतो. पुण्याचे गुण, दुर्गुण आम्हाला आपोआपच चिकटलेले असणार. अनिलचं सगळं काम जास्तीतजास्त पुण्यातलंच आहे. बरेच संदर्भ महाराष्ट्र, पुणं, कर्वेनगर या भोवतालचे आहेत हे अगदी खरं आहे. हे पुस्तक वाचताना तुम्ही जगाच्या कुठच्याही भागात असलात तरी त्यामुळे जागेचे संदर्भ बदलतील. अभ्यासाचे विषय मात्र तेच राहतील.

– शोभा भागवत

अभ्यास मंडळात याविषयी काय काम चालतं

या कल्पनेची थोडक्यात ओळख

मी भाषणं करण्याच्या विरुद्ध आहे कारण त्याचा काही उपयोग होत नाही अशी माझी खात्री झाली आहे. त्यामुळे मी फक्त कार्यशाळाच घेतो. आत्तापर्यंत 500च्या वर ज्या कार्यशाळा घेतल्या त्याविषयी हे लिखाण आहे. यातला प्रत्येक लेख किंवा लेखाचा भाग म्हणजे एक कार्यशाळा आहे असं समजूया. पण त्या विषयाच्या अनेक कार्यशाळांचा गोषवारा इथे आहे. प्रत्यक्षातल्या कार्यशाळा अनौपचारिक आणि प्रश्नोत्तरं पद्धतीच्याच असतात; पण तो मजकूर त्याप्रकारे नाटकातल्या संवादांसारखा लिहायचा म्हणजे तो खूप पानांचा होतो. म्हणून ते मुद्दे सलग पद्धतीनी मांडले आहेत.

कार्यशाळांचा मुख्य सूत्रधार बहुतेक वेळा मी असतो. भविष्याचा विचार करून सूत्रसंचालनासाठी आणखी काही लोक तयार करण्याचं काम चालू आहे. अशा सूत्रधारांनी आधी त्या विषयाचा माझ्याबरोबर अभ्यास करून मुद्दे लिहून तयार ठेवलेले असतात. आम्ही त्यावर चर्चा केलेली असते.

अगदी प्रथम माझी या सबंध कामामागची, कार्यशाळेमागची, पुस्तकामागची भूमिका स्पष्ट करतो. ही एक अनेक विषयांची कार्यशाळांची मोठी मालिका चालू आहे, अशी कल्पना करून मी हे पुस्तक लिहिलंय. आपण सगळे एका खोलीत समोरासमोर बसलो आहोत आणि प्रत्येक विषयासंबंधी निरनिराळ्या लोकांची निरनिराळी मतं, शंका, गैरसमजुती आपण सगळे ऐकतो आहोत अशी कल्पना

केली आहे. जीवनसाथमधला आत्तापर्यंतचा अभ्यास त्याबद्दल काय म्हणतो हे मी सांगतोय, अशी कल्पना मनात धरलीय.

मला कळायला लागल्यापासून गेली 50 वर्षं मी जे आसपासचं जग बघतोय, परदेशात, भारतभरात, महाराष्ट्रात जे अनुभवलंय ते मला आवडलेलं नाही. थोडक्यात, ज्या दिशेनी सबंध जगाचा, भारताचा प्रवास चाललाय ती दिशा मला योग्य वाटलेली नाही. कुठच्यातरी निराळ्या पद्धतीनी विचार केल्याशिवाय, मार्ग शोधल्याशिवाय मला धडगत दिसत नाही. ज्याला सध्याची परिस्थिती पसंत नसेल त्यानी ती परिस्थिती बदलण्यासाठी धडपड करावी, नाहीतर मुकाटपणी सहन करावं. मी मुकाटपणी सहन करणाऱ्यांपैकी नसल्यामुळे मी तशी धडपड केली, आयुष्यभर केली. त्या सगळ्या प्रयत्नांचा सारांश म्हणजे 'जीवनसाथ'. या अभ्यासाची सुरुवात विवाहाच्या अभ्यासानीच झाली. पुढे मात्र ती सबंध आयुष्याच्या अभ्यासाची संस्था बनली.

मी माझ्या आसपास बघितलं तर मला संतुलित लोकं सहज दिसतच नाहीत. उन्मत्त तरी दिसतात किंवा उदास लोक दिसतात. वागणारे मग्रूर तरी असतात किंवा केविलवाणे असतात.

प्रत्येक पर्वातल्या प्रत्येक काळात समाजाला विचार आणि भावना यांच्या समतोलाचीच गरज असते हे सगळ्यांना मान्य असतं. पण पुढे माझ्यासारख्या कोणी म्हटलं की, सध्याचा समाज भावनेच्या बाजूला पार झुकलेला आहे, त्यामुळे या समाजाला विचाराच्या दिशेनी समतोलापर्यंत खेचूया तर ते मात्र मान्य होत नाही. समाज भावनेच्या बाजूला अतिरिक्त प्रमाणात कशामुळे झुकला हे बघायला गेलं तर दोन गोष्टी स्पष्ट दिसतात.

एक म्हणजे प्रत्येक माणूस स्वतःच्या भविष्याची चरितार्थाची किंवा मनःशांतीची चिंता या एका भावनेमुळे हवालदिल आहे. वरवर बघितलं तर तो गाताना, नाचताना, हसताना दिसेल. पण ते दृश्य फसवं आहे. माणूस आतून घोर काळजीत आहे. त्या चिंतेच्या भावनेच्या ओझ्यामुळे तो झुकलेला आहे.

दुसरं म्हणजे प्रसारमाध्यमांनी सर्वसामान्य माणसाची बुद्धी किंवा विचार करण्याची क्षमता क्षीण केली आहे आणि त्याच वेळेला अतिशयोक्त भावनांचं भडक चित्रण करून त्याला भावनेच्या बाजूला आणखी ढकललं आहे. ही दोन्ही कारणं जरी समजली तरी सत्य ते सत्यच आहे. समतोलापर्यंत त्याला पोहोचवण्यासाठी

स्पष्ट विचारांचं बळ त्याला द्यायला हवं आहे. माझी त्याबद्दल खात्री आहे. मला जर वाटलं असतं की, माणूस फार विचारांच्या दिशेनी झुकला आहे तर मी भावनांच्या दिशेनी त्याला खेचलं असतं कारण शेवटी समतोल हा उद्देश आहे.

या सगळ्या प्रयत्नात दोन मोठ्या अडचणी मात्र आहेत. विचाराच्या दिशेनी खेचणं म्हणजेच विवेकनिष्ठ विचारसरणीमधे खेचणाऱ्याला फार कष्ट आहेत कारण कोट्यवधी लोकांना खेचण्याचा तो लढा आहे. दुसरी अडचण म्हणजे विवेकनिष्ठ विचाराच्या पुरस्कर्त्याला लोक कोरडा किंवा भावनाहीन, असंवेदनशील समजतात. ते खरं नाही हे त्याला स्वतःला माहिती असतं. पण लोकांची तशी गैरसमजूत, उघड किंवा पाठीमागे टीका सहन करावी लागते. थोडक्यात, या कारणांमुळे हा मार्ग लोकप्रिय होऊ शकत नाही. मला याची अगदी स्पष्ट कल्पना आहे.

मी आता 72 वर्षांचा आहे. शोभा 69ची आहे. हे सगळं पुस्तकात उतरवणं शक्य आहे तोपर्यंत लिहिलेलं बरं असं वाटल्यामुळे मी इथे दोन गोष्टींवर भर देऊन लिहायचं ठरवलं.

1. समाजाचं वैवाहिक आयुष्य, त्याखेरीजचं रोजचं आयुष्य, त्यातले समाजाचे प्रश्न आणि त्यावर उपाय
2. शोभाच्या आणि माझ्या वैवाहिक सहजीवनाचं चरित्र. सहजीवनाचं चरित्र या शब्दाकडे मला लक्ष वेधायचं आहे कारण हे माझं किंवा शोभाचं व्यक्तिगत चरित्र नाही.

या पुस्तकाबद्दलचा एक निर्णय पक्का केलाय तो असा. व्यवस्थापनशास्त्र, मानसशास्त्र, तत्त्वज्ञान या माझ्या अभ्यासातल्या तीनही विषयांत मूळच्या अभ्यासातच असे अनेक शब्द आहेत की, त्यांचं ओढूनताणून मराठी भाषांतर करण्याच्या फंदात न पडणं चांगलं. काही भाषांतरित शब्द सोपे, काही आधीच प्रचलित असलेले आहेत ते वापरले. बाकीचे खुशाल देवनागरी लिपीत इंग्लिश शब्द वापरायचे असं ठरवलं, कारण हे पुस्तक लोकांनी वाचावं, त्यांना ते सोपं जावं, त्यातल्या गोष्टी त्यांनी अमलात आणाव्यात ही इच्छा आहे. मग समजायला कठीण करून कसं चालेल? याबद्दलचे सोपे-कठीण वगैरेचे निर्णय मीच

वाचकांबद्दलच्या माझ्या अंदाजानी घेतले आहेत. त्या माझ्या अंदाजात काही चूक आढळली तर नंतर ती जरूर दुरुस्त करीन.

आणखी एक निर्णय घेतला. हे पुस्तक वाचणाऱ्यांपैकी कॉम्प्युटर वाचणाऱ्यांचं प्रमाण जास्त असेल असं मला वाटतंय. त्यामुळे जीवनसाथच्या वेबसाईटवरून हे सबंध पुस्तक बघता येईल, छापता येईल अशी व्यवस्था करणार आहे. ज्यांना कागदावर छापलेली अक्षरंच सोयीची वाटतात त्यांच्यासाठी छापील पुस्तकाचीही सोय असणार आहे.

मी स्वतः व्यवस्थापनशास्त्र शिकलेलो असल्यामुळे आणि गेल्या अनेक वर्षांमधे तो विषय शिकवल्यामुळे विषयाचे भाग पाडण्याची मला सवय लागली आहे. वाचणाऱ्यांना ते सोयीचं जाईल याबद्दल माझी खात्री आहे.

एक प्रश्न सगळ्यांना पडेल त्याचं आधीच स्पष्टीकरण करतो. आपलं म्हणणं थोडक्यात मांडावं अशी शिफारस मी अनेक वेळा ठिकठिकाणी केली आहे, तर मग जीवनसाथ म्हणजेच जीवनभर स्पष्ट विचारांची साथ हा विषय समजावून सांगताना एवढी थोरली जवळपास 3000 पानं आणि बारा पुस्तकं कशासाठी लिहिली? याचं उत्तर असं आहे. 18 वर्षं एवढ्या निरनिराळ्या लोकांशी बोलताना एक गोष्ट लक्षात आलेली आहे. कुठच्या शब्दांत कुठच्या पद्धतीनी कुठच्या वेळेला कोणाला मुद्दा समजेल याला कुठचाही नियम नाही. तो संवाद साधण्याची तीव्र इच्छा असल्यामुळे माहिती असलेले सगळे मार्ग वापरायचे, असं मी ठरवलं. त्यामुळे मजकूर वाढला.

किती बारकाव्यात शिरायचं, किती सविस्तर सांगायचं याबद्दल माझा विचार तळ्यात-मळ्यात होता. तो पक्का कशामुळे झाला तो प्रसंग सांगतो. सकाळी चार वाजता नियमितपणी रोज उठून मी हे पुस्तक लिहिण्याचं काम करतोय. मधे व्यायाम, रोजचं आवरणं आणि समुपदेशनाच्या ठरलेल्या वेळा हे सांभाळून, किंचित टी.व्ही. बघून मी रोज रात्री 10 वाजता झोपतो. त्यातला व्यायाम मला रोज 3 ते 4 वेळा करावाच लागतो, नाहीतर माझी कंबर, खांदे, मान दुखायला लागतात आणि ही सगळी कामं, लिखाण शक्यच होत नाही. व्यायामाबद्दलच्या अनुभवामुळे माझा निर्णय झाला. कसा ते सांगतो. माझ्या डॉक्टरांनी मला जे व्यायाम सांगितले त्याबद्दल माझी जराही तक्रार नाही. ते सोपे आणि उपयोगी व्यायाम आहेत. ते व्यायाम त्यांनी मला रोज 6 वेळा करायला

सांगितले होते. माझी अडचण निराळीच होती. पहाटे व्यायाम नक्की जमायचा. माझं 'काउन्सेलिंग शेड्यूल' सुरू झालं की, त्यात मला मधे दिवसा व्यायाम शक्यच व्हायचा नाही. थोडक्यात, पहाटे आणि रात्री दोनदाच मला खात्रीशीरपणे व्यायाम जमायचा. अर्थातच तेवढा व्यायाम पुरायचा नाही. शेवटी मान, खांदे, कंबर दुखायचीच. साधारण दोन महिने मी निरनिराळ्या युक्त्या करून बघितल्या. पण त्यांतली एकही युक्ती उपयोगी पडली नाही. त्रास तसाच्या तसाच.

दोन महिन्यांनंतर मी तोच व्यायाम पहाटे आणि रात्री लागोपाठ दोनदा करायला लागलो. म्हणजे त्याची बेरीज झाली चार वेळा व्यायाम. दोन वेळचा प्रश्न उरला. मग मी त्या व्यायामाचे छोटे भाग केले. दिवसभरातल्या वेळापत्रकात जमतील तसे, तेवढ्या मिनिटांत बसतील तसे तुकड्यातुकड्यांत व्यायाम करत गेलो. या पद्धतीनी कधी पाच वेळा तर कधी सहा वेळा व्यायाम व्हायला लागला. माझा प्रश्न सुटला. मला त्यासरशी साक्षात्कार झाला की समुपदेशनार्थींचा प्रश्न, दिनचर्या, स्वभाव, कौटुंबिक प्रश्न, सगळ्या गोष्टी लक्षात घेऊन उपायांचे पर्याय सविस्तरपणी मांडले तरच त्याला त्याचा खरा उपयोग होतो. माझे गेले तसे दोन महिने त्रास सोसत वाया जात नाहीत. त्यामुळे या कार्यशाळेत म्हणजेच या पुस्तकात एकदम बारकाव्यात सविस्तर सांगायचं हा निर्णय एकदम पक्का झाला.

ही कार्यशाळा घेताना, हा मजकूर लिहिताना मला अनेक भूमिकांच्यात शिरावं लागणार आहे. दोन मुख्य भूमिका म्हणजे समुपदेशक आणि ज्येष्ठ अभ्यासू मित्र. पुन्हा या दोन भूमिकांमधून बोललेल्या, लिहिलेल्या मजकुराची सरमिसळ होणार हेही निश्चित आहे. कधी मित्र म्हणून गमतीगमतीत एखादी गोष्ट सांगितलेली असेल, तर कधी माझा समुपदेशनातला गंभीर अभ्यास त्यात डोकावेल. कधी मला न सुटलेला प्रश्न मी मांडलेला असेल.

समुपदेशन या सबंध विषयाविषयी खूप गैरसमजुती आहेत. वेड लागलेल्या माणसाला वेड्यांच्या हॉस्पिटलमधे ठेवतात ही गोष्ट सगळ्या भारतीयांच्या मनावर थेट कोरलेली आहे. समुपदेशकाकडे देखील वेड लागलेली माणसंच जातात असा त्यांचा विश्वास असतो. त्यामुळे समुपदेशकाकडे जायचा विषय निघाला की, 'वेड लागलंय का?' हा प्रश्न लोकांच्या मनात असतो. ज्याला समुपदेशन म्हणजे काय हे समजलं त्याचा बरोब्बर उलटा प्रश्न असतो, 'इतका त्रास होतोय तरी

अजून तू समुपदेशकाकडे गेला नाहीस? असा वेडेपणा करू नकोस.'

समुपदेशन या विषयाच्या अंतरंगाच्या पसाऱ्याची लोकांना कल्पना नसते. जीवनसाथमधे 60 विषयांची यादी आम्ही वापरतो. त्यांच्यापैकी विषय निवडण्याचं काम सभासदच करतात आणि दर महिन्याच्या पहिल्या रविवारी एक एक विषय गटचर्चेसाठी ठेवतात. लोकांना पडलेला प्रश्न असा असतो की, आयुष्यात एवढ्या साठ विषयांचा संबंध खरोखर येतो का? माझ्या दृष्टीनी हो. माझ्या 72 वर्षांत माझा तर त्यातल्या प्रत्येक विषयाचा संबंध आला बाबा!

आणखी एक प्रश्न अनेकांच्या मनात असतो. प्रत्येक व्यक्तीचा स्वभाव निराळा असतो. प्रत्येकाचा प्रश्न स्वतंत्र आणि खासच असतो. घडणाऱ्या घटनाही निराळ्याच आणि खास असतात. चांगल्या घटना आणि वाईट घटना दोन्ही त्या त्या व्यक्तीलाच फक्त तपशीलातल्या बारकाव्यासकट माहीत असू शकतात. मग निराळीच कुठचीतरी त्रयस्थ व्यक्ती तो प्रश्न कसा सोडवू शकेल? याचं खरं उत्तर असं आहे की, जगाची लोकसंख्या कितीही असली तरी व्यक्तिमत्त्वाचे प्रकार मोजकेच असतात. चांगल्या आणि वाईट घटनांचेही मोजकेच प्रकार असतात. समस्यांचंही तसंच असतं. व्यक्तिमत्त्वाचे, घटनांचे आणि समस्यांचे या तीन गोष्टींच्या प्रकारांची सांगड कशी घालायची हे समुपदेशकाला माहिती असतं. तेवढी दिशा त्यांनी दाखवली की, प्रश्न सुटण्याच्या दिशेनी एक एक पाऊल पडायला लागतं. समुपदेशनार्थींनी अभ्यास मात्र मनापासून करावा लागतो. अगदी कॉलेजमधे असताना जसा विषय, त्यातले मुद्दे, त्यांचा क्रम, त्यांची प्रश्नोत्तरं, त्यांबद्दल चर्चा, पडताळणी, लिखाण असतं तसं सगळं करावं लागतं.

मी व्यवस्थापनशास्त्र अमेरिकेत शिकलो ते बांधकामापुरतं. त्या ज्ञानाचं भारतीयीकरण केल्याशिवाय त्याचा इथे उपयोग नाही, हे मला पदोपदी जाणवलं. तेवढं केल्यावर मात्र व्यवसायात त्याचा खूप फायदा झाला. माझ्या आणि शोभाच्या वैवाहिक आयुष्यासाठी, कुटुंबासाठी उपयोगी असं त्यात फारसं नव्हतं. ते कसं शोधायचं याबद्दल माझ्या सुप्त मनात सतत विचार चालू होता. मी त्या माझ्या प्रयत्नांना 'रिलेशन्स मॅनेजमेंट' असं म्हणायचो. या नावाची काही लोक टिंगल करायचे. ते म्हणायचे, 'जी रिलेशन्स मॅनेज करावी लागतात त्यांच्यात अर्थच काय?' खरं असंय, मला शोभाशी बोलताना देखील कुठच्या शब्दांत, केव्हा, कसं याचा विचार करावा लागतो. ती 'मॅनेजमेंट'च आहे आणि त्यात

वाईट काहीच नाही. शोभाला न दुखावता माझा प्रश्न सोडवणं हाच तर उद्देश आहे.

पुढे अनेक वर्षांनी वैवाहिक समुपदेशन या विषयात पीएच.डी. करायची ठरवून मी मानसशास्त्राच्या मार्गानी गेलो. मानसशास्त्रामधे समोर आलेली 'थिअरी' प्रचंड होती. काही गोष्टींचा खोलवर अभ्यास आणि बाकीच्यांचा तुलनेनी वरवर अभ्यास असं ठरवावंच लागलं. मी पूर्वी शिकलेल्या व्यवस्थापनशास्त्रातल्या अनेक मुद्द्यांचा निराळा अर्थ मला दिसायला लागला. त्यामुळे पीएच.डी. 'थीसिस' लिहिताना मानसशास्त्र आणि व्यवस्थापनशास्त्र या दोन्हींचा उपयोग विवाहानंतरच्या आयुष्याला कसा करता येईल याच्या मागे मी लागलो. त्यावेळेला सारखं मनात यायला लागलं की, सगळ्या शास्त्रांच्या, ज्ञानाच्या मुळाशी तत्त्वज्ञान आहे. त्यामुळे तत्त्वज्ञानाचा अभ्यास केला पाहिजे. ते शक्य नव्हतं. कारण ठरलेल्या वेळेत आणि पृष्ठसंख्येत ते बसलं नसतं. त्या 'थीसिस'मधे मी माझ्या स्वतःच्या काही कल्पना मांडल्या. गंमत म्हणजे त्याच्यावर जो रिपोर्ट लिहून आला त्यात संशोधन करणाऱ्यानी मी स्वतःची कल्पना मांडली त्याबद्दल टीका केली होती. स्वतःचं डोकं चालवणं याला 'ॲकॅडमिशियन्स'च्या जगात वाईट समजतात हे मला त्यावेळी थप्पड खाल्ल्यासारखं कळलं. मी तर 'सेल्फ मेड' आणि 'अप्लाइड' प्रकारचा माणूस आहे. मी त्याला मान झुकवली नाही. माझ्या दृष्टिकोनातून आत्तापर्यंत थोर लेखकांनी, संशोधकांनी म्हटलं तेच मानत राहणं, बोलत, शिकवत राहणं, यापेक्षा स्वतःचा विचार मांडणं जास्त चांगलं आहे.

त्यामुळे मी साधारण सहा-सात वर्षांपूर्वी 'विवाहाचं तत्त्वज्ञान' या विषयाच्या मागे लागलो. मला हवं ते कुठे सापडेना. तत्त्वज्ञानाच्या प्राध्यापकांशी बोललो. 'वैवाहिक आयुष्याचं तत्त्वज्ञान' असा स्वतंत्र अभ्यास झालेला नाही असं कळलं. मग मीच त्या गोष्टी वाचून, माझ्या पद्धतीनी मांडायच्या ठरवल्या. मी 'हार्डकोअर फिलॉसॉफी शिकवणारा ॲकॅडेमिशियन' नसल्यामुळे मी जे या पुस्तकात मांडलंय ते तत्त्वज्ञानातल्या विद्वान, अनुभवी लोकांच्या दृष्टिकोनातून अर्धवट आणि निराळंच किंवा विक्षिप्त असू शकेल; पण आता मी थांबायला तयार नाही. मी मांडतो ते उपयोगी आहे याबद्दल मला शंका नाही, कारण मी ते अनेक वेळा बोलून, मांडून बघितलंय आणि तरी मी यामधे कुठच्याही दुरुस्तीला तयार आहे हे महत्त्वाचं आहे. मी स्वतः कुठे कमी पडतो याचा माझा शोध अखंड चालूच

आहे. तेव्हाच तर माझ्या वागणुकीत दुरुस्ती होईल. या पुस्तकात मी कसा कसा बदलत म्हणजे सुधारत गेलो त्याचीच कहाणी आहे म्हटलं तरी चालेल.

स्वतःला स्वतःबद्दल नीट कळणं ही फार महत्त्वाची गोष्ट आहे. कारण स्वतःच्या शोधाची प्रक्रिया समजली की, इतरांना समजणंही सोपं जातं. ते जमलं की बऱ्याच बाबतींतले छुपे/उघड संघर्ष संपतात, निदान कमी होतात आणि शेवटी माणूस मनःशांतीपर्यंत पोहोचण्याची शक्यता हळूहळू वाढत जाते.

प्रत्यक्ष अनुभवानंतर माझी खात्री झालीय की, काहीही समजावून सांगण्याचा मुख्य उद्देश लोकांना समजणं हाच आहे. तीच सांगणाऱ्याची खरी परीक्षादेखील आहे. त्या दोन्हींच्या वापराचं म्हणजे थिअरी आणि प्रॅक्टिसविषयी बोलण्याचं माझ्या दृष्टीनी प्रमाण थिअरी एक वाक्य, तर प्रॅक्टिसविषयी 100 वाक्यं असं आहे.

मला वाटणारी अगदी मुळातली गोष्ट प्रथम सांगतो. शब्दशः काहीही म्हणजे अगदी काहीही कोणीही करत असलं, तरी त्याचा हेतू दोन शब्दांत वर्णन करता येतो. 'समाधान मिळवण्यासाठी'. इतरांच्या दृष्टीनी ते कृत्य चांगलं, वाईट, 'ग्रेट' कसंही असो, तो माणूस ती गोष्ट स्वतः समाधान मिळवण्यासाठीच करत असतो. लहानपणीचा स्वतःचा खेळ, अभ्यास, धांगडधिंगाही स्वतःला आनंद मिळवण्यासाठीच असतो आणि तरुणांचे वात्रट चाळे, प्रेमप्रकरणं, चांगल्या शिक्षणासाठी केलेली धडपड, करिअरसाठी केलेले प्रयत्नही स्वतःला आनंद मिळवण्यासाठीच असतात. आई-वडलांवर असलेलं प्रेम, आदर, भांडणंही त्यासाठीच आणि अधिक पुढच्या वयातला लग्नाबद्दलचा निर्णयही स्वतःच्या समाधानासाठीच असतो. लग्न न करण्याचा निर्णय असो, अमुक एका व्यक्तीशी लग्न करण्याची कृती असो, शेवटी हेतू एकच. स्वतःच्या मनाविरुद्ध आईवडलांचं मन सांभाळण्याचा निर्णयही शेवटी त्यांचं मन सांभाळण्यामुळे स्वतःला मिळणाऱ्या समाधानासाठीच असतो. समाजासाठी निरपेक्षपणी काहीतरी करू हाही निर्णय स्वतःच्या समाधानासाठीच असतो. इतरांचा फायदा हे त्याचं 'बाय प्रॉडक्ट' असतं.

थोडक्यात, हा सगळा माझा प्रयत्न समाजाच्या जगण्याचा दर्जा सुधारण्यासाठी म्हणजेच 'क्वालिटी लाईफ'साठी आहे. जीवनसाथचं सगळं काम 'प्रिव्हेंटिव्ह' काउन्सेलिंगवर भर देणारं आहे. पण आपल्या समाजात 'क्युरेटिव्ह' कामच जास्त लोकप्रिय आहे आणि मानसिक अस्वास्थ्याच्या बाबतीत काहीच न करता नुसतं

सोसणं त्याहून लोकप्रिय आहे. त्याच्याहीपेक्षा वरच्या नंबरवर लोकप्रियतेच्या शिखरावर जोडीदाराला किंवा मुलांना छळणं आहे. त्याबद्दलचं हे प्रबोधनाचं काम आहे.

लोकांचे अनेक प्रश्न असतात. त्या प्रश्नाचं मूळ शोधायला गेलं तर त्याची मुळं त्यांच्या लहानपणाच्या वाढीत सापडतात. लहानपणी त्यांची वाढ चुकीच्या पद्धतीनी झालेली असते. म्हणजेच पालकांची वागण्यात चूक झालेली असते. त्या पालकांच्या वागण्यातल्या चुकीची कारणं शोधली तर ती त्यांच्या सह-जीवनात सापडतात.

माझा दृष्टिकोन कायम विवेकनिष्ठ बुद्धिवाद्याचा आहे. बुद्धी शब्दावरून आमच्याकडे नेहमी गंमत चालते. मी कुठलाच धर्म मानत नाही, हे सगळ्या जीवनसाथींना माहिती आहे. माझ्या विवेकवादाला ते 'बुद्धिझम' म्हणतात. तो गमतीचा भाग तात्पुरता सोडला तरी एक गोष्ट नक्की. विवेकनिष्ठ विचारांनी सहजीवनाकडे बघता आलं तरच उपाय सापडेल. म्हणून सहजीवनाबद्दल काहीतरी करता येतं का बघूया. त्यासाठी या पुस्तकाचा महाप्रपंच.

पैशाबद्दलची विचारसरणी किंवा आर्थिक व्यक्तिमत्त्व आणि करीअरचं या दोन्ही विषयांचा खूप बारकाव्यानी अभ्यास करण्याची गरज भागते कारण हळूहळू चरितार्थ नीट चालवण्याचा झगडा फार अडचणीचा व्हायला लागला आहे.

त्याविषयीच्या पर्यायांमधे परदेश या विषयाशी अनेकांचा संबंध यायला लागला आहे. त्याबद्दलच्या वास्तवाशी नीट परिचय असावा या इच्छेनी मी परदेशाबद्दलचे माझे अनुभव आणि विचार इथे मांडले आहेत.

महत्त्वाची गोष्ट अशी आहे की, माणसाला कुठचाही प्रश्न असो, त्यावरच्या उपायाला सुरुवात झाली किंवा केली तरी स्वस्थ वाटतं.

●

आर्थिक व्यक्तिमत्त्व

●

करीअरचं नियोजन

जीवनसाथ

जीवनभर स्पष्ट विचारांची साथ म्हणजेच जीवनसाथ

अनुक्रम

पुस्तक क्र. 4

1) पैशाबद्दलची विचारसरणी .... 25 ते 97

1. पैशाबद्दलच्या विचारसरणीची प्रक्रिया । 25
2. विवाहापूर्वी आर्थिक व्यक्तिमत्त्वाची पारख । 36
3. मिश्रगट कार्यशाळा– प्रश्नावलीचा उपयोग । 40
4. कामाचं स्वरूप आणि करिअर प्लॅन । 47
5. मिळवती बायको । 51
6. पिढीतला फरक । 52
7. गरिबीमुळे येणारी समृद्धी । 53
8. उसनवारी, कर्ज, परतफेड । 55
9. बचतीच्या सवयी । 60
10. प्रामाणिकपणा– रास्त भूमिका । 61
11. मध्यमवर्गीय असण्याचे फायदे । 65
12. मोह, फसणं, फसवणं । 74
13. दातृत्व । 83
14. भ्रष्टाचार– काळा पैसा । 84
15. व्यसनं । 88
16. पैशाबद्दलचा कौटुंबिक सुसंवाद-विसंवाद । 89

17. आर्थिक विषमता– देशाची धोरणं । 95

2) शिक्षण आणि करिअर .... 98 ते 143

1. सध्याची परिस्थिती । 98
2. परीक्षांची पद्धत । 106
3. शिक्षणाची योग्य पद्धत । 109
4. शैक्षणिक इमारती, इतर सोयी । 117
5. वैवाहिक आयुष्यात शिक्षणाचं महत्त्व । 119
6. आयुष्यात करिअरचं महत्त्व । 121
7. जीवनशिक्षणासाठी योग्य मार्ग । 128
8. करिअरचं नियोजन आणि बदल । 134
9. भागीदारीतली करिअर । 140
10. तीन मिनिटांचा खेळ । 141

3) परदेश .... 144 ते 161

4) बचत .... 162 ते 174

1. बचत । 162
2. विमा । 173

5) आभार 197

●●●

1

पैशाबद्दलची विचारसरणी

1) पैशाबद्दलच्या विचारसरणीची प्रक्रिया

जीवनसाथच्या एका कार्यशाळेत एक खेळ घेतला होता. कल्पना करा की, तुम्ही वैवाहिक आयुष्यं तपासणार आहात नि त्या परीक्षांचे तुम्ही पेपर सेटर आहात. एकूण 100 मार्क. त्यात 3 पेपर ठेवायचे. 1) पैसे ऊर्फ काम, चरितार्थ 2) शारीरिक आरोग्य-तब्येत, व्यायाम, आहार, सवयी वगैरे. 3) मानसिक स्वास्थ्य-विशेषतः वैवाहिक ताण नसण्यामुळे मिळणारं सहजीवनातलं स्वास्थ्य. कुठच्या पेपरला तुम्ही किती मार्कांची परीक्षा ठेवाल आणि का ते सांगा.

या खेळात, चर्चेत साधारणपणे मुलगे पैसे मिळवण्याला जास्त मार्क देतात. मुली तीनहीला सारखे मार्क ठेवतात. विवाहित स्त्री-पुरुष मात्र जास्त मार्क सहजीवनातल्या स्वास्थ्याला, त्याखालोखाल आरोग्याला आणि शेवटी पैशाला देतात. कमाल आहे! लग्नापूर्वीच्या आणि अनुभवी विवाहित लोकांच्या मतांत एवढा फरक असावा?

याच्या अभ्यासासाठी मुद्दामहून आपण आपल्या लहानपणापासून आठवायला सुरुवात करूया. शाळेत असताना आपली बरोबरीच्यांशी मैत्री असते, पण व्यवहार त्यात कधी फारसा येत नाही. कॉलेजमधे जरा खिशात पैसे असतात, कोणी कोणासाठी खर्च करायचा हा प्रश्न निर्माण होतो. होस्टेलवर उधाऱ्याही चालतात. काही लोक तेव्हापासून पैशाला चोख असतात, देताना आणि घेतानाही. काही स्वतः खिशातून कधीच पाकीट काढत नाहीत. उलट आपले पैसे दुसऱ्याकडून कसे उकळायचे यासाठी आयाडिया करत असतात. याउलट कायम

दात्याच्या भूमिकेत असणारे आणि श्रीमंतीची खरी किंवा खोटी ऐट दाखवणारेही असतात. ही सगळी वागणूक म्हणजेच पैशाबद्दलची विचारसरणी किंवा आर्थिक व्यक्तिमत्त्व. त्याचा अभ्यास आपल्याला या आजच्या कार्यशाळेत करायचा आहे.

पैशाच्या व्यवहाराच्या बाबतीत कुठची व्यक्ती कशी वागते, रास्त वागणूक आहे का नाही याचं निरीक्षण आणि त्यामागची पार्श्वभूमी समजून घेणं हा गमतीचा भाग असतो. आम्ही एका मैत्रिणीबरोबर काही दिवस सहलीला गेलो होतो. प्रवास, राहणं, जेवणं यावर तर मुख्य मोठा खर्च होणार होता. त्या खर्चाचा एक तृतीयांश तिनी देणं अपेक्षित होतं. त्याबद्दल ती एक अक्षर बोलायला तयार नव्हती, पैशाचं पाकीट बाहेरच काढत नव्हती. त्या प्रवासात एके ठिकाणी एक छोटा खर्च होता तो तिनी लगबगीनी जाऊन केला याचा अर्थ 'एकहाती खर्च होऊ दे, मग हिश्श्याचा हिशेब करू' अशी तिची समजूत नक्की नव्हती. शेवटपर्यंत या मैत्रिणीनी तिच्या वाटणीचे पैसे दिले नाहीत, किती ते विचारलं नाही, शेवटी बुडवलेच.

अशाच दुसऱ्या एका कौटुंबिक सहलीत एक बाई आमच्याबरोबर होत्या याला किती खर्च येणार, मी किती द्यायचेयत् अशी चौकशी लहान मुलं करणार नाहीत हे आपण समजू शकतो. कुठच्याही सज्ञान माणसानी असा खर्चाच्या हिश्शाचा विचार न करणं शोभत नाही. या बाई तर चांगल्या पन्नाशीमधल्या होत्या. प्रवासाला निघालेल्या व्यक्तींपैकी वयानी सर्वांत लहान होत्या. जिथे पैसे खरचण्याचा प्रश्न नसेल तिथेही त्या कामासाठी जागेवरून उठायच्या नाहीत, एखादी नुसती चौकशी करण्याचा प्रश्न असला तरी, ती करण्यासाठी तोंडही उघडायच्या नाहीत. एखादी निर्जीव वस्तू बरोबर नेऊन परत आणावी तशा या बाई बोचक्यासारख्या आमच्याबरोबर बाहेरगावी आल्या होत्या आणि आमच्या बरोबर परत आल्या.

कार्यक्रमांसाठी, भाषणं, कार्यशाळा वगैरेंसाठी शोभा अनेक ठिकाणी जाते. तिच्या मानानी मी कमी ठिकाणी जातो. नंतर शोभा आणि मी आम्हाला त्या निमंत्रण करणाऱ्या व्यक्तीचं किंवा संस्थेचं आर्थिक व्यक्तिमत्त्व कसं वाटलं हे बोलतो. मी आणि शोभा सुखवस्तू, उच्चमध्यमवर्गीय असल्यामुळे निव्वळ पैशासाठी आम्ही कुठचंच काम करत नाही, कुठचंच निमंत्रण पैसे कमावण्यासाठी स्वीकारत नाही. पण कोण कसा पैशाचा व्यवहार करतं, त्यावरून त्यांच्या आर्थिक व्यक्तिमत्त्वाविषयी आमचे अंदाज ताडून पाहाणं हा मात्र आमचा

आवडता उद्योग आहे.

काही ठिकाणी निमंत्रण करणारी व्यक्ती किंवा संस्था निश्चित पैसेवाली आहे हे आम्हाला माहिती असतं. खुद्द कार्यक्रमात मात्र पैशाचा विषयच कोणी काढत नाही, नंतर देखील नाही. आम्ही आपणहून पैसे मागणार नाही हे नक्की असतं. त्यांची मात्र कमाल वाटते. मोठा धंदा, थाटामाटात समारंभ, जेवणं. सगळं चालू असतं. काही लोक तर जागतिक पातळीवरची कामं करत असल्याचा दावा करतात. कधी कधी त्या कार्यक्रमामागच्या व्यक्तीची आमची ओळखही नसते आणि तरीदेखील त्या निर्णय घेणाऱ्या माणसाचं आर्थिक व्यक्तिमत्त्व स्पष्टपणी कळतं.

गरिबीतून वर येऊन अकस्मात बरेच पैसे हातात खेळायला लागल्यावर दारुच्या आहारी आणि मित्रांना स्वखर्चानी ट्रीट करण्याच्या मोहात पडून बरबाद झाल्याची उदाहरणं मी बघितली आहेत. अगदी मध्यमवर्गीय सुसंस्कृत, सुशिक्षित घरात देखील. अशा लोकांच्यात वास्तव विचारांचा अभाव हा मुख्य प्रश्न असतो.

आमच्या एका मैत्रिणीच्या लहानपणी गरिबी होती. लहापणच्या गरिबीमुळे माणसावर दोन्ही टोकांचे परिणाम बघायला मिळतात. काही माणसं जन्मभरासाठी चिक्कू बनतात. त्यांच्याकडे सुबत्ता आली तरी ते काटकसरीनीच वागतात. दुसरं टोकही दिसतं. ते पैशाला हावरट, खर्चाला उधळे बनतात. पण दुसऱ्याला काही देणं त्यांच्या जिवावर येतं. आमच्या या मैत्रिणीचा निराळाच प्रकार आहे. तिला वस्तू, खाद्यपदार्थ, वेळ, श्रम फक्त देण्याचीच हौस आहे. दुसऱ्याकडून काही घ्यायला मात्र खळखळ करते.

मी आणि शोभा एवढ्या निरनिराळ्या देशात निरनिराळ्या समाजात एवढी वर्षं निरनिराळ्या प्रकारचे गट बघत किंवा चालवत आहोत. एका बाबतीत आमची पूर्ण खात्री झालीय. जो खर्च येईल तो हजर असलेल्या लोकांच्यात वाटून घेणं, थोडक्यात सोल्जर्स काँट्रिब्यूशन किंवा 'गोइंग डच' यासारखा उत्तम मार्ग नाही. याबद्दल भारतीय लोकांपेक्षा पाश्चात्त्यांमधे जास्त समज आढळते. आपल्याकडे बाहेर जेवायला दोन माणसं, दोन कुटुंबं गेली तर 'पैसे मी देणार' वरून भांडणं, वादावादी, खेचाखेची होते. मी अनेक वेळा समजावून सांगायचा प्रयत्न केला की, आपण एकत्र खाणंपिणं आणि एकत्र सहवासासाठी जमतो, पैसे एकानी दुसऱ्याचे देणं ह्यासाठी नाही, पण एकूण ते कठीणच जातं. मी, शोभा आणि आमची मुलं, शोनील आणि आभा आणि त्यांचे जोडीदार श्रेयस आणि

ॲनास्तेसिया, आमच्यापुरती आम्ही ही पद्धत पाळतो. एकत्र सहलीला, जेवायला गेलो तरी खर्च विभागून घेतो. ते सर्वांत सुखाचं असतं. यानीच संबंध उत्तम राहतात याबद्दल आमची पूर्ण खात्री आहे.

मित्र-मैत्रिणींच्या गटात पैशाच्या व्यवहाराच्या बाबतीत काही लोक नुसती मैत्री करतात, पण व्यवहार टाळतात. काही ओळखी, मैत्र्या फक्त व्यवहारामुळे झालेल्या आणि टिकलेल्या असतात. अर्थात व्यवहार संपला की ती मैत्री संपते. काही लोक मैत्रीलाही घाबरतात आणि व्यवहारही टाळतात. फारच कमी लोक असे असतात की चोख व्यवहारही करतात आणि मैत्रीही टिकवू शकतात.

माझा, शोभाचा, जीवनसाथ संस्थेचा असा विश्वास आहे की, व्यवहार रास्त रकमेचा, परवडेल असा, पण आग्रहानी पूर्ण केलेला असलाच पाहिजे. फुकट काही घ्यायचं नाही आणि द्यायचं नाही असं धोरण आम्ही पक्कं सांभाळतो. जीवनसाथची फी अगदी कमी आहे. आयुष्यभरासाठी एकरकमी रु.1500/-. वैयक्तिक समुपदेशन असलं तर प्रत्येक भेटीला प्रत्येकाचे रु. 100/- फक्त. फी एवढी कमी असतानाही ते देण्याचे, टाळण्याचे अनेक नमुने दिसतात. ती फी माणूस कशी, केव्हा देतो, टाळतो यावरून अगदी सुरुवातीलाच आर्थिक व्यक्तिमत्त्वाचा अंदाज येतो.

या निमित्तानी आणखी एक मुद्दा सांगतो. आपल्या कुटुंबाची आर्थिक परिस्थिती कशी आहे हे आईवडील मुलांना सांगत नाहीत. त्यांचा हेतू चांगला असतो, पण त्याचा पुढे त्रास होतो. अगदी लहानपणापासून कुटुंबाच्या बजेट मीटिंग्जचा आम्हाला फार चांगला अनुभव आहे. मुलांच्या ताब्यात खर्चाला पैसे जरूर द्यावेत पण टप्प्याटप्प्यानी. खर्च लिहिणं, त्याचं पृथक्करण करणं, यापुढच्या खर्चाचं, मिळकतीचं प्लॅनिंग संबंध कुटुंबानी करणं ही गोष्ट पण तशीच जादू करते.

मगाशी उल्लेख केला त्या खेळात 40-50 वयातल्या जवळजवळ सगळ्या विवाहित स्त्री-पुरुषांनी पैशाच्या पेपराला 100 पैकी 10 ते 15 मार्क फक्त ठेवले होते. याचा अर्थ वैवाहिक आयुष्याचं मर्म सहजीवनातलं स्वास्थ्य आहे हे त्यांना कळलंय्. माझ्या पिढीलाही ते कधीकधी खूप उशिरा कळतं, पण पुढच्या पिढीच्या या मुलामुलींना काही महत्त्वाच्या गोष्टी आपल्यापेक्षा आधी कळल्या तर बरं होईल!

जवळजवळ सगळी अनुभवी विवाहित मंडळी समाधानी सहजीवनाला

पैशापेक्षा जास्त महत्त्व देताना दिसली. तरुण मात्र पैशाला जास्त महत्त्व देतात, हे आपण बघितलं. प्रश्न असा की, आधीच्या पिढीला स्वस्थ सहजीवनाचं महत्त्व कळलेलं आहे हे नक्की. मग ते आपल्या स्वतःच्या मुलामुलींना ही महत्त्वाची गोष्ट का सांगत नाहीत? त्यांना पैशाचा लोभ, खर्चिक लग्नसमारंभ, हुंडा, डावपेच, या वाटेनी का जाऊ देतात? कामाच्या समाधानासाठी, कामावरच्या प्रेमासाठी करिअर प्लॅन करावा, मेहनत करावी, पैसे नक्की मिळतात. चरितार्थासाठी प्रत्येकानी पैसे मिळवायलाच पाहिजेत पण दुसऱ्याला फसवायचं नाही हे का सांगत नाहीत?

जरुरीपेक्षा जास्त पैसे मनःस्वास्थ्य घालवतात. आमच्या अभ्यास-मंडळातल्या कार्यक्रमात याबद्दल आत्मकथनाचा खेळ असतो. प्रत्येकानी स्वतःचा विचार, आपल्या कामाचं स्वरूप, बालपणापासूनचे संस्कार, स्वतःवरचे पैशाचे ताण असं सांगायचं असतं. अशा वेळी आमची भूमिका प्रश्न उपस्थित करणाऱ्या फॅसिलिटेटरची असते. आम्ही स्वतःचे अनुभव सांगून पचेल तवढं मार्गदर्शन करतो. जोडीदाराच्या अंतर्गुणांचा शोध या महत्त्वाच्या विषयात जरा जरा प्रगती व्हायला लागते.

ह्या सगळ्या पार्श्वभूमीनंतर रोजच्या आयुष्यात येणारे प्रसंग आणि त्यांच्यामागची मूलतत्वं ही एक एक करून बघूया. प्रथम चरितार्थासंबंधीचे विचार घेऊया कारण ती प्रत्येकाची प्राथमिक जबाबदारी आहे. कुठच्याही मार्गानी काय वाट्टेल ते करून पण प्रत्येक सज्ञान माणसाला स्वतःच्या खाण्यापिण्याची सोय करावीच लागते. त्यातलं मूलतत्व असं की, प्रत्येक जिवंत प्राण्याला जगण्याची ईर्षा असते. मरायची कोणाचीही तयारी नसते. विवाह अभ्यास मंडळात जेव्हा हा मुद्दा चर्चेसाठी निघतो तेव्हा काही लोकांना वाईट वाटतं. आतासुद्धा वाचताना वाईट वाटू शकेल ह्याची मला कल्पना आहे. आणि तरी लहान मुलं, अपंग, विकलांग, मंदबुद्धी, वयोवृद्ध एवढे अपवाद सोडले तर, स्त्री असो पुरुष असो कमीत कमी स्वतःच्या चरितार्थापुरते पैसे प्रत्येकानी मिळवलेच पाहिजेत हेच सत्य आहे. पूर्वीच्या पिढीमधे स्त्रियांचा पोटापाण्याचा उद्योग म्हणजे लग्न अशीच समजूत होती. पण गेल्या काही वर्षांत त्यात हळूहळू बदल होऊन स्त्रीचा व्यवसाय, काम, करिअर वगैरे विषय महत्त्वाचे झाले.

सहजीवनातलं स्वास्थ्य ही गोष्ट अगदी सरळ सरळ मॅरेज मॅच्युरिटीवर अवलंबून आहे. एक नॉर्मल स्त्री आणि एक नॉर्मल पुरुष कोणीही असले तरी विवाह-अभ्यासाच्या आधारानी त्यांना आनंददायक जीवन जगता येईल. पैसे

आणि माणुसकी यांचा तोल साधता आला की बाकी सगळं जमेल. मला हे वाक्य म्हणायला सोपं आहे, पण प्रत्यक्षात आणणं कठीण आहे. विशेषतः समोर दिसणाऱ्या तरुण पिढीला खूपच गुंतागुंतीचं आहे.

आर्थिक व्यवहारामधली परिपक्वता ही काही प्रमाणात जन्मजात, काही प्रमाणात पालकांनी कसं वाढवलं यातून आणि काही प्रमाणात स्वतः कमावलेली असते. त्याचं शिक्षण घ्यायला आणि परिपक्वता यायला बरेच टप्पे पार करावे लागतात. पण परिपक्वता ओळखण्याचे काही निकष सांगतो.

1. आपण जे काम करतो त्याचे रास्त पैसे घेतले पाहिजेत आणि कुठच्या कामाचे किती पैसे याचं छापील पत्रक पाहिजे. छापील पत्रक अशासाठी की, समोरचा माणूस किती पैसे बाळगून आहे, किती अडचणीत आहे त्याचा पैसे आकारण्याशी काही संबंध असता कामा नये.
2. त्या तक्त्यात लिहिल्याप्रमाणे किंवा तोंडी ठरल्याप्रमाणे काम केल्यावर त्याचे पैसे मागायचा जराही संकोच असता कामा नये. हे पैसे मागण्याची भीड चेपणं आणि तरी सभ्यपणी पैसे मागणं, त्याची सभ्यपणी आठवण करणं, म्हणजे परिपक्वतेचाच एक भाग आहे.

एक निराळा मुद्दा मांडतो. ज्या गोष्टी मनुष्यप्राण्यावर वाईट परिणाम करतात ते विकार. अशा विकारांपैकी गेली शेकडो वर्षं सर्वांत जास्त छळणारा पैसे हा विकार आहे. अभ्यासाचा एक टप्पा म्हणून मी 'विमुक्त समाज' या विषयावर वाचन, चर्चा, अभ्यास केला. भारतीयांशी आणि परकीय लोकांशीही बोललो. मुळातल्या माणसाच्या गरजा-अन्न, वस्त्र, निवारा, लैंगिक भूक आणि समानता, आरोग्य ह्या सगळ्याची सोय निसर्गात आहेच. वनस्पती भरपूर अन्न देतात. अनेक पुरुष, स्त्रिया एकत्र राहात असले की लैंगिक भूक भागते. वनस्पतींच्या मशागतीत आरोग्य, समानता सगळे प्रश्न मिटतात. अशा अवस्थेत आपले पूर्वज रहात होते तशी अवस्था आपण निर्माणच करू शकत नाही. ही विमुक्त कल्पना मान्य असलेले लोक आहेत, पण अशी जागा नाही. कुठच्या तरी देशाच्या सरकारचं आपल्यावर बंधन आहेच. राहण्यालायक निसर्ग असलेल्या

सगळ्या जागा सर्व प्रकारच्या बंधनांनी केव्हाच रिझर्व्ह केल्यायत्. प्रगती, सोय, नावीन्य, महत्त्वाकांक्षा, कुतूहल या चांगल्या गोष्टींच्या मागे लागताना जसे अनेक वैज्ञानिक शोध लागले तसे सामाजिक शोध लागले. त्यांतले काही महत्त्वाचे म्हणजे राष्ट्र, विवाह आणि पैसा या संकल्पना, हे तीनही मात्र मोठे विकार ठरले. पटो न पटो, त्यांपासून सुटका नाही अशी अवस्था झाली. विवाहसंस्थेच्या इतिहासाबद्दल अभ्यास मंडळात अगदी पद्धतशीर अभ्यास चालतो. त्यातला हा भाग असतो.

पैसे या गोष्टीचा सर्वसाधारण माणसाचा संबंध प्रथम केव्हा येतो ते बघूया. आठवून बघा. अगदी लहानपणी पहिल्यांदा स्वतः पैसे कमावण्याचा प्रसंग म्हणजे शाळेतलं बक्षीस. नातेवाइकानी वाढदिवसासाठी कौतुकानी दिलेल्या 200 रुपयांपेक्षा स्वतःच्या गुणानी कमावलेल्या त्या 10 रुपयांची किंमत कितीतरी जास्त असते. शाळेमधे खरी कमाई नावाचाही प्रकार होता. काहीतरी श्रमाचं काम दुसऱ्यासाठी करून पैसे कमावण्याचा तो आणखी एक अनुभव होता.

मोठेपणी पैशाच्या बाबतीत योग्य विचार व्हायला पाहिजे असेल तर त्याची सुरुवात लहानपणीच व्हायला पाहिजे. कुटुंबाच्या आर्थिक परिस्थितीप्रमाणे रक्कम कमी किंवा जास्त असेल, पण ते पैसे अंगावर वागवणं, ते सांभाळण्याची जबाबदारी आणि घरी सांभाळून ठेवणं या शिक्षणासाठी प्रत्येक मुलाची स्वतंत्र तिजोरी, जमाखर्चाची वही लिहिणं अशी रचना कुटुंबात असावी, अशी शिफारस आम्ही करतो.

समतोल व्यवहार साधण्यासाठी लहानपणापासून छोटे छोटे व्यवहार करायला मुलांना उत्तेजन द्यावं असं माझं आणि शोभाचं मत आहे. जरूर असो नसो, उसने देणं, ते मागणं, उसने घेणं आणि ते लक्षात ठेवून परत करणं, दुकानदाराकडून यादीप्रमाणे वस्तू आणून वस्तूंचं बिल तपासणं, चेक लिहिणं. वस्तू बनवून विकणं, दुसऱ्यानी बनवलेल्या वस्तू घाऊक प्रमाणात खरेदी करून नफा ठेवून विकणं, हे सगळे व्यवहार सातव्या-आठव्या वर्षापासून मुलांना जरूर शिकवावेत.

दहाव्या-बाराव्या वर्षी त्याचा पुढचा टप्पा गाठून व्यवहार करायला उत्तेजन द्यावं. नात्यात, मित्रांच्यात, परक्यांशी, अनोळखी माणसांशी पैशाचे व्यवहार करताना चुका झाल्या तर मुलांना त्या समजावून द्याव्यात. यानी दोन गोष्टी साधतात. सुखवस्तू घरातली मुलं बावळट बनत नाहीत. शिवाय जेव्हा ती पैसे

कमवायला लागतात तेव्हा ती बेभानपणे खर्चिक पण होत नाहीत. प्रत्यक्षात परिस्थिती उलट आढळते. आईवडील किती पैसे मिळवतात, आपला घरखर्च किती हे पण मध्यमवर्गीय घरांत मुलांना माहीत नसतं. 'तुला काय करायचंय्, तू तुझ्या अभ्यासाकडे लक्ष दे', असं उत्तर मिळतं. प्रत्यक्षात अशा अनुभवांमुळे अभ्यासाकडे दुर्लक्ष वगैरे अजिबात होत नाही. शोभाच्या आणि माझ्या पालकशिक्षण वर्गात हा प्रश्न नेहमी निघतो.

शिक्षण पूर्ण झाल्यावर नोकरीतला पहिला पगार प्रत्येकानी आठवून बघावा. त्याचंही समाधान खासच असतं. मग स्वतः निर्णय घेऊन खर्चही सुरू होतात. या मिळकत आणि खर्चाची सुरुवात सुरळीत होते आणि मग केव्हातरी, कोणीतरी उसने मागतं, परत करतं किंवा फसवतं, आपल्याला कोणाकडून तरी पैसे मागण्याची पाळी येते. कधी त्यावरून संबंध सुधारतात, बिघडतात आणि तिथून आपली मनी पर्सनॅलिटी तयार व्हायला लागते. हळूहळू अशा चांगल्या-वाईट अनुभवांची यादी पक्की तयार होते. आकडे मोठे होतात आणि आपल्या पैशासंबंधीच्या विचारसरणीचा 'पॅटर्न' स्पष्ट व्हायला लागतो. आज आपण आपल्या अभ्यासात त्याचं पृथक्करण कसं करायचं आणि माणसाच्या व्यक्तिमत्त्वाच्या या महत्त्वाच्या भागाचं आपण काय करायचं हे बघूया.

एकूण पैसे मिळवण्यासाठीचे तीन मार्ग असतात. त्यांपैकी एक मार्ग माणूस प्रथम स्वेच्छेनी निवडतो आणि पुढे परिस्थितीमुळे त्याचा तो कायमचा मार्ग बनायला लागतो.

1. कष्ट-शारीरिक, बौद्धिक किंवा दोन्हींचं मिश्रण. ज्याला स्वतःच्या कामात शारीरिक आणि बौद्धिक कष्ट दोन्ही करण्याची संधी मिळते तो मनुष्य जास्त समतोल आणि नशीबवान समजायचा. निव्वळ बुद्धीचे श्रम करून त्याचं शरीर आखडतं आणि निव्वळ शारीरिक श्रम करून बुद्धी आखडते. सध्या ज्याचं जे काम असेल त्यात याचा विचार करून शक्य तितकी दुरुस्ती प्रत्येकानी अवश्य करावी.

एक प्रश्न विचारतो - भारत देशातली सर्वांत मोठी इंडस्ट्री कुठची? म्हणजेच जास्तीतजास्त टर्नओव्हर कशात होतो? कोणाला वाटेल फिल्म इंडस्ट्री, कोणाला क्रिकेट, कोणाला 'राजकारण' कोणाला हॉस्पिटल्स, कॉलेज शाळा वगैरे असं वाटेल. काहींना देवधर्मामधे होणारा टर्नओव्हर 1 नंबरवर आहे असं वाटेल. या सर्व गोष्टींमधे प्रचंड पैसा खेळतो हे खरं आहे, पण भारतातला सर्वांत

जास्त टर्नओव्हर लाअेझन इंडस्ट्रीचा आहे. लाअेझन म्हणजे सरकारी यंत्रणेशी जुळवाजुळव हे कळणं महत्त्वाचं अशासाठी की यावरून आपण कुठे आहोत हे नीट कळायला मदत होते. माझी इच्छा एवढीच, काहीही करा, पण चांगलं काम करा, मनापासून, मेहनतीनी प्रामाणिकपणानी आणि चांगल्या दर्जाचं करा.

ज्याला पैसे मिळवण्यासाठीचे कष्ट नको असतात पण हाव जास्त असते तो चोरीचा मार्ग निवडतो. कागद वापरून, कायदा वापरून चोरी किंवा शस्त्र वापरून चोरी हे नुसते चोरीचे प्रकार आहेत. पण मुळात ती प्रवृत्ती आहे. त्या प्रवृत्तीचं नाव आहे, 'जे माझं नाही ते मला हवं' प्रवृत्ती. यातली प्रत्येक चोरी रोखण्याचा, पकडण्याचा कायदा प्रयत्न करतो, पण हे सगळया प्रकारचे चोर पुरेसे बुद्धिमान, धाडसी किंवा बेपर्वा असतात. मुख्य म्हणजे 'अॅबनॉर्मल' माणूस असतात.

याखेरीजचा मार्ग भीक मागणं. कुठचीही वस्तू किंवा कल्पना न विकता काहीही मागणं म्हणजे ती भीकच. रस्त्यावर हात पसरणं हा एक उघड आणि उपेक्षित मार्ग झाला, पण त्याच्या इतरही अनेक स्टाईल्स आहेतच की! डोंबाऱ्याचे खेळ करणं, हत्ती घेऊन येणं, गणपती उत्सवाची वर्गणी, मदतीसाठी नाटकाचा कार्यक्रम, रिलीफ फंड गोळा करणं हे सगळे त्याचेच प्रकार आहेत.

कष्ट करायचे हा मुख्य मार्ग ज्यांचा ठरला आहे त्यात विचाराचे, कामाचे दोन मुख्य प्रकार होतात. पैसे मिळवण्यासाठी दुसऱ्याला काहीतरी विकावं लागतं. वस्तू किंवा ज्ञान. वस्तू विकणारे म्हणजे दुकानदार. धंदा करणारा, उत्पादन करणारा हाही वस्तू विकणाराच. ज्ञान किंवा शारीरिक कष्ट (किंवा मिश्रण) विकणारे म्हणजे व्यावसायिक किंवा नोकरदार.

या माणसांच्या प्रकारांच्या पृथक्करणाची आणखी एक कल्पना सांगतो. त्याचं संक्षिप्त नाव 'सापबंद'. सध्याची भारत देशाची अर्थकारणाची आणि समाजकारणाची जी बिघडलेली यंत्रणा आहे, ती भयानक अवस्थेत आहे. सामान्य माणसाला हतबुद्ध करण्याची ताकद त्याच्यात आहे. आता सापबंदची फोड सांगतो. सा म्हणजे सामील. या सध्याच्या आहे त्या भ्रष्टाचारी यंत्रणेला सामील झालेले किंवा तशी इच्छा असणारे. प म्हणजे पलायन केलेले. आहे त्या परिस्थितीला तोंड देऊन मार्ग काढण्यापेक्षा असे लोक परदेशात जाणं जास्त पसंत करतात.

बं म्हणजे बंडखोर. जे लोक इथेच राहून परिस्थितीला सामील न होता

प्रतिकार करण्याइतकी बुद्धिमत्ता, ईर्षा, जिद्द दाखवतात ते. मी स्वतः बंडखोर आहे म्हणून तर हे पुस्तक लिहितोय्.

आणि द म्हणजे दबलेले. सध्याच्या समाजयंत्रणेचे बळी बनून त्याखाली दबलेल्यांची संख्या सर्वांत जास्त आहे. यांपैकी आपण कशात बसतो किंवा काय होण्याची आपली इच्छा, प्रयत्न आहेत हा निर्णय ज्यानी त्यानीच घ्यायचा. समोरचा माणूस यांपैकी कुठच्या प्रकारचा आहे याची पारख करता आली तर खूप गोष्टी सोप्या होतात.

माझे एक श्रीमंत क्लायंट होते. स्वतःच्या कामाचं, स्वतःच्या श्रीमंतीचं कौतुक वाटणं, थोड्या बढाया मारणं इतपत आपण समजू शकतो. या माणसाच्या बढाया म्हणजे मात्र आत्तापर्यंत मी ऐकलेल्यांपैकी सर्वोच्च कोटीतल्या होत्या. त्यांच्या बांधकामासाठी पैसे किती लागणार वगैरे चाललं होतं. थोडं बँकेचं कर्ज घेतलं तर ते जास्त बरं दिसतं, प्रत्यक्षात पैशाचा प्रश्न नसला तरी कर्ज घ्यावं वगैरे बोलणं चाललं होतं. तेव्हा ते म्हणाले,'या बँकेच्या कर्जाची खरं म्हणजे मला काही गरज नाही. मी ठरवलं तर बँकदेखील विकत घेईन.'

आमचा दुसरा एक मध्यमवर्गीय मित्र होता. त्याला श्रीमंत होण्याची फार इच्छा होती. प्रत्यक्षात ते शक्य नव्हतं पण तो आपली श्रीमंतीची हौस एका गमतीशीर पद्धतीनी पुरवून घ्यायचा. तो मोठेमोठे आकडे वापरून त्याविषयी बोलायचा. दर वेळेला बघावं तर दुसऱ्या कोणीतरी तिसऱ्याला काही कोटी रुपये दिल्या-घेतल्याचा उल्लेख असायचा. त्या गोष्टीचा चालू विषयाशी संबंध काय हे आम्हाला कळायचं नाही. खूप मोठ्या पैशांच्या नोटा बघणं यात जसा काहींना आनंद मिळतो, तसा हा माणूस केवळ त्या बोलण्याच्या आनंदासाठी असं बोलायचा हे नंतर लक्षात आलं.

भारतीय समाजाची पैशाबद्दलची विचारसरणी जशी आहे तशी बनण्यामागची बहुतेक सगळी कारणं मला समजलेली आहेत, पण एका शब्दात सरासरी भारतीय माणसाच्या आर्थिक व्यक्तिमत्त्वाचं वर्णन करायचं तर ते 'हावरट' असंच करावं लागेल. एक निराळा मुद्दा मांडतो. जगभर लोक समजतात की ग्राहक हा राजा असतो. गिऱ्हाइकाला जे हवं असेल ते उत्पादक बनवतात. याला बायर्स मार्केट म्हणतात. भारतात मात्र परिस्थिती पार उलटी आहे. गिऱ्हाइकाला कशाची जरूर असायला हवी हे उत्पादक आणि विकणारे ठरवतात. भारतीय जनता या जाळ्यात अलगद शिरते. भारत हे मॅन्युफॅक्चरर्स, डिस्ट्रिब्यूटर्स, सप्लायर्स,

सेलर्स मार्केट आहे. गिऱ्हाईक इथे राजा नाही, गुलाम आहे.

मानसशास्त्राच्या अभ्यासात अनेकांनी अनेक 'थिअरीज्' मांडल्या. त्यातली एक मला पटलेली कल्पना इथे मांडतो. आपल्या प्रत्येकाच्या व्यक्तिमत्त्वात एक तृतीयांश भाग आपल्या पूर्वजांकडून आपण घेतलेला असतो. रंग-रूप, उंची, रोग, विचार, भावना, बुद्धिमत्ता यापैकी काहीही. हा पूर्णपणे नशिबाचा भाग असतो. दुसरा एक तृतीयांश स्वतःचे स्वतः कमावलेले गुण-दोष आणि उरलेला एक तृतीयांश आपली ज्या लोकांशी गाठ पडते, सहवास घडतो त्यांच्यामुळे आपल्यावर झालेल्या परिणामाचा भाग असतो.

काही ठिकाणी एका विशिष्ट उद्देशानी एक ग्रुप सातत्यानी भेटतो. तो उद्देश म्हणजे आपल्या पूर्वजांचा आपल्यावर झालेल्या परिणामांचा शोध. म्हणजे वर सांगितलेल्यापैकी पहिला एक तृतीयांश भाग. समुपदेशकाच्या सल्ल्यांनी हा गट सातत्यानी भेटतो. एकेक जण त्या बैठकीत आपल्या कुटुंबाच्या पूर्वजांच्या पार्श्वभूमीविषयी सांगतो. लोक प्रश्न विचारतात. ज्या गोष्टी माहिती नसतील त्यांचा शोध घ्यायचा प्रयत्न करायचा असतो. जीवनसाथमधे थोड्या प्रमाणात पण हा कार्यक्रम असतो. या प्रकाराला 'कॉन्स्टेलेशन' असं म्हणतात. खापर-पणजोबा खापर-पणजीपासूनचा वंशवृक्ष, त्यांचा व्यवसाय, आवडी-निवडी, स्वभाव वगैरे गोष्टी सांगायच्या आणि आजी-आजोबा, आईवडील असं करत भावंडं, स्वतःची मुलं इथपर्यंत पोचायचं.

या सगळ्या प्रक्रियेत स्वतः असे का आहोत याची उत्तरं सापडायला मदत होते. जो गुण आनुवंशिक नसेल तो कमावण्यासाठी जास्त मेहनत घ्यावी लागते. पैसे कमावण्याची, राखण्याची, वाढवण्याची कला, धंद्याची का नोकरीची प्रवृत्ती, पैसे आणि माणुसकी यांचा तोल राखण्याची हातोटी, समानतेची समज (विशेषतः स्त्री-पुरुष समानतेची), हुंडा पद्धतीबद्दल भूमिका, फुकटच्या मिळकतीचं आकर्षण, वस्तूंचा मोह अशा अनेक गोष्टींचा कॉन्स्टेलेशनमधे उलगडा होतो. इतरही गोष्टींचा उलगडा होतो. उदा. स्त्री-पुरुष लैंगिक आकर्षणाची अंतर्गत ऊर्मी, संयम, काही दुष्टप्रवृत्ती वगैरे. त्याविषयी या पुस्तकात स्वतंत्रपणी उल्लेख सापडतील.

●

2) विवाहापूर्वी आर्थिक व्यक्तिमत्त्वाची पारख

एक प्रश्न लोकांना पडलेला असतो. लग्नानंतर जोडीदाराच्या व्यक्तिमत्त्वाचे अनेक चांगले-वाईट पैलू कळतातच. पण लग्नाआधी ते कसे ओळखायचे हा खरा प्रश्न असतो. विवाह-अभ्यास मंडळ म्हणजे काय? या स्वतंत्र लेखात हे लग्नाआधी कसं कळू शकतं हे सविस्तर सांगितलेलं आहे. आर्थिक व्यक्तिमत्त्व म्हणजे पैसे, करिअर, बचत, गुंतवणूक वगैरेबद्दलही इतर विषयांसारखेच खेळ, गटचर्चा, गोलचर्चा सगळं असतंच. 60 विषयांच्या यादीपैकी ठरवून हा विषय मधूनमधून चर्चेसाठी असतो.

ज्या जोडीदाराशी आपलं लग्न होणार अशी कल्पना असते त्याच्या संपूर्ण व्यक्तिमत्त्वाची पारख कठीण असतेच, पण त्यातल्या एका भागाचा अंदाज शिक्षणानी येऊ शकतो. तो भाग म्हणजे पैसे मिळवण्याची क्षमता. ती क्षमता संपूर्णपणी शिक्षणावर अवलंबून नसते. गमतीत केलेलं एक विधान तुम्ही ऐकलं असेलच. परीक्षेत 50-60% मिळवून पास होणारे स्वतःचा धंदा चालू करतात आणि 90-95% मिळवणारे त्यांच्याकडे नोकरी करतात. हे गमतीत म्हणत असले तरी त्यात बरंच तथ्य आहे. अशा दोन्ही प्रकारची माणसं मला अगदी जवळून माहिती आहेत.

लग्नसमारंभ कसा करायचा याच्या बैठका साधारणपणी अजूनही दोन कुटुंबांच्यामधे ठरतात. लग्न करणाऱ्या मुलाला आणि मुलीला 'ते सगळं आम्ही बघून घेऊ' असं सांगून गप्प बसवतात. याचा थेट आर्थिक व्यक्तिमत्त्वाशी संबंध आहे. लग्नसमारंभ या विषयावर या पुस्तकात स्वतंत्र लेख असल्यामुळे त्याविषयीच्या तपशीलात इथे शिरायला नको. पण मुलाचं आणि त्याचे आई-वडील, आजी, आजोबा, महत्त्वाचे नातेवाईक यांचं आर्थिक व्यक्तिमत्त्व याबाबतीत महत्त्वाचं ठरतं. तसंच सगळं मुलीचं. त्यांपैकी प्रत्येकाचा पैशाबद्दल विचार करण्याचा प्रकार महत्त्वाचा ठरतो आणि शेवटी दुसऱ्यावर दबाव टाकण्याचं तंत्र ज्या गटाला जास्त अवगत त्यांच्या मताची सरशी होते.

बहुतेक ठिकाणी साधं लग्न, त्यामुळे कमी लोकांना बोलावून छोऽऽटी यादी करूया म्हणत, भरपूर खर्च करायचा निर्णय होतो. खरं म्हणजे मुलगा

आणि मुलगी या दोन आर्थिक व्यक्तिमत्त्वांच्या प्रकारांचा मध्य काढायला हवा, इथपर्यंत आपण समजू शकतो. मुलगा-मुलगी यांनी 'स्वतःला परवडेल तेवढा खर्च' असा निर्णय घेणं अपेक्षित आहे. त्याखेरीज लग्नाचा खर्च मुलीकडच्यांनी करायचा या अनिष्ट प्रथेलाही विरोध करायला हवा. थोडा खर्च आणि तोही दोन कुटुंबांनी निम्मा निम्मा एवढी एकच गोष्ट पटण्याजोगी आहे. याचा सगळ्यांनी मिळून आग्रह धरायला हवा.

लग्नापूर्वी लग्नाबद्दल ठरवण्याच्या महत्त्वाच्या गोष्टी अनेक आहेत. त्यातल्या बऱ्याच 'लग्न पहावं करून' या माझ्या पुस्तकातल्या प्रश्नावलीमधे दिल्या आहेत. त्यांपैकी पैशासंबंधीची महत्त्वाची गोष्ट म्हणजे लग्नसमारंभावर होणारा खर्च. तो खर्च कमीतकमी करावा असं तर आम्ही जीवनसाथमधे सांगतोच, पण शिवाय मुलाकडच्यांनी निम्मा खर्च करणं हेही महत्त्वाचं आहे. हा खर्च कुटुंबानी न करता प्रत्यक्ष मुलानी आणि मुलीनी स्वतःच्या ऐपतीत बसेल एवढाच आणि शिवाय निम्मा निम्मा केला तर फार उत्तम. या पुस्तकात लग्नसमारंभ या विषयावर स्वतंत्र सविस्तर लेख असल्यामुळे एवढे अतिमहत्त्वाचे मुद्दे पुन्हा सांगून मी पुढे जातो.

लग्नाच्या वयात आणखी निराळ्याच गोष्टींचा प्रभाव पडायला लागतो. मुलगे आपली 'मनी पर्सनॅलिटी' खोटी रंगवायला लागतात.

लग्नापूर्वी काही मुली श्रीमंतीची स्वप्नं बघायला लागतात. श्रीमंत घरी पडल्यामुळे लग्नानंतर आर्थिक स्तर बदलला तर बिघडलं कुठे? असा त्यांचा प्रश्न असतो. याचा साधा अर्थ एकच. अशा मुली आपल्या चरितार्थाचा, पोटापाण्याचा उद्योग म्हणून लग्न करतात. श्रीमंत होण्याची ती एक संधी असते असंही लोक समजू लागतात. ज्यांना श्रीमंत नवरा हवा अशा मुलींच्या गटाशी मी स्वतंत्र चर्चा केली. निम्म्या मुली चर्चेअखेर म्हणायला लागल्या की, आमचा श्रीमंतीपेक्षा इतर गुणांकडे जास्त ओढा आहे, पण आई-बाबांना कोण पटवणार? पळून जाऊन लग्न करायची आमच्यात हिंमत नसल्यामुळे नाइलाज आहे.

वडिलोपार्जित मालमत्तेविषयीची परिस्थिती बघू. मालमत्ता असेल किंवा नसेल. ती व्यक्ती एकुलती एक असेल किंवा नसेलही, पण ती व्यक्ती स्वतः काय कमावते आहे, काय काम करते आहे, हाच खरा महत्त्वाचा प्रश्न असतो. जिथे स्वतःचं काम, गुणवत्ता बेताची असते तिथे वडिलोपार्जित मालमत्तेचं जास्त वर्णन केलं जातं.

शोभानी आणि मी पत्रव्यवहारामधून एकमेकांना एकमेकांच्या वडिलोपार्जित

मालमत्तेविषयी कळवलं होतं. आर्थिक व्यवहारामधे माझ्या पूर्वजांनी जे गुण उधळले होते ते सगळे मी शोभाला कळवले. पूर्वीचा पेशवेकाळचा भागवतवाडा बराच मोठा होता. माझ्या पूर्वजांपैकी दर पिढीत एकेकानी स्वतःच्या कर्तृत्वाच्या जोरावर लाखाचे दहा हजार करून दाखवले होते. वाड्याचे भाग विकत विकत शेवटी अगदी छोटा, दुर्लक्षित, पडीक भागवतवाडा माझ्या वाट्याला आला होता. थोडक्यात या आनुवंशिक गुणाबद्दल सांगण्याजोगे माझ्याकडे फक्त अवगुणच होते.

स्वकष्टानी जमवलेल्या मालमत्तेचं वर्णन याबद्दल जरा बोलू. लग्नाचं सरासरी वय वाढल्यामुळे आणि व्यवसायात किंवा नोकरीत प्राप्ती बरी असली तर आजकाल तरुण अविवाहित मुलाकडे किंवा मुलीकडेही शहरात स्वतःच्या मालकीची किंवा भाड्याची जागा असू शकते, इतर काही कमाईही असू शकते, त्याचं खूप कौतुक वाटायला पाहिजे, कारण त्याचा अर्थ पैसे मिळवण्याच्या गुणवत्तेबरोबर पैसे राखण्याची समज आहे, असा होतो.

त्याचबरोबर हेही खरं की, विवाह नोंदणी झाल्याझाल्या त्या मालमत्तेला एक कायदेशीर, अधिकृत भागीदार निर्माण होतो, हीदेखील गोष्ट समजायला हवी. कायद्याची आवश्यक तेवढी माहिती प्रत्येकानी मिळवायलाच हवी.

अभ्यास मंडळातच जमलेल्या दुसऱ्या एका लग्नाची हकीकत अशी. मुलगी वयानी मोठी, अनेक वर्षं नोकरी करून स्वतः काही पैसे साठवलेले. मुलगा बेताच्या आर्थिक परिस्थितीत आणि स्वतःच्या व्यवसायात. त्या दोघांनी छोटा लग्नसमारंभ करून लग्न केलं नि समारंभासाठी आई-वडिलांचे पैसे वापरले नाहीत. आहे की नाही विशेष?

या विषयाचा माझा अभ्यास चालू होता. लग्न ठरण्यापूर्वी जोडीदाराचं आर्थिक व्यक्तिमत्त्व कळायला हवं यामधे कोणाचंही दुमत नसेल अशी एकेकाळी मला खात्री होती ती खोटी ठरली. 'वडील पैसेवाले आहेत, बास झालं', असं म्हणणारे लोक मी बघितले. जसेजसे फसवणुकीचे प्रकार वाढायला लागले तसं, 'वडलांचं नाही, मुलाचं आर्थिक व्यक्तिमत्त्व बघूया', पर्यंत पोचलेल्यांची संख्या वाढली. त्यापुढे भलत्या मागण्यांनी नवऱ्यांना छळणाऱ्या विवाहित मुली जशा आढळायला लागल्या तशी, 'मुलाचं आणि मुलीचंही आर्थिक व्यक्तिमत्त्व तपासण्याची गरज आहे', इथपर्यंत काही लोक पोचले.

ते तपासायचं कसं हा प्रश्न शिल्लक राहिलाच. अजूनही आहे. मला दोन

उपाय माहिती आहेत. एक म्हणजे कुठचंही, तुम्ही जिथे राहात असाल तिथे, विवाह-अभ्यास मंडळ शोधणं, नसलं तर स्वतः पुढाकार घेऊन चालवणं (यासाठी तर हे पुस्तक लिहिलं आहे.) आणि दुसरं म्हणजे तो मुलगा, मुलगी जिथे काम करत असतील तिथल्या सहकाऱ्यांना अपरोक्ष भेटणं, वरिष्ठ अधिकाऱ्यांना भेटणं. यामधे खूप खऱ्या महत्त्वाच्या गोष्टी कळतात. निदान काही ढोबळ गोष्टी तर नक्कीच कळतात. उदाहरणार्थ, कामसू का कामचुकार, प्रामाणिक का खोटारडा, कंजूष, उधळा का समतोल, भविष्यात असणाऱ्या संधी. बहुतेक ठिकाणी सहकारी आणि वरिष्ठ सहकार्य देतात. त्यांनी सुद्धा हा सामाजिक प्रश्न लक्षात घेऊन तेवढे कष्ट घेऊन खरी माहिती सांगायला हवी. मी आणि शोभा अशा माहिती काढण्याच्या मोहिमेवर काही वेळा गेलो होतो आणि काही सत्यं समोर आल्यामुळे जीवनसाथच्या सभासदांचा बचावही झाला होता. काहींनी आम्ही काढलेल्या माहितीकडे दुर्लक्ष केल्याचीही उदाहरणं आहेत.

लग्नापूर्वी आर्थिक व्यक्तिमत्त्व कसं कळेल याचा एक पर्याय म्हणजे एकत्र खरेदी करणं. जो माणूस घासाघीस प्रकारचा असतो तो आयुष्यभर वागणुकीत, भावनांची सुद्धा घासाघीस करत राहातो.

मुला-मुलीला लग्नाआधी एकमेकांविषयी जे कळायलाच पाहिजे अशा बऱ्याच गोष्टी आहेत. पण आर्थिक व्यक्तिमत्त्वासंबंधी एवढ्या गोष्टी कळणं जरूर आहे. प्रत्यक्ष दर महिना उत्पन्न (नियमित असो, अनियमित मिळकतीची सरासरी असो), कला, जिद्द, शिस्त, बचतीच्या सवयी, पैसे देताना-घेताना समतोल चोख व्यवहाराची समज आणि अनुभव.

तुम्ही लग्न करायचं ठरवा किंवा अविवाहित राहा, स्वतःच्या चरितार्थाची जबाबदारी प्रत्येकानी घेतलीच पाहिजे. लग्न केलं तर इतरांच्या चरितार्थाचीही जबाबदारी असते. मुलं झाली तर त्यांची असते. लहान मुलं, अपंग, वृद्ध हे याला अपवाद. इतरांना सुटका नाही आणि तरी काही स्त्रिया आणि थोडे पुरुष ही जबाबदारी टाळतात नि दुसऱ्यावर टाकतात. हे सगळं जेवढं लवकर कळेल तेवढं बरं असतं.

●

3) मिश्रगट कार्यशाळा– प्रश्नावलीचा उपयोग

जीवनसाथ विवाह-अभ्यास मंडळ चालू झाल्यावर पहिल्या दोन-तीन वर्षांत मला प्रश्नाच्या गांभीर्याची कल्पना आली. त्याच्यावर आधारित मी एक छोटेखानी पुस्तक लिहिलं. पुस्तकाचं नाव 'लग्न पहावं करून'. याचा उल्लेख पूर्वी केलेला आहे. खरं म्हणजे अनेकदा केला आहे. यामधे आपण नेमके कसे आहोत हे ओळखण्यासाठी माझ्या त्या पुस्तकातले काही प्रश्न आत्ता नमुन्यादाखल घेऊया.

त्या पुस्तकात मुलगा आणि मुलगी यांनी एकमेकांशी काय बोलायचं आणि पारख कशी करायची यासाठी एक मार्गदर्शक प्रश्नावली दिलेली आहे. या प्रश्नांच्या अभ्यास मंडळातल्या रंगीत तालमीत मुलं-मुली सुरुवातीला खुबीनी सोयीस्कर पण नंतर खरी उत्तरं देतात.

मला प्रश्नावली महत्त्वाची वाटते तशी तेवढी इतरांना वाटत नाही हे मला चांगलं कळलंय्. तरुण पिढीतल्या अनेक लोकांशी माझा सारखा संबंध येतो. त्यांच्या दृष्टीनी कुठची क्रेडिटकार्ड्स कोण ठेवतं, कुठचा मोबाईल कोण वापरतं हे महत्त्वाचं. जवळजवळ सगळा मोकळा वेळ, एसएमएस, फेसबुक, व्हॉट्स ॲप अशा गोष्टींच्यातच जातो. 'जोडीदाराची निवड' या लेखात संपूर्ण प्रश्नावली दिली आहे. पण इथे त्याविषयी थोडक्यात कल्पना देतो.

त्यात एक प्रश्न असा आहे, काटकसरी, खर्चिक यांपैकी कसा स्वभाव आहे? आखून बेतून खर्च करणार? विचार करून, आपल्या प्राप्तीचा विचार करून खर्च करण्याची सवय तरुणपणीच लागलेली असली तर सगळ्यात चांगलं. गरज, सोय आणि चैन हे जे खर्चाचे तीन गट आहेत त्यात खूप गोंधळ आढळतात. सोय ही गरज वाटल्याची आणि चैन ही पण गरज वाटणाऱ्यांची संख्या थोडी नाही.

आर्थिक व्यक्तिमत्त्वासंबंधी आणखी एक प्रश्न असा आहे. तुमची राहाणी कशी आहे? - बहुधा दोन प्रकारची उत्तरं असतात, चांगली किंवा साधी. 'साधी राहणी उच्च विचार' हे तर सगळ्यांनीच ऐकलेलं असतं. पण साधी राहणी खरोखर आहे का नाही हे पुढच्या प्रश्नाच्या उत्तरावरून कळतं. सध्याच्या कपड्यांची संख्या किती? - कल्पना करा. साधी राहणी आहे असं उत्तर दिलं

नि कपड्यांची संख्या 150 तर समोरच्याला खरं काय ते कळतंच की!

मी अशीही उदाहरणं बघितली आहेत की जो कमावणारा माणूस असतो तो स्वतःसाठी निवडक, खास चांगल्या ब्रँडेड वस्तू घेतो आणि न कमावणाऱ्या कुटुंबसदस्यासाठी साध्या स्वस्तातल्या वस्तू घेतो. विवाहसंबंधातली प्रगल्भता नसल्यामुळे सुरुवातीला अशा चुका केल्या, पण मॅच्युरिटी आल्यावर वागणुकीत सुधारणा केली अशीही उदाहरणं आहेत. आर्थिक व्यक्तिमत्त्व मुळातलं आणि सुधारलेलं असं चित्र बघायला मिळण्याचं प्रमाण वाढतंय. पण सावकाश.

त्याच्या पुढचा एक प्रश्न असा. पोशाखी, नटवी राहणी आणि विचारातला खोटेपणा यातला संबंध कळतो का? हा प्रश्न कित्येकांना कळायलाही कठीण जातो. दागिन्यांनी, भारी कपड्यांनी मढलेली, खूप नटलेली, दिखाऊ गोष्टींच्या मागे लागलेली व्यक्ती तुमच्या पाहाण्यात असेल. त्याच्या व्यक्तिमत्त्वातला खोटेपणा जाणवायला लागला की पुढे ते कळत जातं.

अशा तऱ्हेतऱ्हेच्या पद्धतीनी माणूस ओळखायला शिकवण्याचा उद्योग जीवनसाथ अभ्यास मंडळात चालू असतो. सोपे सोपे विषय, विधानं देऊन छोटे ग्रुप्स करून त्यात चर्चा चालतात. या चर्चा खूप साक्षात्कारी आणि रंजक असतात. एक विधान असतं–'श्रीमंत आणि सरळ माणसं क्वचित सापडतात', दुसरं विधान असतं– 'श्रीमंताला समोरचा आपल्याकडे पैसे मागेल अशी सतत भीती असते.' आणखी एक विधान, 'ज्याच्याकडे चोरण्याजोगं काहीतरी असतं त्याच्याचकडे चोरी होते.' या अनेक चर्चांच्यातून आणि अभ्यास मंडळातल्या अनेकांचा अभ्यास करून माझं वैयक्तिक मत असं बनलंय् की. उच्च मध्यमवर्गीय असणं ही अतिशय समाधान देणारी, परिपूर्ण आयुष्य जगण्याची संधी देणारी गोष्ट आहे.

एखादा माणूस, स्त्री किंवा पुरुष भेटला आणि एकदम खूप जिवाभावाची मैत्री झाली या कल्पनेवर माझा विश्वास नाही. माझ्या मते 3 दर्शनं व्हावी लागतात. प्रथम दर्शन म्हणजे रंगरूप, बाह्यरूप. दुसरं, आर्थिक व्यवहार आणि तिसरं, विरोधी विचाराची हाताळणी. विशेषतः जोडीदार निवडीच्या बाबतीत 'बघितल्या बघितल्या' आवडला किंवा आवडली याला काही अर्थ नाही. विरोधी विचाराची हाताळणी बोलण्यानी कळू शकते. पण आर्थिक व्यक्तिमत्त्व कळण्यासाठी व्यवहार प्रत्यक्ष करावाच लागतो. समजा, व्यवहार शक्य नसला तर निरनिराळ्या खर्चाचे, मिळकतीचे विषय मुद्दामून काढावे लागतात. हे सगळं विवाह-अभ्यास

मंडळात जास्त सहजपणी होऊ शकतं.

याखेरीज काही खेळ असतात. एकदा अविवाहित तरुण-तरुणींना दर महिन्याचा कुटुंबाचा सरासरी खर्च आणि त्याची फोड विचारली. व्यवस्थित नोकऱ्या-धंदे करून 10-15 हजार रुपये दर महिना मिळवणाऱ्या पण आईवडलांच्या घरी राहाणाऱ्या या तरुणांचं अज्ञान थक्क करणारं होतं. किराणा, दूध, घरभाडं, वीज, फोन, प्रवास, फळं, भाज्या, पाहुणे, करमणूक अशा जमा-खर्च वहीतल्या रकान्यांपुढचे आकडे त्यांना माहितीच नव्हते. तरी सगळ्यांना ते लिहायला सांगितले. कोणाच्या खर्चाची दर महिन्याची बेरीज एक लाख व्हायला लागली तर कोणाची महिना 4000/-. आहे की नाही गंमत!

माझ्या एवढ्या 18 वर्षांच्या समुपदेशनात शेकडो लोकं भेटली. काही लोकांचे प्रश्न आर्थिक व्यक्तिमत्त्वाशी निगडित असतात. कधी स्वतः त्या माणसाची पैशाबद्दलची भूमिका ही अडचण असते तर कधी जोडीदाराच्या. काही सतत फक्त पैशाचा विचार करतात. खरं म्हणजे आवश्यक तेवढाच पैशाचा विचार करणं हे योग्य असतं कारण निर्णयाच्या अनेक घटकांपैकी फक्त एक घटक पैसा हा असतो. माणूस नोकरी करायची ठरवतो, व्यवसाय की धंदा हे पण त्याच्या स्वभावानुसार ठरवतो. त्यातली समज आणि हातोटी असेल त्याप्रमाणे थोडे किंवा चांगले पैसे मिळवतो. याच मूळ स्वभावाच्या प्रकारानुसार कोणाशी लग्न करायचं ते ठरवतो आणि लग्नाचा खर्चाचा आकडा, अटी त्यानुसारच ठरतं. समुपदेशनात या सगळ्या गोष्टींच्या गाठी सोडवत, उलगडत सावकाश पुढे जावं लागतं.

आणखी एक खेळ सांगतो, सूत्रधार म्हणतो, 'मी तुम्हाला ब्लँक चेक देतो - आकडा तुम्ही टाकून घ्या.' तो आकडा लिहून झाला की त्याचं काय करणार ते आणि त्यापुढे त्या खर्चाचे आकडे लिहा. कोणी 10 कोटींचा चेक लिहितात नि खर्चाचे आकडे काही लाखांच्या पुढे न सुचल्यामुळे उरलेले गुंतवणार किंवा दान करणार म्हणून मोकळे होतात. काही 4-5 लाख लिहितात. अगदी थोडे जण चेक नाकारतात. स्वकष्टानी पैसे मिळवू म्हणतात. फारच मजा येते.

एकदा स्पष्ट विचाराची साथ हे ठरलं की, अजून स्पष्ट, अधिक स्पष्ट, त्याहून स्पष्ट या आग्रहाला सुरुवात होते. अनेक निरनिराळ्या विषयांना हे लागू होतं. अभ्यास मंडळात बऱ्याच वेळा निघणारा आर्थिक व्यक्तिमत्त्वासंबंधीचा विषय म्हणजे 'श्रीमंत कसं होणार?' अनेक मुलग्यांच्या डोक्यात एक विचार

पक्का असतो. जोडीदाराचा शोध जेव्हा चालू असतो तेव्हा कोणी कोणी मुली सुचवत राहातात आणि तो मुलगा नकार देत राहातो. खरं त्या मुलाच्या मनात असते ती मुलगी म्हणजे, 'श्रीमंत आईबापांची एकुलती एक सुंदर मुलगी.' त्यातला श्रीमंत होण्याचा मनातला विचार सारखा मधे येत असतो.

अनेक मुलग्यांशी याबाबत बोलल्यावर असं लक्षात येतं की श्रीमंत होण्याची प्रबळ इच्छा आहे, पण 'श्रीमंत कसं होणार?' याचं धड उत्तर नसतं. स्वतःचे आईबाप श्रीमंत आहेत का?– नाही. विकण्याजोगी प्रचंड मालमत्ता आहे का?– नाही. सर्वसाधारण मुलांपेक्षा स्वतंत्र, कुशाग्र बुद्धिमत्ता आहे का?– नाही. खास शरीरयष्टी, रूप यामुळे सिनेसृष्टीत चमकण्याची शक्यता आहे का?– नाही. एखाद्या क्रिकेटसारख्या लोकप्रिय खेळात अफाट प्रावीण्य आहे का?– नाही. एखादा खास वशिला असलेली मोठी राजकीय व्यक्ती गॉडफादर आहे का?– नाही. पण मग कशाच्या आधारावर श्रीमंत होणार?

कोणी म्हणतं, नशिबानी मला लॉटरी लागेल. ग्रुपमधले सगळे अर्थातच म्हणतात नशिबाबद्दलच बोलायचं तर खूप वाईटही काही होऊ शकेल. अपघातापासून मृत्यूपर्यंत काहीही. मग तो मुलगा शेवटी म्हणतो, 'मी खूप कष्ट करीन.', 'रात्रीचा दिवस करीन' वगैरे. पण केवळ या गुणांनी श्रीमंत होणं शक्य नाही. मग शेअर्स, लाअेझन सगळ्या पर्यायांची विचार-पृथक्करण-चर्चा होते. शेवटी असं बाहेर पडतं की, श्रीमंत आईवडलांच्या एकुलत्या एका मुलीशी लग्न करीन. ग्रुप विचारतो, 'पण ती मुलगी तुला कशी पसंत करेल?' मग चर्चा श्रीमंताच्या एकुलत्या एक कुरुप किंवा अपंग, वेडसर मुलीशी लग्न करून घरजावई होण्यापर्यंत पोचते. या चर्चेचा शब्दात शेवट होवो किंवा न होवो, एका निष्कर्षापर्यंत मुलगे पोचतात. आपण स्वतः मध्यम रूपाचे, मध्यम आर्थिक परिस्थितीचे, मध्यम शिक्षणाचे, मध्यम गुणवत्ता असणारे आहोत. त्यामुळे आपल्याला तशाच वर्णनाची अनुरूप, अनुगुण मुलगी मान्य करणार आणि आपण तिला मान्य करणार आणि तरीही विवाह-शिक्षणाच्या मदतीनी समाधानकारक स्वस्थ संसार करता येईल. असा जीवनसाथचा दावा आहे.

आमच्या ओळखीची अशी अनेक अख्खी कुटुंबंच्या कुटुंबं आहेत की ज्यांच्या बुद्धीची इतर सर्व अंगं गळून पडलीयत्. ते सुशिक्षित, सुसंस्कृत, बुद्धिमान आहेत. पण त्यांना बोलायला, विचार करायला फक्त एक विषय असतो, 'फक्त पैसे'. आम्ही अशांना फ.पै. किंवा 'ओ. अेम' म्हणजे ओन्ली

मनी म्हणूनच ओळखतो.

जोडीदार निवडण्याच्या प्रक्रियेत आपलं 'रोल मॉडेल' कोण आणि त्याचं वर्णन, कारणं सांगण्याचाही कार्यक्रम असतो. निदान एकमेकांनी ते सांगायला पाहिजे. रोल मॉडेल म्हणजे आवडती नट-नटी नाही, तर प्रत्यक्ष ओळखीची स्त्री किंवा पुरुष. प्रसिद्ध व्यक्तींचे उल्लेख यासाठी उपयोगी नाहीत. एकमेकांचं अंतरंग कळण्यासाठी याचा छान उपयोग होतो.

प्रत्येकानी स्वप्नं बघावीत, स्वप्नांच्या मागे धावावं, स्वप्नपूर्तीचा आनंद अवर्णनीय असतो, हे सगळं छान आहे. स्वतः करण्याच्या कामाच्या, समाजकार्याच्या बाबतीत हे अगदी खरं आहे. पण जोडीदाराची निवड, लग्नसमारंभाची अतिरंजित स्वप्नं याबाबतीत हे चूक आहे. खूप सुंदर, खूप श्रीमंत स्थळाच्या शोधातल्या स्वप्नांमुळे लग्न इतकं लांबलं, की खूप तडजोडी करून लग्न करावं लागलं किंवा अविवाहित राहावं लागलं अशी खूप उदाहरणं आहेत. लग्नसमारंभाबद्दल अमुक सिनेमातल्यासारखे दागिने, तमुक सीरियलमधे दाखवल्यासारखा कार्यक्रम, काय काय मुलामुलीचे आग्रह असतील सांगताच येत नाहीत. व्यवस्थापनशास्त्र याबद्दल स्पष्ट आहे, 'वास्तववादी स्वप्नं' हा एकच मार्ग योग्य. फार वरच्या जागेवर नेम धरण्यानी स्वतःचा घोटाळा, कामाचा घोटाळा, आपल्या विवाहाच्या संदर्भात आयुष्याचा घोटाळा एवढंच होतं.

कधीकधी गोलचर्चेसाठी विषय दिलेला असतो– 'लग्न ही भागीदारी आहे.' त्यातल्या पैशाच्या भागीदारीबद्दल प्रथम विषय निघतो. सगळं सुरळीत असतानाच्या भागीदारीबद्दल बऱ्याच प्रमाणात अनेकांनी विचार केलेला असतो. अडचणीत जोडीदाराची साथ, सासरच्या अडचणींमधे मदत, आजारपणाचा खर्च या गोष्टींची चर्चाही झालेली नसते. जेव्हा समोर प्रत्यक्ष प्रसंग येतो तेव्हा योग्य संभाषणं, योग्य निर्णय होत नाहीत. पैशांशिवाय इतर बाबतींतल्या भागीदारीविषयी पुरेसा विचार केलेला नसतो. उदाहरणार्थ, जोडीदार अस्वस्थ असला तर कसं, केव्हा वागायचं, मतभेद कसे हाताळायचे वगैरे.

ज्याबद्दल कमीतकमी अडचणी असतात ती गोष्ट म्हणजे मुलं. मुलांच्या शाळेच्या माध्यमाबद्दल मतभेद होतात. पण त्यांच्या शारीरिक वाढीच्या सोयींबद्दलची भागीदारीची कल्पना बहुतेक जोडप्यांमधे एकसंध असते. लग्नातल्या लैंगिक भागीदारीविषयी फार कमी विचार केलेला असतो. जीवनसाथ विवाह अभ्यास मंडळातल्या 'लैंगिक शिक्षण' या विषयावरच्या मी आणि शोभानी घेतलेल्या

कार्यशाळांमधे जमलेल्या अविवाहित, विवाहित, वयस्कर लोकांचं 'लैंगिक भागीदारीबद्दलचं' अज्ञान आम्हाला थक्क करणारं असतं. लैंगिक शिक्षण यावर स्वतंत्र लेख या पुस्तकात असणार आहे त्यामुळे त्याविषयी आणखी इथे सांगत नाही.

या चर्चेतून काही मुद्दे निघतात नि अधिक चर्चांना सुरुवात होते. मग हजर असलेल्यांपैकी ज्यांची तयारी असेल त्यांना स्वतःच्या करिअरविषयी, कामाच्या स्वरूपाविषयी आम्ही सांगायला सांगतो. आधी मी विचारतो की, हे सगळ्यांना नीट कळेल असं सांगण्यासाठी किती वेळ लागेल? साधारणपणे मुलं-मुली 10-15 मिनिटं असं उत्तर देतात. हा अंदाज क्वचितच बरोबर ठरतो. कामाच्या जागेवरची स्वतःची प्रतिमा काय आहे, याविषयी सांगायला सांगतो. प्रामाणिक, कष्टाळू, मनमिळाऊ, व्यवहारचतुर, कार्यक्षम, वेळ पाळण्याच्या, शब्द पाळण्याच्या बाबतीत चोख. मग त्याची कारणं विचारतो. अशा प्रकारच्या कामाला बाजारात किती पैसे मिळतात, स्वतःला होणाऱ्या प्राप्तीविषयी समाधान आहे का? भविष्यातल्या करिअरच्या शक्यता वगैरे चर्चा होतात. मग तो मुलगा-मुलगी स्वतःच्या कामाविषयी जे काही म्हणाली त्याविषयी अगदी थोडक्यात इतरांना काय कळलं, काही प्रश्न आहेत का वगैरे होतं. आपल्या कामाविषयी दुसऱ्याला थोडक्यात सांगण्याचा पाठ व्यवस्थापनशास्त्रात असतो. 10 मिनिटांपासून सुरुवात करून 2 मिनिटांत, एका वाक्यात अशा सारांशापर्यंत पोचणं असा तो पाठ असतो. मुलगा-मुलगी जेव्हा एकमेकांना दोघंच भेटतात तेव्हा 2 मिनिटांत स्वतःच्या करिअरचं वर्णन हे खरं उपयोगी असतं.

काही लोकांना हवेतून जमिनीवर येता यावं यासाठी अभ्यास-मंडळात दोन प्रकारच्या गटचर्चा मधूनमधून चालतात. त्यातली एक चर्चा अशी– तुम्ही स्वतःबद्दल नेमका कसा विचार करता? स्वतःला किती सामान्य, किती असामान्य समजता? या प्रश्नाला नीट उत्तर बहुतेक वेळेला कोणालाच देता येत नाही. मग मी त्यांना सांगतो की, निराळ्या पद्धतीनी याचं उत्तर मिळवायचा प्रयत्न करूया. तुम्ही स्वतःला जे काही ओळखत असाल त्या सगळ्या गुणांचा विचार करा. रूप, शरीरयष्टी, शिक्षण, मिळकत, लोकसंपर्क, संवादकला सगळ्यांचा विचार करून तुम्ही स्वतःला 'लाखात एक' समजता का? समजा तसं नसलं तर, दहा हजार मधे एक, दहा लाखांत एक, कोटींमधे एक एवढे खास समजता का? जे उत्तर येईल ते पुढे कारणासकट सांगायचं, हे मात्र महत्त्वाचं आहे.

आणखी एक चर्चा कार्यक्रमांच्यातून काही वेळा घेतलेली आहे. मी सूत्रधार म्हणून एक विधान करतो. त्याविषयी चर्चा करण्यासाठी छोटे– 4-5 मुलामुलींचे (वयानी मोठे, विवाहित, अविवाहित स्त्री-पुरुष सगळे एकत्र असतात) स्वतंत्र गट करायचे. ज्या चर्चा होतील, मुद्दे निघतील ते नंतर सांगायचे. विधान असं - 'माणसाची आर्थिक प्रगती टप्प्याटप्प्यानी झाली तरच चांगली असते. एकदम फार पैसे मिळाले तर त्यात तोटेच जास्त असतात. अनेक प्रकारचे धोके त्यात संभवतात.' गटचर्चेत अनेक मुद्दे निघतात. पैसे खर्चायचे कसे समजतच नाही.

गुंतवणुकीचा अनुभव नसल्यानी चुकीच्या ठिकाणी पैसे गुंततात. भलत्या अनावश्यक वस्तू घरात येऊन पडतात. कधी अपात्री दान केले जातात. मजेच्या चुकीच्या कल्पना डोक्यातून निघायला लागतात. काही लोक पैशांचं नियोजन जाणणारे निघतात. ते लगेच खर्चण्यासाठीचे आकडे, काही वर्षांनी मुलांच्या शिक्षणासाठी तेवढ्या काळासाठी पैसे गुंतवण्यासंबंधी बोलतात. अगदी विमा, विम्याचे प्रकार सगळ्याविषयी चर्चा होते. साध्या एका खेळासारख्या चर्चेतून पैशाविषयी बऱ्याच गोष्टी कळतात, डोक्यात शिरतात नि स्वतः 'श्रेष्ठ मानव' या भूमिकेतून बाहेर यायला मदत होते. आपल्यापेक्षा जास्त पैसे मिळवणारे पण साधी राहणी असलेले, आईवडलांसाठी कृतज्ञतेनी काहीतरी करणारे लोकही दिसतात.

जीवनसाथमधे ज्या मिश्रगट चर्चा चालतात त्यांत कधीकधी काही एका ओळीची विधानं दिलेली असतात आणि त्यांच्यावर छोट्या गटचर्चा घडवून आणायच्या असतात. अशी 3 विधानं मी इथे देतोय. जमलेल्यांनी चर्चा करून आपापल्या गटाचा निष्कर्ष 5-7 मिनिटांनंतर सांगायचा.

1) प्रसिद्ध किंवा श्रीमंत माणूस म्हणून जगण्यापेक्षा सामान्य राहाण्यात जास्त आनंद आहे.
2) श्रीमंत लोक कनिष्ठ वर्गाबद्दल संवेदनाहीन असतात.
3) खूप पैसे घेतले तरच लोकांना ज्ञानाची किंमत वाटते.

सगळ्यात शेवटी तुम्हाला माहिती असलेली एक गोष्ट पुन्हा सांगतो.

'द बेस्ट थिंग्ज इन लाइफ आर फ्री', बाकी तुमचा निर्णय तुम्हीच घ्यायचाय्.

●

4) कामाचं स्वरूप आणि करिअर प्लॅन

आपलं लहानपण जरा प्रत्येकानी आठवून बघा. स्वतः भविष्यात कोण बनणार आणि त्याची कारणं हा खेळ तर लहान मुलांच्याबरोबरही खेळणं चालू असतं. कोणी पायलट बनणार म्हणतं, कोणी डॉक्टर होणार म्हणतं. मोठेपणी लग्नाच्या वयात हाच प्रश्न मुलानी आणि मुलीनी किंवा कुटुंबानी विचारणं यात फार फरक आहे. वास्तववादी कल्पनांविषयीच बोलावं लागतं आणि त्याची कारणंही सांगावी लागतात. या वयात हा विचार नीट केलेला नसला तर मात्र चुकीचे निर्णय होऊ शकतात.

करिअरच्या बाबतीत व्होकेशनल ट्रेनिंग, करिअर गाइडन्स देणाऱ्या संस्थांमधे व्यवस्थित माहिती मिळते. तिथे एक-दोनदा जावं, मग स्वतःचा निर्णय घ्यावा. मूळ प्रवृत्तीचा शोध घ्यावा. नोकरी करायची असली तर सरकारी का खाजगी, कमी अधिकार आणि कमी पगाराची का, जास्त जबाबदारीची आणि जास्त पगाराची हे वेळेवर ठरवावं. स्वतःचा व्यवसाय का धंदा तोही छोटा का मोठा हेही नीट ठरवावं. माझ्या मते मोठ्या धंद्यात प्रसिद्धी, पैसे जास्त पण त्रास फार असतात. स्वतःचा आणि छोटा – कमी माणसांचा व्यवसाय हा सर्वांत चांगला, सुवर्णमध्य गाठणारा असं माझं मत बनलेलं आहे. 'स्वकर्तृत्वानी त्यानी किंवा तिनी धंदा खूप वाढवला आणि कुठच्याकुठे पोचवला' अशी वर्णनं ऐकली की समुपदेशकाच्या भूमिकेतून मला वैवाहिक-कौटुंबिक अस्वास्थ्याच्या शंका यायला लागतात कारण या वर्णनाचे लोक माझ्याकडे समुपदेशनाला बऱ्यापैकी संख्येनी येतात. अर्थात ते वैयक्तिक समुपदेशनाला येतात. गटात ते हे बोलूच शकत नाहीत.

सगळ्यांना नीट समजण्यासाठी आता मुद्दामून नोकरी आणि करिअर यांमधला फरक स्पष्ट करूया. नोकरी म्हणजे निव्वळ पैशासाठी केलेलं 'टोला ते टोला' काम. त्याच कामाबद्दल खूप आवड निर्माण झाली, कामाच्या तासांव्यतिरिक्तही त्या विषयाबद्दल विचार होऊ लागल्या, नवीन गोष्टी सुचू लागल्या की ती करिअरच्या मार्गावर प्रवास करायला लागलेली नोकरी समजायची. आपणहून माणूस त्या विषयाविषयी आत्मीयतेनी अनेकांशी बोलू लागला, स्वतःहून त्याविषयी वाचन करू लागला, कात्रणं ठेवून सीरियसली त्या विषयाचा

अभ्यास करू लागला की ती त्याची करिअर समजायला हरकत नाही.

त्या त्या क्षेत्रात पैसे कमी का जास्त हे मात्र समाजातल्या लाटेवर अवलंबून आहे. विशिष्ट काळात कुठच्यातरी ठिकाणी त्या विशिष्ट क्षेत्राला खूप मागणी असते. त्या लाटेवर स्वार होणाऱ्याला जास्त पैसे मिळतात. इतरांना कमी मिळतात. हा झाला नशिबाचा भाग. नशीब या विषयावर आपण नंतर सविस्तर बोलणार आहोत.

सध्या काही क्षेत्रात एकदम फार पैसे मिळू लागले आहेत. उदा. कॉम्प्युटर. या प्रचंड पैसे मिळवणाऱ्या लोकांना मुख्य म्हणजे आयुष्य जगायला वेळ उरतच नाही. दुसरं म्हणजे जवळचे मित्र, नातेवाईक, आईवडील यांच्यापेक्षा फार पैसे मिळवायला लागल्यामुळे त्यांचे संबंध दुरावतात. फ्लॅट, गाडी, फर्निचर, काय घेऊ नि काय नको असं त्यांना होतं. स्वतःला ते खरोखरच 'श्रेष्ठ मानव' समजायला लागण्याचा धोका असतो. प्रत्यक्षात पैसे मिळणं हा नशिबाचा भाग असतो. याचा उल्लेख आधी झाला आहे, पण इथे उल्लेखाचं कारण निराळं आहे. ते सविस्तर सांगतो.

गेल्या काही वर्षांत आय.टी. (इनफॉर्मेशन टेक्नॉलॉजी) क्षेत्रामुळे आर्थिक विश्वात खूप बदल झाले. चांगले आणि वाईट दोन्ही प्रकारचे बदल. अमेरिकन कंपन्या, त्यांचे डॉलरमधले पगार रुपयांत मोजले की इतर व्यावसायिकांपेक्षा फार मोठे आकडे असतात. इतर अनेकांपेक्षा जास्त पैसे कमावल्यामुळे त्यांना स्वतः आपण ग्रेट, असं वाटायला लागतं. त्यांना कॉम्प्युटरवर काम करायचं असल्यामुळे घरूनही काम करणं शक्य असतं. भारतात राहून परदेशातला पगार हा खूपच फायदा असतो. सगळे पैसे चेकनी मिळाल्यामुळे सरकारचाही करामधे फायदा होतो. काळ्या पैशाचा प्रश्न काही प्रमाणात कमी होतो. पूर्वी मी बांधकाम क्षेत्रातला व्यावसायिक असल्यामुळे एक मोठा तोटा मला ठळकपणे समजतो. जमिनींच्या, फ्लॅट्सच्या किमती प्रचंड वाढल्या. सर्वसामान्य माणसाला 'फ्लॅट' खरेदी अशक्य वाटायला लागली. जागांच्या किमती वाढल्या त्या प्रमाणात भाडीही वाढली. कष्टकरी वर्गाचे जागेचे हाल तर फारच झाले. चालू आहेत.

नवरा-बायको दोघंही आय.टी. क्षेत्रात असली की चालू असलेला खो-खो खेळत खेळत संसार ही पण एक गंभीर गोष्ट आहे. दोघांनाही ऑफिसच्या कामाचा ताण, मधूनच मंदीमुळे नोकरी जाण्याची भीती, परदेश दौरे, अमेरिकेशी वेळा जुळवल्यामुळे रात्रीचे कॉल्स, या प्रकरणात कित्येक वेळा दोन निराळ्या

गावांत किंवा निराळ्या देशांत दोघं, अशी परिस्थिती असते. पैसे मुबलक. मुलं नाहीतच किंवा कोणावर तरी सोपवलेली. अशा जोडप्यांच्या संसाराला गमतीत 'ई-संसार' (ई-मेल) किंवा 'मो-संसार' (मोबाईलवर बोलणं किंवा एसएमएस) असं म्हणतात. हा समाधानी वैवाहिक आयुष्याचा मार्ग नक्कीच नाही. मधूनच कामासाठी परगावी, परदेशी जाणं निराळं, पण एरवी रोज नवराबायकोंनी घरी रात्री एकमेकांना, मुलांना भेटलंच पाहिजे. मीही कामासाठी बाहेरगावी जायचो, आमचा मुलगाही जातो, जावईही जातो, पण आम्ही त्याव्यतिरिक्त रोज रात्री एकत्र घरी असण्याचा संकेत पूर्णपणे पाळतो. प्रश्न केवळ लैंगिक संबंधांचा नसतो, सहवासाचा, संवादाचा असतो.

कलाक्षेत्रातली करिअर हा एक पर्याय प्रत्येकाजवळ आहेच. पूर्वी सुंदर चेहऱ्यांनाच फक्त त्यात वाव होता, पण टेलिव्हिजन आणि फिल्म या दोन क्षेत्रांत एवढी जबरदस्त क्रांती झाली की, आता त्या करिअरसाठी रूपवान किंवा गोड गळा हे गुण असायलाच पाहिजेत असं नाही. लाखो लोकांना सामावून घेण्याइतकी ही इंडस्ट्री मोठी आहे. प्रसिद्ध होण्याची शक्यता आणि पैशाचे आकडे मोठे. त्यामुळे त्याचा मोह आहे तसे सापळे आहेत. शूटिंगसाठी कुटुंबापासून दूर राहाणं, कामाचे तास फार असणं असे त्रासही आहेत. ह्या सगळ्या गोष्टी वैवाहिक स्वास्थ्याला मारक आहेत हे लक्षात घेऊन यामधे शिरावं एवढंच आपण म्हणू शकतो.

मी माझ्या तरुणपणी नोकरी केलीय्. परदेशातून परत आल्यावर इथे व्यवसायच केला. अनेकांना निरनिराळ्या कामांसाठी नोकरीवर ठेवलं. माझं स्पष्ट मत असं आहे की, कुठचंही क्षेत्र असो, नोकरीपेक्षा व्यवसायच चांगला. जास्त मेहनत, पैशाची गुंतवणूक, थोडा धोका पत्करण्याची तयारी हे असलं तरी व्यवसायात समाधान नेहमीच जास्त असतं.

काही क्षेत्रात, विशेषतः सेल्स क्षेत्रात कंपनीच्या पैशानी इतरांना पार्ट्या देणं हा कामाचा भागच असतो. ज्यांना पार्टी द्यायची त्यांच्याबरोबर खाणंपिणं भाग पडतं नि बाहेरच्या खाण्याची मनाला सवय लागते, दारू आवश्यक वाटू लागते, ती स्वतःच्या खर्चानीसुद्धा प्यायला लागते नि नवराबायको, मुलं यांच्याबरोबरचं आयुष्य बरबाद होतं. या सवयींपासून दूर आणि तरी सेल्स क्षेत्रात वरच्या पदावर पोचलेला शंभरात एखादा माणूस सापडतो. ते क्षेत्र निवडण्यापूर्वी हा सगळा विचार व्हायला हवा.

एकाच क्षेत्रात शिक्षण झालेली, एकाच कॉलेजमधे त्याच वर्गात शिकणारी आणि प्रेम जुळून लग्न होऊन पुढे एकत्र व्यवसाय करणारी खूप जोडपी माझ्या ओळखीची आहेत. काही ठिकाणी बायको नामधारी भागीदार आणि निर्णय सगळे नवरा घेणार अशी अवस्था, काही अगदी कमी ठिकाणी बायको खरीखुरी भागीदार आणि काही ठिकाणी बायको घर सांभाळून मधून मधून ऑफिसमधे चक्कर टाकणारी, अशी अनेक प्रकारे व्यवसाय-धंदा करणारी जोडपी बघितल्यावर माझं आणि शोभाचं असं मत झालंय् की, नवरा-बायको एकाच क्षेत्रात नसली तर जास्त बरं.

माझा व्यवसाय, धंदा वाढत असताना शोभानी माझ्याच ऑफिसमधे सेक्रेटरी, व्यवस्थापक म्हणून काम करण्यात तात्पुरते खूप फायदे दिसत होते. त्यावर आम्ही थोडी चर्चा केली पण लगेच तो विषय निकालात काढला कारण मला त्यात स्त्री-पुरुष असमानतेची शक्यता दिसत होती. शिवाय शोभाचा आवडीचा विषय काय, हे शोधणं चालू होतं. दोन मुलांच्या जन्मानंतर म्हणजे 5 वर्षांच्या कामामधल्या खंडानंतरचा हा शोध होता. पुढे शोभानी योग्य निर्णय घेत टप्प्याटप्प्यानी चांगली करिअर केली, पण एका खूप मोठ्या चुकीपासून आमच्या कुटुंबाचा बचाव झाला. शोभानी माझी सेक्रेटरी म्हणून काम करणं ही फार मोठी चूक ठरली असती.

संपूर्ण करिअरबद्दल तत्त्वज्ञानातलं एक वाक्य लक्षात ठेवावं लागतं– ‘फारच क्वचित यश म्हणजेच समाधान असं असतं’. थोडक्यात या दोन्ही गोष्टी एकाच वेळी क्वचित मिळतात. एरवी ‘यश किंवा समाधान यांपैकी एक निवडावं लागतं.’ तत्त्वचिंतनातलं आणखी एक वाक्य तेवढंच महत्त्वाचं आहे. ‘शिखराच्या टोकावर पोचणाऱ्याला एकटेपणा मान्य करावाच लागतो.’ अशी नुसती वाक्यं सांगायची आणि मग स्वतःच्या अनुभवाच्या संदर्भाप्रमाणे प्रत्येक जण आपला स्वतःचा विचार सांगतो. अशा चर्चा खूप अर्थपूर्ण ठरतात. बदलीच्या शक्यतेमुळे काही लोक वरच्या पदावरची बढती नाकारताना दिसतात तेव्हा हाच विचार त्याच्या मागे असतो. परदेशातल्या प्रॉजेक्टला लोक नकार देतात त्यामागे हाच विचार असतो. त्याचं सर्वसामान्य शब्दातलं वर्णन कुटुंबापासून दूर असं असतं, पण मूलतत्त्व या दोन तत्वांच्यात सापडतं.

●

5) मिळवती बायको

फक्त संसाराला पैशाचा हातभार म्हणून बायकोनी नोकरी करायची ही कल्पना बराच काळ होती. कामामुळे मिळणारं समाधान, त्यामुळे होणारा व्यक्तिमत्त्व विकास हा विचार अजूनही बऱ्याच जणांना नवीन वाटतो.

सध्याची परिस्थिती लक्षात घेतली तर स्त्रीला आत्मसन्मान जपायचा असेल तर तिला त्यासाठी कष्ट करावे लागतात. बुद्धिमत्ता, शिक्षण, मेहनत हे नुसते गुण असून चालत नाही, सिद्ध करावे लागतात. खरं सांगायचं म्हणजे लहान मुलांमुळे 4-5 वर्षं जो खंड पडेल तेवढा सोडला तर स्वतःची करिअर नीट करावी लागते, पैशाच्या ऐवजी तिनी नाव कमावलं तरी चालतं, पण नुसत्या गृहिणीला घरात सन्मान मिळाल्याची उदाहरणं फार कमी सापडतात. या विषयावर या पुस्तकात स्वतंत्र लेख असल्यामुळे इथे थोडक्यात मुद्दा सांगतो. अगदी स्पष्ट सांगायचं म्हणजे बाहेरच्या जगाला तोंड देण्याचा अनुभव गाठीशी असला तरच आत्मसन्मान मिळतो, कारण परक्यांशी वागणं, पैशाचे व्यवहार करणं यालाच खरा अनुभव म्हणता येतं.

खुद्द माझ्याबद्दल सांगायचं तर, स्पष्ट विचाराच्या वाटेवर मी वयाच्या 13 वर्षांच्या आसपास चालायला सुरुवात केली होती. स्पष्ट विचार करणं आणि मांडणं अशा वागणुकीला त्या काळात विक्षिप्त म्हणायचे आणि आतादेखील म्हणतात. अशा माणसाला पत्करणारी मुलगी मिळणं कठीण वाटल्यामुळे मी लग्न करणार नाही असं आईवडलांना सांगून इंग्लंडमधे गेलो होतो. वय 23. प्रत्यक्षात पत्रव्यवहारातून शोभाचं नि माझं लग्न करायचं ठरलं तेव्हाही मध्यमवर्गीय घरातली मुलगीच मला बायको म्हणून हवी होती. शोभाला विक्षिप्त नवरा पसंत होता. ज्या कल्पनांविषयी मी ठाम होतो त्या म्हणजे लग्नसमारंभ नाही, हुंडा नाही, विधी नाहीत, दागिने नाहीत. स्वतः कष्ट करून पैसे मिळवण्यामधला आनंद काय असतो हे माहीत असल्यामुळे माझी बायको 'करिअरवूमन' असावी हेही स्पष्ट होतं. याविषयी अधिक सविस्तर उल्लेख येणार आहेत त्यामुळे त्याविषयी आत्ता इथे थांबतो.

●

6) पिढीतला फरक

पिढीतल्या फरकाचं मुख्य कारण म्हणजे दोन पिढ्यांच्यातल्या मूल्यांमधला फरक. शुद्ध मराठीत जनरेशन गॅप. या प्रश्नातून कोणाचीही सुटका नाही. मला आणि शोभाला वाटत होतं की, आमच्या अभ्यासामुळे, तरुण आणि मुलं यांच्याशी असलेल्या मैत्रीमुळे, आमची मुलं शोनील आणि आभा आणि त्यांचे जोडीदार यांच्याबरोबरच्या आमच्या संबंधांना याचा फटका बसणार नाही, पण ते खोटं निघालं. त्यांच्या पिढीतले आर्थिक ठोकताळे आमच्यापेक्षा बरेच निराळे असतात. इतरही अनेक बाबतींत हा फरक असतो.

एक गोष्ट सांगायलाच हवी. सुशिक्षित वर्गातल्या तीन पिढ्या बघितल्या तर आर्थिक सुबत्ता वाढत गेली. माझ्या खापरपणजोबांची मला काहीच माहिती नाही, पण आजोबा जेमतेम परिस्थितीत होते. त्यामानानी वडील मध्यमवर्गीय आयुष्य जगले. आमच्या पिढीत आम्ही उच्चमध्यमवर्गीय झालो. त्याचबरोबर हेही खरं की काटकसरीनी संसार करणं ही एक कला आहे. ती आधीच्या पिढीला अवगत होती, ती आता हरवत चालली आहे.

माझ्या आधीच्या पिढीत कर्तृत्व असलेल्यावर कुटुंबातल्या इतर अनेकांचा भार असायचा. त्यामुळे अशा माणसाला फक्त देण्याची आणि इतरांना फक्त घेण्याची सवय असायची. कित्येक वेळा देताना चांगुलपणानी आपण मदत करतो पण परत मागताना वाईटपणा येतो. या बाबतीत आधीची पिढी शक्यतोवर कर्ज घेणं टाळताना आढळते. नव्या पिढीला कर्ज देण्याघेण्याची त्यामानानी जास्त ओळख असते. थोडक्यात देण्याची आणि घेण्याची दोन्हींची सवय आणि समज असते. ही चांगली गोष्ट आहे.

●

7) गरिबीमुळे येणारी समृद्धी

या शीर्षकाबद्दलच काहींना अचंबा वाटेल, पण मला स्वतःला ते पूर्ण पटलेलं आहे. मगाशी मी म्हणालो की, काटकसरीनी संसार करणं ही एक कला आहे. शहरी मध्यमवर्गीय माणूस ही कला विसरत चाललेला आहे. शहरात आपल्याला जेवढे पैसे मिळतात ते पैसे घेऊन आपण छोट्या गावात गेलो तर पैसे खर्च करण्यासाठी वस्तूंनी भरलेली दुकानंच न सापडल्यामुळे पैसे खर्चच होत नाहीत असं आढळेल. त्या वेळेला नीट विचार केला तर आपल्यासमोर तीन गोष्टी उभ्या राहातात. आपली गरज काय, सोय व्हावी म्हणून खरेदी करण्याची गोष्ट कुठची आणि चैनीसाठी आपण काय खरेदी करतो.

गरज, सोय, चैन यामधे घोटाळा असलेल्या लोकांना संसारातले आर्थिक धक्के पचवणं कठीण जातं. संसारातला आर्थिक धक्का तुमच्या वाट्याला येऊ नये अशी माझी फार इच्छा आहे, पण तसा प्रसंग आलाच तर कोसळून जाऊ नये म्हणून त्याची सवय माणसाला असणं चांगलं. उदाहरणार्थ, स्वयंपाकासकट सगळं घरकाम येत असणं अतिशय गरजेचं आहे. कामाची बाई आली नाही म्हणून सबंध कुटुंबानी चिडचिड करणं बरोबर नाही. ऑफिसमधे, विशेषतः स्वतःच्या व्यवसायात हाताखाली कोणी नसणं आणि सगळी कामं स्वतः हातानी करावी लागणं हे माझ्या व्यवसायात बरेच वेळा झालं. मला वाटतं ते फार चांगलं झालं. काही कामं खालच्या दर्जाचीही समजली जातात. केर टाकणं, दळण आणणं वगैरे कामांच्यात पुरुष कमीपणा मानतात. असे काटकसरीनी काढण्याचे दिवस मी आणि शोभा दोघांच्याही वाट्याला आले. त्यामुळे आमचा आणि दोन्ही मुलांचा खूप फायदा झाला असं आम्हाला वाटतं.

तुम्ही हे वाक्य कुठेतरी ऐकलेलं असेल, ‘कमीतकमी गरजा असलेला माणूस खरा श्रीमंत असतो.’ आमच्या दोन्ही मुलांना अनेक वेळा कामासाठी, ट्रेकिंगसाठी स्वतःचं सामान पाठीवर घेऊन प्रवास करावा लागला. मुलगा शोनील त्याबाबतीत खूप पुढे गेला. माहिना - दोन महिने संशोधनासाठी जंगलात जाऊन राहण्याच्या त्याच्या प्रवासाचं सगळं सामान पाठीवरच्या सॅकमधे असायचं. त्याचा

अनुभव वाढला तसं सामान कमी होत गेलं.

मध्यमवर्गीय आयुष्य सर्वांत सुखाचं यात काही शंका नाही, पण आयुष्यात असे गरिबीचे, सोयी परवडत नसण्याचे, सोयी उपलब्ध नसण्याचे अनुभव माणसाला खरोखर खूप समृद्ध करतात.

आर्थिक व्यक्तिमत्त्वाचा शोध घेताना खेळ म्हणून हे विधान खूप उपयोगी आहे. 'कमीतकमी गरजा असणारा माणूस खरा श्रीमंत असतो.' हे वाक्य घेऊन यावर एकदा गटचर्चा जरूर घेऊन बघा.

●

'कमीतकमी गरजा असलेला माणूस खरा श्रीमंत असतो.' मध्यमवर्गीय आयुष्य सर्वांत सुखाचं यात काही शंका नाही, पण आयुष्यात असे गरिबीचे, सोयी परवडत नसण्याचे, सोयी उपलब्ध नसण्याचे अनुभव माणसाला खरोखर खूप समृद्ध करतात.

8) उसनवारी, कर्जं, परतफेड

आपण आत्ताच म्हणालो की, आधीच्या पिढीच्या कर्ज घेण्याविषयीच्या कल्पना निराळ्या होत्या. त्या काळात जीवनावश्यक वस्तूंच्या किमती बऱ्यापैकी स्थिर होत्या. गेल्या 15-20 वर्षांत ज्या वेगानी भारतातली महागाई वाढली त्यामुळे सगळ्या पैशांच्या विचारपद्धतीतच बदल झाला.

आजच्या किमतीला जी वस्तू ज्या किमतीला मिळते त्या किमतीला ती वस्तू व्याजानी कर्जाऊ पैसे घेऊन विकत घेणं हे फायदेशीर आहे ही गोष्ट अनेकांना वेळेवर कळत नव्हती, पण तरुण पिढीला बरोब्बर समजली होती. वस्तू, जागा यांच्या किमती इतक्या भयानक प्रमाणात वाढल्या की, कर्ज न घेतलेला माणूस खुळा ठरायला लागला. त्यासाठी हा प्रश्न विचारावा लागतो, 'सध्या कुठची कर्जं फेडताय?' नोकरी करत असताना लग्नाच्या वयाच्या मुलानी किंवा मुलीनी फारच क्वचित कर्ज घेतलेलं असतं. पण व्यवसायात किंवा स्वतःच्या धंद्यात कर्जं असतातच. ती नियमित घेण्याची आणि जबाबदारीनी फेडण्याची ज्याला सवय आहे त्याला पुढे आर्थिक ताणांना तोंड देणं सोपं जातं. ज्याला ही समज आहे तो मोकळेपणानी कर्जाविषयी खरं सांगायलाही संकोच करत नाही.

कर्ज आणि त्याच्यावरचं व्याज याबद्दल माझं अनुभवानी बनलेलं मत असं. मित्र, नातेवाईक यांच्यात किरकोळ उसनवाऱ्या चालतात तेव्हा व्याजाचा मीटर त्याला बहुतेक वेळा लावलेला नसतो. रकमा जरा मोठ्या असल्या आणि व्याजानी परत करायची बोली नसली, किंवा, उसने परत करण्याची तारीख पाळता आली नाही की संबंधांवर परिणाम व्हायला लागतो. व्याजाचा हिशेब ठरला असला तरच हे संबंध सुरळीत राहू शकतात, कारण परतीला उशीर झाला तरी व्याज मिळेल हा दिलासा असतो. व्याजाचं मीटर नसलं की परतीचं प्रेशर नसतं, त्यामुळे चालढकल होते असं माझं मत बनलंय्. त्यामुळे खुशाल पैसे उसने घ्यावेत, द्यावेत, कागद करावा आणि व्याजाचा दरही बाजारप्रमाणे ठरवून लिहावा, तरच कौटुंबिक, सामाजिक स्वास्थ्य टिकतं असं मला वाटतं.

आपला अभ्यास मध्यमवर्गीयांचा आहे हे खरं आहे, पण कष्टकरी वर्गाविषयी माहिती आवश्यकच आहे. कामगार वर्ग मुळात बँकेचं वातावरण,

तिथलं कागदपत्रांचं जग याला घाबरतो. शक्यतोवर तो बँकेत जाणं टाळतो. बँकेतलं कर्ज घेण्याचा विचार अर्थातच बाद होतो. ओळखीच्या लोकांकडून, कामावरच्या मालकाकडून बिनव्याजी हातउसने पैसे त्यांना जास्त सुखाचे वाटतात. त्यांच्या गरजा कमी असतात त्यामुळे रकमाही छोट्या असतात. या कशामधे अडचण आलीच तर ते खाजगी अनधिकृत सावकाराकडून प्रचंड व्याजानी पैसे उचलतात. या दोन्ही गोष्टी चुकीच्या आहेत, पण हे त्यांना समजावणं, पटवणं जवळजवळ अशक्य असतं.

पुन्हा जरा प्रश्नावलीकडे वळू. याखेरीज काही महत्त्वाचे प्रश्नही विचारात घ्यायला लागतात. मित्रमंडळींशी पैशाचे, देण्याघेण्याचे व्यवहार सुखानी होत असले तर ते चांगलं लक्षण समजावं. त्यासाठी हा प्रश्न आहे. मित्रमंडळींशी पैशाचे व्यवहार आहेत?– माझ्या मते हा फार महत्त्वाचा मुद्दा आहे. मित्रांकडून पैसे घेऊ नयेत, नात्यात व्यवहार नको वगैरे म्हणतात कारण आपण स्वतः तो व्यवहार सरळपणी पुरा करू याची खात्री नसते.

माझ्या धंद्यात माझ्यावर मित्र, नातेवाईक यांच्याकडून पैसे मागण्याचा प्रसंग आला होता. मला माझ्या सचोटीविषयी खात्री होती. माझी धमक मला माहिती होती. पण प्रश्न त्यांना माझ्याविषयी खात्री वाटत होती का नाही, हा होता, ज्या अर्थी मला अनेकांनी पैसे व्याजानी उसने दिले त्या अर्थी माझ्यात दुसऱ्याला विश्वास वाटावा असा काहीतरी गुण होता. तो नेमका कोणता गुण हे मला समजलेलं नसलं तरी त्यांना समजलं होतं. मी सगळ्या लोकांचे सगळे पैसे व्याजासह परत केले असले तरी त्यांनी माझ्यावर जो विश्वास टाकला त्याबद्दल मी कायम कृतज्ञ आहे. त्या कुटुंबांची नि माझी जवळीक झाली. त्याचबरोबर काही जवळच्या नात्यातल्या पैसे राखून असलेल्या लोकांनी मला आवश्यक असताना पैसे दिले नाहीत यावरून त्यांच्या आर्थिक व्यक्तिमत्त्वाविषयी माझं ज्ञान खूपच वाढलं. नात्यातला पोकळपणा कळला. माझं जबरदस्त शिक्षण झालं.

मला अशी काही उदाहरणं माहिती आहेत की, पैशाच्या अडचणीच्या वेळी लोकांकडून उसने पैसे घ्यावे लागले आणि ते वेळेवर परत करता आले नाहीत. मग नंतर, उशिरा पण केव्हातरी ते पैसे परत करायला हवे होते, पण नाही केले. या गोष्टीचा सबंध कुटुंबावर कायमचा वाईट परिणाम झालेला मी बघितला आहे. देणाऱ्या लोकांनी ते पैसे केव्हाच सोडून दिले. न्यूनगंडाचं, अप्रामाणिकपणाच्या शक्यतेचं घेणाऱ्याचं ओझं मात्र मानेवरून आयुष्यभर निघालं नाही.

दुसऱ्याला खरी परिस्थिती सांगण्याचं धाडस ही स्वतंत्र गोष्ट आहे. लग्नाची बोलणी करताना कर्ज कशासाठी घेतली, तारण काय ठेवलं या गोष्टी खऱ्याखुऱ्या सांगण्यात जास्त फायदा असतो. ती कर्जं फेडणार कशी याच्यासकट सांगितलं तर समोरच्या माणसाचं आपल्याविषयी चांगलं मत होण्याची नव्व्याण्णव टक्के खात्री असते. फक्त खरं बोलण्याचं धाडस आहे का नाही हा प्रश्न असतो. ज्या मुलाला किंवा मुलीला आपल्या पैशाच्या अडचणीविषयी खरं बोलण्याचं धाडस असतं ती व्यक्ती भविष्यात आयुष्यात येणाऱ्या अडचणींना व्यवस्थित तोंड देऊ शकते.

प्रत्यक्षात सगळं 'पाहून' लग्न केलं आणि नंतर कळलं की खूप कर्जं आहेत, मालमत्तेची कौटुंबिक युद्धं रंगलेली आहेत, प्रचंड इमला पण पोकळ वासे आहेत, अशी उदाहरणं वारंवार समोर येतात.

मगाशी उल्लेख केलेल्या फ.पै. लोकांपैकी काही कोणाच्या अध्यात मध्यात नसतात. ते इतरांना त्रास देत नाहीत. पण काही हावरट आणि दुष्टही असतात. पैशासाठी सुनांना छळणारे, फक्त प्रॉपर्टी बघून लग्न ठरवणारेही अनेक असतात. आमच्या ओळखीत अगदी उच्चशिक्षित, सुसंस्कृत वाटणाऱ्या कुटुंबांत अशी अनेक उदाहरणं घडलेली आहेत. एका मुलीच्या लग्नानंतर कळलं ते सगळं कुटुंब प्रचंड कर्जात होतं. एकत्र कुटुंबात राहणारे नाकर्ते मुलगे लग्न होऊन बारकावे कळेपर्यंत लक्षात येत नाहीत. नवरा आणि सासरे यांचं भांडण झालं तर रस्त्यावर यायची पाळी येते.

पैशामुळे बिनसलेल्या संसारांची संख्या खूप आहे. लग्नापूर्वीच्या चर्चांमधे ग्रुपच्या सहाय्यानी मनी पर्सनॅलिटी आधी कळावी यासाठी जीवनसाथमधे आमचा सारखा प्रयत्न असतो. त्यासाठी ग्रुपमधली प्रश्नोत्तरं आणि खाजगी सल्लामसलतही असते. लहानपणचा पैशाचा स्वतःच्या जबाबदारीवर केलेला पहिला चांगला किंवा वाईट व्यवहार खूप लक्षात राहातो आणि आर्थिक व्यक्तिमत्त्व घडवतो हे अगदी खात्रीनी आपण म्हणू शकतो.

तशीच एक अवस्था अनेक वर्षांनी पुन्हा माझ्या आयुष्यात मोठेपणी आली, त्याविषयीचा किस्सा सांगतो. मी अमेरिकेतून भारतात कायम वास्तव्यासाठी परत येऊन स्वतःच्या व्यवसायाला लागलो होतो. एवढ्या मोठ्या वयात, तरीदेखील स्वतःच्या व्यवसायामधल्या बाल्यावस्थेमधेच मी होतो, हे मी कबूल करतो. भारतात स्वतःच्या व्यवसायात फसवणारी आणि फसणारी दोन्ही प्रकारची

माणसं आसपास भरपूर प्रमाणात सापडतात. मला तर ह्या दोन्हींपैकी काही व्हायचं नव्हतं. त्या शिक्षणाच्या सुरुवातीच्या काळात माझे एक जवळचे नातेवाईक एक-दोन वेळा भेटले. मीही त्यांच्या घरी जाऊन आलो. घरची परिस्थिती बेताची. दारुचं व्यसन घरात. खूप मोठमोठ्या आकड्यांच्या गप्पा. भविष्यातल्या अतिरंजित कथा, सगळं मला दिसत होतं.

अशा अवस्थेत त्यांनी माझ्याकडे उसने पैसे मागितले. अगदी किरकोळ रक्कम नाही आणि मोठी रक्कमही नाही. 'उद्या सांगतो', असं सांगून मी रात्री शोभाशी सविस्तर बोलायचं ठरवलं होतं, कारण हा पैशाचा नाही तर धोरणाचा प्रश्न होता. या माणसाकडून पैसे परत मिळण्याची काही शक्यता नव्हती हे समजत होतं आणि 'दान' याविषयी शोभाची नि माझी काही भूमिका होती. पैसे मदत म्हणून देण्यापेक्षा पैसे कमावण्याचा मार्ग दाखवणं योग्य असं आम्हाला वाटत होतं. 'सामाजिक कार्याच्या दिशा' या विषयाच्या कार्यशाळेत आणि लेखात आपण याविषयी सविस्तर बोलणार आहोत. त्या विशिष्ट नातेवाइकाविषयी आम्ही 'फसण्याचा' निर्णय घेतला. त्याला मी पैसे उसने द्यायचे ठरवले. आमचा अंदाज खरा ठरला. ते पैसे परत करणं शक्य नसल्यामुळे त्यानंतर तो आम्हाला आयुष्यात पुन्हा कधीही भेटला नाही.

माझा एक गरिबीतून वर आलेला, मनानी चांगला आणि व्यवहारचतुर मित्र होता. अमेरिकेतून कायम वास्तव्यासाठी भारतात परत आल्यावर मी मुंबईत आणि पुण्यात व्यवसाय करायचो. खूप काम नसल्यामुळे या मित्राला मधून मधून भेटायचो. बाजारात 'क्रेडिट' वाढवण्याची पद्धत त्यानी मला समजावून सांगितली. प्रथम एकाच दुकानदाराकडून रोखीनी काही वेळा माल घ्यायचा. त्यानंतरच्या पुढच्या टप्प्यात चौथ्या-पाचव्या वेळेला खिशात पैसे असले तरी विसरलो सांगायचं. नव्व्याण्णव टक्के दुकानदार 'उधारी बंद'ची पाटी दुकानात लावून बसले असले तरी पैशाशिवाय माल देतात. दुसऱ्या दिवशी आपणहून जाऊन रोख पैसे द्यायचे. त्यानंतरच्या व्यवहारासाठी दुकानदार आपणहून सांगतो 'पैसे नंतर द्या.' तेही आठवड्यात पण शक्यतोवर चेकनी द्यायचे नि 'मी फोन करून सांगितलं की चेक भरा', अशी सूचना द्यायची. दोन दिवसांनी चेक भरायला सांगायचा. उधारीची जरूर नसताना बाजारात अशा तऱ्हेनी क्रेडिटच्या रकमा वाढवत न्यायच्या. वेळ पण हळूहळू महिना-दोन महिन्यांपर्यंत वाढवायची. हे सगळं मी शिकलो, अमलात आणलं आणि खरोखर उधारीची जरूर असताना

त्या ज्ञानाचा खूप उपयोगही झाला.

मी व्यवस्थापन क्षेत्रातला माणूस असल्यामुळे मी त्या नजरेनी प्रत्येकच प्रसंगाकडे बघतो. एक उदाहरण सांगतो. आमच्याकडे काम करणारी कामवाली मधूनमधून सारखे पैसे उसने घेते. प्रत्यक्ष त्याबद्दल माझं काही म्हणणं नाही, कारण मला पक्कं माहिती आहे की कष्टकरी वर्गाच्या रकमा छोट्या असतात. मला हेही माहिती आहे की, बँक ह्या गोष्टीची त्यांना भीती वाटते. अशिक्षित, अर्धशिक्षित अशा लोकांना ते बँकेमधले फॉर्म भरण्याचं संकट वाटतं. त्यामुळे ते शक्यतोवर खाजगीत पैसे उचल घेतात. साहजिकच व्याज द्यावं लागत नाही. पण माझा अनुभव असा की, हा कष्टकरी वर्ग पैसे कधी बुडवत मात्र नाही.

तरी एक-दोन वेळा असं झालेलं आहे की किती पैसे घेतले आणि किती परत केले ह्याच्या अर्धवट रकमांचा थोडासा घोटाळा झाला. आमच्या घरातल्या व्यवस्थेप्रमाणे कामवाल्यांचा सगळा व्यवहार शोभा बघते आणि व्यवस्थापन तंत्राच्या साध्या नियमाप्रमाणे त्या व्यवहाराविषयी मला काही शंका असली तर मी ती शोभाला विचारतो. थेट कामवालीशी त्याबद्दल बोलत नाही. एरवी आमच्या कितीही गप्पा चालू असल्या तरी हा विषय शोभानीच हाताळायचा हे पक्कं असतं. अशा प्रकारचे घोटाळे होऊ नयेत ह्यासाठी मुख्य म्हणजे गैरसमजुती टाळण्यासाठी आमच्या बांधकाम क्षेत्रात 'कॅश नोट' असा प्रकार सर्रास वापरतात. त्याचा अर्थ असा की, कागदावर लिहिलेली पैशाची नोंद, देणारा आणि घेणारा ह्यांच्या सह्या आणि त्याची कार्बन कॉपी पैसे घेणाऱ्याकडे अशी पद्धत असते.

पैशाच्या व्यवहाराशी संबंधित असलेला दुसरा एक प्रश्न प्रश्नावलीत आहे. व्यवस्थितपणा, शिस्त, नीटनेटकेपणा यांची आवड आहे? – खरं म्हणजे या गोष्टी संपूर्ण आयुष्यभरासाठी असतात. व्यवस्थितपणा, नीटनेटकेपणा कपड्यांच्यात, कपाटात, कामाच्या ठिकाणी, स्वयंपाकघरात सगळीकडे असतो. याबाबतीत माणूस इतरांना काच करायला लागला तर मात्र हा दुर्गुण ठरतो. पैशाचे व्यवहार जास्त असतील तेव्हा स्वतःची शिस्त तिथेही उपयोगी पडते. खरं म्हणजे तेव्हा शिस्तीला पर्यायच नसतो.

●

9) बचतीच्या सवयी

एखादी व्यक्ती कनिष्ठ मध्यमवर्गीय असो नाहीतर मध्यम मध्यमवर्गीय असो, जर अल्पबचतीची जादू त्याला अवगत असली तर पैशाच्या अडचणीमुळे तो नक्की त्रस्त होणार नाही. अल्पबचत म्हणजे अल्प रक्कम नियमितपणी बाजूला टाकणं. रोज 10 रु. का रोज 100 रु. हे ज्यानी त्यानी ठरवावं, पण 'अल्प आणि नियमित' या दोन गोष्टी महत्त्वाच्या. त्यातलं नियमित म्हणजे 'रोज' अशी शिफारस आहे. तरच त्यात जादू आहे. त्यासाठी प्रश्नावलीत हा प्रश्न ठेवलेला आहे.

बचतीच्या सवयी कशा आहेत? 'तोंडानी कोणी काही सांगो न सांगो, त्या माणसाचं पासबुक सगळं काही सांगतं.' अशी एक नवी म्हण आहे. मिळवता मुलगा किंवा मुलगी असेल तर नियमित बचत आहे की नाही यावरून पैशासंबंधीची वागणूक समतोल का असमतोल हे स्पष्ट कळतं. नियमित अल्पबचतीची 'थिअरी' अनेकांना माहिती असते. प्रत्यक्षात ती बचत करणारे फार कमी असतात. एक गंमत करून बघा, अगदी लहानपणापासून रोज एक रुपया बचत केली तर बँकेच्या व्याजासकट वयाच्या तिशीत किती रक्कम साठेल? रोज दहा रुपयांनी करून बघा. महिना शंभर रुपयांनी करून बघा. या रकमा वापरायच्या मात्र नाहीत. त्यांना 'वन वे व्हॉल्व्ह' लावून टाकायचा. काढताना अनेक लोकांच्या सह्या लागतील अशी सूचना बँकेला द्यायची की ते जमतं. अल्पबचतीची जादू बघाच एकदा. फार तर एक वर्ष बचत करून ती रक्कम फिक्स्ड डिपॉझिटमधे टाकून बघा. वर्षाअखेर त्या साठलेल्या रकमेबद्दल तुम्हीच विचार करून ठरवा पुढे काय करायचंय ते.

●

10) प्रामाणिकपणा - रास्त भूमिका

अभ्यास मंडळात नियमित येणाऱ्या एका अगदी बेताच्या आर्थिक परिस्थितीतल्या मुलानी मंडळातल्या सधन कुटुंबातल्या एका मुलीशी लग्न ठरवलं. व्यक्ती म्हणून दोघंही साजेसे होते, पण लग्नानंतर आर्थिक वर्ग बदलणार होता. या मुलानी आपल्या सगळ्या व्यवहाराची फाइलच त्या मुलीला पाहायला दिली. पगार, बचत, कर्ज, कर्जफेड, गुंतवणूक सगळं काही. आम्हाला या जोडीचं कायम कौतुक वाटतं. एरवी अशा गोष्टी लपवण्याचीच पद्धत असते. ती मुलगी उच्चमध्यमवर्गीय, चांगली शिकलेली आणि मिळवती होती. मुलाकडे शिस्त होती, जिद्द होती, निग्रह होता. अल्पबचतीची त्याला सवय होती. ती त्याची मुख्य ताकद होती. पासबुकात, मुदत ठेव पावत्यांच्यात ते सगळं स्पष्ट दिसत होतं.

आपण स्वतः प्रत्येक पैशाच्या व्यवहारात प्रामाणिकपणी वागलं पाहिजे हे तत्त्व म्हणून सगळ्यांनाच मान्य असतं. प्रश्न असा शिल्लक राहातो की, आपण प्रामाणिक आहोत असं स्वतःला वाटलं तरी दुसऱ्याला तसं कशामुळे वाटेल? दुसऱ्यानी अनेक अप्रामाणिक लोक बघितलेले असतात. कसं वागलं म्हणजे दुसऱ्याला आपण प्रामाणिक वाटू हे कळण्यासाठी आधी स्वतःकडे नजर टाकावी. कसं वागलं की आपल्याला माणूस प्रामाणिक वाटतो? आपण त्याला दिलेली वस्तू, पैसे तपासून शहानिशा करून त्याची पावती देणारा का न बघता घाईनी वस्तू पिशवीत टाकणारा?

आर्थिक व्यवहारात माझ्या मते अविश्वासानी तपासणीपासून लोकं तपासणी न करण्यापर्यंत पोचतात तिथे चूक होते. मला वाटतं, 'विश्वासानी तपासणी' हा रास्त मार्ग आहे. अशी विश्वासानी तपासणी आणि रास्त व्यवहार साधारण दोनदा-तीनदा झाले की प्रामाणिकपणावर विश्वास बसतो. प्रत्यक्ष व्यवहार होण्याआधी माणूस कशामुळे प्रामाणिक वाटतो. याला एकच उत्तर आहे. वस्तूची, कामाची किंमत, लागणारा वेळ याविषयी आपणहून जो स्पष्टीकरण देतो, संबंधित कागदपत्रं आपणहून देतो, दुसऱ्याकडून स्वतःविषयी माहिती काढण्यासाठी स्वतःहून नाव, पत्ते देतो. तो प्रामाणिक वाटतो.

मी भागीदारांबरोबर बिल्डरचा धंदा करायचो. महानगरपालिकेच्या परवानगीचा शिक्का असलेलं 'ड्रॉइंग' समोरच्यानी मागायच्या आधी मी दाखवायचो. असा सँक्शन्ड प्लॅन न मागणारी गिऱ्हाईकंही खूप असतात आणि न दाखवणारे किंवा विचारलं तरच दाखवणारे बिल्डरही बरेच असतात. महानगरपालिकेकडून परवानगी न काढलेलेही बरेच असतात. आपणहूनचा माझा आग्रह पक्का असायचा. त्याचा सगळा फायदाच असायचा कारण शंका, गैरसमजुती, अविश्वास यांचा समोरच्याच्या मनात शिरकावच व्हायचा नाही.

कर्ज घेताना पैशाची जरूर असते त्यामुळे कर्ज देणारा मागेल ती कागदपत्रं, प्रामाणिकपणाचे पुरावे माणूस द्यायला तयार असतो. एरवीच्या वागणुकीत मात्र तो आपला प्रामाणिकपणा सिद्ध करायला नाखूष असतो. जोडीदाराची निवड करताना हाच प्रश्न येतो. नुसतं प्रामाणिक असून पुरत नाही, तसं दिसावं लागतं आणि तसं वागावं लागतं. एकदा नाही तर कायम. मनात 'एवढा विश्वास नाही का?' हे वाक्य सारखं येतं, ते रोखावं लागतं. माहिती द्यायची आणि तीही आपणहून हे पक्कं ठरवावं लागतं. त्यातल्या 'आपणहून' या शब्दाला फार महत्त्व आहे. त्यामुळे पुढच्या अनेक गैरसमजूती टळतात.

हा पुढचा मुद्दा समजावून सांगण्यासाठी प्रथम थेट माझं आणि शोभाचं वर्णन करतो. आम्ही कधीही घासाघीस करत नाही. दुकानात नाही, भाजीबाजारात नाही, छोटी-मोठी वस्तू घेताना नाही, ड्रायव्हरच्या, कामवाल्यांच्या पगाराबद्दल नाही. पैसे देताना नाही आणि घेताना नाही. आमचा दोघांचा कायम रास्त व्यवहाराचा आग्रह असतो. आमच्या प्रकारचा माणूस कोटेशनचा आग्रह धरतो. बाजार काय आहे त्याबद्दल माहिती काढतो. मगच निर्णय घेतो. कुठच्याही परिस्थितीत घासाघीस करत नाही.

गेली अनेक वर्षं मी कागदावर अटी-शर्तींसह करार करूनच कामं केली. बांधकाम व्यवसायात मी गेल्या चाळीस वर्षांपासून आहे. कराराचा आग्रह मी धरला तेव्हा मित्रमंडळींकडून 'ते तुझं अमेरिकेतलं ठेव अमेरिकेत', हे ऐकलं. त्यावेळी मी कराराचे मसुदे तयार केले, ते पुन्हा पुन्हा वाचून पक्के केले आणि त्याचा आग्रह धरला. त्यामुळे माझी काही कामं गेली असतीलही, पण काम चोख असल्यामुळे प्रकल्पामागून प्रकल्प मिळत गेले. आर्किटेक्चर, इंटीरियर डिझाइन, बांधकाम, लँडस्केप यातलं कुठचंही काम मी लेखी कराराशिवाय केलं नाही.

'जो विचार करीन तेच बोलीन, जे बोलीन तेच लिहीन आणि जे लिहीन ते सर्व तपशीलांसकट तसंच करीन' या प्रकारचा मी माणूस आहे. याला लोक 'अमेरिकन' म्हणायचे, पण ते तेवढं खरं नाही. बहुतांश अमेरिकन माणसंदेखील अशी नसतात. ही माझी वृत्ती आहे. त्यात घासाघीस बसत नाही. मला ज्याची किंमत योग्य वाटत नसेल ती गोष्ट मी घेत नाही. घासाघीस करण्यानी माणसाची किंमत कमी होते, त्याचा अपमान होतो असं तत्त्व मी पाळतो. मी आत्तापर्यंत बऱ्याच जमिनी, इमारती घेतल्या आहेत, विकल्या आहेत. प्रत्येक व्यवहाराची बोलणी करण्यासाठी भेटलेल्या माणसाला मी सुरवातीलाच सांगत आलोय् की, पसंत नसेल तर नाही म्हणा, पण उगीच वास्तूला नावं ठेवायची नाहीत. हे नावं ठेवणं केवळ किंमत कमी करण्यासाठी चालू असतं त्याला माझा सक्त विरोध आहे.

पैशाविषयी आणखी एक चुकीची गोष्ट सर्वसामान्य माणूस करताना आढळतो. बिघडत चाललेल्या वातावरणामुळे खरं म्हणजे त्याचा कोणावरही विश्वास राहिलेला नसतो. व्यक्तीच्या प्रामाणिकपणावर विश्वास आहे, पण व्यवस्थितपणाबद्दल विश्वास नसला तरी पुरत नाही आणि दोन्ही गुण असलेल्या व्यक्ती खरंच कमी असतात. भानगड अशी असते की, कामाच्या जागी 'माझा तुमच्यावर विश्वास आहे', असं म्हणत राहावं लागतं. जवळच्या नातेवाईक, मित्रमंडळींच्याबद्दल असं बोलावंच लागतं. मित्राकडून रोख रक्कम घेताना म्हणायचं, 'तू मोजलेयस् ना, मग मला मोजायची गरज नाही' प्रत्यक्षात घरी येऊन घाईघाईनी ती रोख मोजावी लागते आणि मग 100 ऐवजी 99 नोटा आल्यायत हे कधीकधी कळतं. त्या वेळी काही बोलता येत नाही.

व्यवस्थापनशास्त्र पुन्हा पुन्हा शिफारस करत असतं की, चेकनी व्यवहार करा, पण ते कटकटीचं वाटतं म्हणून रोखीचा व्यवहार केलाच तर रोख तिथल्या तिथे ओला स्पंज (जिभेवरची थुंकी नाही) वापरून मोजा, प्रत्येक रोख व्यवहाराची पावती करा, त्याची कार्बन कॉपी (नीट उठणारा कार्बन पेपर वापरून) स्वतःजवळ ठेवा. नंतर मोजणं, दोष देणं, मनातल्या मनात चिडणं वगैरे गोष्टींना अर्थ नाही. बँकेत पैशाचाच व्यवहार दिवसभर चालतो त्यामुळे रोख मोजण्याचं यंत्र असतं, पण बाहेर ते कसं असणार? थोडक्यात सर्वसामान्य माणसानी रोख समोरच्याच्या देखत मोजून घेण्याचा संकोच सोडून देण्याखेरीज दुसरा योग्य मार्ग नाही.

100 पैकी 95 टक्के लोकांवर आपला खरं म्हणजे विश्वास नसतो. तसं तोंडानी बोला असं मी म्हणत नाही, पण स्वतःच्या मनाशी ते मान्य करा. दुसऱ्याला न दुखावता खुबीनी स्वतःची खात्री करून घ्या. कागदपत्रं असतील तर वाचून मगच सही करा. निदान 'विश्वास आहे, तपासण्याची गरज नाही' असं खोटं भासवू नका. मनात जरा जरी शंका असली तर कागद घरी घेऊन जा, शांतपणी वाचा, जोडीदाराशी बोला, दुसऱ्या दिवशी सह्या करा.

मीटिंग चालू असली आणि एखादा मुद्दा भागीदाराशी किंवा जोडीदाराशी खाजगीतच बोलायला हवा असा असला तर बाहेर जाऊन बोलून या, पण भलती गोष्ट मान्य करू नका. प्रामाणिकपणानी रास्त भूमिका घेणं आणि व्यक्त करणं हे या सगळ्याचं मर्म आहे.

●

100 पैकी 95 टक्के लोकांवर आपला खरं म्हणजे विश्वास नसतो. तसं तोंडानी बोला असं मी म्हणत नाही, पण स्वतःच्या मनाशी ते मान्य करा. दुसऱ्याला न दुखावता खुबीनी स्वतःची खात्री करून घ्या. कागदपत्रं असतील तर वाचून मगच सही करा. निदान 'विश्वास आहे, तपासण्याची गरज नाही' असं खोटं भासवू नका. मनात जरा जरी शंका असली तर कागद घरी घेऊन जा, शांतपणी वाचा, जोडीदाराशी बोला, दुसऱ्या दिवशी सह्या करा.

11) मध्यमवर्गीय असण्याचे फायदे

आपण मध्यमवर्गीयांच्यातच काम करतो. गरीब, मध्यमवर्गीय आणि श्रीमंत यांच्या व्याख्या स्पष्ट करू म्हणजे पुढचं बोलणं सोपं जाईल. प्राप्तीच्या रुपयांच्या आकड्यांत बोलणं शक्य नाही, कारण ठिकाणाप्रमाणे त्यांचं मूल्य निराळं असू शकेल. शहरात आणि छोट्या गावात फरक असेल.

● गरीब म्हणजे ज्याला चालू महिनादेखील सुरक्षितपणी, समाधानानी चरितार्थ चालवता येईल याची खात्री नसते. साहजिकच भविष्याबद्दल त्याचं कसलंही नियोजन असू शकत नाही.

● मध्यमवर्गीय म्हणजे ज्याला चालू महिना, चालू वर्ष, पुढची काही वर्षं निश्चिंतपणी काढता येतील अशी खात्री वाटते, पण मोठं आजारपण, म्हातारपण, मोठे खर्च यांच्याबद्दल पैशाच्या सोयीची शाश्वती वाटत नाही.

● श्रीमंत म्हणजे ज्यांना म्हातारपणाची, आजारपणाची, पुढच्या पिढीचीही चरितार्थाची काळजी नसते. महत्त्वाची गोष्ट म्हणजे या व्याख्या रुपयाच्या आकड्यात नसतात कारण मोठ्या शहरात आणि खेड्यात राहणीचे खर्चाचे आकडे निराळे असतात. रोज करावा लागणारा प्रवास, करमणुकीच्या सोयी आणि शक्यता यांत फरक असतो.

आता जरा निराळ्या पद्धतीनी आर्थिक वर्गाकडे बघूया. माझ्या दृष्टीनी एकूण सात आर्थिक वर्ग आहेत.

1) गरीब - त्यांना पैसे मिळवण्याची अनुवंशिक कला नसते. गुणवत्ता, जिद्द, हितसंबंध, मेहनतीची इच्छा, काहीच नसतं. हा वर्ग कायम गरीब राहणाऱ्यांपैकी असतो.
2) आज गरीब पण त्यांच्याकडे बुद्धिमत्ता, गुणवत्ता, महत्त्वाकांक्षा, जिद्द, मेहनतीची तयारी असते त्यामुळे ते मध्यमवर्गीय बनण्याच्या वाटेवर असतात.

3) मध्यमवर्गीय - बुद्धिमत्ता, जिद्द, मेहनतीची तयारी असते, पण भारतासारख्या लोकशाही सरकारी वातावरणामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीत भ्रष्ट, वाकड्या मार्गांनी जाण्याची तयारी नसल्यानी ते मध्यमवर्गीयच राहतात. मध्यमवर्गीयांबद्दल हे अभ्यास मंडळ असल्यामुळे जरा वेळानी त्याबद्दल जरा सविस्तर बोलू.
4) मूळचे मध्यमवर्गीय कुटुंबातले पण पैशाच्या मागे लागून श्रीमंत बनण्यासाठी धडपड करणारे. हे लोक श्रीमंत होतील किंवा होणार नाहीत, पण पैशाची हाव हा त्यांचा स्थायीभाव असणार.
5) उच्च मध्यमवर्गीय - दर महिन्याचा खर्च व्यवस्थित भागवू शकणारे आणि गुंतवणुकीमुळे पुढच्या आयुष्याची रोज काळजी नसणारे.
असा सुखवस्तू गट माझ्या मते माणूस सर्वांत स्वस्थ जीवन जगू शकतो. गरिबीच्या वेदना, श्रीमंतीच्या कळा या दोन्हींपासून त्यांची सुटका होते. मी आणि शोभा या उच्चमध्यमवर्गात असल्यामुळे आम्ही कुठचीही, अगदी कुठचीही गोष्ट केवळ पैशासाठी करत नाही. आम्हाला ज्या कामात आनंद, समाधान मिळेल तेवढंच काम आम्ही करतो. मुख्य म्हणजे आम्हाला ते परवडतं. त्यामुळे अर्थात मनःस्वास्थ्य असतं.
6) श्रीमंत - पिढीजात श्रीमंत किंवा स्वतःच्या मेहनतीच्या जोरावर आणि संधीचं सोनं करण्याची गुणवत्ता असल्यामुळे झालेले श्रीमंत. भारत सरकारच्या खुब्या अवगत झाल्यामुळे ह्यांची श्रीमंती टिकाऊ असू शकते.
पण श्रीमंत लोकांची एक मोठी अडचण असते. पैशाचा उपभोग घेण्यासाठी त्यांच्याकडे वेळ नसतो. नुसते पैसे राखण्यातच एवढे श्रम असतात की, त्यातच 365 दिवस गुंतून पडावं लागतं. त्यात धंदा वाढवला, मिळकत वाढवली की त्याचं गणित 365×24×7 असं होतं. असे लोक बहुतेक वेळा घरीच नसतात. कुटुंबासाठी वेळ नसतो. त्यामुळे कुटुंबसहवासाचा मोठा आनंद त्यांनी केव्हाच सोडून दिलेला असतो.

भारतात चांगल्या मार्गांनी पैसे मिळवण्याची 'खुबी' साधलेली माणसं संख्येनी फार कमी असतात. चांगल्या मार्गाची व्याख्या साधी आहे. कायदेशीर मार्गांनी. पण खुबीचा माझ्या मते अर्थ असा. प्रत्येक दिवसाच्या 24 तासांचे तीन भाग, प्रत्येकी 8 तासांचे. निसर्गांनी मानवी शरीराची रचनाच अशी केली आहे की, त्याला 8 तास झोप लागते, 8 तास स्वतःसकट संपूर्ण कुटुंबाच्या

सहवासाच्या आनंदासाठी आणि 8 तास काम. शहरी वातावरणातल्या सगळ्या ताणांमुळे आणि पैशाच्या गरजेमुळे 8 तासांच्या ऐवजी कामाचे तास 12-15 झाले. कुठूनतरी हे जास्तीचे तास चोरावे लागतातच. झोपेतून एखादा तास फार तर काढता येतो. उरला मार्ग एकच. कुटुंबाबरोबरचे तास चोरायचे. या सगळ्याच्या ताणामुळे सबंध कुटुंब अस्वस्थ होतं.

कितीही पैसे कमावण्याची क्षमता आणि संधी असली तरी कायम लक्षात ठेवण्याची गोष्ट म्हणजे काम, त्यापासून मिळणारे पैसे सर्वांत महत्त्वाचे असं कधीही वाटता कामा नये. स्वतः कायम प्रथम आणि आपलं कुटुंब हे दुसऱ्या क्रमांकाचं असलं पाहिजे, त्यानंतर काम. हे कळलं नाही तर पैसे मिळतात पण जगण्यातली गंमत निघून जाते. अशांना ती 'खुबी' साधलेली नसते.

7) मूळचे श्रीमंत पण बदललेल्या लोकशाही सरकारी वातावरणाशी जुळवून न घेता आल्यामुळे मध्यमवर्गीय किंवा गरीबही होण्याच्या वाटेवर असलेले.

माझा एक कोकणातला जवळचा मित्र होता. म्हणजे तो आहे, पण आता आमची मैत्री नाहीय्. मनानी चांगला, साधा, उदात्त हेतू असलेला, पण अव्यवहारी. एरवी त्याच्या खाजगी जीवनात त्यानी खूप अव्यवहार केले हे मला माहिती होतं. अनेक कोटींची मालमत्ता, जमीन, वाडी, त्यावर भरपूर झाडं, विहीर असं संपन्न कुटुंब होतं. पण कोणाशीच कुठल्याच बाबतीत जुळवून न घेता आल्यामुळे कामधंदा शून्य. जे जे करून बघितलं त्यात मार खाल्ला. बायको, मुलं यांचा चरितार्थ चालवणं आवश्यक असल्यामुळे मालमत्तेतली एक-एक खोली करत अनेक खोल्या अनेकांना भाड्यानी दिलेल्या. थोडक्यात मौल्यवान प्रॉपर्टीचा इतका राडा करून ठेवला की कोणी बिल्डर त्याला हात लावणंच शक्य नाही. यामुळे बायको त्याला सोडून गेली. तो एकटा राहायला लागला. पुढे त्याचे तब्येतीचे प्रश्न चालू झाले. त्याला लग्न करता येत नव्हतं कारण पहिल्या बायकोशी कायदेशीर घटस्फोट झालेला नव्हता. मी या सगळ्या गुंत्यातून त्याला सोडवायचा अयशस्वी प्रयत्न केला.

मालमत्तेची 'स्कीम' करण्याचा मार्ग शोधून काढला. मी स्वतः त्यात पैसे घालणार नव्हतोच, त्यामुळे मी फसलो नाही, पण माझी फी पूर्ण न मिळाल्यामुळे शेवटी माझं नुकसान झालं. स्कीम अर्धवट राहिली. सगळ्यांचं नुकसानच

नुकसान झालं. आमची मैत्रीही राहिली नाही, कटुता आली. अव्यवहार्यतेचं असं टोक मी अजून दुसरं बघितलेलं नाही. स्वतःहून स्वतःची केलेली बरबादी आणि तेही दारू, सिगारेट, कसलंही व्यसन नसताना.

आणखी एक निराळा मुद्दा मांडतो. गरिबीच्या यातना असतातच असतात. गरिबी चांगली असं कोणालाच वाटत नाही. पण श्रीमंताला निराळे ताण असतात हे कित्येकांना माहीत नसतं. समोरचा माणूस पैसे मागेल ही कायमची भीती असते. खरं सांगतो, पैसे मिळवणं सोपं, पण खुबीनी वाचवणं, राखणं, सांभाळणं, वाढवणं फार कठीण असतं. भारताच्या करपद्धतीत श्रीमंताकडे सगळे पैसे पांढरे असणं जवळजवळ अशक्य आहे. काही विशिष्ट व्यवसायांत तुलनेनी पैसे जास्त मिळतात, काहीत कमी हे शक्य आहे. पण त्यावर कर भरण्याचा प्रश्न आला की अडचणींना सुरुवात होते. शिवाय इतर लोकांशी श्रीमंती दाखवण्याची स्पर्धा, आपल्या प्रेस्टीजला शोभणारी राहणी आणि घर, या चक्रात माणूस अडकत जातो. काळ्या किंवा पांढऱ्या पण पैसे राखण्याच्या विवंचनेत माणूस अस्वस्थ होतो. परदेशात गेलं तर हे टाळणं शक्य आहे, पण त्याविषयी आपण स्वतंत्रपणे बोलणार आहोत.

माझा आणि शोभाचा या विषयातला अभ्यास आमच्या लग्नाच्या वेळीच झालेला होता. मध्यमवर्गीय आयुष्यच सुखाचं असतं याबद्दल आमची खात्री होती. त्यामुळे शोनील आणि आभा यांच्या जोडीदार शोधण्याच्या काळात ही गोष्ट आम्ही त्यांना अगदी स्पष्ट सांगू शकलो. शोनीलची बायको ॲनास्तेसिया आणि आभाचा नवरा श्रेयस यांची पार्श्वभूमी मध्यमवर्गीय कुटुंबाचीच आहे. त्यामुळे खूप सोपं जातं.

ए. नागराज हे एक आधुनिक तत्त्वचिंतक आहेत. मध्यम आचरण, साधी पर्यावरणाशी सुसंगत राहणी, मध्यम अपेक्षा, याच्यामधल्या सुखाचे अनेक तपशील नागराज यांनी मांडले. शारीरिक बळाच्या मागे लागणारा, अति व्यायाम करणारा माणूस त्या ताणामुळे पुढच्या वयात आजाराची शिकार बनण्याची शक्यता जास्त असते. दिसायला बळकट शरीरापेक्षा चिवट, काटक, चपळ शरीर जास्त चांगलं. आहाराचं तसंच. पैसे साठवण्याचं, प्रचंड श्रीमंतीचं तसंच. त्यात त्रासच जास्त. पैसे गुंतवणुकीचे, सांभाळण्याचे कष्ट खूप असतात. कुठचंही खास बिरुद, पद नसलेलं साधं माणूस म्हणून राहण्यात जास्त समाधान असतं.

अतिसुंदर मोठ्या सिनेनटनट्यांना, राजकारण्यांना खूप प्रसिद्धी, अमाप

पैसा मिळाला तरी त्यांच्यापेक्षा आपण मध्यमवर्गीय माणसं जास्त सुखी असतो. या बाबतीत कृष्णमूर्तींनी फार महत्त्वाचा विचार मांडलेला आहे. ते म्हणाले, 'भारतीय समाजव्यवस्था बिघडलेली आहे. श्रीमंत लोकांना या व्यवस्थेत पाहिजे ते सगळं मिळालेलं आहे, त्यामुळे ते त्यात बदल करणार नाहीत. गरीब लोक स्वतःच्या चरितार्थाच्या झगड्यात इतके बुडालेले आहेत की त्यांना दुसरा काही विचार सुचू शकत नाही.'

ज्यांचं हातावर पोट आहे अशी भारतीय माणसं जेव्हा खुलेपणानी हसताना दिसतात तेव्हा खरं कौतुक वाटतं. सगळ्या सोयी, भरपूर पैसे सगळं काही असलेली माणसं कपाळावर आठ्या घेऊन हिंडतात आणि ह्यांच्याकडे बघा! माणसाची मूलप्रवृत्ती आनंद मानण्याचीच असते हे अगदी पटतं. पण ते समाजयंत्रणेत बदल घडवण्याची काही शक्यता नाही. त्यामुळे कृष्णमूर्ती पुढे म्हणतात, 'मध्यमवर्गीय माणसंच फक्त या व्यवस्थेत बदल घडवू शकतील, त्यामुळे मध्यमवर्गीय लोकांची समाजात खास जागा आहे आणि विशेष कर्तव्यं आहेत.'

मध्यमवर्गीय या विषयाबद्दल या पुस्तकात स्वतंत्रपणी सविस्तर विवेचन आहे. मध्यमवर्गीय याचा अर्थ पैशानी मध्यम असाच आहे. असा माणूस आपोआपच मध्यममार्गी होतो. तत्त्वज्ञानामधल्या समतोल विचाराची संकल्पना त्याला सर्वांत व्यवस्थित समजते.

तो सहसा कुठच्याच बाबतीत टोक गाठत नाही. बाह्यरूपाचा समतोल, म्हणजे फार उंच नाही, फार बुटका नाही, लठ्ठ नाही-बारीक नाही, खादाड नाही, मिताहारी नाही, संपूर्ण शाकाहाराचा आग्रह नाही, नियमित मांसाहार नाही. तो शहराच्या मध्यभागीही राहात नाही आणि शहरापासून फार लांब राहात नाही. रूपानी मध्यममार्गी माणूस गोरा नाही, काळा नाही, सावळा म्हणून निराळा ओळखू येतो. विचारांच्या बाबतीत तो आधुनिक आणि पारंपरिकच्या मधला असतो. ईश्वरवादीही नसतो नि निरीश्वरवादी नसतो. अतिधार्मिक नाही नि निधर्मीही नाही. जातीवादी नाही आणि जातीविरुद्धही नाही. रूढीप्रिय नाही नि रूढीविरोधीही नाही. त्याला अहंगंड असतो, पण टोकाचा नाही. तो दुसऱ्यावर थोडा अन्याय करतो नि थोडा सहनही करतो. तो ज्ञान मिळवतो, अभ्यास करतो, पण फार अभ्यासाला तयार नसतो आणि तरी शेवटी कृष्णमूर्ती म्हणतात ते अगदी खरं आहे. भारतातले, इतिहासातले समाजप्रबोधक बघितले, तर हे अगदी पटण्याजोगं आहे. ते मध्यमवर्गीयच असण्याचं प्रमाण सर्वांत जास्त आहे.

चर्चेत आणखी काही विचारप्रणालींबद्दल, विशेषतः मध्यमवर्गीय असण्याबद्दल मुद्दे निघतात. आपण बघितलं की, श्रीमंत माणसाला सतत भीती असते की दुसरा आपल्याकडे पैसे उसने मागेल. कोणावर विश्वास टाकावा, न टाकावा, नाही म्हणायचं तर काय कारण सांगावं, अशा गोष्टींनी तो अस्वस्थ असतो. खरं म्हणजे जी गोष्ट आपल्याकडे दुसऱ्याला देण्याइतकी मुबलक असेल तीच देता येईल. कोणाकडे ज्ञान, कोणाकडे श्रम, काहींकडे वेळ, कलागुण आणि थोड्याच लोकांकडे पैसे असतील. उदाहरणार्थ मी आणि शोभा. दोघांकडे दुसऱ्याला देण्यासारखं विवाह-अभ्यास आणि पालक-शिक्षण यातलं ज्ञान आहे. त्यामुळे ते आम्ही दिलं तर आम्हाला आनंद मिळेल. मध्यमवर्गीय असल्यामुळे पैसे हा आमचा स्ट्राँगपॉइंट नाही. पैसे दिले तर आमची स्वतःची स्वस्थता हरवण्याचीच शक्यता सर्वांत जास्त आहे.

आणखी एक गोष्ट सगळ्यांनी नीट समजून घ्यावी.

- जे पैशानी स्वस्त त्याचा खप जास्त, ते लोकप्रिय कारण कनिष्ठवर्ग सतत 'स्वस्तात स्वस्त' याच्या मागे असतो.
- श्रीमंतवर्ग फक्त उत्तम दर्जाचीच वस्तू घेतो.
- मध्यमवर्ग उत्तम आणि स्वस्त वस्तू शोधण्याच्या खटपटीत असतो. पण मध्यम दर्जाची मध्यम किमतीची वस्तू आणि तसं ठिकाण सापडेपर्यंत त्यानी खूप चुकीच्या वस्तू घेतलेल्या असतात.
- आपण काय करायचं याचा विचार करून, ज्यामुळे मनःशांती टिकून राहील ती गोष्ट करणं सर्वांत महत्त्वाचं.

जे. कृष्णमूर्तींनी याबद्दल म्हटलंय ते फार महत्त्वाचं आहे. आपण मध्यमवर्गीय लोकांनी या विधानांचा विचार करायची गरज आहे. मध्यमवर्गाकडे समाजातली आणखी एक महत्त्वाची भूमिका आहे. गरीब, कष्टकरी वर्ग आणि श्रीमंत यांच्यातला मध्यमवर्ग हा मध्यस्थ आहे. मी मध्यमवर्गीयाचं आणि व्यवसायातलं आयुष्य जगलेलो असल्यामुळे मी श्रीमंतांची, उच्च मध्यमवर्गीयांची कामं करून त्यांच्याकडून पैसे मिळवले आणि ते कष्टकऱ्यांना म्हणजे 'लेबर'ला वाटले.

अनेक श्रीमंतांनी 'हा लेबर रेट फार आहे', 'ही माणसं कामं नीट न करता नुसते पैसे मागतात', अशा तक्रारी करण्याचा प्रयत्न केला. काही श्रीमंत मंडळींनी लेबरबरोबरच्या व्यवहारात स्वतः हजर राहून भाग घेतला. 'भागवतसाहेब, तुम्ही घासाघीस करण्याच्या विरुद्ध म्हणजे शेवटी आमचं नुकसान करणार', असं म्हणून मला पटवण्याचा प्रयत्न केला. अतिजलद कामामधे कामगारांना बांधकामाच्या जागेवर राहायला जागा, चहा, नाश्ता, जेवण द्यायचं असतं त्यात खळखळ केली, पण मला ही माझी मध्यस्थाची भूमिका पक्की कळलेली असल्यामुळे मी कधी बधलो नाही.

भारतात ज्या गतीनी महागाई वाढतेय् ते बघून काही प्रश्न पडतातच. स्वतः अर्थतज्ज्ञ असण्याचा फायदा ओळखीचे काही मित्र घेऊ देऊ शकतील या आशेनी त्यांच्याशी काही चर्चा केल्या, पण काही निष्पन्न झालं नाही. असे बहुतेक मित्र सी.ए. नाहीतर एम.बी.ए. असतात. काहींनी अर्थशास्त्रात पदवी घेतलेली असते. महागाई या विषयावर कोणीही उपाय सांगू शकत नाहीत. आपण जास्त पैसे मिळवणं हा एकच मार्ग आहे असं सगळे म्हणतात. आपल्या देशाचं 'चुकीचं राजकारण' ह्या मोठ्या राक्षसाशी कसा सामना करायचा ते कोणालाही समजत नाही.

संदीप वासलेकर या माणसाला यातली दृष्टी आहे असं त्यांच्या लिखाणावरून मला वाटतं. असे द्रष्टे पूर्वीही अनेक जण होते, अजूनही ठिकठिकाणी असतील. पण समाजकारणी आणि राजकारणी या लोकांची फारकत झालेली असणं हा मुख्य रोग आहे. विचारवंतांचं ऐकणार कोण हा प्रश्न आहे. भारत जगातली महासत्ता होणार असं सगळ्यांनी बोलत राहून हा प्रश्न सुटणार नाही. ग्लोबलायझेशन ही गोष्ट चांगली झाली की वाईट याविषयी मी अनेकांशी बोललो. सध्यातरी मला तोटेच जास्त दिसतात.

सत्य असं दिसतंय् की, मध्यमवर्गीय माणूस महागाईबरोबर रोज थोडाथोडा गरीब होतोय्. आपला अभ्यासाचा प्रत्येक विषय विवाहाशी आणि सबंध आयुष्याशी जोडलेला असल्यामुळे याच्या झळा आपल्या समाजातल्या प्रत्येक कुटुंबाला रोज जाणवणार. गरीब वर्गाचं तर पार पेकाट मोडलंय्. भविष्यात शक्य तितका काळ गरीब वर्ग सरळ मार्गानी आयुष्य रेटेल, त्यानंतर वाकड्या मार्गानी जाईल. स्वभाव, धाडस याप्रमाणे आपापला निर्णय घेऊन छोटी, मध्यम, मोठी, खूप मोठी चोरी करेल. काही लोकं गटानी चोऱ्या करतील.

मध्यम मध्यमवर्गीय माणसावर या सगळ्या परिस्थितीचा ताण तर येतोच. त्याच्या परीनी तो बारीक बारीक गोष्टींत काटकसर करण्याचा प्रयत्न करणार. घरून फोन करण्याऐवजी ऑफिसच्या फोनवरून खाजगी कामं करणार. आपल्या मोबाईलवरून फोन करण्यापेक्षा मिस्ड कॉल द्यायला शिकणार, आल्यागेल्याला अगदी छोट्या कपात चहा देणार. सेलच्या शोधात राहून तेव्हाच वस्तू खरेदी करणार. घरच्या स्वैपाकाच्या पदार्थांत बाजारभावाप्रमाणे बदल करणार, या सगळ्याचं कारण तेच. आपण कनिष्ठ मध्यमवर्गीय होऊ याची त्याच्या पोटात सतत भीती असते.

साखर खूप महाग झाली होती त्या काळात एका ओळखीच्या बाईंच्या घरी एक गट बैठकीसाठी नियमित भेटायचा. त्या बाईंनी सगळ्यांना सांगितलं की, पुढच्या वेळेपासून प्रत्येकानी आपापली साखर घेऊन यायची. एरवी या बाई चांगल्या होत्या, पण मध्यमवर्गीय माणसावर ताण आल्यामुळे तो कसं चुकीचं बोलू-वागू शकतो या उदाहरणासाठी हे सांगितलं.

काही लोक तर 365 दिवस 24 तास फक्त पैसे या एकाच गोष्टीचा विचार करताना आढळतात. त्यामधे ते माणुसकी, मूल्यं, कुटुंब, मुलांवरचं प्रेम, नवरा-बायकोच्या सहजीवनातलं स्वास्थ्य – सगळ्या गोष्टींपासून दूर जातात. माझ्या अगदी जवळच्या ओळखीत अशी काही माणसं आहेत. तुमच्याही ओळखीची असतील. गरिबीमुळेही माणूस या सगळ्या चांगल्या गोष्टींपासून दूर जातोच. यामुळे विवाहितांच्या यापुढच्या धोरणांसाठी हा विषय मांडलेला आहे.

एक सूत्रधार समुपदेशक आणि एक व्यक्ती म्हणून पण मी तर अगदी स्पष्टपणी म्हणतो, 'आम्ही मध्यमवर्गीय आहोत याचा मला अतिशय आनंद होतो'. जे मध्यमवर्गीय श्रीमंत होण्यासाठी पैसे पैसे करत सारखी घासाघीस, दुसऱ्याचे पैसे कापणं, बुडवणं अशा मनी पर्सनॅलिटीच्या मागे लागले आहेत ते समाधानाचा रस्ता सोडून सुंदर वाटणाऱ्या काट्याच्या रस्त्यानी चालले आहेत. मी माझ्या स्वतःच्या आयुष्यात मगाचच्यापैकी बऱ्याचशा वाटांचा स्वतः अनुभव घेतलाय. जवळ असलेली गोष्ट सोडणं नेहमीच कठीण असतं, पण मी अशा काट्याच्या वाटा स्वतःहून सोडल्या की!

थोडक्यात मला असं म्हणायचं आहे, 'समाधान हा हेतू आहे ना? मग मध्यमवर्गीय राहा. जास्त पैसे मिळाले तर ते खर्चून मध्यमवर्गीय व्हा.' मुळात मध्यमवर्गीय पण कर्तृत्वामुळे जरूरीपेक्षा जास्त पैसे मिळाले तर त्यांचं काय करता

येतं याची उत्तम उदाहरणं अगदी दोन-तीनच देतो, कारण 'करण्याजोगं समाजकार्य' नावाचा स्वतंत्र लेख या पुस्तकात आहे. जे आपल्याला भिडेल ते तत्त्व इतरांना सांगण्याची ऊर्मी प्रत्येकाकडे असते. ती गोष्ट स्वतः आयुष्यात करून दाखवणं हे काहींनाच जमतं.

एका जोडप्याला पर्यावरणवादी शैली याचं महत्त्व वाटलं म्हणून त्यांनी खेड्यामधे स्वतःचं घर बांधून राहायला जायचं ठरवलं. एका बाईंना बरेच पैसे निराळ्याच प्रकारच्या अपघाती दुर्घटनेमुळे मिळाले ते त्यांनी स्वतः न वापरता बिनव्याजी शैक्षणिक कर्जं देण्यासाठी संस्था चालू केली. पु.ल. आणि सुनीताबाई देशपांडे यांनी किती संस्थांना किती देणग्या दिल्या हे सगळ्या वाचकांना ऐकून माहिती असेल.

मी आणि शोभानी दोन छोट्या गोष्टी केल्या. 'बहुगुणी' विद्यार्थ्यांसाठी शाळेमधे बक्षीसं ठेवण्यासाठी देणग्या दिल्या. इतर छोट्या समाजोपयोगी संस्थांना मधूनमधून देणग्या देणं चालू असतं. अर्थात देणग्याही छोट्या असतात, कारण आमच्या मिळकतीत तेवढंच जमतं आणि मुख्य म्हणजे स्वतःला भावलेली 2 कामं 'जीवनसाथ' आणि 'पालक विद्यापीठ' आम्ही स्वखर्चानी चालवतो. जास्त पैसे मिळतील तेव्हा आणखी काहीतरी करू.

●

'भारतीय समाजव्यवस्था बिघडलेली आहे. श्रीमंत लोकांना या व्यवस्थेत पाहिजे ते सगळं मिळालेलं आहे, त्यामुळे ते त्यात बदल करणार नाहीत. गरीब लोक स्वतःच्या चरितार्थाच्या झगड्यात इतके बुडालेले आहेत की त्यांना दुसरा काही विचार सुचू शकत नाही.'

'मध्यमवर्गीय माणसंच फक्त या व्यवस्थेत बदल घडवू शकतील, त्यामुळे मध्यमवर्गीय लोकांची समाजात खास जागा आहे आणि विशेष कर्तव्यं आहेत.'

12) मोह, फसणं, फसवणं

माझ्या बांधकाम सल्लामसलतीच्या कामात मला बाहेरगावी खूप वेळा जावं लागायचं. माझी जबाबदारी फक्त बांधकामापुरती असायची. पण त्या त्या साइटसंबंधीच्या इतर प्रश्नांसाठी माझ्या क्लायंटनी एक माणूस दिलेला असायचा. जाता-येतानाचा प्रवासाचा, राहण्याचा, खाण्यापिण्याचा सगळा खर्च क्लायंट कंपनीचा असायचा. त्यासाठी माझ्याकडे रोख देऊन ठेवलेली असायची. वाटेत जिथे जिथे आम्ही थांबायचो तिथे काहीतरी खाण्यापिण्याचे, जेवण्याचे खूप प्रसंग यायचे. हे गृहस्थ प्रत्येक ठिकाणी अगदी दाबून जेवायचे, भरपूर पदार्थ मागवायचे, खायचे, फस्त करायचे. नंतर केव्हातरी मला त्यांच्या सहकाऱ्यांकडून कळलं की दुसऱ्याच्या पैशानी अशी सोय असली की हे गृहस्थ खाण्याची संधी सोडत नाहीत. मी त्या काळी रात्री जेवायचो नाही. ते मलाही आग्रह करायचे. उघडउघड म्हणायचे, 'कंपनी पैसे देणार आहे. कशाला सोडता उगीच?'

मला स्वतःला दुनियेतले सगळे पदार्थ आवडतात. मला अनेक खाद्यपदार्थांचा मोहदेखील होतो. पण 'दुसऱ्याच्या खर्चानी' याचा मात्र मोह मला अजिबात नाही. मला समारंभ, मेजवान्या, लग्नसमारंभ मनापासून आवडत नाहीत. ज्या अनेक कारणांनी लोक लग्नसमारंभांना जातात त्यात 'फुकट खाणं' हा एक उद्देश असू शकतो. मला तरी हा मोह विकृतीकडेच झुकलेला वाटतो.

चरितार्थासाठी पैसे मिळवणं हा तर कर्तव्याचाच भाग आहे. पण त्याला 'पैशाची हाव' असं स्वरूप आलं की त्याला चुकीचं वळण लागतं. पैशाची हाव, जास्त व्याजाचा मोह म्हणजे ते व्यसनच हे कित्येकांना कळत नाही. निरनिराळ्या स्कीम्स, म्युच्युअल फंड्स, गोल्डक्वेस्ट्स, शेअर्स यांचा नाद लागला की माणूस त्या विचारात गुंतून जातो. पुढची पायरी त्यात थोडे पैसे गुंतवणं, मग जास्त, असं जुगारासारखं ते व्यसन वाढत जातं. शेअर ब्रोकरेज ही गोष्ट निराळी आहे. तो कमिशनचा व्यवस्थित धंदा आहे. पण शेअर्समधे पैसे गुंतवून वाढवणं याचा स्वतःचा पूर्णवेळचा धंदा व्यवस्थित जमला अशांचं प्रमाण हजारात एक इतकं कमी असतं. बाकीचे सगळे 'आपटे' असतात.

अमेरिकेत फिलाडेल्फियामधे मी आणि शोभा राहात असताना मी एक

मूर्खपणा केला तो तुम्हाला सांगायचाय्. मी शोभाचा सल्ला घेतला होता असं मी म्हणू शकतो पण त्याला काही अर्थ नाही. तिला काहीच अनुभव नव्हता. लवकर पैसे कमवू आणि लवकर भारतात परतू या कल्पनेपायी आम्ही तिथे एका भारतीय माणसानी चालू केलेल्या नवीन कंपनीत डॉलर्स गुंतवले. आम्ही आणि इतर काही लोक कंपनीच्या काही टक्क्यांचे मालक झालो. काही महिन्यांत कंपनी आणि आम्ही सगळे मालक गाळात गेलो. थोडक्यात माझी हाव नडली. कंपनी चालवणारा थेट पळून गेला. त्यानंतर गेल्या 45 वर्षांत मी तसला वेडेपणा पुन्हा केला नाही. मी आत्तापर्यंत एकदेखील 'शेअर' घेतलेला नाही आणि त्या दिशेला सुद्धा बघितलेलं नाही.

शोभाचा आणि माझा स्वतःचा या बाबतीतला विचार सांगतो. स्वकष्टानी मिळवलेल्या गोष्टीमुळे मिळणारा आनंद याचं वर्णन फार अवर्णनीय आहे. व्यवसायात, नोकरीत, दर महिन्याचा चेकसुद्धा आपल्याला आनंद देतो. कष्टाशिवाय मिळालेल्या वस्तूची फिकीर आपल्याला कमी असते. काही वस्तू खरेदी केली आणि त्याच्याबरोबर कंपनीनी प्रमोशनसाठी दिलेल्या फ्री वस्तूमुळे तात्पुरता आनंद होतो, पण त्या फ्री वस्तूविषयी पर्वा कमी असते. मालमत्तेच्या बाबतीत तसंच. कष्ट करून, कर्ज काढून, बँकेचे हप्ते कष्टानी, काटकसर करून फेडल्यानंतर जेव्हा जागेचा आनंद मिळतो तो आयत्या मिळालेल्या जागेपेक्षा जास्त असतो. जेवढं हे स्पष्टपणे लवकर कळेल तेवढं बरं. दुसऱ्यानी भेटवस्तू दिली तर होणारा आनंद कमी काळ टिकणारा असतो. स्वतः पैसे साठवून कष्टानी वस्तू घेतल्याचा आनंद टिकाऊ असतो.

हा मुद्दा एवढा सविस्तर मांडण्याचा उद्देश असा की, एवढं सगळं कळत असून 'आयतं' काहीतरी मिळावं असा मोह कसा होतो? माझ्या मते याबद्दलच्या तत्त्वचिंतनाची बैठक कच्ची असते. माझ्यापुरतं म्हणाल तर, मला ते पूर्णपणे पटलेलं असल्यामुळे मी कोणाकडूनही भेटवस्तू स्वीकारत नाही. मी माझ्या वस्तू स्वतः विकत घेतो. यामधे संकोच, भीड अशा भावनांमुळे होणारे घोटाळे मला माहीत आहेत. दुसऱ्याला वाईट वाटेल म्हणून वस्तू स्वीकाराव्या लागतात वगैरे सगळं मला माहीत आहे. त्याबद्दल मी माफी मागतो, पण शेवटी वस्तू नाकारतो. अशा अनेक प्रश्नांविषयी आपण स्वतंत्रपणी सविस्तर बोलणार आहोत.

एका विशिष्ट वृत्तीचं वर्णन करतोय्. 'जे माझं नाही ते मी दुसऱ्याकडून घेणार नाही आणि जे माझं आहे ते पटलं तरच दुसऱ्याला देईन.' हे विधान पैसे,

भौतिक गोष्टी, वस्तू यांच्याबद्दल आहे. ज्ञानदान आणि ज्ञानग्रहण ही संपूर्णपणे स्वतंत्र आणि सतत चालणारी गोष्ट आहे. त्याला हे विधान लागू नाही.

चुकीच्या पद्धतीनी पैसे मिळवणाऱ्यांची इतरांसाठी करण्याची वृत्ती कमी होते. हाताखालच्यांशी, गरिबांशी, कामकऱ्यांशी वागणं अधिकाधिक वाईट होत जातं. पुढे दुसऱ्याला फसवतानाही दिक्कत वाटेनाशी होते. सारखी घासाघीस दिसते. अशा कुटुंबात नवरा-बायकोचेही संबंध 'स्वस्थ' राहाणं फार कठीण जातं कारण ते पैशाचं भूत सगळ्यांच्या मानगुटीवर बसलेलं असतं.

काही उदाहरणं देतो. पूर्वी एक ड्रायव्हिंगच्या धंद्यातले चांगले ओळखीचे गृहस्थ होते. आमच्या संपूर्ण कुटुंबाशी त्यांची जवळची ओळख होती. अनेक बाहेरगावच्या, माझ्या व्यवसायाच्या, खासगी सहलींच्या खेपा असायच्या. एकदा मी त्यांना म्हटलं, 'मला एक सेकंडहँड गाडी निवडून द्याल का?' त्यांनी लगेच ते मनावर घेतलं नि मला गाडी मिळवून दिली. त्यानंतर आश्चर्य म्हणजे ते एकदम भेटेनासे झाले, फोन उचलेनात. मी त्यांच्या ओळखीच्यांकडे चौकशी केल्यावर कळलं की, माझ्या गाडीच्या व्यवहारात त्यांनी चोरून काही कमिशन खाल्लं. अशा माणसांचं मला खूप आश्चर्य वाटतं. माझ्याकडून नियमितपणे त्यांना काही प्राप्ती होत होती, ती सोडून देऊन, चांगले असलेले संबंध बिघडवून घेऊन त्यांनी कमिशनच्या चोरीच्या लोभानी स्वतःचं नुकसान करून घेतलं. मला टाळण्यासाठीही त्यांना खूप कष्ट घ्यावे लागले असणार कारण ते माझ्याच भागात रोज यायचे.

फसवायचं नाही हा निर्णय घेतलेले आणि खरोखर तसं वागणारे खूप जण आहेत, पण न फसण्याचा निर्णय घेतला तरी ते आचरणात आणण्यासाठी मोठी तपश्चर्या लागते. न फसण्याची खबरदारी घ्यायला मी अनेक वर्षांत खूप कष्टानी शिकलो. आपण न फसल्यामुळे समोरचा माणूस रागावला अशीही खूप उदाहरणं सापडतात.

पैशाच्या व्यवहारात आपण फसलो, नुकसान झालं की वाईट तर वाटतंच, पण फसायचं नसेल तर रास्त भावाच्या चौकशीसाठी वेळ घालवायला लागतो, मेहनत करावी लागते. पैसे रोखीत बाळगायचे असले तर सांभाळायचे कसे याचं शिक्षण घ्यावं लागतं. काही प्रमाणात याविषयी विचार स्पष्ट व्हावेत म्हणून याच पुस्तकातल्या 'विवाह आणि व्यवस्थापनशास्त्र' या लेखात बऱ्याच बारीक बारीक गोष्टी सांगितल्या आहेत. शिवाय 'एमएमआय आणि आरक्यू' हा लेखही त्यासाठी उपयोगी पडेल.

पूर्वी मला मोबाईल फोनच्या वापराविषयी पुरेशी माहिती नव्हती. मी ओळखीच्या दुकानदाराकडून मोबाईल फोन विकत घेतला. माहिती अपुरी असल्यामुळे मी घरी आलो आणि कव्हर उघडून त्याचं लिटरेचर वाचलं. फोन थोडा वापरून बघितला. मला त्यात गजर लावण्याची सोय हवी होती, ती सापडेना म्हणून पुन्हा लिटरेचर वाचलं. त्यातही गजराचा उल्लेख नव्हता. दुकानदाराला फोन करून हे सांगितलं. त्याला माहिती नव्हतं. उगीच फोन परत करण्यात दिरंगाई नको म्हणून फोन घेतल्यापासून तासाभरात त्याच्याकडे परत गेलो. गजराची सोय नाही म्हणून तो मोबाईल सेट परत केला. त्यानी कंपनीकडे चौकशी करण्यासाठी तो ठेवून घेतला. या गोष्टीला पाच वर्षं झाली. तो त्याविषयी एक शब्दही बोलत नाही, पैसे परत करण्याची तर बातच नाही. ओळखीचा दुकानदार असल्यामुळे मला 'खास वागणूक' मिळाली. या दुकानदाराचं आर्थिक व्यक्तिमत्त्व कसं असेल, आपण कल्पना करू शकतो की!

भारतात परत आल्यावर मी स्वतःच्या व्यवसायात काही चुका केल्या, त्याचे दोन किस्से सांगतो. सुरुवातीला प्राप्ती फार नव्हती. टॅक्स रिटर्न्स भरायची सुद्धा जरूर नव्हती. पण सी.ए. झालेल्या मित्राला विचारलं, त्यानी रिटर्न्स भरले आणि भरपूर फी घेतली. मग मी आणखी एका दुसऱ्या सी.ए. मित्राकडे गेलो. तो फक्त लाएझन प्रॅक्टिस करणारा निघाला. त्यानी दुसऱ्या एका सी.ए. कडे नेलं. त्यानी किरकोळ सल्ला देऊन आणखी जास्त फी घेतली. योग्य पद्धतीनी रास्त फी घेऊन व्यवस्थित काम करणारा सी.ए. शोधायला मला खूप त्रास पडला.

दुसरा किस्सा एका भागीदारीचा. त्या भागीदारीत बांधकामासंबंधी सर्वकाही मी करायचं होतं आणि पैसे उभे करायची जबाबदारी दुसऱ्या भागीदाराची होती. प्रत्यक्षात जेव्हा काम उभं करण्याची वेळ आली तेव्हा कळलं की तो पैसे उभे करू शकत नाही. समोरची संधी हातची जाऊ नये म्हणून मलाच शेवटी पैसे घालावे लागले. तो भागीदार त्यापुढचे पैसे जमा करू शकला नाही. त्यामुळे संधीही गेली आणि माझे पैसेही गेले. दुसऱ्यावर कधी अवलंबून राहायचं नाही हा धडा मात्र मी शिकलो.

माझ्या सल्लामसलतीच्या व्यवसायात व्हॅल्युएशन हा एक भाग होता. एकदा एक जवळचा मित्र आणि त्याच्या जवळच्या नात्यातले जमिनीतले भागीदार यांच्या मालकीच्या जमिनीचं व्हॅल्युएशन करायचं होतं. तेवढं सुरळीत पार पडलं. पुढे प्रश्न असा आला की, दोघांच्या भागीदारीच्या हिश्श्यात बऱ्याच अडचणी

होत्या, गैरसमजुती, कागदपत्रांच्यामधल्या त्रुटी होत्या. दोघंही माझ्या खूप जवळचे ओळखीचे, त्यामुळे त्यांचा प्रश्न मिटावा अशी माझी इच्छा होती. वकिलाचा काही उपयोग नव्हता कारण खटलाखटली करायची त्यांची इच्छा नव्हती. मग दोघंही म्हणाले की, मी मध्यस्थी करावी.

त्यांना हे मी सांगून बघितलं की, तुम्ही दोघं एकमेकांशी बोलून तुमच्या अपेक्षांचा मध्य काढा, मी मध्यस्थ असलो तरी मी मध्यच काढणार. त्यांचे संबंध संभाषणापलीकडे ताणले गेले असल्यानी मला मध्यस्थी करावी लागली. मी तो मध्य काढून दिला पण दोघंही शेवटी नाराज झाले नि मैत्रीवर परिणाम झालाच. सध्या एवढ्या वर्षांनंतर मी विवाह समुपदेशनाचं काम करतानाही मला अनेक वेळा मध्य काढण्याचंच काम करायचं असतं, पण तेव्हा आणि आतामधे फार फरक आहे. पूर्वीच्या माझ्या व्यवस्थापनशास्त्राच्या ज्ञानात, मानसशास्त्र, विवाह आणि कुटुंब समुपदेशन आणि तत्त्वज्ञान या विषयांच्या ज्ञानाची भर पडल्यामुळे मी त्यांचा किंवा माझा घोटाळा होऊ देत नाही.

मी बांधकामाच्या म्हणजे बांधकाम सल्लागाराच्या नाही, प्रत्यक्ष कंत्राटदारीच्या धंद्यातही काही वर्षं होतोच. एका मित्राबरोबरच्या बांधकामाच्या करारावर सही केली होती आणि त्यात मी पैसे गुंतवायचे नाहीत असं स्पष्ट लिहून सह्या केल्या होत्या. सगळं काम सुरळीतपणी साधारण निम्म्यावर पोचलं असताना त्यानी एक भलताच मुद्दा काढून वादाला सुरूवात केली. त्याची मशीनचे भाग बनवणारी छोटी कंपनी होती आणि तो टेल्कोला ते भाग पुरवायचा. तिथे त्याला माल दिल्यानंतर तीन महिन्यांनी चेक मिळायचा. याउलट त्याच्या कामासाठी जी मालखरेदी मी करायचो त्यामधे सगळे पैसे त्याला रोख द्यायला लागायचे. त्यानी मुद्दा मांडला की, त्याला पण टेल्कोच्या व्यवहारासारखं तीन महिन्यांचं 'क्रेडिट' मिळायला पाहिजे. माझ्या ओळखीचे सप्लायर्स त्याला तयार होते, पण माझ्यावर जबाबदारी टाकून. मी ती जबाबदारी घ्यायला तयार नव्हतो कारण पैसे न गुंतवण्याचा आमचा करार होता. या वादातून मी कसाबसा मार्ग काढला पण त्यापुढच्या करारांमधे या शक्यतेसकट मुद्दा टाकायचा हे शिकलो. खरा निष्कर्ष असा की, कितीही स्पष्ट बोलावं, लिहावं लागलं तरी चालेल. व्यवहारात लेखी करार या गोष्टीला घाबरू नये. वागणूक मात्र कायम चांगली अगत्यपूर्ण हवी.

माझ्या पैशाच्या अडचणीच्या काळातच एकानी मला फसवलं. माझ्या दृष्टीनी ती मोठी रक्कम होती. मी एका मित्राच्या ओळखीनी एका मातब्बर

प्रोफेशनल निगोशिएटरला गाठलं. त्यानी सगळं समजावून घेतलं. दोन दिवसांनी माझ्या मित्रानी सांगितलं, 'ते एवढं छोटं काम घ्यायला तयार नाहीत. त्यांचं 'कमिशन' कमीतकमी एक कोटी असलं तरच ते मध्यस्थी करतात', त्याखेरीज राजकारणातल्या त्या मोठ्या माणसाच्या इतर व्यवस्थेला जेवढा खर्च येणार होता तेवढी माझी वादातली रक्कमदेखील नव्हती.

'प्रोफेशनल निगोशिएटर' याचा अर्थ अनेक मध्यमवर्गीयांना बहुतेक कळणारच नाही. राजकीय दबाव, कायदेशीर बाजूंचा अभ्यास आणि जरूर पडेल तेव्हा बळाचा वापर या तीनही गोष्टी ज्यांना आत्मसात असतात ते हा व्यवसाय करतात. त्यांचा व्यवसाय जोरात चालतो कारण एक कोटी कमिशन देण्याइतपत मोठ्या आकड्यांत वावरणारेही बरेच लोक आहेत. अशा अतिश्रीमंतांचा, खूप प्रसिद्ध लोकांचा कुठच्या ना कुठच्या प्रकारे गुन्हेगारी जगताशी संबंध असतोच. सरळ किंवा तिरक्या मार्गानी पण एकदा श्रीमंती आली की त्याच्या संरक्षणासाठी हिंसा करू शकणाऱ्यांची नेमणूक करावीच लागते. अतिश्रीमंतांच्या मुलांना पळवून नेण्याचा धोकादेखील असतोच. तसं होऊ नये म्हणून जी काही व्यवस्था करावी लागते ती शेवटी हिंसेचीच व्यवस्था असते.

माझ्या बांधकाम व्यवस्थापनाच्या व्यवसायातला एक अनुभव सांगण्याजोगा आहे. अनेक व्यवसाय यशस्वीपणे केलेला अनुभवी माणूस होता. सर्व प्रकारच्या मालखरेदीचा, भाव कमी करण्याचा, मोठ्या प्रमाणावर वस्तू घेण्या-विकण्याचा भरपूर अनुभव या माणसाच्या गाठी होता आणि तरी एका कामावर आर्किटेक्ट आणि इंटीरियर डिझायनरनी त्यांना फसवलं. मालखरेदीची एवढी माहिती त्यांना होती, पण सर्व्हिस कॉंट्रॅक्टची नव्हती. आर्किटेक्ट आणि इंटीरियर डिझायनर या दोघांशी त्यांनी घासाघीस करून लंपसम म्हणजे एकरकमी करार करून घेतले, पण त्यांनी काय सर्व्हिस द्यायची याचे तपशील नीट लिहून घेतले नाहीत. परिमाम असा की, कामावर धड सुपरविझन नाही, त्यामुळे काम बिघडलं. वेळेवर न झाल्यामुळे खूप नुकसानही झालं. सारांश असा की, मटीरियल सप्लाय कॉंट्रॅक्ट आणि सर्व्हिस कॉंट्रॅक्ट निराळी असतात आणि दोन्हींचा अभ्यास करावा लागतो.

त्याशिवाय या गृहस्थांनी काय केलं होतं, की आवडलेल्या बांधकामाच्या वस्तू स्वस्तात स्वस्त पद्धतीनी ते खरेदी करत गेले. असं बांधकामापूर्वी दोन-तीन वर्षं चाललं होतं. त्या शोभिवंत वस्तू अर्थातच नंतर बांधलेल्या इमारतीच्या मापांशी जुळणाऱ्या नव्हत्या. त्या वस्तूंचा वापर करण्यासाठी डिझायनरला खूप

डोकेफोड करावी लागत होती. त्याबद्दल खूप तक्रारी होत्या. एकूण त्या माणसाविषयी सगळ्यांच्याच तक्रारी होत्या.

हे गृहस्थ गोडबोले होते. ते म्हणायचे, ''मी माणसांचा भुकेला आहे.'' प्रत्यक्षात सगळ्यांचा अनुभव असा की, ते पैशाचे भुकेले आहेत. मला हा प्रश्न सोडवणं कठीण वाटायला लागलं होतं. शेवटी मी त्या इंटीरियर डिझायनरला म्हटलं, ''काही असलं तरी आपण एका धंद्यातली माणसं आहोत. गैरसमजुती झाल्या हे तर उघडच आहे. पण शेवटी गिऱ्हाईक नाराज होणं हे आपल्याला शोभत नाही.'' त्यातल्या 'शोभत नाही'चा उपयोग झाला आणि गाडी रुळावर आली. मी अनेक ठिकाणी नेहमी म्हणतो की, अमुक घटना स्वतःला शोभली का नाही हा मुख्य प्रश्न असतो.

माझ्या बांधकामातल्या सल्लामसलतींच्या अनेक मीटिंग्जमधे मला कळतं की, दोन माणसांचा पैशांचा व्यवहार ठरतो आहे, गोल गोल फिरवून आडूनआडून जे काही बोलणं चालू आहे त्या सगळ्याच्या मागे आहे फक्त घासाघीस. 50 आणि 100 यांचा मध्य 75 हाच शेवटी काढायचा, पण त्यासाठी तासन्‌तास घालवायचे, उणीदुणी काढायची, पण घासाघीस शब्द वापरायचा नाही.

ह्या सगळ्यातलं मूलतत्त्व असं आहे की, चरितार्थापुरते पैसे प्रत्येकानी जरूर मिळवायचे, शक्य झालं तर स्वतःच्या आणि जोडीदाराच्या चरितार्थापुरते मिळवायचे. त्याच्या पुढची पायरी म्हणजे मुलांसाठी पैसे मिळवायचे, पण ते कोणालाही न फसवता मिळवायचे. प्रत्यक्षात दुर्दैवानी हुशार, चलाख आणि लबाड हे एका अर्थाचे शब्द बनायला लागले आहेत. हा प्रकार इतका वाढला आहे की, लोकांशी व्यवहार करताना आपण कोणाला फसवायचं नाही हा निर्णय अमलात आणणं सोपं आहे. फार फार तर त्यामुळे जरा कमी पैसे मिळतील, पण दुसऱ्या कोणाकडून फसायचं नाही ह्यासाठी फार मोठं कौशल्य लागतं, अशी परिस्थिती आहे. न फसण्याचं शिक्षण देणारी यंत्रणा अस्तित्वातच नाही. फसवायचं कसं याचे अगणित कोर्सेस आहेत.

भारतीय जनतेचं एका बाबतीत मला खूप आश्चर्य वाटतं. त्यांना फसवणाऱ्या माणसाचा राग येण्याऐवजी कौतुकच जास्त वाटतं. छोटा घोटाळा करणारा त्यांच्या दृष्टीनी हीरो असतो आणि मोठमोठे घोटाळे करणाऱ्याचा तर दबदबाच असतो. ज्यानी जनतेला गंडा घातला तो माणूस हुशार तर असणारच. सबंध देशाला फसवणारा माणूस तर खूप हुशार असणार याबद्दल शंकाच नाही. लोक

त्या माणसाचं नाव अतिशय आदरानी घेतात याचं बहुतेक कारण असं असणार की, ‘जी गोष्ट आपल्याला बापजन्मात जमली नसती ती यानी करून दाखवली,’ असं त्यांना वाटत असणार.

प्रत्येकानी चांगलं काम करावं असं म्हणताना राज्यकर्त्यांनीही चांगलं काम करणं आवश्यक आहे याची जाणीव बोचते. आमच्या, माझ्या आणि शोभाच्या प्रत्यक्ष वैयक्तिक ओळखीचे राजकारणात असलेले लोक आहेत. आम्ही कुठच्याच राजकीय पक्षाचे नसल्यामुळे आमची निरनिराळ्या पक्षांतल्या लोकांशी वैयक्तिक ओळख टिकू शकते. आमच्या मते, सगळ्या राजकीय पक्षांनी शहरं वाढवण्याचा आणि शहरं, खेडी यांना लुटण्याचा कार्यक्रम चालवलेला आहे. पर्यावरणाची लूट तर बोलण्यापलीकडे आहे. याला व्यक्ती म्हणून प्रामाणिक असणारे काही नगरसेवक अपवाद आहेत, पण पक्षश्रेष्ठींपुढे त्यांचं काही चालत नाही. जनतेला सर्व अर्थानी लुटण्यामधे पुण्याचा प्रथम क्रमांक आहे. महागाई, रस्ते, वीज, पाणी, रहदारी, सुरक्षितता सगळ्या बाबतींत पुण्याची वाट लागलेली आहे. कुठच्या तरी बाबतीत पुण्यानी एक नंबर पटकावलाच!

एक महत्त्वाची गोष्ट सगळ्या व्यवहारांच्यात लक्षात ठेवण्याजोगी आहे. ती म्हणजे धंदा फार मोठा झाला की, त्यातली मजा संपली समजायचं. सगळ्यांना समजायला सोपं म्हणून आपण मुंबई-पुण्यातल्या मोठ्या बिल्डरचं उदाहरण घेऊया.

फार मोठ्या रकमांचा प्रश्न असला की ते पैसे लोकांकडून तरी उभे करावे लागतात किंवा खाजगी फायनान्सरकडून घ्यावे लागतात. सध्या चाललेलं सुब्रोतो रॉय सहारा प्रकरण आपण वर्तमानपत्रांतून वाचतोच आहोत. फार मोठी रक्कम ह्याचा आणखीन एक जवळजवळ निश्चित संबंध गुन्हेगारी जगताशी असतो. मोठा धंदा करणारा माणूस रोज कितीही ऐटीत हसतमुखानी रुबाबात वावरत असला तरी त्याला त्याच्या व्याजांच्या आकड्यांमुळे एकतर शांत झोप लागत नाही किंवा तो निगरगट्ट असला तर केव्हातरी तुरुंग, मारामारी, खूनदेखील त्याच्या नशिबात लिहिलेला आहे, हे त्याला माहीत असतं.

आर्थिक व्यक्तिमत्त्वाच्या पृथक्करणाची आणखी एक पद्धत सांगतो. काही माणसं दुसऱ्याला व्यवहारात फसवणं, त्यांचा गैरफायदा घेणं, कुरघोडी करणं यातच भूषण मानतात. खूप मोठ्या संख्येनी या अशा फसवणाऱ्यांकडून फसणारे असतात. अगदी कमी लोक तिसऱ्या निराळ्या प्रकारचे असतात. ते फसवतही नाहीत आणि फसतही नाहीत. एवढंच काय, दुसरा तिसऱ्याला फसवत असेल

तर तेही खपवून घेत नाहीत. समोरचा माणूस या तीन प्रकारांपैकी कोण याचीही पारख खूप महत्त्वाची असते.

ही पारख लग्नाआधी करता यावी यासाठी खेळांबरोबरच गटचर्चांमधले काही विषय उपयोगी पडतात. मागच्या काही आर्थिक व्यवहारांविषयी समतोल साधता आला का ही गटचर्चा उपयोगी पडते. मध्यमवर्गीय या शब्दाची तो माणूस कशी व्याख्या करतो यावरून पारख करायला मदत होते. तसंच निवृत्तीनंतरच्या आयुष्याच्या कल्पना याचाही छान उपयोग होतो. स्वतःची निवृत्ती ही गोष्ट खूप दूरची असली तरी आई-वडील, काका, मामा, मावश्या, आत्या, ओळखीचे यांच्या उदाहरणांचा खूप उपयोग होतो.

जरा तत्त्वज्ञान आणि व्यवहार यांचा रोजच्या आयुष्यातला संबंध तपासूया. फुकट कोणाकडचं काही घ्यायचं नाही हे तत्त्व ठरलं की पुढचे अनेक निर्णय झटपट आणि योग्य पद्धतीनी घेता येतात. ज्या माणसाला ज्या कामासाठी पगार देऊन नेमणूक केली त्याला इतर कामं मुळात सांगायची नाहीत. आणीबाणीत अपवाद केला तर त्याचा मोबदला आग्रहानी द्यायचा हे अमलात आणलं की आयुष्य सोपं होतं. मी एवढी वर्षं बांधकाम व्यवस्थापनाचा, सल्लामसलतीचा व्यवसाय केला त्यात माझे संबंध सगळ्यांशी उत्तम राहण्याचं मुख्य कारण चोख व्यवहार आणि सन्मानाची वागणूक. माझ्या गाडीचा ड्रायव्हर रिकामा असला तरी मी इतर कामं त्याला कधी सांगत नाही. माझी बॅगदेखील मी स्वतःच आग्रहानी उचलतो. सोसायटी वॉचमनना लोक जास्तीची कामं सांगतात हे देखील मला अजिबात पटत नाही.

तत्त्वज्ञान म्हणतं की स्वतः आणि आपल्या संबंधात येणारा सगळा समाज समाधानी होईपर्यंत खरं सुख मिळणं शक्यच नाही. ही गोष्ट लक्षात आली तर समाजकार्य का करायला पाहिजे याचं कारण कळतं. तुम्ही तुमच्या स्वतःच्या पैशानी महाल बांधलात, पण महालापर्यंत पोचण्याची वाट झोपडपट्टीतून असली तर महालात राहण्याचं सुख मिळणंच शक्य नाही.

कित्येकांना सुख याची खरी व्याख्याच समजलेली नसते. स्वतः केलेली चंगळ म्हणजे सुख असं अनेकांना वाटतं. तत्त्वज्ञान मात्र अगदी स्पष्टपणी म्हणतं की, आसपास दिसणारे सर्व प्राणी समाधानात असणं आणि त्याचबरोबर स्वतःच्या गरजा भागणं यालाच खरं सुख म्हणता येईल.

●

13) दातृत्व

एखाद्या माणसाची देण्याची इच्छा असणं हा वृत्तीचा प्रश्न असतो. पैसे असणं किंवा नसणं ही स्वतंत्र गोष्ट आहे आणि देण्याची इच्छा असणं ही निराळी गोष्ट आहे.

बालभवनमधला शोभाचा एक अनुभव सांगतो, एक बाई झोपडपट्टीत राहून छोटं बालभवन आणि तशीच छोटीशी शाळा त्याच झोपडपट्टीत चालवायच्या. अजूनही त्या तसंच पण थोड्या प्रमाणात ते काम करतात. गरवारे बालभवनवर त्यांचं खूप प्रेम आणि शोभावर भक्तीच आहे. मधूनमधून त्या शोभाला भेटायला येतात. कधी बालभवनमधे तर कधी घरी. त्यांचा नवरा अनेक वर्षांपूर्वी वारलेला, दोन मुलगे आणि सुना नीट वागवत नाहीत अशी घरची अगदी जेमतेम परिस्थिती. पण दरवेळेला शोभाला भेटायला येताना त्या अनेक छोट्या छोट्या भेटवस्तू घेऊन येतात. शोभानी त्यांना अनेक वेळा वस्तू न आणण्याबद्दल सांगूनही त्या ऐकत नाहीत. सुरुवातीला शोभाला नि मला वाटायचं त्यांचा पैसे मागण्याचा अंतस्थ हेतू असेल, पण एवढ्या वर्षांच्यात त्यांनी एकदाही पैशाची मदत मागितलेली नाही.

एक फार महत्त्वाच्या गोष्टीचाही उल्लेख इथे करतो. जरा जास्त पैसे असले की ते दान करणं सोपं आहे. त्यापेक्षा पैसे खर्च करण्याचा चांगला मार्ग म्हणजे स्वतःच्या मनाला पटलेल्या क्षेत्रात स्वतः काम करून त्यात पैसे घालणं. आमचा स्वतःचा या बाबतीतला प्रयत्न असा. पालकत्वाचं शिक्षण देणारी शोभा आणि मी दोघं चालवत असलेली संस्था 'पालक विद्यापीठ'. मी त्यात पुरुष पालकांना मार्गदर्शनाचं काम करतो आणि अर्थात 'जीवनसाथ' अभ्यास मंडळ. जीवनसाथ म्हणजे जीवनभर स्पष्ट विचारांची साथ हे आपण सतत लक्षात ठेवूया.

खूप मोठे उद्योगधंदे, कारखाने वगैरे चालवणाऱ्यांना, भरपूर नफा करणाऱ्यांना सरकारी कायद्यानी 'सी.एस.आर.' म्हणजे 'कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिलिटी' बंधनकारक केली. काही उद्योजकांनी कायदा होण्याआधीच स्वतःची जबाबदारी ओळखली होती, पण असे अगदी थोडे. बाकीच्यांना कायद्याचं वेसण घालावं लागलं. त्यातून ते वाटा काढतील हेही नक्की.

●

14) भ्रष्टाचार - काळा पैसा

‘माझं ते मी ठेवणार आणि दुसऱ्याचंही घेणार’ ही वृत्ती एकदा तयार झाली की रोखणं फार कठीण असतं. काहीही करायचं असलं की, ‘त्यात मला काय मिळणार’, हा प्रश्न मनात यायला लागला की भ्रष्टाचाराच्या वाटेवरचा प्रवास सुरू होतो. मनातला या प्रकारचा विचार तपासण्यासाठी प्रश्नावलीत हा प्रश्न घातलेला आहे.

पैसे मिळवण्याचे बिनश्रमाचे मार्ग पसंत आहेत? उदा. लाच. हा प्रश्न इतका डायरेक्ट विचारलेला मुलींना चालतो, मुलांना याबद्दल जास्त अडचणी असतात. लाच ही गोष्ट कदापि मान्य करणार नाही असंही मुलं-मुली म्हणताना आढळतात. प्रत्यक्षात सरकारी नोकरी असली तर लाच ही गोष्टच अशी आहे की घेतली तर शांती जाते, न घेणंही फार कठीण असतं. खाजगी नोकरीत कष्ट जास्त. स्वतःच्या व्यवसाय-धंद्यात त्याहूनही कष्ट जास्त. एखाद्या प्रश्नातून इतक्या तऱ्हेतऱ्हेचे मुद्दे निघतात, की बोलायची सोय नाही.

ज्यावर अधिकृतपणे आपला हक्क नाही त्याची मागणी केली तर ती मागणी पुरी करण्याचं काम लपूनछपूनच करावं लागतं. अर्थातच अशा पैशांचा व्यवहार रोखीतच करावा लागतो. प्रत्यक्ष लाच आणि काळा पैसा या निराळ्या संकल्पना आहेत, पण लाच मिळाली, घेतली अशी पावती बनत नसल्यामुळे टॅक्स रिटर्न्स मधे ती दाखवता येत नाही. त्यामुळे शेवटी असं होतं की, लाच याचा अर्थ काळा पैसा असाच होतो.

पैसे खाण्याची सुरुवात खर्चायला पैसे कमी पडतात म्हणून होते. पण वाईट भाग असा आहे की, किती पैसे मिळाले की लाच खाणं सोडून देणार याबद्दलचे सगळे विचार पुढे विरून जातात. त्याचं व्यसनात रूपांतर होतं. पैसे खाणाऱ्यांची पद्धतशीर संघटना बनते. त्या साखळीचा आपण एक भाग असलो की त्यातून सुटकाच होऊ शकत नाही. पुन्हा किती पैसे कोणाकडून आणि कुठच्या कामासाठी हे बायकोलासुद्धा सांगता येत नाही. समजा, बायकोला सांगितलं तरी मुलांपासून ते गुपित राखण्याची कसरत करावी लागते कारण मुलं आणखी शेजाऱ्यांना सांगतील ही भीती. मुळात पैसे ठेवायचे कुठे इथून प्रश्नाला

सुरुवात होते. मग बाथरूममधे पाण्याच्या टाकीत, बेडरूममधे चोरकप्पे, फॉल्स सीलिंगमधे पैसे हे सगळं चालू होतं.

एवढ्या अडचणी असूनदेखील एखादं काम करण्यासाठी कोणी पैसे चारले नाहीत तर अपमान होतो. वर्तमानपत्रात मधूनच प्राप्तीकर विभागानी धाडी टाकल्याच्या बातम्या येतात. घरात सापडलेल्या नोटांच्या थप्प्यांचे आकडे ऐकले की कळतं भ्रष्टाचाराचा राक्षस केवढा मोठा आहे ते. ज्यांचे याहून फार मोठे व्यवहार असतात ते आपल्या व्यवहारांसाठी म्हणजे पैसे सांभाळण्यासाठी काही टक्क्यांचे अनेक भागीदार ठेवतात. जमिनी घेतात, फ्लॅट्स घेतात कारण आपल्याकडची रोख दुसऱ्याकडे देण्याचा तो राजमार्ग आहे. मी स्वतःही बऱ्यापैकी पैसे कमावले पण त्यावर कायम 'कॅपिटल गेन टॅक्स' भरून टाकला. शेवटी स्वतःची मनःशांती जास्त महत्त्वाची.

बिनश्रमाचे पैसे मिळू लागले की पैशाची किंमत कमी होते. आरोग्याला अपायकारक सवयी लागतात, कारण खर्च कशात तरी करायलाच पाहिजे अशी परिस्थिती होते. सामाजिक भान सुटतं. सर्व गोष्टी पैसे या एकाच भाषेत कळतात.

काही उदाहरणं देतो. एवढ्या माझ्या बांधकामाच्या अनेक वर्षांच्या अनुभवात अगदी थोड्या को-ऑपरेटिव्ह हाउसिंग सोसायट्यांची देखील कामं होती. एका कामावर सेक्रेटरीपदावर एक गृहस्थ सुखवस्तू घरातले होते. तरी ते प्रत्येक सबकॉंट्रॅक्टरकडून पैसे खायचे. त्याला ते मान राखला गेला म्हणायचे. त्या सोसायटीचे अध्यक्ष बरे होते. पण त्या दोघांची मैत्री बघून त्या अध्यक्षांचीही शंका यायची.

शोभा गरवारे बालभवनची संचालक आहे. निरनिराळ्या आर्थिक व्यक्तिमत्त्वांचे अनेक नमुने तिथे बघायला मिळतात. त्यातले दोन खास नमुने इथे सांगतो. एकदा एक नवरा-बायको त्यांच्या मुलाला घेऊन प्रवेश घ्यायला आले. त्याआधी त्यांच्या मेव्हण्यांचा शोभाला फोन आला होता. मध्यम अधिकाराच्या पदावर ते होते. त्यांनी आणखी काय काय आपल्या पदाविषयी सांगितलं नि पुढे सांगितलं 'माझी बहीण आणि मेव्हणे मुलाच्या प्रवेशासाठी येतील त्यांना फुकट प्रवेश द्या, निदान फीमधे निम्मी सवलत द्याच.' मग समोर बसलेल्या त्या जोडप्यानी बालभवनचा प्रवेश घेण्यासाठीचा सविस्तर फॉर्म भरला. त्यात प्रचंड मासिक उत्पन्न लिहिलेलं होतं. लिहिताना काही चूक झालेली नाही असं तपासल्यावर फी न घेणं हे बालभवनच्या नियमातच बसणारं नव्हतं असं दिसलं. शेवटी शोभानी असा मार्ग

काढला की, त्या मुलाला काही कागदपत्रं दाखल न करता नुसतंच यायला सुरुवात करायला सांगितली. माझ्या दृष्टीनी एक गोष्ट स्पष्ट आहे. त्या सरकारी अधिकाऱ्याला आणि त्याच्या मेव्हण्याला फुकट मिळवण्याचं व्यसन जडलं होतं. पुढे तो मुलगा येईनासाच झाला, पण बालभवनला त्यात शिकायला मिळालं.

काळ्या पैशाचा एकदा संबंध आला आणि ते सांभाळायचे कसे, ह्यानी माणूस हवालदील झाला की बहुतेक माणसं हे आपल्याला जमणार नाही असं म्हणून त्यापासून दूर होतात. घरातल्या तिजोरीत पैसे ठेवून सगळ्यांनी कुलूप लावून घराबाहेर पडण्याचीसुद्धा भीती वाटते. ते पैसे एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी न्यायचे असले की, कुठच्या बॅगेतून कसे न्यायचे हे सुद्धा संकट वाटतं. ही झाली सरळमार्गी, सर्वसामान्य माणसाची कथा. पण काही लोक सरकारी पदावर खुर्चीवर बसून लाच घेणारे किंवा त्यांना लाच देणारे ह्या सगळ्याला निर्ढावतात.

एकदा त्याची सवय झाली की, लायेझन इंडस्ट्रीची गोडी लागते. तीच करिअर बनते आणि मग निरनिराळ्या सापळ्यात माणसं स्वतःहून सापडतात. काही लोक चैनीच्या वस्तू घेण्याचा पैसे खर्चण्याचा मार्ग अवलंबतात किंवा काही गिल्ट कॉम्प्लेक्समुळे सामाजिक प्रतिमा उंचावण्याची धडपड करतात. ते अनेक निरनिराळी सामाजिक कामं शोधून त्यांना देणग्या देतात. सर्वांत लोकप्रिय राजमार्ग म्हणजे शेती विकत घेऊन त्याच्यावर खर्च करतात. सरकारी नियमांमधे फार्म हाऊस ह्याची व्याख्या स्पष्ट केली आहे आणि त्यामधे असंख्य पळवाटाही ठेवलेल्या आहेत. अनेक उद्योजक, लायेझन कन्सल्टंट जेव्हा टॅक्स कन्सल्टंटबरोबर चर्चेला बसतात तेव्हा स्पष्ट ठरतं की, फार्महाऊस विकत घेण्याखेरीज दुसरा कुठचाही मार्ग नाही.

काळ्या पैशामधेच ज्यांचा बराचसा व्यवहार असतो अशांसाठी काळ्या पैशाचा देण्याघेण्याचा प्रत्यक्ष व्यवहार कुठे कसा करायचा हा मोठा प्रश्न असतो. पकडलं जाण्याचा धोका असतो. एरवी समारंभप्रिय नसणारा माणूस लग्नसमारंभाच्या बाजूनी बोलायला लागतो, तेव्हा कित्येक लोक कोड्यात पडतात. प्रत्यक्षात त्या कोड्याचं उत्तर काळा पैसा हे असतं. लग्नसमारंभात अगदी राजरोसपणी शेकडो लोकांच्या देखत पैशाचा छोटा, मोठा व्यवहार उरकता येतो. कोणीच काही बोलू शकत नाही.

मला तर सरकारी नोकर दहशतवाद्यांसारखेच भासतात. अंगावर अगदी

काटा येतो एक एक कहाणी ऐकून. आमचे एक जवळचे नातेवाईक होते. ते सरकारी नोकरीत होते आणि पैसे खाण्यापासून दूर होते. नंतर काय झालं कोणास ठाऊक, त्यांनी जागा बदलली, आमच्याशी संबंध तोडले. आम्हाला काही कळेना. मग कळलं की, ते पैसे खाण्याच्या साखळीत जोडले गेले होते त्यामुळे आम्हाला तोंड दाखवणं त्यांना कठीण होतं.

माझ्या बांधकाम क्षेत्रातल्या अनुभवात अनेक लाचखोर मी बघितले आहेत. त्याविषयी अनेकांशी माझं बोलणं झालं आहे. लाचखोरांमधे आम्ही लोक 5 गट मानतो. त्यांची प्रमाणं काही वर्षांपूर्वी अशी होती–

1) जो लाच घेत नाही, पण इमानानी काम करून टाकतो. 1%
2) जो लाच घेतो पण आधी काम करतो आणि दिलेली रक्कम खुशीनी घेतो. 80%
3) जो लाच घेतो, त्यापुढे काम अडवतो, त्रास देतो आणखी जास्त पैसे लुटून मगच काम करतो. 15%
4) जो लाच घेतो आणि तरी काम करत नाही. 3%
5) जो लाच घ्यायला तत्त्वनिष्ठपणे नकार देतो आणि कामही करत नाही. 1%

नं. 1 आणि नं. 2 यांच्या आधारानी आपलं सरकार चालू आहे. 3 नं.चे लोक बरेच वेळा गुंडांना सामील होतात. 4 नं. च्या लोकांच्या बदल्या होतात, त्यांना लोकं कधीकधी धरून पिटतात. 5 नं. च्या लोकांना काही महिनेदेखील एका जागी टिकता येत नाही इतक्या प्रमाणात आयुष्यभर त्यांच्या बदल्या होतात.

आणखी एक गमतीचं जागतिक निरीक्षण सांगतो.

1) उत्तर युरोपात कायदे पाळण्याचं प्रमाण जास्त, भ्रष्टाचार कमी. दक्षिण युरोपात भ्रष्टाचार जास्त, गुन्हेगारी जास्त.
2) अमेरिका खंडात- उत्तरेकडे कायदे पाळण्याचं प्रमाण जास्त, भ्रष्टाचार कमी. दक्षिण अमेरिकेत भ्रष्टाचार, गुन्हेगारी जास्त.
3) भारतात उत्तरेकडे कायदे पाळण्याचं प्रमाण कमी, भ्रष्टाचार जास्त. गुन्हेगारी जास्त. दक्षिणेकडे त्या तुलनेत भ्रष्टाचार कमी, गुन्हेगारी कमी.
   महाराष्ट्र मध्य भारतात मोडतो. भ्रष्टाचार मध्यम, गुन्हेगारी मध्यम.

●

15) व्यसनं

लाच घेणं हे व्यसनच आहे, पण फक्त मानसिक विकारावर ते व्यसन क्वचितच थांबतं. त्यापुढे शरीराला अपायकारक अशा व्यसनांना सुरुवात होण्याचं प्रमाण फार आहे. व्यसनं हा माझ्या अभ्यासाचा विषय नाही. तरी त्याबद्दल काही उल्लेख करणार आहे, कारण मानसशास्त्राच्या डॉक्टरेटच्या निमित्तानी झालेल्या अभ्यासात तेवढा थोडा भाग आला आहे. सगळ्या प्रकारच्या व्यसनांच्या बाबतीत एक धागा कायम असतो. तो म्हणजे आत्मविश्वासाचा अभाव.

काही मानसशास्त्रीय चाचण्यांच्यामधे या व्यक्तीला व्यसन लागण्याची शक्यता आहे किंवा नाही हे कळतं. ती शक्यता असली तर जास्त सावधगिरीनी वागायला हवं. नाहीतर एखादी व्यक्ती मधूनमधून थोडी सिगारेट, दारू, तंबाखू यांचं सेवन करत असेल तर त्यात फार गंभीर काही नसतं. थोडा 'लो स्टेक'चा जुगार खेळला, गंमत म्हणून 'रेस'ला जाऊन म्हणून 100-200 रु. लावले, एखाद्या मशीनशी जुगार खेळला तरी काही फरक पडत नाही. त्याचं प्रमाण वाढलं तर देण्याच्या चाचण्या अर्थातच आहेत नि व्यसन लागलं असं वाटलं तर 'ट्रीटमेंट'देखील आहेच. व्यसनमुक्ती केंद्रं हेच तर काम करतात.

अनेक मुली स्थळ बघताना निव्वळ 'निर्व्यसनी' हा शब्द उगाळत बसतात. ती मुलगी एखाद्याला आवडली असली तर तो मुलगा खुशाल खोटं सांगतो, लग्न करतो आणि मग वादावादी, आरोप यांना सुरवात होते. मधूनमधून दारू-सिगारेट पिणाऱ्या मुलांनी खरं सांगावं आणि मित्र, सहकारी वगैरेंचे खुशाल फोन नंबर्स द्यावेत, माहिती काढायची पूर्ण मोकळीक द्यावी आणि निर्णयाची घाई करू नये.

मी स्वतः 'व्यसन लागणार नाही' अशा प्रकारची व्यक्ती आहे हे माझ्या चाचणीत आलं होतं. तेव्हा माझं लग्न झालेलं होतं नि ती चाचणी अमेरिकेत एका गावच्या जत्रेत (अमेरिकेत त्याला गार्डन फेअर म्हणत असत) गंमत म्हणून दिलेली होती. शोभाच्याही चाचणीत तसंच आलं होतं. इतरही अनेक स्वभाववैशिष्ट्यं त्यात सांगितलेली होती. हा विषय या प्रकरणात येतो कारण व्यसन म्हणजेच खूप खर्च. त्याचा आर्थिक व्यक्तिमत्त्वाशी फार जवळचा संबंध आहे.

●

16) पैशाबद्दलचा कौटुंबिक सुसंवाद-विसंवाद

मी माझ्या एवढ्या अनुभवात, अभ्यासात शेकड्यांनी कुटुंबं बघितलीयत. ज्या कुटुंबात मालमत्तेवरून, पैशावरून काही वादविवाद, विसंवाद झाले नाहीत अशी कुटुंबं मला फारच क्वचित आढळली. मी स्वतः, माझं कुटुंबदेखील याला अपवाद नाही. फरक इतकाच की मी तो वाद मिटवू शकलो. कोणीतरी पडतं घेऊन वाद मिटतात. पण मुळात सगळ्यांची भूमिका समंजसपणाची असल्यामुळे वाद झालाच नाही अशी उदाहरणं फार फार कमी असतात.

एका उदाहरणात आईवडलांना पैशाची जरूर असल्यामुळे एका मुलानी अनेक वर्षं त्यांना पैसे पाठवले. त्याची स्वतःचीच पंचाईत झाली तेव्हा त्यानी बहिणीकडे पैशाची मागणी केली. बहिणीनी स्पष्ट नकार दिला.

वडिलोपार्जित मालमत्तेच्या बाबतीत कायदा किंचित किंचित सुधारणा करत राहातो. पण रीतिरिवाज आणि लोकांच्या स्वार्थाबद्दलच्या कल्पना दोन पिढ्या मागच्या असतात. त्यात योग्य वेळेला स्पष्ट बोलण्याचा, लिखाण करण्याचा अभाव हा रीतीमधला शाप प्रत्येकजण भोगत असतो. इस्टेटीत वाटा मागण्यापुरती समानता फक्त कळली, जबाबदारी घेण्यातली नाही कळली अशी उदाहरणं भरपूर दिसतात. शहरात स्थायिक झालेल्या पण गावी स्वतःच्या वाटची शेती असलेल्यांना भाऊबंदांच्या ग्रामीण हुशारीचे अनुभवही खूप आलेले असतात. कोकणात एकानी उजाड शेतजमिनीचं काही वर्षं खपून नंदनवन बनवलं. जमिनींच्या किमती दसपट झाल्यावर मुंबईत स्थायिक झालेली भावंडं आपल्या हिश्श्यांचा मोबदला मागायला लागली.

मालकीच्याच काय भाड्याच्या जागेबद्दलही खूप भांडणं दिसतात. मोठ्या शहरात तर त्याचा पागडीशी संबंध असतो. मालमत्ता म्हणजे शेवटी पैसेच. 'इम्मूव्हेबल प्रॉपर्टी व्हॅल्युएशन' नावाचं पद्धतशीर शास्त्र आणि पद्धत असते हे कित्येकांना माहितीच नसतं. दोन वास्तू आणि तीन मुलं असल्यामुळे एका गृहस्थांनी जिथे जी दोन मुलं राहतात त्या वास्तू त्या दोन मुलांना दिल्या आणि तिसऱ्याला काही नाही असं जाहीर केलं. प्रत्यक्षात सारखी वाटणी हा उद्देश त्यांच्या मनात होता, पण किमतीचे तीन सारखे हिस्से हे त्यांना कळलं नाही.

त्यामुळे एकाला देऊ केलेल्या भाड्याच्या जागेची पागडीची किंमत प्रचंड, दुसऱ्याच्या वास्तूची किंमत फालतू आणि तिसऱ्याला काही नाही. सरळ, भाबडा पण व्यवहार माहीत नसलेला माणूस होता दुसरं काय!

आई-वडलांना आधीच्या पिढीतल्या संस्कारांमुळे असेल, पण खरंच प्रामाणिकपणे वाटतं की, आपल्या मुलांची मालमत्ता, पैसे यावरून भांडणं होणार नाहीत आणि ते जवळजवळ प्रत्येक वेळेला खोटं ठरतं आणि मग म्हातारपणात आई-वडील म्हणतात, 'आमच्याकडे ही प्रॉपर्टी, पैसे नसते तर बरं झालं असतं.' यापासून प्रत्येकानी काय बोध घ्यायचा ते ठरवावं, गरिबी चांगली असं कोणीच म्हणणार नाही.

सध्याची आधुनिक समाजाची आर्थिक परिस्थिती बघितली तर घरातली पैशाची रचना कशी असावी याबद्दल माझं काही मत आहे. ते जरा सविस्तर मांडतो. एखाद्या घरामधे डबल इंजिन किंवा सिंगल इंजिन जे असेल ते त्याला हे सगळं लागू पडेल.

ह्याचा कमाईच्या आकड्याशी काहीही संबंध नाही. दर महिना नवरा मिळवत असेल ते पैसे हजारांत असोत नाहीतर लाखांत असोत. बायको लाखांच्यात पगार मिळवणारी आय.टी. प्रोफेशनल असो किंवा हाऊसवाईफ असो, रचना हीच. मी शिफारस केलेल्या ह्या व्यवस्थेमधे तीन बँक अकाऊंट असतील. एक नवऱ्याचं अकाऊंट असेल, त्यानी एकट्यानीच ऑपरेट करण्याचं असेल, दुसरं बायकोनी एकटीनी ऑपरेट करण्याचं असेल आणि तिसरा दोघांनी ऑपरेट करण्याचं जॉइंट अकाऊंट असेल. दर महिना खर्चाची जी अंदाजे रक्कम असेल (किराणा, भाजीपाला, कामवाल्या) अशा प्रकारचा सगळा घरखर्च त्यात येईल. खरं म्हणजे जे घरखर्च महिना होणारच आहेत, उदा. वीज बील, फोन बील, सोसायटी मेंटेनन्स, गॅस, टी.व्ही. वगैरे वगैरे असे सगळे खर्च त्या जॉईंट अकाऊंट मधून होतील. समजा, महागाईमुळे आकडे बदलले तर त्यात जास्त पैसे ठेवावे लागतील.

आता त्यातला महत्त्वाचा भाग सांगतो, नवऱ्याची कमाई आणि बायकोची कमाई ह्याचे आकडे निराळे असू शकतील. कदाचित हाऊसवाईफचा आकडा शून्यसुद्धा असू शकेल. पण मूळ मुद्दा असा आहे की, आपापल्या मिळकतीच्या प्रमाणात त्यांनी जॉइंट अकाऊंट मधे पैसे टाकावेत. ह्याचा फायदा स्पष्ट आहे. घरखर्च अडणार नाही आणि स्वतःच्या अकाऊंटच्या ऑपरेशन्सबद्दल स्वातंत्र्यदेखील असेल. मी आणि शोभा आधीच्या पिढीचे आहोत त्यामुळे आम्ही हे प्रत्यक्षात

केलेलं नाही, पण सध्याच्या तरुण पिढीला ही कल्पना मी आग्रहानी सुचवतोय्.

आमच्या अगदी जवळचे नवरा-बायको मित्र आहेत. ते एकदा अतिशय काळजीनी असं म्हणत होते की, पैशाच्या काळजीमुळे इनसिक्युअर वाटतं. त्यांच्या तोंडून हे वाक्य ऐकून आम्ही खरोखरच विचारात पडलो. जीवनसाथमधे ज्या गटचर्चा असतात त्यामधे चर्चेला असा विषय असतो, किती पैसे साठवलेले असले की तुम्हाला स्वस्थ वाटेल? एका मुलानं सांगितलं की, मी आणि माझ्या बायकोनी मुलं नकोत असं ठरवलेलं आहे. आम्हाला साधारणतः सहा-सात लाख रुपये साठवलेले असले की शांत वाटेल. एका छोट्या गावात राहाणारं जोडपं म्हणालं की, आमचा महिना खर्च फारतर तीन-चार हजार रुपये असतो आणि तेवढं व्याज मिळण्यापुरते पैसे आमच्याकडे आहेत, त्यामुळे आम्हाला काही काळजी वाटत नाही.

आमची दोन्ही तरुण मुलं त्यांचा त्यांचा मार्ग शोधतील त्यामुळे त्यांचीही आम्हाला काही काळजी वाटत नाही. एक पुण्यात एकट्या राहाणाऱ्या बाई म्हणाल्या, माझे बँकेत सहा लाख आहेत. माझी स्वतःची जागा आहे. त्यामुळे मी अगदी समाधानी आहे. ही सगळी निरनिराळी उत्तरं आपण बघितली. आता मी तुम्हाला ह्या इनसिक्युअर वाटणाऱ्या कुटुंबाची माहिती देतो; म्हणजे दृष्टिकोनातल्या फरकामुळे सबंध आयुष्य कसं बदलून जातं हे स्पष्ट होईल. मगाशी आम्ही विचारात पडलो असा उल्लेख होता, ते सगळं ज्या कुटुंबाबद्दल बोलणं चाललं होतं तो नवरा महिन्याला चार लाख रुपये कमावतो, बायको महिन्याला एक लाख रुपये कमावते, त्यांचा लग्न झालेला एकुलता एक मुलगा पंचाहत्तर हजार रुपये महिना कमावतो आणि त्यांच्या मालकीचे प्रत्येकी एक ते सव्वा कोटी किमतीचे तीन फ्लॅट्स मुंबईत आहेत. या कुटुंबाला आम्ही फ. पै. कुटुंब म्हणूनच ओळखतो. फ. पै. म्हणजे 'फक्त पैसे' कळतात अशी लोकं.

भारत देशात जसजशी महागाई वाढत जाईल तसतशी फ. पै. जातीतली माणसं संख्येनी, प्रमाणानी वाढत जातील. पाण्याची टंचाई असली की लोक जसे घरात पाणी भरून ठेवतात, तसे हे लोक पैसे साठवत जाणार. या 'फक्त पैसे' जमातीबद्दल आणखी एक निरीक्षण सांगतो. यातल्या बहुतेक नवराबायकोंमधे लैंगिक संबंधांबद्दल खूप अडचणी असतात. नवऱ्यांना त्यांच्या कामाच्या ताणामुळे लैंगिक संबंध नीट करण्याइतकी मानसिक, शारीरिक शक्ती शिल्लक नसते. ते बायकोला 'ऑरगॅझम' ऊर्फ 'समाधी'चा आनंद देऊ शकत नाहीत कारण

त्यासाठी मेहनत करावी लागते ती त्यांना शक्य नसते. बायको असमाधानी राहिल्यामुळे तीही नवऱ्याला लैंगिक तृप्ती देऊ शकत नाही. या लैंगिक असमाधानामुळे 'फक्त पैसे' वृत्ती आणखी वाढीला लागते. 'आपल्याकडे कशी कोटी कोटी रुपयांची मालमत्ता आहे.' हा विचार म्हणजेच नवऱ्याचा 'ऑरगॅझम' आणि 'जास्तीतजास्त महाग खूप साड्या, ड्रेसेस, दागिने' हा विचार म्हणजे बायकोची समाधी अशी अवस्था होते.

वैवाहिक स्वास्थ्याला मारक आणि तारक अशी आणखी एक गोष्ट आहे, की जिचा आर्थिक व्यक्तिमत्त्वाशी, आयुष्यातल्या कर्तव्यांची समज किती आली याचा जवळचा संबंध आहे. संसार म्हटला की पाहुणे येणारच आणि पाहुणे आले की जास्तीचा खर्च होणारच. नवऱ्याचे आई-वडील, भावंडं, भाचरं, पुतणे आणि मित्र, पाहुणे असणार. एका जेवणापुरते आले तरी खर्च होणार. राहाण्याचा एवढा खर्च होत नाही, पण खाण्याचा होतोच. हीच सगळी यादी बायकोकडच्या पाहुण्यांची असणार. काही पाहुणे भावनेनी म्हणजेच मनानी जवळचे तर काही जवळीक कमी पण कर्तव्याचं बंधन जास्त असे.

आपला सगळा अभ्यास मध्यमवर्गापुरताच मर्यादित आहे हे पण मान्य. तरी त्यातही कनिष्ठ-मध्यमवर्ग, मध्यम-मध्यमवर्ग आणि उच्च-मध्यमवर्ग असे तीन आर्थिक क्षमतेचे प्रकार आहेत. पाहुणे फार दिवस राहिले तर जास्त खर्च आणि 'प्रायव्हसी' कमी झाल्यामुळे गैरसोय दोन्ही होते. त्या कारणांमुळे नवरा-बायकोमधे मतभेद झाल्याची खूप उदाहरणं आहेत.

काही पाहुणे सधन असतात, त्यांना होणाऱ्या खर्चाची जाण असते. काहींना सधन असूनही जाण नसते, तर काही हॉटेलवर होणारा खर्च कमी व्हावा म्हणून राहायला आलेले असतात. पाहुण्यांची स्वतंत्र खोली प्रत्येक घरी असेलच असं नाही. खुद्द माझं वैयक्तिक मत असं की चार दिवसांच्या वर कोणाकडे राहायला जाऊ नये. असलेली जवळीक कमी करण्याचा तो एक मार्ग आहे. मी स्वतः स्पष्ट विचारांचा, स्पष्ट बोलणारा शिवाय बोलल्याप्रमाणे वागणारा असल्यामुळे मी आणि शोभा यांच्यामधे सुरुवातीला याबद्दल विसंवाद व्हायचा. त्यात शोभाकडचे नातेवाईक ग्रामीण पार्श्वभूमीचे असल्यामुळे न कळवता यायचे. शोभा वर्किंग वाईफ असल्यामुळे आयत्या वेळच्या या पाहुण्यांमुळे खुद्द तिची पंचाईत व्हायची कारण त्या पाहुण्यांसाठी जेवण करणं, विशेषतः आयत्या वेळचा स्वयंपाक तिला खूप गैरसोयीचा होता.

'अतिथी तुम कब जाओगे' हे मनात आलं तरी बोलणं सोपं नसतं. आमच्या संसारात आलेले हे प्रसंग हळूहळू कमी झाले, आमची आर्थिक परिस्थितीही सुधारली आणि मला शोभाच्या अशा नातेवाइकांची सवयही झाली. माझ्याही बहिणी अशा प्रकारे यायच्या. आई-वडील यायचे, पण त्यांच्या येण्याचं प्रमाण कमी होतं आणि तरी शोभा घरची जबाबदार गृहिणी असल्यामुळे तिच्याकडून अपेक्षा जास्त असायच्या, मी पुरुष असल्यामुळे आणि व्यावसायिक असल्यामुळे माझी सुटका व्हायची पण शोभावर ताण पडायचाच.

याला अपवाद असेही पाहुणे आमच्या संसारात होते. माझे आई-वडील, शोभाचा मोठा भाऊ अशा काहींना जास्त समज असल्यामुळे ते 'हवेहवेसे' पाहुणे होते. आपण स्वतः दुसऱ्याकडे जातो तेव्हा 'हवेहवेसे पाहुणे' व्हायचं असलं तर तसं वागायला लागतं. माझ्या व्यवसायात मला अनेक गावी जाऊन लोकांच्या घरी राहावं लागायचं, कारण काही गावांत 'हॉटेल्स'ची पद्धत नसायची. एक गोष्ट मी कायम पाळायचो. कुठलीही वस्तू त्यांच्याकडे मागण्याची वेळच येऊ द्यायची नाही. प्रत्यक्षात मी 'सन्मान्य सल्लागार' म्हणून त्यांच्या गरजेसाठी गेलेलो असायचो, पण या शिस्तीमुळे आणि पद्धतीमुळेच मी 'सन्मान्य' राहू शकलो. असे सगळे क्लायंट्स माझे कायमचे मित्र बनले. प्रत्यक्ष सल्ल्याच्या व्यवहारातदेखील प्रेमानी पण न्याय्य पद्धतीनी व्यवहार हे मी कायम पाळू शकलो.

माझ्यात आणि शोभामधे पैशाबद्दल एकमेकांवर विश्वास नसण्याचा प्रश्न कधीच आला नाही, पण निराळ्या प्रकारची जोडपी मी पाहिलेली आहेत. तुझे पैसे, माझे पैसे यावरून भांडणारे नवरा-बायको क्वचित, पण सापडतातच. मगाशी आपण म्हणालो तसा प्रामाणिकपणा खरोखर असायला हवाच, शिवाय दिसायला हवा. लग्नानंतर नवरा-बायकोमधे पैशावरून काही मतभेद झाले तर, त्याचा खरा अर्थ लग्नापूर्वी आर्थिक व्यक्तिमत्त्व तपासायचं राहिलं. त्यात खूप फरक असला तर अमुक गोष्ट दुसऱ्याला न सांगता खरेदी केल्यावरून संघर्ष, मग लपवलेले खर्च वगैरे चालू होतं. हळूहळू पैशाच्या व्यवहारावरून विसंवाद चालू होतो, पारदर्शकता नाहीशी होते आणि अविश्वासाचं वातावरण तयार होतं.

मुळात आमच्याकडे कधी काळे पैसे नव्हतेच कारण मी बिल्डरचा धंदा केला तरी संपूर्ण चेक पेमेंटचा, फक्त नं. 1चा धंदा केला. मुळात काळे पैसे घरात आलेच नाहीत की अनेक गुपितं, लपवाछपव्या, कोणाला न सांगण्याची बंधनं सगळ्यातून नवरा-बायकोची आणि कुटुंबाची सुटका होते.

मुख्य म्हणजे संपूर्ण चेकचा धंदा करूनही उच्च मध्यमवर्गीय आयुष्य जगण्याइतके पैसे मिळवता येतात.

करिअरमधल्या अडचणी हा एक स्वतंत्र अभ्यासाचा विषयच आहे. नकारात्मक घटनांची तयारी करताना करिअरमधे अडचणी येणारच नाहीत असं धरून चालणं चुकीचं आहे. त्याबद्दलचं नशीबही त्रासदायक ठरू शकतं, पण त्याबद्दल आपण काही करू शकत नाही. त्यामुळे नशीब या गोष्टीबद्दल बोलण्यात, कृती करण्यात एक मिनिटही वाया घालवू नये. जी घटना घडली असेल त्याला आपली काहीतरी चूक कारणीभूत असणार. माझ्याही करिअरमधे मोठ्या रकमांच्या अडचणी आल्या. त्यात माझं काय चुकलं ते शोधणं महत्त्वाचं. एक तर ती चूक पुन्हा होऊ नये अशी काळजी घ्यायची आणि यापुढे त्यावर इलाज शोधण्यासाठी धडपड सुरू करायची.

पहिली महत्त्वाची गोष्ट म्हणजे जोडीदाराशी संपूर्ण खरं बोलायचं. त्याची किंवा तिची मदत घ्यायची. व्यवसायातल्या किंवा नोकरीतल्या पैशाच्या प्रश्नामधे नवरा-बायकोमधली गैरसमजूत आणि भांडणं वाढली तर प्रश्न अगदी हाताबाहेर जातो. व्यवस्थापनशास्त्र निरनिराळ्या पद्धतीनी सांगतं की, पैशाच्या प्रश्नाच्या बाबतीत (खरं म्हणजे कुठच्याही प्रश्नाच्या बाबतीत) सकारात्मक किंवा नकारात्मक दृष्टिकोन ठेवायचा नाही. समतोल वृत्ती महत्त्वाची. मी माझ्या अडचणीच्या वेळी दोन्ही गोष्टी केल्या. शोभाचा संपूर्ण सल्ला, आधार घेतला आणि समतोल दृष्टिकोन ठेवला. त्यामुळे मी त्यातून सहीसलामत बाहेर पडलो. लोकांकडून प्रचंड रकमा व्याजानी घेतल्या आणि परत केल्या. मी, शोभा आणि आमचा मुलगा आणि मुलगी यांना त्या प्रसंगामुळे महत्त्वाचं शिक्षण मिळालं.

यशस्वी म्हणजे नेमकं काय? श्रीमंत? प्रसिद्ध? नाही ना. तिथेच तर सगळी अडचण असते. 'यशस्वी'चा खरा अर्थ 'समाधानी'. पण तो कळेल तेव्हा खरं. एक म्हण आहे, 'बापकमाईपेक्षा आपकमाईत जास्त मौज आहे'. याचा अर्थ स्पष्ट आहे. आयतं वडलांकडून मिळालेलं उपभोगण्यात जेवढी मजा आहे त्यापेक्षा शून्यातून उभ्या केलेल्या कामाचं समाधान निराळं आहे. ज्या नवरा-बायकोंना काडी काडी करून घर उभं करण्यातली गंमत कळली त्यांची भाववीण जास्त घट्ट विणलेली असते.

●

17) आर्थिक विषमता - देशाची धोरणं

पूर्वी चक्क असा रिवाज होता की लग्न करताना बायकोचं घराणं कमी प्रतीचं (त्याला डावं असं म्हणायचे) असावं म्हणजे संसार सुखाचा होतो. बायको पैशानी बेताची, उंचीनी कमी, वयानी कमी (हे दोन्ही त्या विचारामधूनच आलं), नम्र स्वभावाची, आज्ञाधारक (याला पाण्यासारख्या रंगाची असाही वाक्प्रचार होता, म्हणजे कोणत्याही कुटुंबात मिसळून जाणारी, थोडक्यात कधीही अधिकाराची मागणी न करणारी) अशी असावी. अर्थात गृहकृत्यदक्ष. या सगळ्याखेरीज सुंदर, अशी एकूण अपेक्षा असायची. या गोष्टी घरातल्या वडीलधाऱ्या पुरुषांच्या डोक्यात असल्या तर मुलग्यांच्यामधे येणारच. माझं मत तुम्हाला सांगायला नकोच. याबद्दलचं पुरुषांना शहाणपण यायला अनेक वर्षं जावी लागतात. 'स्त्री-पुरुष समानतेच्या' कार्यशाळेत आणि लेखात आपण याच्या खोलात शिरू.

ही स्त्री-पुरुष विषमता आहेच, पण त्याला आर्थिक संदर्भ आहे म्हणून इथे हा मुद्दामून उल्लेख केला. श्रीमंत लोकांच्या मानसिक अवस्थेच्या अभ्यासात चक्क असं आढळलेलं आहे की, सगळे श्रीमंत वरवर ताठपणी वागले तरी मनातून घाबरून असतात. आपल्याकडे साठलेली संपत्ती जाईल याची त्यांना फार काळजी वाटते. त्यांची संपत्ती काढून कोण घेणार, तर मध्यमवर्गीय आणि मुख्य म्हणजे गरीब कष्टकरी वर्ग. ते आपल्याकडे चोरी करतील याला ते घाबरतात. सरकारला ते घाबरत नाहीत कारण सरकारला केव्हाही कसंही गुंडाळता येतं.

भारतात गेल्या 25-30 वर्षांत श्रीमंत आणि गरीब या विषमतेत खूप वाढ झाली आहे. त्यामुळे असंतोष आणि अविश्वासानी भारलेलं वातावरण आहे. कन्स्ट्रक्शन मॅनेजमेंट कन्सल्टंट म्हणून मी अनेक ठिकाणी स्टाफ ट्रेनिंगसाठी जातो. सगळीकडे मला दिसणारं एक चित्र आहे ते म्हणजे मालक विरुद्ध नोकर असं वातावरण. प्रत्यक्षात सगळ्यांनी मिळून काम करायचं असतं ही कल्पना बाजूलाच पडलेली असते. या विषमतेला उत्तर शोधणं खूप कठीण जातं. त्यावर प्रथम काम करावं लागतं.

आर्थिक व्यक्तिमत्त्व हे एका व्यक्तीचंच असतं असं नाही. मोठ्या उद्योगसमूहाची देखील काहीतरी आर्थिक धोरणं असतात आणि ती आपल्याला

दिसतात कारण त्यातल्या मुख्य व्यक्तीची ती धोरणं झिरपत खाली आलेली असतात. भारतापुरतं बोलायचं तर, 'टाटा समूह' यांचं आर्थिक व्यक्तिमत्त्व सगळ्यांना चांगलं, रास्त, समाजाची पर्वा असलेलं असं स्पष्ट कळतं. इतर काही समूहांविषयी लोक चांगलं बोलत नाहीत.

तसंच वर्तमानपत्रांचं आर्थिक व्यक्तिमत्त्व म्हणजे धोरण उघड असतं. त्या वर्तमानपत्रामागे असलेल्या व्यक्तीची ती पैशाची विचारसरणी असते. महाराष्ट्रात खूप वितरण असलेली वर्तमानपत्रं उघडल्या उघडल्या सगळं कळतं. काहींमधे समाजप्रबोधनाचा प्रयत्न करणारे चांगले लेख सातत्यानी दिसतात तर इतर काही वर्तमानपत्रांत जाहिरातीच मुख्य असतात.

आपण मगाशी गरीब, मध्यमवर्गीय आणि श्रीमंत यांच्या व्याख्या बघितल्या. या व्याख्या रुपयांच्या आकड्यांत मांडण्याचे प्रयत्न सरकारी पातळीवर चाललेले असतात. जागतिक पातळीवर देखील पर कॅपिटा इन्कम, भारतात दारिद्र्यरेषेच्या वर आणि खाली, श्रीमंत लोकांच्यात धनिक क्र. 1 ते 10 वगैरे बरेच उल्लेख सतत वाचनात येतात. पण आपल्या आर्थिक व्यक्तिमत्त्वाच्या अभ्यासापुरत्या आपल्याला उपयोगी अशा एक-दोन गोष्टी सांगतो. त्या अशा. गरीब कुटुंबातले लोक आजचा दिवस, चालू आठवडा, जास्तीतजास्त सध्याच्या महिन्याच्या चरितार्थाच्या सोयीबद्दल काहीतरी योजना करू शकतात, तेवढ्या काळापुरते निश्चिंत असतात. कोणाकडून तरी उसने मागून ते तो महिना काढू शकतात, पण त्यापलीकडे ते आर्थिक योजना करूच शकत नाहीत, कारण त्यांना तेवढेच पैसे मिळतात.

आपल्या ओळखीत कष्टकरी, हातावर पोट असणारे किंवा गरीब असतात, तसे काही ग्रामीणही असतात. आपलं 'जीवनसाथ अभ्यास मंडळ' मध्यमवर्गीय शहरी, मराठी भाषिकांचं असल्यामुळे ग्रामीण लोकांविषयीचा माझा अभ्यासही नाही आणि आपल्याला आज त्याविषयी फार बोलायचंही नाहीय्. पण एक नक्की सांगतो, बरेच ग्रामीण लोक निरक्षर असतील, पण ते अशिक्षित नाहीत. जीवन-शिक्षण या विषयात ते शहरी लोकांपेक्षा जास्त तयार असतात. त्यांना सर्व्हायव्हल आर्टिस्ट म्हणून जग ओळखतं.

आत्ता उल्लेख केलेले धनिक आणि गरीब यांच्यातली प्रचंड विषमता हाच तर भारताचा मोठा प्रश्न आहे. मगाशी आपण 'फक्त पैसे' जमातीच्या श्रीमंतांबद्दल बोललो. भारतातला कष्टकरी गरीब वर्गही 'फक्त पैसे' याच वर्गात मोडतो, पण

उलट अर्थानी. चोवीस तास फक्त पैसे या एकाच विषयाच्या चिंतेत ते असतात. प्रत्येक काम, प्रत्येक गोष्ट ते जीव जगवण्यासाठी करतात. त्यांनादेखील या निराळ्या अर्थानी फक्त पैशाचीच भाषा कळते.

सबंध जगामधे प्रगत देश आणि अप्रगत देश (डेव्हलप्ड आणि डेव्हलपिंग कंट्रीज्) कशाला म्हणतात याची जी समाजशास्त्रानी व्याख्या केली आहे ती आपल्याला खूप विचार करायला लावणारी आहे. समाजातल्या श्रीमंतांच्या प्राप्तीची सरासरी आणि गरिबांच्या प्राप्तीची सरासरी ह्या दोन सरासरींमधला फरक कमी असेल तर त्याला प्रगत देश म्हणतात. यामागे सरकार चालवण्याचं मूळ तर्कशास्त्र असं आहे की, सरकार म्हणजे श्रीमंतांकडून पैसे काढून त्याचं वाटप गरिबांच्यात करणारी यंत्रणा. ही यंत्रणा चालवण्यासाठी जे पैसे लागतात ते पैसे वजा करून उरलेले पैसे गरिबांना द्यायचे असतात. भारत देशाची परिस्थिती अशी आहे की, सरकारची यंत्रणा चालविण्यासाठी लागणारा खर्च वजा केल्यावर गरिबांपर्यंत पोहोचविण्यासाठी काहीही उरत नाही.

पुढचा पेच असा की, या गरीब माणसांकडून माणशी एक असं मत तर पाहिजे असतं त्यामुळे सतत आश्वासनं देत, खोटं बोलत राहाणारा तो म्हणजे राजकारणी अशी परिस्थिती असते. लवकरच भारत जगातली महासत्ता बनेल ह्या संपूर्ण थापा आहेत आणि हे कळण्यासाठी प्रगत देश म्हणजे काय ही व्याख्या सांगितलेली आहे. विकासाच्या व्याख्येप्रमाणे देखील भारताचा नंबर जगातल्या 165 देशांच्यात शंभरच्या आसपास असतो. भारताची अवस्था जर इतकी वाईट आहे तर बाकीच्या 65 देशांची काय अवस्था असेल?

●●●

2

शिक्षण आणि करिअर

1) सध्याची परिस्थिती

आज आपण शिक्षण आणि करिअर याविषयी चर्चा करायची ठरवलं आहे. प्रथम शिक्षणाविषयी बोलावं की करिअरविषयी हा निर्णय घ्यायचा मी प्रयत्न करत होतो, ते मात्र कठीण वाटायला लागलं. करिअरबद्दल विचार करून प्रत्येक जण शिक्षण घेतो. त्यामुळे म्हटलं तर करिअरबद्दल आधी बोलायला हवं आणि आपण शिक्षण हे करिअरच्या आधी घेतो त्यामुळे शिक्षणाचा नंबर प्रथम लावायला हवा. शेवटी असं मान्य केलं की दोन्हीविषयी एकत्र आलटून पालटूनच विचार मांडूया.

एक गोष्ट अगदी नक्की आहे की कुटुंबाबरोबरचं जीवन, त्याचा अभ्यास आणि अंमलबजावणी हा करिअरचाच भाग आहे. त्यासंबंधीचे डूज अँड डोन्ट्स याच्याकडे दुर्लक्ष करताच येत नाही.

भारतामधे शिक्षण हा विषय मुळातच महा गुंतागुंतीचा आहे. माणूस जन्मला की त्याच्या चरितार्थाचा प्रश्न त्या क्षणीच निर्माण होतो. लोकसंख्या रोज वाढत चाललीय, कारण देशापुढचा लोकसंख्या हा गहन प्रश्न आहे याची लोकांना समज नाही. समज नाही, कारण शिक्षण नाही. शिक्षण ज्यांना द्यायचं त्यांची संख्या प्रचंड आहे, पण त्यांना शिकवणारे पुरेसे नाहीत. चरितार्थ चालवण्यासाठी लोक शिक्षक बनायला बघतायत, पण त्या शिक्षकांचंच शिक्षण नीट झालेलं नाही. हा सगळा गुंता कागदावर मांडताना त्यातल्या उपविषयांचीही महा गुंतागुंत आहे हे मला पदोपदी जाणवतंय.

आपण सध्याचं आर्थिक व्यक्तिमत्त्व वगैरेबद्दल आधी एवढं सविस्तर बोललो आणि त्याच्या मुळाशी असलेल्या विषयाच्या खोलात आता मुद्दामच नंतर शिरतो आहोत. लग्नाच्या स्थळाची माहिती काढताना शिक्षण किती याचा उल्लेख अगदी सुरुवातीलाच होतो. जीवनसाथनी तयार केलेल्या प्राथमिक प्रश्नावलीत देखील शिक्षण असा एक रकाना आहेच. त्याचा अर्थ, उद्देश, जो प्रत्येकाच्या मनात असतो तोच मी इथे मांडतोय. शिकलेलं माणूस म्हटल्यासरशी वागण्या-बोलण्याच्या पद्धतीबद्दल आपल्या मनात काहीतरी कल्पना तयार होते. ती कल्पना सभ्य, सुसंस्कृत, संयमी, विचार नीट व्यक्त करणारी व्यक्ती याच्या जवळपास असते. ती कितपत खरी, ते आपण यापुढे ठरवायचं शिल्लक आहे.

शिकायचं कशासाठी असं कोणी विचारलं तर एकच उत्तर मिळतं. पैसे मिळवण्यासाठी. प्रत्यक्षात पैसे फक्त शारीरिक श्रमानीही मिळवता येतात, पण शरीर थकल्यावर फक्त शिक्षणाचाच उपयोग होईल, हे माहीत असतं. खरं म्हणजे शरीर आणि बुद्धी यांचा सततच उपयोग हवा. फक्त बुद्धी वापराच्या कामामधे भारतात सगळीकडे पैसे जास्त मिळतात. यामुळे जास्त पैसे मिळवण्यासाठी जास्त शिक्षण असाच सर्वसामान्य हिशेब असतो.

पालक वर्षभर नोकऱ्या/व्यवसायात गुंतलेले असतात. शाळा-कॉलेजेसना मात्र त्या मानानी खूप सुट्याच सुट्या असतात. उन्हाळ्याच्या सुटीत मुलांना कुठे ठेवायचं, त्यांना कशात आणि कुठे अडकवायचं, या चिंतेत पालक असतात. ही चिंता मिटवणारे लगेच तयारच असतात. मुलांच्या परीक्षा झाल्यापासून शाळा पुन्हा सुरू होईपर्यंत उन्हाळ्यातल्या शिबिरांचा पुणे-मुंबईत सुकाळ असतो. पैसे कमावणं हा ज्यांचा उद्देश असतो त्यांना भरपूर पैसे कमवण्यासाठी दीड महिना असतो. पालकांनापण पैसे खर्च केल्यामुळे मुलांसाठी काहीतरी केल्याचं समाधान मिळतं. अशा शिबिरांमधे व्यक्तिमत्त्व विकास आणि संस्कार वर्ग सर्वांत जोरात असतात.

मुळात जाऊन शिकायचं कशासाठी हा प्रश्न स्वतःला विचारून पाहिला तर असं दिसतं की शिक्षणानी माणूस शहाणा होतो, म्हणजे काय तर त्याला शिकण्यापासून फायदा होतो हे कळतं. 'शिकली सवरलेली माणसं' हा वाक्प्रचार त्यातल्या 'सवरलेली'साठी महत्त्वाचा आहे. शिकण्यामुळे शिकायचं कसं हे समजतं. शिक्षणाची पद्धत, पायऱ्या, मांडणी याबाबतीत माणूस शहाणा होतो. त्यानंतर तो कुठचाही विषय शिकू शकतो. पैसे मिळवण्याची क्षमता येते आणि

आयुष्य हे शिकत राहण्यासाठी आहे हे महत्त्वाचं सत्य समजण्याची शक्यता असते. भारतातल्या शिक्षणपद्धतीतला मुख्य दोष एकच आहे. शिक्षकाचं मुख्य काम विद्यार्थ्याला शिकण्याची गोडी लावणं हे असतं; ते राहून जातं.

एक निराळा विचार मांडतो. शहरातले आणि खेड्यातले प्रश्न निराळे असतात. निसर्गात असलेल्या 3 मोसमांशी शहरी माणसाचा संबंध सोय-गैरसोय एवढाच असतो. ज्या लोकांचा शेतीशी संबंध आहे अशांचं सबंध वर्ष उपजीविकेच्या म्हणजेच शेतीविषयीच्या विचारांनी भरलेलं असतं. ही उन्हाळी सुटी, शाळा बंद, मुलं घरी वगैरे त्यांना अजिबात सोयीचं नसतं. ब्रिटिश लोक भारतावर राज्य करत असताना इथला उन्हाळा त्यांना सोसायचा नाही म्हणून उन्हाळ्यात ते इंग्लंडला जायचे. त्यामुळे इथल्या शाळा सलग दीड महिना बंद असा शिरस्ता पडला. यामधे भारत स्वतंत्र झाल्यावर बदल व्हायला हवे होते. प्रत्येक गोष्टीला मधून मधून सुटी हवी यामधे काही शंका नाही. शालेय, महाविद्यालयीन शिक्षणालाही तीच तर्कसंगती लागू व्हायला पाहिजे.

सरकारी कचेऱ्या, खाजगी धंदे, शाळा, सगळ्याच गोष्टी निसर्गतत्त्वाप्रमाणे नवीन पद्धतीनी योजलेल्या हव्यात. राज्याराज्यात निसर्ग निराळा असतो. त्याप्रमाणे सुट्ट्यांचं वेळापत्रक बदलण्यात काहीच अडचण नाही. मानवी मन आणि शरीर याला सलग किती तास, किती दिवस काम किंवा शिक्षण कार्यक्षमतेनी करता येतं याविषयी बऱ्यापैकी संशोधन झालेलं आहे. वर्षातून किती सुट्ट्या योग्य, किती अयोग्य, यावरही भरपूर काम झालंय. या सगळ्यातून मुलांना वगळायचं काहीच कारण नाही. मला स्वतःला असं वाटतं की भारत सरकारनी मुलं, मुलांचं शिक्षण याकडे फार वर्षं फार दुर्लक्ष केलेलं आहे. मतांच्या राजकारणात मुलं मतदार नसल्यामुळे असं झालंय. जरा याकडे लक्ष दिलं तर मुलांची, त्यांच्या कुटुंबांची सोय होईल आणि शिक्षणाचा दर्जाही सुधारेल.

काम आणि विश्रांती यांचं सर्वसाधारण माणसाचं योग्य प्रमाण किती असावं, कशानी कार्यक्षमता, उत्पादन वाढतं यावर उद्योजकांच्या क्षेत्रात जगभर भरपूर काम झालेलं आहे. माझ्या दृष्टिकोनातून शिक्षण हेच मुलांचं काम मानायला हवं. भरपूर काम चालू असताना मधे 2 ते 3 दिवस सुटी घेतली तर माणूस ताजातवाना होतो आणि अधिक कार्यक्षमतेनी काम करतो. अशा 2-3 दिवसांच्या सुटीची मोठी सुटी करायची असं मानलं तर सर्वसाधारण माणसाला 8 ते 15 दिवस सुटी चांगली वाटते. काही लोक 10 दिवसांनंतर अस्वस्थ

होतात. त्यानंतरच्या 5 दिवस जास्तीच्या सुटीचा त्यांच्या कार्यक्षमतेवर विपरीत परिणाम होतो. मगाशी म्हटल्याप्रमाणे मुलांच्या अभ्यास नावाच्या कामातदेखील 10-15 दिवसांनंतर मुलांना कंटाळा येतो आणि केव्हा एकदा शाळा चालू होतेय असं त्यांना वाटायला लागतं.

मी म्हणतो आहे त्याचा काही लोक चुकीचा अर्थ घेतात. शाळांना दीड ते दोन महिने सुटी असते. त्या सुटीत ते मुलांना क्लासमधे अडकवतात. मला ते योग्य वाटत नाही. शाळांनीच सलग मोठ्या सुटीची पद्धत बंद करून वर्षात विभागून छोट्या जास्त सुट्या द्याव्यात असा माझ्या म्हणण्याचा अर्थ आहे.

शिक्षणाचा मूळ उद्देश स्वतंत्र होणं असा पाहिजे. आपण स्वतःच स्वतःवर अनेक काल्पनिक चुकीची बंधनं घालतो; त्यापासून स्वातंत्र्य हवं. आसपासच्या जगानी आपल्यावर अशीच अनेक चुकीची बंधनं घातलेली असतात; त्यापासून देखील स्वतंत्र व्हायला हवं. सध्याच्या शिक्षणपद्धतीत उगीचच जिथे तिथे स्पर्धा असते. वर्गात कोणाचा तरी पहिला नंबर असं म्हटलं की बाकीचे खालच्या दर्जाचे असं म्हटल्यासारखंच आहे.

शाळा-कॉलेजेसमधे या स्पर्धांचं वातावरण नको असा एक विचार आहे. मुलांचे नंबर लावण्याऐवजी किंवा मार्कांचे टक्के मोजण्याऐवजी नुसत्या ए, बी, सी ग्रेड्स द्यायच्या असा प्रयोग अनेक ठिकाणी सुरू आहे. शाळांची एकूण प्रवृत्ती मुलांवर ताबा मिळवण्याची झालेली आहे.

कुठचीही नवीन कल्पना समोर आली तर लोकांच्या डोक्यातला पहिला विचार असा असतो की याचा उपयोग पैसे मिळवण्यासाठी कसा करता येईल? भाषा शिक्षण असो, आरोग्य शिक्षण असो, कला शिक्षण असो, यंत्र शिक्षण असो, क्ष असो नाहीतर य असो, शिकण्यातला किंवा शिकवण्यातला मुख्य उद्देश आनंद, समाधान असा नसतो तर पैसे हा असतो. सगळे शिक्षक हे दुकानदार बनले आहेत.

फक्त चरितार्थ चालवण्यासाठी शिक्षण हा विचार प्रत्यक्षात खूप जुना आहे. पण प्रश्न होता तो शाळांबद्दल. एक गमतीची गोष्ट सांगतो. भारतात एकेकाळी शाळा नव्हत्या. बरेचसे लोक अशिक्षितच असायचे. जेव्हा प्रथम शाळा सुरू झाल्या तेव्हा लोक विचारायचे, 'या अक्षरं शिकण्याचा आयुष्यात काय उपयोग?' त्यांच्या म्हणण्याचा अर्थ असायचा की शेती, माल विकणं, शेळ्या, गाय, बैल पाळणं यात लिहिण्या-वाचण्याचा संबंधच येत नाही तर कशाला शिकायचं?

'केरळ शास्त्र साहित्य परिषद' नावाची एक विज्ञानाचा प्रसार करणारी संस्था आहे. त्यांचा एक स्टेजवरचा शिक्षण या विषयावर कार्यक्रम मी पाहिला होता. त्यामधे असं दाखवलं होतं की एक नॉर्मल मुलगा शिक्षणाच्या यंत्रात शिरतो. तो बाहेर पडेपर्यंत विकलांग आणि वेडावाकडा झालेला असतो.

शाळेमधे मूल मानसिक, शारीरिक अत्याचार सहन करायला शिकतं. ती मुलं मोठी झाली की त्यातली नव्व्याण्णव टक्के मुलं दुसऱ्यावर अत्याचार करणारी बनतात. त्यात बायको, छोटी भावंडं, मुलं, कामावरचे सहकारी सापडतात. एक टक्का माणसं त्या लहानपणच्या अनुभवामुळे कोणावरही अत्याचार करायचे नाहीत असं ठरवतात.

खुद्द माझं उदाहरण सांगतो. माझ्या वडलांच्या नोकरीमुळे आम्ही तीन भावंडं आई-वडलांबरोबर अहमदाबादला राहात होतो. माझी मोठी बहीण हुशार होती. तिथल्या पद्धतीप्रमाणे ती 4 वर्षांची असताना बालवाडीत आणि 5 वर्षांची पहिलीत गेली. ती बुद्धिमान आहे तेव्हा तिचा भाऊही असेल या कल्पनेनी मला 3 वर्षांचा असताना बालवाडीत आणि चक्क 4 वर्षांचा असताना पहिलीत टाकलं. अहमदाबादमधली मराठी शाळा अशी कल्पना असली तरी सगळे जण गुजराथीच बोलायचे. मी पहिलीत पास कसा झालो, हा प्रश्न मला अजूनही सुटलेला नाही. वय लहान आणि भाषेचा प्रश्न यामुळे माझा अभ्यास मागे पडला. मला कधीच गोडी लागली नाही.

त्यानंतरच्या शाळेमधे अ ब क ड ई फ पर्यंत तुकड्या होत्या. अ वर्गातल्या मुलांवर त्याचा परिणाम व्हायचा. थेट अहंगंड. खालच्या तुकडीतल्या मुलांच्या मनात न्यूनगंड आपोआपच तयार व्हायचा. मुळात धर्म, वर्ण, जात, रंग, आर्थिक वर्ग यांनी संपूर्ण भारतीय जनतेची, त्यातल्या मुलांच्याही मनाची शकलं झालेली आहेतच. त्याच्या जोडीनी लहानपणापासून अ तुकडीतला, फ तुकडीतली असा आणखी एक भेद या व्यवस्थेनी केला. मी माझ्या अनेक अडचणींमुळे अ तुकडीत कधीच नव्हतो.

मला नेहमी वाटतं की, क तुकडीतलं मूल आयुष्य लवकर शिकतं. मागच्या बाकावर बसणारी मुलं तर मनानीच मोठी होतात. लहानपणच्या माझ्या शिक्षणाच्या अवस्थेचा विचार केला की कुठच्या भयानक दलदलीतून मी बाहेर आलो हे जाणवल्यामुळे आता छान वाटतं.

मी 3 ऱ्या किंवा 4 थ्या इयत्तेत असताना आम्ही सगळे नागपूरला गेलो.

तेव्हा नागपूर मध्यप्रदेशात होतं. त्यामुळे शाळेत हिंदी बोलायचे. सगळा गोंधळच गोंधळ होता. 5 वी ची परीक्षा पुण्याला देऊन कसाबसा पास झालो. मग आम्ही लोकं ठाण्याला राहायला गेलो. 6 वी ची परीक्षा कशीबशी पार पडली. पुढे ठाण्याच्याच शाळेत 7 वी, 8 वी आणि 9 वी केली. तीही कशीबशीच.

10 वी च्या सुरुवातीला एका मास्तरांचं दुसऱ्यांशी माझ्याबद्दल बोलतानाचं वाक्य ऐकलं. ते म्हणत होते, 'हा खरा हुशार मुलगा आहे, पण आपण शिक्षक याला अभ्यासाची गोडी लावू शकलो नाही.' या एका वाक्याचा माझ्यावर खूप चांगला परिणाम झाला आणि मी बिघडलेल्या मुलापासून थेट 180^0 मधे वळून अभ्यासू मुलगा बनलो. 11 वी एस.एस.सी.पर्यंत सगळा अभ्यास भरून काढून मी शाळेत दुसरा आलो. त्या माझ्या शिक्षकांनी गोडी लावण्याबद्दल जो उल्लेख केला तो त्यातला सर्वांत महत्त्वाचा शब्द आहे. विषय कुठचाही असो, शिकणाऱ्याला तो शिकताना मजा आली पाहिजे. ते जमत नसलं तर ते शिक्षकाचं अपयश आहे.

माझ्या ओळखीचे शाळा, कॉलेजच्या वयाचे, मोठेपणी नोकरी, व्यवसाय, संसार सांभाळून काहीतरी शिकण्याचा प्रयत्न करणारे बरेच लोक आहेत. कोणी कॉम्प्युटर कोर्स करतं, कोणी चित्रकला शिकतं, कोणी समुपदेशनाचा कोर्स करतं, कोणी नृत्य, वाद्यसंगीत, गाणं, अशा कला शिकतं. मुख्य मुद्दा तरीही तोच राहतो. कुठचाही विषय असो, शिकताना मजा आलीच पाहिजे. समजा, त्यात काही चुकत असलं तर सोयीची पद्धत, विद्यार्थ्यांच्या आवडीप्रमाणे त्यामधे आवश्यक ते बदल हे सगळं शिक्षकानी करायला पाहिजे. प्रत्येक शिक्षकानी सतत लक्षात ठेवण्याची गोष्ट म्हणजे 'विद्यार्थ्याला मजा आलीच पाहिजे' ही जबाबदारी शिक्षकाची आहे.

पुढे मी 15 व्या वर्षी आर्किटेक्चर कॉलेजला गेलो आणि 5 वर्षांचा आर्किटेक्चरचा कोर्स संपवून 20 व्या वर्षी आर्किटेक्ट झालो. इतक्या वाईट सुरुवातीनंतर पुढची करिअर खूपच सुरळीत झाली म्हणायची. कड्याच्या टोकावरून परत आल्यासारखंच वाटायचं मला. मला भाषेचं, गणिताचं, चित्रकलेचं, खेळांचं चांगलं अंग होतं. एवढे गोंधळ माझ्या शिक्षणात झाले असले तरी मला प्रामाणिकपणे वाटतं की सगळे विषय छानच असतात. गोडी लागणं हाच फक्त प्रश्न असतो. मगाशी मी उल्लेख केला त्यातल्या कोणावरही अत्याचार न करण्याच्या निर्णय घेणाऱ्या 1% पैकी लोकांच्यात मी गेलो, एवढं मी अभिमानानी सांगू शकतो.

पूर्वी शालेय शिक्षण खरंच असं होतं. हे सगळंच हळूहळू बदललं. इतकं बदललं की शिक्षण हा पूर्णपणे धंदा बनला. आपल्या शिष्यानी आपल्यापेक्षा हुशारी दाखवली, यश मिळवलं तर स्वतःचा गौरव मानणाऱ्या शिक्षकांपासून विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल मत्सर वाटणारे शिक्षक आम्ही बघितले आहेत.

शिक्षणानी माणसात नेमका काय फरक होतो, याचा विचार करताना मला वाटतं की का आणि कसं शिकत राह्यचं हे समजतं. आज 72 आणि 69 या वयात देखील मी आणि शोभा कायम शिकायला तयार असतो. त्यामुळे आम्हाला शिकवण्याचा नैतिक अधिकार पोहोचतो. शिकणं आणि शिकवणं या दोन्ही भूमिका सतत करणं बुद्धीला आणि भावनेला कठीण जाऊ शकतं. त्यामुळे जरा वय वाढलं, शिक्षण झालं, हुद्दा मिळाला की अनेकांना वाटतं की, यापुढे आता आपण फक्त शिकवायचं. साहजिकच असे लोक शिकायला तयार नसतात. तुम्हाला कल्पना येणार नाही इतक्या मोठ्या संख्येनी आसपास असे लोक आढळतात.

या सगळ्यांखेरीज शाळेच्या माध्यमांचा प्रश्न सगळ्यांना कायम सतावतोच. मराठी का इंग्लिश माध्यम, हा खरा चर्चेलायकसुद्धा विषय नाही. कुटुंबभाषेत शालेय शिक्षण करून त्यानंतर इंग्लिशच काय कुठचीही भाषा शिकायला बुद्धिमान आणि मेहनती विद्यार्थ्याला फक्त 6 महिने ते 1 वर्ष लागतं. या सगळ्याचे निर्णय फीच्या आकड्यावरून होतात ही आणखी वाईट गोष्ट. आर्थिक व्यक्तिमत्त्वाचा प्रश्न बाजूला राहून आर्थिक क्षमतेचाच प्रश्न महत्त्वाचा ठरतो. फी कमी असली तर बरं असं वाटणारेही असतात आणि जेवढी जास्त फी तेवढं जास्त चांगलं शिक्षण असा विश्वास असणारेही पालक असतात. त्याशिवाय शाळेचं नाव ‘इंटरनॅशनल’ शिवाय त्यात ‘केंब्रिज’ वगैरे नावं असली तर शिक्षण फारच उच्च. जेवढं ‘डोनेशन’ जास्त, जेवढी इमारत छान, तेवढी शाळा अधिक छान हेही आहेच.

प्रत्यक्षात इंग्लंड आणि यू.एस.ए. या दोन आपल्याला माहिती असलेल्या देशात शालेय शिक्षण सक्तीचं आणि फुकट असतं. जवळजवळ सगळ्या प्रगत देशांत असंच असतं. शाळा त्या त्या भागात घरापासून जवळ असतात. त्या शाळांच्यात प्रवेश मिळवणं हा चिंतेचा भाग नसतो. प्रवेश मिळतोच. इंटरनॅशनल शाळा म्हणजे नेमक्या कशा असतात हे कळावं म्हणून मुद्दामून सांगितलं.

भारतीय शिक्षणाच्या अवस्थेचं एका निराळ्या पद्धतीनी असं वर्णन

करतात. शिक्षण हा विषय निघाला की त्यातली पहिली पायरी म्हणजे शिकावंसं वाटणं. भारताला ही पहिली पायरी जमलेली नाही. प्रत्येकाला शिकावंसं वाटेल असं वातावरण नाही. दुसरी पायरी म्हणजे अनेक गोष्टी करून बघून आपल्याला काय शिकायला आवडेल ते ठरवणं. त्याची देखील भारतात सगळी पंचाईत आहे. तिसरी पायरी म्हणजे जे आवडेल ते शिकणं. या पायरीपर्यंत बहुतेक लोक पोहोचतच नाहीत. त्यामुळे त्याबद्दलचा प्रश्नच येत नाही. सारांशात, शिक्षणाच्या बाबतीत सबंध भारत देश पार नापास आहे.

भूक लागली की खाण्यातच मजा आहे, तसं शिक्षणाचं आहे. शिकण्याची भूक लागते. त्यानंतर शिकू नको म्हटलं तरी माणूस ऐकत नाही. प्रत्येक नॉर्मल लहान मूल असंच असतं. आपली शिक्षण पद्धती त्याची भूक मारते.

●

शिक्षण हा विषय निघाला की त्यातली पहिली पायरी म्हणजे शिकावंसं वाटणं. भारताला ही पहिली पायरी जमलेली नाही. प्रत्येकाला शिकावंसं वाटेल असं वातावरण नाही. दुसरी पायरी म्हणजे अनेक गोष्टी करून बघून आपल्याला काय शिकायला आवडेल ते ठरवणं. त्याची देखील भारतात सगळी पंचाईत आहे. तिसरी पायरी म्हणजे जे आवडेल ते शिकणं. या पायरीपर्यंत बहुतेक लोक पोहोचतच नाहीत. त्यामुळे त्याबद्दलचा प्रश्नच येत नाही. सारांशात, शिक्षणाच्या बाबतीत सबंध भारत देश पार नापास आहे.

2) परीक्षांची पद्धत

शोभाचा शालेय शिक्षणाशी जेवढा संबंध येतो तेवढा माझा येत नाही. माझ्या बांधकाम व्यवस्थापन सल्लामसलतीच्या निमित्तानी मी अनेक मध्यम आकाराच्या गावी गेलो आहे. एका गावी माझ्या अशीलाच्या घरी काम करणारी मुलगी मला तिथे रस्त्यात भेटल्यामुळे मी तिला चार चाकी गाडीनी लिफ्ट दिली. 'तू किती शिकलीस?' 'नववीत आहे.' एवढं मला कळलं. पुढे मला कळलं की हिला वर्तमानपत्रसुद्धा धड वाचता येत नाही. 'मग ही मुलगी नववीमधे गेलीच कशी'? असं विचारल्यावर कळलं की आठवीपर्यंत सर्व विद्यार्थी-विद्यार्थिनींना पास करून वरच्या वर्गात ढकलण्याचे आदेश होते. मग परीक्षा-पद्धतीविषयी बोलणं निघालं.

परीक्षेची योग्य पद्धत याबद्दल बऱ्यापैकी संशोधन झालेलं आहे. आंधळ्या, मूक-बधीर, मतिमंद, गतिमंद अशा मुलांची परीक्षापद्धत निराळी असावी, हे कोणालाही पटेल. पण अशी मुलं संख्येनी फार थोडी असतात. बाकीची नॉर्मल मुलं, त्यांचे प्रश्न, त्यांच्या बुद्धिमत्तेची वाढत जाणारी तयारी सगळ्या गोष्टी लक्षात घेतल्या तर संशोधनात खऱ्या योग्य परीक्षेबद्दलच्या ज्या कल्पना सापडतात त्यात फार तथ्य आहे.

शिक्षणातल्या सगळ्या अभ्यासक्रमानी त्या विद्यार्थ्याची आयुष्यात येऊ शकणाऱ्या प्रश्नांना तोंड देण्याची तयारी झाली की नाही हे मुख्य तपासायला हवं. त्यामुळे वर्षाच्या शेवटी ठराविक तारखेला एकदाच परीक्षा हे अगदी चुकीचं आहे. वर्षभरात प्रत्येक आठवड्याला आठवड्याभरात शिकवलेल्या अभ्यासाची तोंडी परीक्षा हीच परीक्षा अर्थपूर्ण ठरते. पुस्तकाचा वापरही करायला खरं म्हणजे हरकत नाही. पुढच्या प्रत्यक्ष आयुष्यात कुठचाही प्रश्न सोडवायला कुठचंही पुस्तक केव्हाही बघायला परवानगी असतेच. कुठच्याही माणसाला शंका विचारायला परवानगी असतेच. तसंच शाळेमधे असलं पाहिजे. कोणालाही विचारलं किंवा कुठच्याही पुस्तकाचा वापर केला तरी शेवटी त्याचं उत्तर विद्यार्थ्याला स्वतःच्या तोंडानी द्यावं लागणार हे पक्कं असलं तर खरा अभ्यास केल्याशिवाय विद्यार्थ्याला गत्यंतरच नसतं. कोणाची 'कॉपी' शक्य नाही. एखाद्या विद्यार्थ्याची

आजारपणामुळे गैरहजेरी असली तर तेवढी परीक्षेची व्यवस्था पुढच्या आठवड्यात करता येईल.

सध्याची जी वार्षिक लेखी परीक्षेची पद्धत आहे ती शाळेच्या आणि शिक्षकांच्या सोयीसाठी योजलेली आहे, खऱ्या चांगल्या शिक्षणासाठी नाही. तोंडी परीक्षेच्या पद्धतीत खरी तयारी झाल्याशिवाय विद्यार्थी पासच होऊ शकत नाही आणि प्रत्येक विद्यार्थ्याला प्रत्येक पास होईपर्यंत परीक्षेचा अभ्यास केल्याशिवाय सुटकाच नसेल. सारांशात, सगळे विद्यार्थी पासच होतील.

मी शाळेत कधी शिकवलं नाही, पण कॉलेजमधे या प्रकारचा प्रयोग मी यशस्वीपणे केला होता. मी कॉलेजमधे बिल्डिंग टेक्नॉलॉजी शिकवायचो. बिल्डिंग टेक्नॉलॉजीची परीक्षा असायची. त्या त्या विषयाचं ड्रॉईंग काढायचं नि त्या विषयीच्या प्रश्नांना तोंडी उत्तरं द्यायची. मी मुलांचा शिक्षक असायचो आणि परीक्षकही असायचो. मी आधीच जाहीर केलेलं असायचं की परीक्षेला बसणारे सगळे पास होतील हे नक्की. त्याचा अर्थ सुरुवातीला विद्यार्थ्यांना कळायचा नाही. अर्थ असा की पास होईपर्यंत अभ्यासाची प्रत्येकाची तयारी झाल्याशिवाय कोणाचीही सुटका नाही. ड्रॉईंग नीट नसलं किंवा विचारलेल्या प्रश्नांची नीट उत्तरं देता आली नाहीत की त्या ड्रॉईंग्जवर आणि विषयावर पुन्हा काम करून, अभ्यास करून पुन्हा यावं लागायचं. सारांश असा की, सुरुवातीला परीक्षकाचा बराच वेळ जातो, पण अभ्यासाशिवाय सुटका नाही हे एकदा विद्यार्थ्याच्या डोक्यात शिरलं की संपूर्ण वातावरणच बदलतं. विद्यार्थ्यांना खरंखुरं शिक्षण मिळतं.

मला नक्की वाटतं, सगळ्या परीक्षा तोंडीच असाव्यात. दर आठवड्याला किंवा एकेका छोट्या भागाच्या असाव्यात. सगळ्या विषयांच्या वार्षिक परीक्षेची गरजच नाही. सध्याच्या वार्षिक परीक्षा पद्धतीचा विद्यार्थ्यांवर इतका ताण येतो की बिचाऱ्याला दुसरं काही सुचत नाही. आपल्याला म्हणजे मोठ्या माणसांना जर कायम ताणविरहित वातावरण चांगलं असं वाटतं, तर मुलं त्याला अपवाद कशी असतील?

याचं सर्वांत आदर्श वर्णन म्हणजे मुलांनी मैदानावर कुठचातरी खेळ खेळून तसंच परस्पर तोंडी परीक्षेला जायला हवं. मधे काहीतरी खेळ खेळल्यानी डोक्यातला अभ्यास काही पुसून जात नाही. तसं असतं तर परीक्षेच्या आधी मुलं झोपू देखील शकणार नाहीत. डोक्यातलं ज्ञान पुसलं गेलं म्हणजे? डोक्यातलं ज्ञान ही गोष्टच अशी आहे की ती मधे दुसरी कसलीतरी कृती केल्यामुळे नाहीशी

होत नाही. परीक्षेच्या हॉलमधे जाण्यापूर्वी अगदी शेवटी काहीतरी घाईनी वाचणं वगैरे सगळा वेडेपणा आहे. पालक, शिक्षक आणि विद्यार्थी यांच्या डोक्यामधल्या ज्ञानप्रक्रियेबद्दलची ती गैरसमजूत आहे.

प्रत्यक्ष अभ्यास करण्याच्या पद्धतीबद्दलही गैरसमजुती आहेत. सलग बैठक मारून बसणं, मान मोडून अभ्यास हे वाक्प्रचारही चुकीचे आहेत. अभ्यासाच्या वेळी मुलांचं मन एकाग्र असावं, पण मधे जरा जरा वेळानी त्यातून डोकं काढून चक्कर मारून येणं, टी.व्ही. बघणं, गप्पा मारणं, खेळणं या चांगल्या गोष्टी आहेत. त्यामुळे प्रत्यक्ष अभ्यासाचं नुकसान तर होत नाहीच, पण फायदा होतो.

मला बराच विचार केल्यावर सध्याची परीक्षा पद्धती निश्चित चुकीची वाटते. मी ज्या अत्याचारांच्या परीक्षा पद्धतीतून इथपर्यंत पोहोचलो त्याच पद्धतीनी तुम्हीही अत्याचार सोसले असणार. जे झालं ते होऊन गेलं. आता मी तुम्हाला एक प्रश्न विचारतो. प्रश्न पूर्ण काल्पनिक आहे, कारण तसं उदाहरणच आपण कोणी बघितलं नसणार.

मी मगाशी म्हणालो त्या पद्धतीनी दर आठवड्याला अगदी छोट्या अभ्यासाच्या भागाची तोंडी परीक्षा झाली असं समजा. त्या आठवड्यामधे खेळ, गप्पा, मजा थांबवण्याचं कारणच नसेल. कशाचाही ताण न घेता विद्यार्थ्यानी त्या त्या भागाचा त्याच्या आवडत्या पद्धतींनी मनापासून अभ्यास केला आणि त्या आठवड्याच्या तोंडी परीक्षेत तो मजेत पास झाला. त्या विषयाविषयी त्याला पुरेशी माहिती झाली. असं समजा की त्याला एकही उत्तर तोंडपाठ नाही, पण पुस्तकातलं योग्य उत्तर तो 5-7 मिनिटांत शोधून, ते वाचून तोंडी उत्तर देऊ शकेल. आता ते पुस्तक त्यानी कपाटात बाजूला ठेवून द्यायला हरकत नाही. कारण त्या विषयाच्या त्या भागाची पुन्हा कधीच परीक्षा असणार नाही.

या तऱ्हेनी नेहमीच्या शाळेतल्या प्रत्येक विषयाच्या प्रत्येक भागाची त्याची परीक्षा झाली आणि अशी कल्पना करा की तुम्ही म्हणाल, त्या कुठच्याही प्रश्नाचं उत्तर वर्षअखेर त्याचं तोंडपाठ नाही, पण तो त्याच्या पुस्तकांतून योग्य उत्तर 15-20 मिनिटांत काढून तुम्हाला तो मजकूर वाचून जरुरीप्रमाणे त्रोटक किंवा सविस्तर उत्तर देऊ शकतो. आता प्रश्न असा की या विद्यार्थ्यानी अशी उत्तरं देण्याची सगळ्या विषयांची उत्तम तयारी केली तर तुम्हाला आक्षेप घेण्याजोगं आहे काय? पुढच्या आयुष्यात याखेरीज काय हवं असतं?

●

3) शिक्षणाची योग्य पद्धत

भारत सरकारच्या राजकारण्यांच्या मनात शिक्षणाबद्दल चांगला हेतू असेलही कदाचित, पण लोकसंख्येच्या राक्षसापुढे कोणाचं काहीच चालत नाही. संपूर्ण देशात शिक्षणाच्या दर्जाची एकच पातळी असा आग्रह धरला नाही हे एका अर्थी चांगलं आणि एका अर्थी वाईट झालं. निव्वळ उदाहरणादाखल आपण शालांत परीक्षा घेऊ. 10 वी म्हणजे एस.एस.सी.ची परीक्षा देशभराची एकाच वेळी घ्यायची असती तर काय झालं असतं? व्यवस्थापन कौशल्य नसल्यामुळे देशभर तुफान गोंधळ झाले असते. देशाचं व्यवस्थापन कौशल्य इतक्या पराकोटीचं वाईट असण्याची अनेक कारणं आहेत, पण आत्ता त्यात शिरायला नको. व्यवस्थापनाच्या बाबतीत संपूर्ण देश पार गाळात आहे हे सत्य मान्य करूनच पुढे जाऊ.

दुसरा प्रश्न – निरनिराळ्या राज्यांतल्या निरनिराळ्या भाषा. साधारण 20 भाषेत त्या परीक्षा घ्याव्या लागतील, कारण देशभर हिंदी ही राष्ट्रभाषा वापरण्याच्या बाबतीतही भारत पार गाळात आहे. या सगळ्याचा सारांश एकच आहे. सबंध देशाची शिक्षणाची एकच पातळी असणं शक्य नाही. एस.एस.सी. पास झालेले दोन निरनिराळ्या राज्यांतले विद्यार्थी बघितले तर त्यामधे प्रचंड तफावत आढळू शकते. तशीच परिस्थिती बारावीची, पदवीची असते. या विषयात किती डोकं फोडलं तरी उपयोग नसल्यामुळे हा विषय आपण इथेच सोडू.

फक्त महाराष्ट्र राज्यापुरता विचार केला तरी काही मूलभूत प्रश्न अनुत्तरितच राहतात. सक्तीचं आणि मोफत शिक्षण ही गोष्ट विलायतेत जमली, पण भारतात जमली नाही. बहुधा लोकसंख्येमुळे ती कधीच जमणार नाही. एकेकाळी प्रौढ शिक्षणाचीही महत्त्वाकांक्षी धडपड महाराष्ट्रभर चालली, पण जमली नाही.

सामान्य माणसाच्या भूमिकेतून नीट विचार केला तर अजूनही शिक्षणाच्या या परिस्थितीत सुधारणा करणं शक्य आहे. 'ईच वन टीच वन' पद्धतीचा अवलंब करावा. ज्यांना आरक्षण देऊन त्यांचा शैक्षणिक उद्धार करण्याचा प्रयत्न आहे त्या सगळ्यांना या पद्धतीनी शिकवावं. ते शिकवणारांना आणि शिकणाऱ्यांना सक्तीचं आणि मोफत ठेवावं. या एवढ्या शाळांच्या प्रचंड यंत्रणा, प्रचंड इमारती

यांची गरजच नाहीशी होईल.

भारतीय शिक्षणाची अशी अवस्था असूनही काही आशेचे किरण दिसतात. आमच्या ओळखीतल्या एका मुलीला तिच्या आईवडलांनी सांगितलं होतं की, तू म्हणशील तेव्हा तुला शाळेत घालू. तोपर्यंत खेळ. इतर मुलामुलींपेक्षा थोडी उशिरा ती आपणहून म्हणाली म्हणून तिला शाळेत घातलं. छान रमली. मजेत शिकली. पुढे डॉक्टर झाली. पालकांना यातलं मर्म कळलं तर किती छान होईल!

लहान मुलाला प्रत्येक गोष्ट समजून घेण्याची इच्छा असते. म्हणजेच सगळं शिकण्याची इच्छा असते. आपल्या चुकीच्या शिक्षणपद्धतीनी वय वाढतं तशी शिकण्याची इच्छा कमी कमी होत जाते. मध्यम वयातच माणसं 'यापुढे नवीन काही शिकणं शक्य नाही' म्हणतात, आणि ज्येष्ठ म्हणतात, 'आम्हाला शहाणपणा शिकवू नका.'

याला इलाज आहे. 'ईच वन टीच वन' या कल्पनेबद्दल मी ऐकलं तेव्हा मला खूप आशा वाटली होती. अजूनही भारतासारख्या अवाढव्य देशात सगळ्या मुलांना यासाठी प्रोत्साहन दिलं तर ते शक्य आहे. फक्त सरकारनीच ते मनावर घ्यायला हवं. 'घरातले, आसपासचे, मोठे नि छोटे सगळे एकमेकांना शिकवू शकतील. आपोआप विकेंद्रीकरण, प्रौढशिक्षण, साक्षरता, जाणीव जागृती सगळं होईल. वातावरण शिक्षणाच्या ओढीनी, गोडीनी भारून जाईल. खरं तर प्रत्येकाला शिकण्याच्या इच्छेबरोबर शिकवण्याची देखील इच्छा असते. ती पुरी झाल्यामुळे शिकणारे आणि शिकवणारे समाधानी होतील.

सध्याच्या व्यवस्थेत शाळेमधे जाणारी मुलं पालकांच्या आणि शिक्षकांच्या अपेक्षांखाली दबून जातात. मुलांना प्रोत्साहन देण्याऐवजी शिक्षक मुलांना हिरमुसलं करण्याचा पूर्ण वेळ उद्योग करतात. त्या निर्भर्त्सनेला शिक्षक 'शाळेची शिस्त' असं नाव देतात. याला उपाय आहे. मुलांची आवड, गरज आणि क्षमता तिन्ही विचारात घेऊन त्याप्रमाणे शाळेनी शिक्षणाची, इयत्तांची रचना करायला हवी. कोणी कोणाच्या जरुरीप्रमाणे स्वतःमधे बदल करायचे? शाळेनी का विद्यार्थ्यांनी? हाच तर मूलभूत दोष आहे. याबद्दल माझं, शोभाचं मत अगदी पक्कं आहे. शाळेनी विद्यार्थ्यांच्या जरुरीप्रमाणे बदलायचं. आम्ही याबद्दल अनेकांशी बोललो आहोत. मुलांबद्दल संवेदनाशील असणाऱ्या सगळ्यांचं याबद्दल एकमत असतं. शिक्षणाच्या नावाखाली जे काही चालू आहे त्यानी ही मुलं त्यांच्यावर झालेल्या अन्यायाचा पुढे सूड घेतील. सध्यादेखील आपला समाज

जसा वागतो आहे त्याबद्दल अशीच शंका येते.

याला देखील उपाय आहे. एक फार अर्थपूर्ण वचन आहे. 'शिक्षणानी आरशाचं रूपांतर खिडकीत व्हायला हवं.' सध्याच्या आत्मकेंद्री समाजाला खिडकीतून दुसऱ्याकडे पाहायला शिकवणारं शिक्षण व्हायला हवं आहे. आपण खिडकी याचा अर्थ निरीक्षण असा घेऊया. निरीक्षण आणि तपासणी यात फरक आहे. निव्वळ निरीक्षणानी खूप शिकायला मिळतं. पाठ्यपुस्तकाचा वापर करून मुलांनी निरीक्षणं, शंका लिहायच्या. शिक्षकांनी नुसती मुलांची निरीक्षणं ऐकायची. शिक्षकांच्या हजेरीत एकमेकांना मोकळेपणानी सांगायची. अडेल तिथे फक्त शिक्षकांनी सांगायचं. शंका फेडायच्या. या पद्धतीनी शिकवता येणार नाही असा विषयच असू शकत नाही.

आणखी एक उत्तम कल्पना आहे. वरच्या इयत्तेमधल्या विद्यार्थ्यांनी त्या खालच्या इयत्तेतल्या विद्यार्थ्यांना शिकवायचं. शिकवताना स्वतःचा किती अभ्यास होतो, हे लक्षातही येत नाही. सर्वांत वरच्या इयत्तेला फक्त शिक्षकांनी मार्गदर्शन करायचं. आणि खालच्या इयत्तांच्या शिक्षणप्रक्रियेवर फक्त देखरेख करायची. या पद्धतीचे प्रयोग जगात अनेक ठिकाणी यशस्वी झाले आहेत. भारतात ते करून बघण्याची तयारी असण्याची फक्त जरूर आहे.

शिक्षण या विषयाबद्दल खूप उदात्त, निस्पृह विचार करणारे असतात. निःस्वार्थी, शिकवण्यासाठी उत्सुक, शिक्षणावर प्रेम करणारे शिक्षक असतात. शिक्षण ही फार उच्च गोष्ट असते, या विचारानी शोभाच्या लहानपणी शिक्षणाला सुरुवात झाली. अशा वर्णनात बसणारे चांगले शिक्षक 50 वर्षांपूर्वी बरेच असायचे. शिक्षकी पेशा पत्करलेले लोक बहुतेक सगळे मध्यमवर्गीयच असायचे.

एक अगदी मुळातला गंभीर प्रश्न जरा तपासूया. माणसाच्या मेंदूवर झालेल्या संशोधनात शास्त्रज्ञांना असं आढळलेलं आहे की, जन्मापासून एक एक करत 6 वर्षांपर्यंत मूल ज्या झपाट्यानी जितक्या गोष्टी शिकतं तेवढं ते त्यापुढे कधीच शिकू शकत नाही. हे फक्त मेंदूच्या शिकण्याच्या क्षमतेबद्दल आहे. शरीराच्या वाढीच्या आलेखाशी ते अजिबात जुळत नाही. मानवाला लैंगिक आकर्षण 10 व्या वर्षापासून जाणवायला लागतं. 16 वर्षापर्यंत त्याची तीव्रता वाढत जाते. शरीराची क्षमता साधारण 21 व्या वयापर्यंत वाढते. 25 वर्षापर्यंत ज्याला स्वभाव म्हणतात तो पक्का होतो.

आत्तापर्यंत मानवाचा मेंदू, शरीराची वाढ, लैंगिक समज, सामाजिक

परिस्थितीचं आकलन हे 6,10,16,21 आणि 25 हे न जुळणारे आकडे यामधे बदल करता येतील का, यावर देखील शास्त्रज्ञांनी काम केलं, पण त्यात काही यश आलं नाही. या सगळ्या गोष्टी गोंधळ निर्माण करणाऱ्या आहेतच, पण त्या जगभरच्या मानवजातीला लागू आहेत. आहेत तशा या गोष्टी मान्य करून त्याप्रमाणे शिक्षणरचना करण्याखेरीज दुसरा उपाय नाही. सध्या 'प्री-स्कूल स्कूलिंग' नावाचं एक भूत आपल्या समाजाच्या डोक्यावर बसलं आहे. 6 वर्षाचं मूल पहिलीत जाणार इथपर्यंत ठीक आहे. थोडासा अभ्यास गंभीरपणे शिकण्याची मुलाची मानसिक तयारी झालेली असते. पण त्याआधीची वर्षं ही मुलांनी फक्त खेळण्यासाठी असतात. ती खेळत असतात तेव्हाही शिकतच असतात, पण पालकांना ते शिकणं वाटत नाही.

3 आणि 4 वर्षांची असताना 'प्री-स्कूल'नी त्यांना शिकवल्यामुळे मुलाला 'ए, बी, सी, डी' ही चार अक्षरं आणि काही आकडे ओळखता, लिहिता आले की पालकांना खूप आनंद होतो. आपलं मूल 'जीनियस' असल्याची त्यांना खात्री पटते आणि 'आणखी शिकवा' असं पालक शाळेला सांगतात. 'प्री-स्कूल नर्सरी' हा सरळ सरळ धंदा म्हणून काढलेला असल्यामुळे त्यांचं धोरण पक्कं असतं. अशी मागणी करणारे पालक असताना 'मागणीप्रमाणे पुरवठा' करायला त्यांना चांगलंच वाटतं. उत्तम धंदा होतो.

अनेक वर्षांपासून खेळत खेळत शिकण्याची 'मॉंटेसरी' पद्धत योग्य होती. अजूनही ती योग्यच आहे. पण योग्य विरुद्ध लोकप्रिय या संघर्षात लोकप्रियची सरशी झालेली आहे. 'खेळत खेळत' याचा आग्रह धरणं हाच यावर इलाज आहे. मुलाच्या दृष्टीनी प्रत्येक विषय हा एक खेळच असतो. तुम्ही त्याला अंकगणित म्हणा, पण मुलांच्या दृष्टीनी ते आकड्यांशी खेळणं असतं. तुमच्या दृष्टीनी जो भूगोल हा विषय असतो तो मुलाच्या दृष्टीनी आपल्या प्रत्यक्ष अनुभवातल्या माहितीच्या विभागापलीकडे काय काय असतं, याबद्दलच्या माहितीचा खेळ असतो. तुम्ही ज्याला पदार्थविज्ञान म्हणता तो मुलाच्या नजरेत वस्तूंच्या गुणधर्मांचा खेळ असतो.

कुठच्याही विषयातला खेळ सापडला की मुलाला त्याची गोडी लागते. त्यात खेळ सापडला नाही तर तो विषय निरस होतो. विषयाची गोडी म्हणजे त्या विषयातल्या आनंदाचा अनुभव. आनंदाचा अनुभव म्हणजेच खेळ. भारतीय शिक्षणाचा खेळखंडोबा करणाऱ्यांना शिक्षणातल्या खेळाचं महत्त्व कळलेलं

नसल्यामुळे ते नुसते एकमेकांविरुद्ध खेळी करायला लागले.

केवळ माहिती म्हणून सांगतो. सगळ्या प्रगत देशांच्यात असं मानतात की, बालवाडीत मुलांवर जे खेळातून शिक्षणाचे संस्कार होतात ते सर्वांत महत्त्वाचे असतात. सबंध आयुष्याचा तो पाया समजतात. बालवाडीत मुलांना शिकवणाऱ्या शिक्षकांना चांगले पगार असतात. कित्येक बालवाडीचे शिक्षक अगदी लहान मुलांना कसं शिकवावं या विषयात मास्टर्स डिग्री, पी.एच.डी. एवढे शिकलेले असतात. भारतात बरोबर उलट परिस्थिती आहे. बालवाडीला शिकवण्यासाठी एखादा छोटा कोर्स असतो. तो केला की पुरतं. काही वर्षांपूर्वी परिस्थिती तर अशी होती की इतर काही काम ज्याला जमत नसेल त्यानी बालवाडी शिक्षिका व्हायचं. आता प्रशिक्षित बालवाडी शिक्षिकांचं प्रमाण वाढलंय, एवढंच.

त्यात आणखी शाळेच्या माध्यमाचा प्रश्न असतो. अनेकांना बालवाडी शिक्षिकेची नोकरी मिळते, पण पुरेसं इंग्लिश संभाषण येत नसल्यामुळे शाळेकडून तंबी मिळते, नोकरी जाते, बढती मिळत नाही. शेवटी असमाधानानी काम करणारी शिक्षिका मुलांना शिकवतेय असंच दृश्य दिसतं.

एक अगदी साधं पण अनादिकालापासूनचं तत्त्व आहे. जी गोष्ट माणसाला आवडते ती त्याला येते आणि अधिक आवडत जाते. या एका वाक्यामधे अनेक कोड्यांचं उत्तर सापडतं असं मला वाटतं.

माझ्या दृष्टीनी, शिक्षकांचं मुख्य काम प्रत्येक विषयामधले खेळ शोधून काढणं हे आहे. ते झालं तर गोडी लावण्याचं काम अगदी सोपं होऊन जाईल.

एका प्रसिद्ध शिक्षणतज्ज्ञानी निराळ्या पद्धतीनी शिक्षणाची व्याख्या केलीय. मला ती खूप महत्त्वाची वाटते. स्वतः मेहनत करून, प्रयत्न करून माणूस जे शिकतो तेच शिक्षण खरं. त्याच्या दृष्टिकोनातून 'शिक्षण देणं', 'शिकवणं' हे शब्दप्रयोगच निरर्थक आहेत. फार तर 'शिकण्यासाठी सोय करणं, शिकण्यासाठीचं साहित्य उपलब्ध करून देणं' एवढंच बाकीचे करू शकतात.

सर्व शाळांच्यात एक गोष्ट सारखी आढळते. पालकांनी शाळेत येऊन फार थांबलेलं आणि शिक्षकांचं निरीक्षण करणं त्यांना आवडत नाही. अगदी क्वचित शाळांच्यात काचेची ऑब्झर्वेशन गॅलरी असते. तीही फक्त बालवाडीपुरती.

मला स्वतःला वाटतं की, कुठचंही काम करणाऱ्या माणसाकडे पारदर्शकता असलीच पाहिजे. माझ्या जलद बांधकामाच्या व्यवस्थापनाच्या कामात कधी कधी काही क्लायंट येऊन बघत बसायचे. माझी त्याला काही हरकत नसायची. एकदा

क्लायंटची खात्री पटली की योग्य माणसाच्या हातात आपण काम सोपवलेलं आहे की त्यानंतर तो क्लायंट निश्चिंत होतो. दोघांच्यातला संवाद जास्त कसदार आणि अर्थपूर्ण होतो. शाळेनी असं धोरण ठेवायला हवं, असं मला वाटतं. एका गोष्टीबद्दल माझी खात्री आहे. शाळेनी पालकांचं कायम स्वागत केलं तर पालक निश्चिंत होतील. शाळा नको नको म्हणत राहिली तर पालक अस्वस्थ राहतील आणि पालक विरुद्ध शाळा असं नको ते वातावरण तयार होईल. सध्या तीच स्थिती आहे.

आमच्या मुलांच्या लहानपणी हाच प्रश्न असाच होता. शोनीलला अभ्यासाची गोडी लागली, तशी आभाला लागली नाही. शोभानी त्यावर उपाय शोधला. ती आभाच्या शाळेत मदतीला जायला लागली. एखादी शिक्षिका गैरहजर असली तर तो तास शोभा घ्यायला लागली. ती नेहमी आभाच्याच वर्गावर जायची नाही, पण मधून मधून जायची. आभाला मजा वाटायची. शाळेची आणि शोभाची कायमची दोस्ती झाली. आभाचा अभ्यासाची गोडी नसण्याचा प्रश्न खुबीनी सुटला. आभाची आवड थेट कला शाखेची होती, हे आम्हाला कळत होतं. ती बुद्धिमान होती, पण शाळेतल्या चौकटीतल्या विषयात नाही. चित्रकला, गाणं, नृत्य, लेखन या तिच्या आवडीच्या गोष्टी होत्या.

गेल्या काही वर्षांत याचा अभ्यास करताना कळलं की, विज्ञान आणि कला या दोन निराळ्या शाखा समजण्याचं काहीच कारण नाही. जवळजवळ प्रत्येक कामात त्याच्याशी संबंधित तांत्रिक ज्ञान लागतंच, पण चमकण्यासाठी ते तांत्रिक ज्ञान वापरण्याची कला अंगात असावी लागते. मुख्य म्हणजे कलेची समज, प्रतिभा उपजत असते. ती वर्ग भरवून शिकवता येत नाही. शिक्षकांनी, पालकांनी फक्त मधे यायचं नाही, एवढं महत्त्वाचं काम करायचं. जमेल तेवढं प्रोत्साहन देत राहायचं.

शिकवताना सगळ्यांना समजलं अशी खात्री करून पुढे जावं लागतं. एका बैठकीत कमी भाग शिकवला गेला तरी चालेल. माझ्या शिकवण्याच्या कारकीर्दीत सुरुवातीला या बाबतीत माझ्या हातून चुका झाल्या. कॉलेजेसमधे बांधकाम तंत्रज्ञान शिकवत असताना आणि त्यानंतर जीवनसाथमधे विवाह शिक्षण देताना. पुढे ही चूक मी अर्थातच दुरुस्त केली. शिकवण्याच्या माझ्या कारकीर्दीमधे मला पूर्ण पटलेली एक खूप महत्त्वाची गोष्ट सांगतो. 'विद्यार्थ्याला समजलं नाही तर ती चूक शिक्षकाची समजावी.' कारण निराळी, जास्त योग्य, जास्त सोपी पद्धत

शोधून काढण्याची जबाबदारी शिक्षकाची असते. एक खूप मोठा विद्वान माणूस हौसेनी शाळेत शिकवायला जायचा. लोक त्याला कारण विचारायचे. त्यानी सांगितलं, 'या मुलांना शिकवायला मी येतो, कारण मला खूप शिकायला मिळतं. जिथे मला शिकता येतं तिथेच मी जातो.'

शहराशहरांतून आता शिक्षणमहर्षी प्रचंड शिक्षण-कारखाने उभे करतायत. त्यांचे हितसंबंध राजकारणाशी गुंतल्यामुळे त्यांची ताकदही खूप वाढली. याप्रकारे शिकण्यासाठी लागणाऱ्या फीचे आकडे प्रचंड झाले. मराठी माध्यमाच्या शाळा कमी कमी होत गेल्या आणि इंग्लिश माध्यमाच्या शाळांचं अमाप पीक आलं. शोभा आणि मी ज्या पालक शाळा घेतो त्यातल्या प्रश्नांचं स्वरूप हळूहळू बदलतंय. शिक्षण याबद्दलचं सर्वांत महत्त्वाचं मर्म आपल्याला माहितीय, पण ते जवळजवळ दिसेनासं झालं आहे.

आपण शिक्षणाविषयी एवढ्या सगळ्या गोष्टी बोलतो आहोत त्या फक्त शाळेत, वर्गात शिकवल्या जाणाऱ्या विषयांबद्दल आहेत असं एखाद्याला वाटू शकेल. हे अजिबात खरं नाही. क्रिकेट शिकवायचं असो, ॲथलेटिक्स असो, बॅडमिंटन असो, पोहायला शिकवायचं असो, बिलियर्ड, गोल्फ, कॅरम काहीही असो. ह्या सगळ्याच्या सगळ्या गोष्टी त्याला तश्श्याच्या तशा लागू असतात. नुकतंच मी एका स्विमिंग कोचला मुलांना पोहणं शिकवताना बघितलं. थेट पाण्यात ढकलून द्यायचं, नाका-तोंडात सुरुवातीलाच पाणी गेलं की डोकं पाण्यावर ठेवण्याचा धडा आयुष्यभर लक्षात राहतो असं त्यांचं म्हणणं होतं. मी त्याचे परिणामही बघितले आहेत. परिणाम म्हणजे पाण्याची कायमची भीती. पोहणं हा विषय आयुष्यातून कटाप.

सगळ्याचं मर्म अगदी साध्या भाषेत असं आहे. 'प्रत्येक मूल शिकतंच. पालकांनी त्यात अडथळा बनायचं नाही. शिक्षकाचं काम मुलाला गोडी लावण्याचं आहे, शिकायला उत्तेजन देण्याचं आहे. शिस्त लावण्याचं नाही.' सध्या 'अभय-अभियान' नावाची संस्था मुलांना शिक्षा करण्याविरुद्ध काम करते. माझा त्यांना पूर्ण पाठिंबा आहे. मी शिकलो त्या काळात 'चौदावं रत्न' या शब्दाचा वापरही खूप होता आणि रत्न दाखवण्याचं प्रमाणही खूप होतं. बिचाऱ्या विद्यार्थ्यांना आणि शिक्षकांना हा एकच मार्ग माहीत होता.

इंग्लंड आणि यू.एस.ए. या दोन ठिकाणच्या शाळेबद्दल मला काही गोष्टी माहितीयत, त्यातली मला खूप आवडली ती महत्त्वाची गोष्ट सांगतो. प्रत्येक

विभागात एक सरकारी शाळा असते. त्या विशिष्ट विभागात राहणाऱ्या मुलांनी त्या शाळेत जायचीच कल्पना असते. मुख्य म्हणजे ती शाळा चालण्याच्या अंतरावर असते. एखाद्या श्रीमंत कुटुंबाला परवडत असलं तर खाजगी शाळेत मुलांना घालता येतं. खाजगी शाळा संख्येनी कमी असतात. त्यामुळे कधी कधी लांब अंतरावर मुलांना जावं लागतं. त्याखेरीज शाळेत जाताना दप्तरांची ओझी नसतात, हे पण मला खास वाटलं. पुस्तकं, इतर साहित्य वगैरे सगळं शाळेतच असतं. प्रत्येक वर्गात मुलंपण फार कमी असतात. साधारण 15 ते 20 फक्त. मी मगाशी म्हणालो तशी त्यांना राष्ट्रीय पातळीवरची शिक्षणाविषयीची समजच जास्त आहे.

भारतीय लोकांना आणखी एक पाश्चात्त्य शाळांची पद्धत ऐकून आश्चर्य वाटेल. तिथे गृहपाठ नसतो. वह्या-पुस्तकांची प्रचंड ओझी घेऊन मुलांना शाळेत जायचं नसतं. अभ्यासाचा सराव असतो, पण तो शाळेतच करायचा असतो. मला नेमकी इयत्ता आठवत नाही, पण काही एका वयापर्यंत विलायती शाळेत मुलगे आणि मुली यांच्या गणवेषाचा रंग ठरलेला असतो. मुलगे म्हणजे निळा आणि मुली म्हणजे गुलाबी.

●

4) शैक्षणिक इमारती, इतर सोयी

आपल्या देशातल्या शिक्षणाच्या बाबतीतला आणखी एक निराळा प्रश्न मला खूप बोचतो. एका बाजूनी 'मुलं ही राष्ट्राचे भावी नागरिक आहेत, त्यांच्या भवितव्यासाठी देशाची प्रगती करूया' असं म्हणणाऱ्या सरकारनी मुलांच्या सुरक्षिततेसाठीच्या कायद्यांकडे जास्त लक्ष द्यायला हवंय.

शाळांच्या 'स्कूल व्हॅन'मधे खूप मुलं कोंबतात. अगदी लहान मुलं तर चक्क गुदमरायची पाळी येते. याबद्दलच्या कायद्याची कडक अंमलबजावणी हवी. स्कूल बसमधल्या सोयी-सुविधा, यांत्रिक कार्यक्षमता यांची कडक तपासणी हवी. स्कूल बस उलटून मुलांना इजा झाल्याच्या बातम्या काय सुचवतात? स्कूल बसच्या ड्रायव्हरवर देखील नियमित तपासणी, ड्रायव्हिंगच्या योग्य पद्धतींचं प्रशिक्षण, याच्या कडक अंमलबजावणीची गरज आहे.

शाळांच्या कायद्यामधे इमारतीला फार महत्त्व असतं. एका छोट्या गावी एक शाळा उभारायची होती. प्राथमिक चर्चेमधे मी त्यांना इमारतीशिवायदेखील शाळा कशी होऊ शकेल, हे सांगितलं. मी पद्धतशीर लँडस्केप डिझाइन विषय शिकलेलो आहे. ठराविक जागी झाडं लावायची. ज्या झाडांचा प्रचंड छत्रीसारखा आकार होतो. त्यांना अंब्रेला ट्रीज म्हणतात. त्यांचा वापर करून वर्ग बनवायचे. आडोशांसाठी झुडपांचा वापर करायचा. शाळेच्या सामानासाठी आणि विद्यार्थ्यांच्या आणि शिक्षकांच्या टॉयलेट्ससाठी फक्त पक्क्या छोट्या बांधकामाचा वापर करावा. पावसाळ्याच्या काळात बांबू, तट्ट्याची छपरं करायची. अशा सगळ्या पद्धतींनी शाळेची कल्पना मी सांगितली. त्यांना ती कल्पना एकदम पसंत पडल्यामुळे मी आराखडे बनवले. पुढची वाईट गोष्ट अशी की, सरकारची अशा प्रस्तावाला मंजुरी मिळाली नाही. पक्की इमारतच पाहिजे असा नियम आहे म्हणे.

खुद्द शाळांच्या वर्गात देखील खूप दुरावस्था असते. पंख्यांची सोय नसते. पुरेशा टॉयलेट्स नसतात. ती स्वच्छदेखील नसतात. विद्यार्थ्यांची बाकं अपुऱ्या मापांची आणि अपुऱ्या संख्येची असतात. मुलांची सरकारला खरोखर काळजी असली तर या सगळ्या गोष्टींची व्यवस्था, त्याचे कायदे आणि अंमलबजावणी यावर बरंच लक्ष द्यायला हवं.

हे सांगायला वाईट वाटतं, पण शिक्षणाबद्दल मूलभूत, स्वतंत्र विचार करू शकणारे आणि करणारे लोक 1% च्या वर नसतात. त्यांच्या हातात सत्ता नसते. मोठमोठ्या शिक्षणसंस्था काढून त्याचं रूपांतर प्रचंड शिक्षण कारखान्यात करणारांच्या हातात सत्ता असते, पण त्यांना समज नसते. समज असली, आली, तरी एकदा कारखाना चालू केला की मधे थांबताच येत नाही. इमारतीवर प्रचंड खर्च केल्यामुळे बिनपरतीचा सापळा स्वतःच बनवून ठेवलेला असतो.

थोर माणसांनी ठिकठिकाणी सांगितलेलं आहे की चांगलं शिक्षण शांतपणी मिळालं तरच समाजात शांती निर्माण होईल. शांतपणी, शांत चित्तानी शिक्षण ही गोष्ट तर सध्या जवळजवळ अशक्य आहे, कारण त्याबाबतीत पूर्ण समाज भांबावलेला आहे. त्यामुळे समाजात शांती नाही. या दुष्टचक्रात आपण पूर्ण अडकलेलो आहोत.

शहरांच्या शिक्षणामधले जे अडसर आहेत त्यातल्या एका अडचणीचं वर्णन करतो. लहान मुलांच्या शाळा एकदम पहाटे 8 वाजता वगैरे असतात. लहान मुलांना झोपेतून लवकर सकाळी उठवणं हे घरातल्यांसाठी रोजचं संकट असतं. वाईट वाटतं, मुलावर अन्याय वाटतो, पण इलाज नसतो. त्याचं कारण काय तर शाळा दोन 'शिफ्ट'मधे असतात. मोठी शाळा सुरू व्हायच्या आधी लहान शाळा संपवावीच लागते. लहान मुलांवर असा अत्याचार लाखो ठिकाणी सतत चालू असतो. या प्रश्नाच्या मुळाशी गेलं तर पुन्हा आडवी येते ती इमारतच. इमारतीसाठीचा खर्च हा मोठा सापळा असतो.

लहान मुलांना जेवढा अभ्यास असतो, जेवढी पुस्तकं रोज दप्तरात वागवावी लागतात तेदेखील अन्यायाचंच वाटतं. प्रत्यक्षात भारतातली तांत्रिक प्रगती इतपत नक्की आहे की सगळ्या पुस्तकांच्यातला सगळा मजकूर वर्गात पांढऱ्या मोठ्या पडद्यावर, लॅपटॉपवर प्रोजेक्ट करता येईल आणि मुलांची पुस्तकं घरच्या अभ्यासासाठी घरीच राहतील. हे नक्की शक्य आहे. सगळी कॉम्प्युटर, टेक्नॉलॉजी हजर असून मुलांसाठी त्याचा उपयोग होईल तेव्हा खरं. शाळांच्यात कॉम्प्युटर लॅब्ज असतात, पण शिक्षणाचा दर्जा सुधारायला त्याचा उपयोग व्हायला पाहिजे. तो दिवस उगवेल तो सुदिन.

●

5) वैवाहिक आयुष्यात शिक्षणाचं महत्त्व

विवाहासाठीचा जोडीदार निवडताना प्रथम कळतं की वैवाहिक आयुष्यात देखील शिक्षण या विषयाची मोठी भूमिका आहे. लग्नाच्या बाजारातले शिक्षणाबद्दलचे पक्के संकेत असतात.

कष्टकरी लोकांमधे दहावी झाली तरी खूप झालं, कनिष्ठ मध्यमवर्गीयांमधे बारावी किंवा दहावीनंतरचा कुठचातरी 2 वर्षांचा डिप्लोमा, मध्यमवर्गीयांमधे कमीतकमी ग्रॅज्युएट (म्हणजे डिग्री) असे संकेत असतात. उच्च मध्यम वर्गीयांच्यात 'मास्टर्स डिग्री' किंवा 'डॉक्टरेट' सहज सापडतात. लग्नाच्या जोड्या जुळवताना याचा विचार चालतो तो भविष्यात पैसे मिळवण्याची क्षमता, या दृष्टिकोनातून. अगदी क्वचित यामधे फरक आढळतो. स्वतःचा व्यवसाय, धंदा असणाऱ्या मुलग्यांना (विशेषतः पैसे व्यवस्थित कमवत असेल तर) या शिक्षणाच्या संकेतातून सवलत मिळते.

जगातले सगळेच्या सगळे विषय सामान्य ज्ञान किंवा सारासार विचार यातूनच विकसित झालेले असतात. त्यामुळे सगळ्या विषयांचा एकमेकांशी संबंध असतो. आदिमानवाच्या एका नर-मादी जोडीपासून संपूर्ण दुनियेची एवढी लोकसंख्या जन्मली असं मान्य केलं तर सर्व मानवजात एकमेकांचे नातेवाईक आहेत हे मान्य करावं लागतं, त्याचप्रकारे सगळे शिक्षणातले विषय एकमेकांशी संबंधितच आहेत हे मान्य करावं लागतं.

सगळ्या विषयांचा जन्मदाता विषय म्हणजे तत्त्वज्ञान. त्याचाही जन्म सारासार विचारातूनच झाला. शाळेमधल्या किंवा कॉलेजच्या शिक्षणात या मूळ कॉमनसेन्सचे अनेक गट करून त्याचा स्वतंत्रपणे विकास केलेला असतो, त्याचा विषय बनतो. गणित आणि नागरिकशास्त्र, इंजिनियरिंग आणि शेतकीशास्त्र हे विषय एकमेकांचे नातेवाईकच असतात. यातल्या प्रत्येक विषयात प्रत्येकाला थोडी गोडी, थोडी गती असतेच. त्या एकाच विषयाच्या अधिक बारकाव्यात शिरणं म्हणजेच औपचारिक शिक्षण.

शिक्षणानी माणसाला मुख्य काही कळत असेल तर ते म्हणजे एकाच विषयाच्या गाभ्यात, तपशिलात मुद्देसूदपणी, पद्धतशीरपणी शिरणं, नोंदी करणं,

पृथक्करण करणं, क्रमवारी लावणं. यामुळे कुठच्या विषयात ग्रॅज्युएशन, मास्टर, डॉक्टरेट केली यापेक्षा इतक्या पद्धतशीरपणी विचार करण्याची बुद्धीला सवय लागली आहे का नाही, हे महत्त्वाचं. यामुळेच सुशिक्षित माणूस त्याच्या बोलण्यावरून, वागणुकीवरून निराळा ओळखू येतो. धोतर, टोपी, लेंगा, पँट, साडी का ड्रेस यावरून नाही.

आणखी एका गोष्टीवरून अशिक्षित का सुशिक्षित, हे कळतं. औपचारिक शिक्षण नेहमीच छपराखाली म्हणजे सूर्यप्रकाशापासून संरक्षित ठिकाणी होतं. त्यामुळे उन्हाचा राप निराळा कळतो. तरी या सगळ्याला अपवाद असणारच. अशिक्षित पण मुळात रंगानी गोरा माणूस व्यवस्थित कपडे घालून चष्मा लावून हातात इंग्रजी वर्तमानपत्र घेऊन बसला तर तो सुशिक्षित दिसेल. बहुधा तो बोलायला लागल्यावर पितळ उघडं पडेल. आणि तरी सुशिक्षितपणा म्हणजे सुसंस्कृतपणा नाहीच. सुशिक्षित होताना अनेक प्रकारच्या लोकांशी संपर्क येतो. बुद्धिमत्ता, मेहनत आणि आर्थिक परिस्थिती यांची अनेक स्वरूपं बघायला मिळतात. ह्या खोलात जाण्याचं कारण जोड्या जुळवताना याच तर्कानी सगळे विचार करतात.

खुद्द पैसे मिळवण्याच्या उपयोगासाठी मात्र शिक्षण हा अनेक घटकांपैकी फक्त एक घटक असतो. इतर गुण जास्त महत्त्वाचे ठरतात. मेहनत, बुद्धिमत्ता, जिद्द, धमक, प्रतिभा आणि शिवाय नशीब यावर पैसे अवलंबून असतात.

एक अगदी निराळ्या प्रकारचा मुद्दा आहे, पण तो वैवाहिक आयुष्याबद्दल आहे आणि बायकांच्या करिअरबद्दल आहे. बायकांची करिअर कितीही उत्तम असली तरी जोडप्याला मूल होणार असलं तर बायकांच्या करिअरमधे एकदम खूप बदल होतात. कायद्यानी आणि संकेतांनी गर्भार बायकांना थोड्या सवलती दिल्या आहेत, पण तेवढ्या पुरत नाहीत.

नवऱ्याच्या आयुष्यात थोडे बदल होतात. पण गर्भ राहिल्याचं कळल्याच्या क्षणापासून बाईचं आयुष्य पूर्ण बदलून जातं. इतर अनेक बदलांच्या बरोबरच करिअरमधे खूप बदल होऊ शकतात. काही वर्षं खंडही पडू शकतो. आवक कमी, खर्च जास्त अशी अवस्था होते. हा सगळा विचार केला तर केव्हा आणि किती मुलं याबद्दल प्रत्येक जोडप्यानी अभ्यासपूर्ण निर्णय घेण्याची खूप जरूर आहे, असं वाटतं.

●

6) आयुष्यात करिअरचं महत्त्व

जीवनसाथ अभ्यास मंडळात बहुतेक मुलं-मुली जी येतात ती आपला करिअर पाथ ठरवलेलीच असतात. बारावीनंतर येणारी फार कमी असतात. कुठच्या क्षेत्रात करिअर करावी, असा प्रश्न शिल्लक असला तर त्यासाठी उपयोगी असा महत्त्वाचा मुद्दा सांगतो.

चरितार्थाचा काहीतरी उद्योग करायलाच पाहिजे असतो. काही लोक सरकारी नोकरी करावी अशा विचारात असतात. खास त्यांच्यासाठी सरकारी नोकरीबद्दलचा एक किस्सा सांगतो. मी त्यावेळी मुंबईत नोकरी करत होतो. माझा एक मित्र पुण्याला एका सरकारी विभागात नोकरी करायचा. एकदा तो मुंबईत माझ्या जेवणाच्या वेळेत भेटायला आला. आम्ही एकत्र जेवलो. तो निघाला आणि मी कामाला लागलो. पुढे तो वारंवार यायला लागला. दुपारी आम्ही जेवणापुरते भेटायचो नि तो निघायचा. मी त्याला एकदा विचारलं, 'एवढ्या प्रमाणात रजा घेणं तुला कसं परवडतं?' तो म्हणाला. 'रजा नाही घ्यावी लागत. सकाळी ऑफिस मस्टरवर सही करून येतो आणि संध्याकाळी पुण्याला ऑफिस मस्टरवर सही करून घरी जातो. काही काम नसतंच. मधे कोण, कुठे जातो कोणी बघत नाही.'

काहीजण खाजगी नोकरीत सबंध आयुष्य काढतात. काही व्यवसाय, धंदा करतात. काहीही करायचं ठरवलं तरी त्यातले दोन महत्त्वाचे उद्देश सगळ्यांनी लक्षात घ्यायला पाहिजेत. चरितार्थ चालवणं हा उद्देश सगळ्यांना समजतो, पण काम केल्याचं समाधान हा दुसरा उद्देश न समजणारी खूप जणं असतात.

ज्याला ज्याला व्यवसाय किंवा धंदा करायचाय त्याला टॅक्सेशनच्या अभ्यासाची खूप गरज असते. मी ज्या काळात भारतात आलो त्या काळात मला टॅक्सेशनची पुरेशी माहिती नव्हती. अमेरिकेतून इथे कायम वास्तव्यासाठी येताना स्वतःचा धंदा, व्यवसाय करायचा एवढंच पक्कं होतं. जेव्हा थोडी माहिती काढायचा प्रयत्न केला तेव्हा 8-10 प्रकारचे टॅक्स सरकार घेतं असं लक्षात आलं. अगदी सुरुवातीच्या काळापासून सारखं माझ्या मनात यायचं की, कुठचीही वस्तू खरीदताना पर्चेस टॅक्स घेतला की इतर गुंतागुंतीच्या करांची सगळी भानगड

काढून टाकता येईल. प्रत्येक म्हणजे प्रत्येक माणसाला वस्तूंची खरेदी केल्याशिवाय जगताच येणार नाही. त्यामुळे वस्तू खरीदताना कर हा विषय संपवून टाकावा आणि त्या पैशावर सरकार चालवावं. त्या काळात आचार्य रजनीशांनीसुद्धा स्वतंत्रपणी ही कल्पना मांडली होती. चौकशी केली, काही लोकांशी बोललो. असं कळलं की वस्तूंच्या किमती वाढतील आणि सरकारविषयी वाईट मत होईल यामुळे सरकार असं पाऊल उचलू शकत नाही. कमाल आहे की नाही? तुम्हाला वाटेल शिक्षण आणि करिअर यात हा विषय कसा आला? केवळ एवढ्यासाठी हे मी सांगतोय की स्वतःचा व्यवसाय, धंदा करण्याची धमक असली तर जरूर करा. फक्त टॅक्सेशनचा व्यवस्थित अभ्यास करा.

जिथे काही माल विकायचा नसतो, नुसती व्यवस्था करायची असते, सल्ला द्यायचा असतो, प्रतिनिधित्व करायचं असतं, अशा सगळ्याला सर्व्हिस इंडस्ट्री म्हणतात. अशा व्यावसायिकाचा त्यात जाणारा वेळ आणि त्या वेळेची ठरलेली फी असाच हा व्यवहार असतो. फीची प्रत्यक्ष आकारणी एकरकमी असो, टक्क्यांनी असो, कशीही असली तरी मुळातलं गणित त्या कामात घालाव्या लागणाऱ्या वेळेचंच असतं. दुसरं काही मोजमाप त्याला असू शकत नाही. आणि तरी व्यवसाय करणाऱ्या प्रत्येकाला मी असा सल्ला देईन की, भारतीय माणसाला वेळ मोजून त्याचे पैसे फी म्हणून देणं फार कठीण जातं. त्याला ते पटत नाही. त्यामुळे वादाचे प्रसंग निर्माण होण्याची शक्यता असते. व्यावसायिकांनी स्वतःच्या हिशेबासाठी वेळेची नोंद ठेवावी, पण गिऱ्हाईकाला एकरकमी किंवा टक्क्यांनीच फी सांगावी.

विवाहित-अविवाहित मिश्रगटासाठी एक एक्सरसाइझ बऱ्याच वेळा आम्ही जीवनसाथमधे घेतो. विषय असा की नोकरी आणि करिअर यातला फरक एकेकानी स्पष्ट करा. पाळीपाळीनी चर्चा होऊन शेवटी एका मुद्द्यावर एकमत होतं. नोकरीमधे आनंद मिळेलच असं नाही, नुसता पगार मिळेल. पण करिअर म्हणजे त्यात आनंद मिळालाच पाहिजे. स्वतः आणि समाजाची प्रगती झालीच पाहिजे. एखाद्याला पैसे कमी आणि समाधान जास्त असलं तरी त्याला करिअर म्हणता येईल.

व्यवसाय आणि धंदा यात एक मोठा फरक असतो. व्यवसायात जाहिरात करता येत नाही. तसा कायदा नाहीय, पण संकेत आहे. धंद्यात मात्र जाहिरात करता येते. तरीदेखील व्यवसाय करणारे युक्त्या कर करून जाहिरात करतात.

सिनेमा, नाटकात काम करणाऱ्यांचा व्यवसाय समजायचा का धंदा? खरं म्हणजे तो व्यवसायच आहे, पण 'सिनेमाचं प्रमोशन' नाव देऊन ते स्वतःचं 'मार्केटिंग' करतातच. मार्केटिंगमधली खरी खुबी काय असते, माहिती आहे? स्वतःला किंवा आपल्या संस्थेला जरूर आहे असं म्हटलं तर कोणी किंमत देत नाही. गिऱ्हाईकाला गरज वाटेल तेव्हाच तो येणार. त्याला गरज वाटेल असं वागायचं, बोलायचं, पटवायचं म्हणजे मार्केटिंगमधलं कौशल्य.

व्यवसाय आणि धंदा यात आणखी एक मुख्य फरक असतो. व्यवसायात 'योग्य' काय ते सांगायचं आणि करायचं असतं. धंद्यात 'लोकप्रिय' काय ते करतात. लोकांना आवडेल असं बोलावं लागतं, दिसावं लागतं. त्यामुळे स्टेजवर सिनेमा नट-नट्या अनेक गोष्टी करताना दिसतात. ज्येष्ठांचे वाकून पाय धरतात, मिठ्या मारतात, कपाळाचं चुंबन घेतात, पूजा करतात, दोन अर्थ निघतील याप्रकारे अश्लील विनोद करतात. काय काय चालतं! त्यांच्यावर 'योग्य'चं बंधन कधीच नसतं.

व्यवसायात आपल्याऐवजी दुसऱ्या व्यक्तीला आपला प्रतिनिधी म्हणून आपण पाठवू शकतो. आपण जबाबदारी घ्यायला सतत तयार असावं लागतं. नोकरी मात्र त्या एका व्यक्तीच्याच नेमणुकीची असते. आपल्याऐवजी दुसऱ्याला पाठवता येत नाही.

आपल्या कामाचा आणखी एका प्रकारानी विचार करण्याची पद्धत आहे. 'प्रायमरी' सेक्टर म्हणजे अत्यावश्यक गरजा पुरवणारं काम, 'सेकंडरी' म्हणजे अत्यावश्यक गरजांसाठी सुविधा निर्माण करण्याचं काम आणि 'टर्शरी' म्हणजे या दोन्हीमधे न बसणारी, अत्यावश्यक गरजेसाठी नसलेली कामं. अशी ती विभागणी आहे. हे समजावून सांगण्यासाठी उदाहरणं देतो. शेती करणारा प्रायमरी गटात असतो. किराणा मालाचा दुकानदार सेकंडरीमधे मोडतो. खानावळ चालवणारा सेकंडरी आणि लग्नकार्याचं जेवणाचं कॉंट्रॅक्ट घेणारा टर्शरीमधे मोडतो. जवळजवळ सगळी शहरी माणसं सेकंडरी किंवा टर्शरीमधे असतात. मी किंवा शोभा जे शिकवण्याचं काम करतो ते सेकंडरी आणि फॅशनेबल ड्रेसेसचं दुकान चालवणारी व्यक्ती टर्शरी गटातलं काम करते.

एकदा या प्रकारे विचार करायला लागलं की तो चाळाच बनतो. कोण काय करतो हे विचारायचं आणि ते काम कुठच्या गटात मोडतं त्याचा विचार करायचा. असं करता करता स्वतः खूप विचार करावा लागतो आणि आपली मूळ

विचारसरणी, आवड, करिअरबद्दलचे निर्णय याचा आपोआप अभ्यास होतो.

जीवनसाथमधे वैवाहिक समुपदेशनही चालतं, त्याचबरोबर विवाह शिक्षण चालतं. लहान मुलांच्या शिक्षणाची साधारण 12 वर्षं धरली तर त्या तुलनेत विवाह शिक्षण साधारण 40 ते 50 वर्षं चालतं. आमच्या ओळखीच्या एका मुंबईच्या बाईंनी शिक्षण हा विषय घेऊन एक वार्षिक काढायचं ठरवलं. जीवनसाथचं काम त्यांच्या चांगलं ओळखीचं आहे. विवाह अभ्यास या कल्पनेचा मी जनक आहे हेही त्यांना माहिती आहे. तरी त्यांना ह्या विवाह शिक्षणाचा त्यांच्या अंकात समावेश करावा असं वाटलं नाही. इतरांनी त्यांना हे सुचवलं, पण त्यांनी ते मनावर घेतलं नाही. मी किंवा शोभा तर त्यांच्या मागे लागणंच शक्य नव्हतं. आमच्या दोघांच्याही आत्मसन्मानाच्या कल्पनांमधे ते बसत नाही. प्रत्यक्षात जीवनसाथमधे चालणारं काम जीवनशिक्षणामधलं मूलगामी काम आहे असं अनेकांनी म्हटलेलं आहे. पण या बाईंना ते कळलं नाही, त्याला कोण काय करणार?

जीवनसाथ विवाह अभ्यास मंडळात मधून मधून एक एक्सरसाइझ आम्ही घेतो. आपण काय उद्योग करतो, थोडक्यात आपली करिअर – म्हणजे नोकरी, व्यवसाय, धंदा जमलेल्या लोकांना वर्णन करून सांगायचं. साधारण 20-25 लोकं असतात आणि प्रत्येकानी हे सगळं 3 मिनिटांतच सांगायचं असतं. आपण काय काम करतो त्याविषयी 15-20 मिनिटं बोलणं हे सोपं आहे, पण 3 मिनिटांत सांगण्यासाठी आपल्या कामातला सर्वांत महत्त्वाचा भाग कुठचा, ते दुसऱ्याला समजेल असं सांगण्यासाठीची शब्दयोजना, त्या मुद्यांचा क्रम यावर बराच विचार करावा लागतो. या सरावामागचा मुख्य उद्देश असा आहे की जोडीदाराच्या निवडीच्या प्रक्रियेमधे दुसऱ्या व्यक्तीला आपण काय करतो यामधे कमी रस असतो. त्याचप्रमाणे आपल्याला स्वतःला देखील समोरच्या व्यक्तीच्या कामाच्या प्रकारात मर्यादितच रस असतो. त्याचा खोलवर अभ्यास केल्यावर असं आढळतं की ही मर्यादा 3 मिनिटांचीच असते. त्यानंतरच्या बोलण्याकडे समोरच्याचं नीट लक्ष नसतं. या छोट्याशा एक्सरसाइझमुळे स्वतःच्या कामाचा दुसऱ्याच्या नजरेतून विचार होतो तो महत्त्वाचा.

करिअरच्या सगळ्या आलेखामधे एक गोष्ट प्रत्येकानी समजून घेतली पाहिजे. काम करण्याचं कसब आणि दुसऱ्यांकडून काम करवून घेण्याचं कसब या निराळ्या गोष्टी आहेत. काम करण्याचं खरं कसब असलेली माणसं

10,000 लोकांच्यात 100 असतात तर काम करवून घेण्याचं कसब असलेला 1 जण असतो. त्या एका माणसाला वरचं पद आणि पगारवाढ मिळते. तुम्ही नोकरी करत असाल तर नऊ हजार नऊशेमधे राहायचं, का नव्याण्णव मधे राहायचं का ती एक व्यक्ती बनायचं, हे तुम्ही ठरवायचं आहे.

मागे मी तुम्हाला सांगितलंच आहे की स्वतःचा व्यवसाय करायचा असा माझा पक्का निर्धार होता. आधीच्या पिढीत माझ्या वडलांचा पक्का निर्धार होता की काही झालं तरी नोकरीच करायची. प्रत्यक्षात स्वभावाचा विचार केला तर जसा माझा आत्मसन्मान प्रखर आहे तसाच त्यांचा होता. अशा माणसांची खरंच पंचाईत असते. कारण प्रत्यक्ष कामात तांत्रिक ज्ञान नुसतं पुरत नाही. इतर अनेक कारणांमुळे तो माणूस त्याच्या करिअरमधे अपेक्षित प्रगती न करण्याची शक्यता असते. माझे वडील तर रोज खिशात राजीनाम्याचं पत्र ठेवूनच कामाला जायचे. फक्त तारीख टाकली की झालं. याप्रकारे त्यांनी त्यांच्या करिअरमधे 3 वेळा राजीनामे दिले. मधे एक-दोन वर्षं विनानोकरीचीही जायची. पैशाची तंगी, बायको-मुलांची फरपट, सगळं व्हायचं. एरवी माणूस म्हणून माझे वडील खूप सरळ, भोळे, प्रेमळ, कर्तव्यनिष्ठ होते. त्यांच्याकाळी जीवनसाथ अभ्यास मंडळ असतं तर कदाचित त्यांनी निराळा विचार केला असता, धोरणं बदलली असती.

खुद्द माझं उदाहरण सांगणं जरूर आहे. मी अनेक वर्षं आर्किटेक्ट म्हणून व्यवसाय केला हे आपण पूर्वीच बोललो आहोत. माझं स्वतःचं निरनिराळ्या संबंधित विषयांच्यात शिक्षण झालेलं असल्यामुळे खुद्द मला अडचण नव्हती, पण आर्किटेक्ट म्हणून व्यवसायामधे काही अर्थच उरलेला नाही. बहुतेक आर्किटेक्ट फक्त 'लाएझनर' म्हणजेच 'करप्शन एजंट' म्हणून काम करतात.

आर्किटेक्ट मंडळींची ही इतकी परिस्थिती कशी होते? त्यांना स्वतःला काही 'हे' नाही का? बऱ्याच प्रमाणात आम्हा आर्किटेक्ट लोकांचं शिक्षण याला जबाबदार आहे. डिग्री कोर्स असो, नाहीतर डिप्लोमा असो नाहीतर आणिक काही असो, पाच वर्षांच्या कोर्समधे कॉलेजमधे एकदाही साइटवर शिकवत नाहीत हे सांगायलाही लाज वाटते. सबंध शिक्षणाचं अंतिम ध्येय चांगली इमारत हे आहे, चांगल्या इमारतीचं चित्र हे नाही हे कॉलेजला कधी कळणार? प्रत्यक्षात एक एक विषय तीन तीन वर्षं फक्त लेक्चर हॉलमधे शिकवून जो कळत नाही तो साइटवर उभं राहिलं तर तीन दिवसांत कळतो. पण आमची कॉलेजं 'लेक्चर हॉल आर्किटेक्चर' बदलायला तयार नाहीत. परिणाम असा की आर्किटेक्ट

मंडळी नुसती स्टाइल, डेकोरेशन आणि वागणुकीचा रुबाब शिकतात. साइटवरच्या काँट्रॅक्टरला आर्किटेक्टला गंडवणं अगदी सोपं असतं, कारण आर्किटेक्टला पुरेशी माहितीच नसते.

वयाच्या विशीपासून पंचावन्न वयापर्यंत बांधकाम व्यवस्थापन ही माझी करिअर होती. 'आर्किटेक्चर, इंजिनियरिंग आणि कन्स्ट्रक्शन मॅनेजमेंट' या तीनही विषयांतल्या तांत्रिक ज्ञानाची माझी बाजू भक्कम होती. प्रॉजेक्ट मॅनेजर म्हणून काम करण्यासाठी जेव्हा माझी आणि मालकाची चर्चा, मुलाखत असायची तेव्हा एक गोष्ट मी कटाक्षानी पाळायचो. ते मला माझी माहिती विचारायचे आणि मी त्यांना त्यांची माहिती विचारायचो. मी त्या कामासाठी योग्य आहे की नाही हा निर्णय त्यांना घ्यायचा असायचा, त्याचबरोबर त्यांचं काम माझ्या योग्य आहे का नाही याचा निर्णय मी घ्यायचा असायचा. भारतातल्या मालक मंडळींना असं वागणं आवडत नाही. त्यांच्या मनात नोकरी मागायला माणूस किंवा काम घ्यायला आलेला व्यावसायिक गरजू असतो. विलायतेत मात्र असे प्रश्न विचारणाऱ्या उमेदवाराविषयी आदर आणि कौतुक असतं.

स्वतःच्या करिअरविषयी आपल्या मनात काही काही कल्पना खूप आधीपासून तयार झालेल्या असतात. दुकान चालवण्याची कल्पना मला कधीच आवडली नाही. आपण दुकान उघडून गिऱ्हाईकाची वाट बघत बसायचं हे माझ्या स्वभावात अजिबात बसणारं नव्हतं. मी प्रोॲक्टिव्ह आहे. मी निर्णय घेऊन कृती करण्यासाठी स्वतःहून पुढाकार घेणाऱ्यांपैकीच आहे. व्यवसायात निदान कामं मिळवण्यासाठी बाहेर हिंडून लोकांशी बोलता येतं.

काही काही कामं मी केवळ कामांच्या अनुभवासाठी आपणहून अंगावर घ्यायचो. अशा कामांच्यात पैसे कमी मिळायचे, पण त्यातला अनुभवच महत्त्वाचा असायचा. मेहनत, बौद्धिक आणि शारीरिक श्रम यांची मला कधीच क्षिती वाटली नाही. काही कामांचं एस्टिमेट, कोटेशन तयार करायचं असायचं. काम मिळणं शक्य नाही हे माहिती असलं तरी मी तेवढी मेहनत करायचो. केवळ अनुभवासाठी. काही प्रकारची कामं मी त्यापूर्वी कधीही केलेली नसायची तरी तसं मालकाला स्पष्ट सांगून करायचो.

अनेक वर्षं माझ्या डोक्यात प्रीकास्ट स्लॅब्ज बनवून बघायचं होतं. एका कामावर तशी संधी मिळाली. मी तशा स्लॅब्ज बनवण्याचा धंदा स्वतःच सुरू केला. काही काळानी एक गोष्ट लक्षात आली. मोठी गुंतवणूक करून त्या

स्लॅब्जचा मोठा धंदा केल्याशिवाय त्यात पुरेसा नफा नाही. तेवढ्या गुंतवणुकीची मला शक्यता दिसत नव्हती. मग तो धंदा बद केला. पण त्यामुळे माझं शिक्षण मात्र खूप झालं.

बिल्डर लोकांकडे लांबून बघून अनेकांना बिल्डर बनण्याच्या कल्पनेचं आकर्षण वाटतं. मी ज्या काळात बिल्डर बिझिनेसमधे होतो तेव्हा मी मोठा बिल्डर कधीच नव्हतो आणि अगदी छोटा बिल्डरही नव्हतो. आपल्या भारतातल्या संदर्भाप्रमाणे बिल्डर आणि प्रमोटर एकच. त्याबद्दलची एक गंमत सांगतो.

कोणा अमुक अमुक बिल्डरचं नाव बरेच वेळा जाहिरातीत दिसलं म्हणजे तो नावाजलेला बिल्डर आहे आणि त्याचा धंदा जोरात असं लोकांना वाटतं. प्रत्यक्षात अगदी बरोबर उलट आहे. प्रमोटर्सचे फ्लॅट जेव्हा खपत नाहीत तेव्हा त्यांना जास्त जास्त जाहिराती कराव्या लागतात. तुम्हाला माहिती असलेल्या प्रमोटर्सच्या दसपटींनी धंदा असलेल्या काही प्रमोटर्सची जाहिरात कधीच कुठे येत नाही.

काही काळ बिल्डर बिझिनेस केल्यावर खूप उशिरा मला स्पष्ट कळलं की सल्लामसलत हाच माझा खरा पिंड आहे. धंदा बंद करायला देखील धाडस लागतं. ते माझ्याकडे होतं. मी बिल्डर धंद्यातून बाहेर पडलो.

●

7) जीवनशिक्षणासाठी योग्य मार्ग

आयुष्यात समाधान मिळवणं हा हेतू स्पष्ट झाला की त्यासाठी आवश्यक ते शिक्षण म्हणजे जीवनशिक्षण. मगाशी आपण जे कामाचं वर्गीकरण केलं (प्रायमरी, सेकंडरी आणि टर्शरी) या तीनही प्रकारच्या कामाची सारख्या प्रमाणात सवय असणं हा जीवनशिक्षणाचा सर्वांत योग्य मार्ग आहे. या मार्गांनी शिक्षण झालं तर पुढच्या आयुष्यात माणसाचं कुठेच अडत नाही. तो सगळ्या बाबतीत स्वावलंबी होतो.

जीवनशिक्षणाचे प्रयोग शाळांमधूनही झाले आहेत आणि 'होम स्कूलिंग' मधेही झाले आहेत. होम स्कूलिंगचा प्रयोग उत्तम आहे. पण भारतातल्या परिस्थितीत तो शक्य वाटत नाही. मूळ कल्पनेत मला त्यात काही चूक दिसत नाही. जवळपासच्या पालकांचा गट त्यासाठी जमवावा लागतो आणि समविचारी आणि जवळपास राहणारे 10-12 पालक त्यासाठी लागतात. तेच न जमल्यामुळे त्याबद्दलच्या प्रयोगांना भारतात सुरुवातच होत नाही. करून बघितल्याशिवाय त्यातल्या प्रश्न आणि उपायांचं संशोधन कसं होणार?

पुण्यातली अक्षर नंदन ही शाळा मला जवळून माहितीय. माझी दोन्ही नातवंडं त्या शाळेत शिकतात. शाळेचं असं म्हणणं असतं की मुलांना शिकवण्याची जबाबदारी केवळ शाळेची नाही, तर शाळा आणि पालक यांची मिळून आहे. त्यामुळे शाळा आणि पालक यांनी अनेक गोष्टी एकत्रितपणी करायच्या असतात. काही पालकांना स्वतःच्या मुलांना शिकवण्यासाठी एवढा वेळ देणं शक्य नसतं, काहींना ही कल्पना पटत नाही. असे पालक यावर नाराज असतात. त्यांच्या डोक्यात रेडीमेड प्रॉडक्ट म्हणजेच शाळेनी शिकवून तयार केलेली आयती मुलं असं असतं. तिथेच तर सगळा घोटाळा असतो. मुलं पालकांची म्हणजे त्यांच्यावर मेहनतही पालकांनीच करायला हवी ना! शाळा त्यात फक्त मदत करणार आहे.

अशा शाळांच्यातून व्यवसायाला उपयोगी असं ज्ञान देण्याचा प्रयोग चालतो. अशा प्रयोगशील शाळांची एक संघटना आहे. माझा त्याच्याशी कमी संबंध येतो, पण शोभाचा बराच येतो. पुण्याच्या आसपास दोन-तीन शाळा मला आणि शोभाला माहिती आहेत की जिथे जीवन-शिक्षण देतात. चरितार्थासाठी

शिक्षण या मूळ कल्पनेत काही चूक नाही. जगायचं कसं, राहायचं कुठे, खायचं काय, ही मोठी आणि महत्त्वाची काळजी मिटली की शिक्षणाची सुरुवातच स्वस्थतेत होते. त्यात अडचण एकच असते. ते शिक्षण आवडलं पाहिजे.

शाळेतल्या मुलांना बँकेचे व्यवहार शिकवणं, पोस्ट ऑफिसच्या कामाची माहिती होणं, त्यांनी बाजारात हिंडून खरेद्या करणं यानी मुलांना आनंद मिळतो आणि माहितीही मिळते. अशा अनेक प्रकारच्या कामात मुलांनी 4-6 महिने ते 1 वर्षं घालवलं की मुलं जगात वावरायला तयार होतात आणि त्यांना आत्मविश्वास मिळतो. एक चिनी म्हण आपल्या सगळ्यांना उपयोगी आहे. 'ऐकलं ते विसरतं, पाहिलं ते लक्षात राहतं, केलं ते समजतं.'

माणसाला आपल्या कामाचा, करिअरचा विचार करायला लागणं ही चांगली गोष्ट आहे. कारण पोकळ डोक्याचे फार दुष्परिणाम असतात. हे विधान विद्यार्थ्यांना लागू आहेच, पण शिक्षकांनाही लागू आहे. माझा बांधकाम मजुरांशी नेहमी संबंध यायचा. माहिती विचारली तर 7 वी पास, 10 वी झालेला असे कामगार असायचे. काही निरक्षरही असायचे. 7 वी, 10 वी च्या उल्लेखावरून आपला काहीतरी अंदाज असतो. तो मात्र पार चुकायचा. अशा अनेक मजुरांना रंग समजायचे नाहीत. रंगांची निरनिराळी नावं तर त्यांच्या गावीही नसायची. पांढरा, काळा, निळा, लाल एवढेच रंग बहुतेक जण ओळखायचे. हिरवा, पोपटी, जांभळा, किरमिजी, शेंदरी, नारिंगी, पिवळा, खाकी वगैरे नावं त्यांच्या दृष्टीनी निरुपयोगी होती. त्याचप्रमाणे डाव्या-उजव्याचा गोंधळ तर निम्म्या कामगारांच्यात असायचा. त्यांच्या परिस्थितीचं वाईट वाटायचंच, शिवाय त्यांच्या शाळेतल्या शिक्षकांनी नेमकं केलं तरी काय, असा प्रश्न पडायचा.

मी पण जवळजवळ गेली 30 वर्षं काहीतरी शिकवण्याच्याच क्षेत्रामधे आहे. कॉलेजमधे मी कन्स्ट्रक्शन मॅनेजमेंट आणि काही काळ बिल्डिंग टेक्नॉलॉजी शिकवायचो. त्यापूर्वी मी आर्किटेक्ट, कॉंट्रॅक्टर, बिल्डर, इंटीरियर डिझायनर असे अनेक संबंधित व्यवसाय केलेले असल्यामुळे मला ते सोपं गेलं. गेली 18 वर्षं मी जीवनसाथ अभ्यास मंडळ चालवतो. मंडळात सगळे सज्ञान लोक असतात. तरुण, मध्यमवयीन, ज्येष्ठ, अविवाहित, विवाहित, स्त्री-पुरुष सगळे असतात. आणि तरी शिक्षणामधला मूळ गोडी लावण्याचा भाग तसाच असतो. मी समुपदेशनाच्या माझ्या कामात अखंड शिकत असतो आणि शिकवत असतो. खरं म्हणजे कायम शिकायला तयार असतो म्हणून शिकवू शकतो.

गेली अनेक वर्षं मी इंग्रजी संभाषणकला शिकवतोय. अनेक वर्षांपूर्वी माझी कॉलेजमधे असलेली चुलत बहीण मला म्हणाली की, तिला इंग्रजी येतं. ती इंग्लिशमधे परीक्षेचा पेपर लिहून ग्रॅज्युएट झाली, पण इंग्रजी बोलण्याचा आत्मविश्वास अजिबात नसल्यामुळे तिथे अडतं. ही 35-40 वर्षांपूर्वीची गोष्ट आहे. मी काही इंग्लिश भाषेचा विद्यार्थी नव्हतो. फक्त मी इंग्लंड आणि अमेरिकेत काही वर्षं राहून नोकरी करून परत भारतात आलेलो होतो. त्यात इंग्लंडमधे असताना काही काळ ब्रिटिश कुटुंबात राहिलेलो होतो. पण इंग्रजी संभाषणकला शिकवायची कशी याचं मला शिक्षण नव्हतं. मग मी माझ्या चुलत बहिणीला शिकवता शिकवता शिकत गेलो.

त्याबद्दल वाचन करताना असं दिसलं की इंग्रजी संभाषणकला शिकवण्याच्या दोन पद्धती आहेत. एका पद्धतीत व्याकरण आणि स्पेलिंग्ज यावर भर देऊन इंग्लिश लिहिण्याची तयारी करून घेतात आणि दुसऱ्या पद्धतीत मराठीतल्या वाक्यांचं इंग्रजी भाषांतर करून ते करता करता जरूर पडेल तसं व्याकरण शिकवतात. पहिल्या व्याकरण पद्धतीनी आमच्या पिढीला शाळेत भरपूर छळलेलं होतं. दुसरी पद्धत मला जास्त तर्कसंगत आणि उपयोगी वाटली. त्याची कारणं सांगतो. त्यातलं मुख्य कारण असं. इंग्रजी संभाषणकलेचं मर्म तीन शब्दात सामावलेलं आहे. आत्मविश्वास, आत्मविश्वास आणि आत्मविश्वास.

1) आपण मराठी बोलायला लागतो तेव्हा प्रथम नुसते एक एक शब्द म्हणजे नुसतं नाम, नुसतं क्रियापद असं बोलतो. व्याकरणावाचून आपलं काही अडत नाही. कोणी न शिकवता आपल्याला लिंग, प्रत्यय, शब्दांची जोडणी व्यवस्थित कळत जाते. त्याच पद्धतीनी इंग्लिश बोलायला मोठेपणी सुरुवात केली तर बोलता यायलाच पाहिजे.
2) इंग्लिश शब्दांचा उच्चार आणि स्पेलिंग्ज यांची पद्धत बऱ्याच प्रमाणात ठरलेली आहे. बऱ्याच म्हणजे साधारण पंचाण्णव टक्के. ती पद्धत कळली आणि उच्चार कळला की स्पेलिंग्ज पाठ करण्याची गरज नाही. उरलेल्या 5% साठी संपूर्ण इंग्लिश बोलण्याबद्दल न्यूनगंड बाळगण्याची काहीच गरज नाही.

या दोन गोष्टी सांभाळत छोट्या मराठी वाक्यांचं इंग्लिश भाषांतर करत गेलं की हळूहळू आत्मविश्वास येतो. संभाषणवर्गात जी वाक्यं बोलली जातील ती घरी मोठ्यांदा पुन्हा पुन्हा बोलण्याचा सराव केला तर निरनिराळ्या वाक्यरचना डोक्यात बसतात आणि चांगली तयारी होते. असं शिकणारांचा 3-4 लोकांचा गट जमला तर फार फायदा होतो. संभाषणवर्गाव्यतिरिक्तदेखील एरवी फोनवर, प्रत्यक्षात बोलता येतं. या पद्धतीनी ज्याला मुळात इंग्रजी येतं पण बोलण्याचा आत्मविश्वास नसतो त्याला इंग्लिश बोलता यायला लागतं. माझ्या चुलत बहिणीला याचा चांगला उपयोग झाला. नंतर काही वर्षांच्या खंडानंतर मी गरवारे बालभवनमधे लहान मुलांना म्हणजे ज्यांना अजून इंग्लिश येत नाही त्यांना शिकवायचा प्रयत्न केला. असं लक्षात आलं की त्यांना इंग्लिश भाषाही शिकवावी लागते आणि संभाषणही शिकवावं लागतं. त्यासाठी बराच वेळ लागतो.

मधे अनेक वर्षं गेल्यावर गेली काही वर्षं मी पुन्हा इंग्रजी संभाषणवर्ग घेतो आहे. एका वेळेला 5-7 जण असतात. सोमवार ते शुक्रवार रोज 1 तास. अगदी किरकोळ फी असते. साधारण 6 महिन्यांत बऱ्यापैकी बोलता येतं. त्यासाठी रोज घरी गृहपाठ मात्र करावा लागतो. या वर्गाला पुरुषांपेक्षा स्त्रिया जास्त येतात. बऱ्याचशा गृहिणी असतात. त्या गृहपाठ करू शकत नाहीत. अशांना बोलता येण्यासाठी साधारण 1 वर्षं लागतं. काही जणी इंग्लिश मीडियम शाळेमधे बालवाडी शिक्षिका असतात. काही चक्क एम.कॉम., इंजिनियरिंगची डिग्री घेतलेल्या वगैरे असतात. त्यांची इंग्रजीची परिस्थिती बघून आश्चर्य वाटतं. यांनी इंग्लिशमधे पेपर लिहून डिग्री कशी मिळवली, हा प्रश्न पडतो. आपल्या शिक्षणपद्धतीविषयीची सगळी परिस्थिती अगदी स्पष्ट होते.

भारतभर इंग्लिश मिडियमच्या शाळांचं मोठं पीक आलेलं आहे. महाराष्ट्रात, पुण्याच्या आसपास हजारो इंग्लिश मिडियमच्या शाळा आहेत. त्याला मागणी आहे. त्यामुळे त्याचा पुरवठा आहे. शाळा निघतायत, बिल्डिंग्ज बांधतायत, मुलं प्रवेश घेतायत. एवढं असल्यावर खोऱ्यानी शिक्षकही लागणारच. त्या शिक्षकांना नोकऱ्याही मिळतायत. एकच प्रश्न उरतो. एवढ्या शिक्षकांना खरोखर इंग्लिश येतं का? इंग्लिश बोलता येतं का? तिथेच तर सगळा घोटाळा आहे. शिकवणाऱ्यांना धड इंग्लिश बोलता येत नाही.

एक निराळा मुद्दा सांगतो. बी.एड., एम.एड. अशा कोर्सेसना शिकवायचं

कसं, हा विषय शिकवतात. त्यात नेमकं काय शिकवतात मला माहिती नाही. पण तीन महत्त्वाच्या गोष्टी शिकवत नाहीत हे स्पष्ट दिसतं. 1) शिकवत असताना स्वतः सतत शिकण्याची तयारी ठेवणं. 2) विद्यार्थ्याला गोडी लावणं. 3) विद्यार्थ्याचा आत्मविश्वास वाढवणं. या तीन गोष्टीच तर शिकवण्याचा प्राण आहेत. मला या तीनही गोष्टी पटतात आणि जमतात.

माझं स्वतःचं हस्ताक्षर आणि लिखाण उपजतच खूप चांगलं आहे. ते बघून हस्ताक्षरकला शिकवाल का, असं लोक विचारायचे. मी त्याला हो म्हणालो आणि अनेक वर्षं हस्ताक्षरवर्ग देखील घेतले. त्यातल्या अगदी मोजक्या गोष्टी इथे तुम्हाला सांगतो.

1) छापील अक्षरांच्याशी जेवढं जास्त साम्य असेल ते म्हणजे चांगलं हस्ताक्षर. छापील मजकुराच्या प्रत्येक अक्षराचं वळण बघून त्याप्रमाणे अक्षर काढण्याचा प्रयत्न करायचा. अक्षराचा आस समांतर असणं फार महत्त्वाचं आहे. कागदाच्या कडांना समांतर अक्षराचा आस हवा किंवा कागदावरच्या आधी आखलेल्या आडव्या रेघांच्या काटकोनात अक्षराचा आस म्हणजे उभी रेघ हवी. त्यासाठी एक सोपी युक्ती आहे. आपण खुर्चीवर बसलो आणि कागद समोर तिरका धरला की आस समांतर येणं कठीण जातं. त्यासाठी आपली खुर्ची थोडी बाजूला ठेवायची आणि हातासमोर कागद टेबलावर काटकोनात ठेवून लिहायचं. कागद तिरका धरायचा नाही.

2) चांगलं अक्षर काढायचंच, ही जिद्द मनात असली तर सुरुवात करताना लिहिण्याच्या वेगाकडे लक्ष द्यायचं नाही. चांगलंच लिहायचं. जास्त वेळ लागला तरी चालेल. वेग हळूहळू वाढत जातो. आकड्यांकडेही स्वतंत्र लक्ष द्यावं लागतं.

3) पूर्ण कागदावरच्या सुबक रचनेची तंत्रंदेखील समजून घ्यायची. कागदाच्या चारही बाजूंना ठराविक समास सोडायचा. दोन परिच्छेदात मुद्दामून थोडी जास्त जागा सोडायची. ओळी समांतर लिहिता येण्यासाठी कोऱ्या कागदामागे गाईड पेपर ठेवावा. शक्यतोवर पांढऱ्या कागदावर काळ्या शाईनी लिहावं.

कॉम्प्युटरवर एवढं छान टायपिंग होत असताना हस्ताक्षर सुधारण्याची गरजच काय, असा अनेकांच्या मनात प्रश्न असतो. हा निर्णय ज्यानी त्यानी घ्यायचा. मी कॉम्प्युटरही वापरतो, पण मला चांगल्या हस्ताक्षराचं खूप महत्त्व रोज जाणवतं.

मी इंग्लंडमधे आणि त्यानंतर अमेरिकेत नोकरी करायचो. तिथे लोकांना खूप नवल वाटायचं. हातानी लिहिलेलं अक्षर एवढं चांगलं असू शकतं, हे पाश्चात्त्यांना समजूच शकत नव्हतं. त्यावेळी कॉम्प्युटर्स नव्हते. टाइपरायटर्स होते. मोठ्या अक्षरात काही लिहून पाहिजे असलं की ते सगळं माझ्याकडे यायचं. गल्फ कंट्रीजमधे तीच परिस्थिती होती. मार्करनी मोठ्या अक्षरातल्या चिठ्या, पाट्या लिहिण्यासाठी लोक थांबून बसलेले असायचे.

एक सांगायचं राहिलं. मला शिकवण्याची मनापासून आवड आहे. साहजिकच मला त्यातली गती पण आहे. कुठचाही मुद्दा आणखीन सोपा करून कसा मांडता येईल, याच्या मी सतत मागे असतो. मी शाळाशिक्षक झालो नाही. कारण शाळांचं वातावरण अत्याचारी असतं. माझ्यावर तर खूपच शैक्षणिक अत्याचार झाले. कॉलेजेसमधे शिकवताना अत्याचारी वागणुकीचा भाग कमी असतो. तेवढा वगळणं मला शक्य होतं म्हणून मी कॉलेजेसमधे शिकवलं.

कुठचाही विषय शिकवायचा तर तो प्रथम माझ्या आवडीचा असलाच पाहिजे याची मी सतत कटाक्षानी काळजी घेतली. मी त्या विषयाचा मनापासून, झोकून देऊन अभ्यास करायचो. अजूनही करतो. मी कार ड्रायव्हिंग उत्तम करतो आणि कार ड्रायव्हिंग उत्तम पद्धतीनी शिकवायचोही.

माझं वय वाढलं, शारीरिक क्षमता कमी झाली. आता मी फक्त बांधकाम करणाऱ्या कंपन्यांचं स्टाफ ट्रेनिंग करतो. त्याखेरीज जीवनसाथमधे आयुष्याचा अभ्यास शिकविण्याचा आनंद ही माझी करिअर आहे. अशा चर्चांमुळे कामाकडे बघण्याच्या दृष्टिकोनात फरक पडतो, तो मला महत्त्वाचा वाटतो.

जीवनसाथ अभ्यास मंडळात अशी एका प्रकारची कार्यशाळा आम्ही मधून मधून घेतो. प्रत्येकानी सांगायचं – आपल्या पालकांचं, स्वतःचं शिक्षण, नोकरी, व्यवसाय, धंदा, पुढच्या योजना. मग त्याविषयी प्रश्नोत्तरं होतात. खूप फायदा होतो. करियरविषयी एक गोष्ट शेवटी थोडक्यात सांगावीशी वाटते. 'काहीही करा, पण चांगलं करा.' पैसे आपोआप मिळतील.

●

8) करिअरचं नियोजन आणि बदल

प्रत्येकानी स्वतःच्या लहानपणापासून आठवून बघावं. जे आवडतं ते चांगलं जमतं, आवडतं ते येतं, येतं ते अधिक आवडतं, ते अधिकाधिक येत जातं, आवडत जातं हा तर शिकण्यामधला प्राथमिक नियम आहे. पण सुरुवात आवडण्यानीच होते. सगळ्या तरुण मित्रांना आमचं सांगणं एकच आहे की काय आवडतं ते लवकरात लवकर शोधा, ठरवा आणि त्यात करिअर करा. चुकून हे कळायला उशीर झाला असला आणि क्षेत्र बदलायची गरज असली तर ते लवकर बदला. या मूलभूत तत्त्वाकडे दुर्लक्ष करून लवकर पैसे मिळवायला लागण्याच्या हेतूनी नोकरीला लागण्याइतकी बिकट आर्थिक परिस्थिती असली तर आपलं काही म्हणणं नाही, पण ज्या मध्यमवर्गीय लोकांच्यात आपण संशोधन करतो आहोत त्यांनी मात्र जे आवडतं तेच करावं अशी आपली आग्रहाची विनंती आहे. एखाद-दुसरं वर्ष या प्रकरणात वाया गेल्याकडे लक्ष देऊ नका. सबंध आयुष्य अनिच्छेनी केवळ पाट्या टाकण्यापेक्षा ते फार चांगलं आहे.

माझं स्वतःचं उदाहरण देतो. माझ्यात लहानपणापासून चित्रकलेची आवड आणि कौशल्य दोन्ही होतं. अ‍ॅथलेटिक्स, क्रिकेट मधेही मला उत्तम गती होती. पण मला लहानपणीच चष्मा लागल्यामुळे सगळे खेळ माझ्या करिअरच्या यादीतून कटाप झाले. आर्किटेक्चरमधे चित्रकलेचा संबंध असतो असं वडलांना कोणीतरी म्हणालं म्हणून मी आर्किटेक्चरला गेलो. आर्किटेक्ट झालो, नोकरीला लागलो. पुढे टाउनप्लॅनिंग आणि लँडस्केप डिझाइन शिकलो. इंग्लंडला जाऊन आर्किटेक्ट म्हणून नोकरी केली. तिथे इंटीरियर अ‍ॅन्ड लाइटिंग डिझाइन शिकलो. पुढे अमेरिकेत जाऊन आर्किटेक्ट म्हणून नोकरी केली. फिलाडेल्फियात नोकरी करता करता अ‍ॅप्लाइड इंजिनियरिंग आणि कन्स्ट्रक्शन मॅनेजमेंटचे कोर्स केले. भारतात परत आल्यावर या सगळ्या गोष्टींचा व्यवसाय सुरू केला. त्यात कन्स्ट्रक्शन मॅनेजमेंट हा विषय मला सर्वांत आवडला होता. बरीच वर्षं तो व्यवसाय केला, बिल्डरचा धंदा केला.

शेवटी मॅरेज अ‍ॅन्ड फॅमिली काउन्सेलिंग या मानसशास्त्रामधल्या विषयात डॉक्टरेट पर्यंत काम केलं. हे काम मला सर्वांत आवडतं. हा माझा शिक्षण-

करिअरचा प्रवास फारच थांबत थांबत आणि लांबलचक, शिवाय वेडावाकडाही झाला. त्याचं मात्र मला कधीही वाईट वाटत नाही.

अनेक विषयांत आवड, कौशल्य असलेल्या माणसानी आवडतं तेच करायचं असं ठरवलं की असं होतं. मला त्याबद्दल पश्चात्ताप नाही. आज काय खरं आवडतं ते ठरवण्यासाठी बऱ्याच सुविधा आहेत. बालभवनं आहेत. मानसिक चाचण्या आहेत.

एक गोष्ट अगदी नक्की. जे आवडतं तेच करावं नि पालकांनी मुलांना ते करू द्यावं. शाळेतला एखादा विषय, त्याखेरीज एखादा छंद, एखादा खेळ या सर्वच बाबतीत काय आवडतं तेच करावं. निरनिराळ्या प्रकारचे क्लासेस चालवणारे लोक धंदा करायलाच बसलेले असल्यामुळे ते पालकांना पैशात अडकवायला बघतात. ते एकदम 6 महिन्यांची, वर्षाची फी आधी मागतात. प्रत्यक्षात पालकांनी एका महिन्याचीच फी भरावी आणि मग मुलाला आवडतंय असं ठरलं तर बाकीची भरावी. 'करून बघणं' ही प्रत्येक मुलाची गरज आहे. संस्थेनी ही गोष्ट मान्य नाही केली तर पालकांची त्याबाबत एकजूट हवी.

शोभा आणि मी पालक शिक्षणाचे वर्ग घेतो. त्यात शाळा, अभ्यास हे विषय असताततच. त्यातल्या अनेक प्रश्नांना पालकांची एकजूट हेच उत्तर असतं. त्यातला योग्य, अयोग्य फी आकारण्याचा मुद्दा स्वतंत्रपणे बाजूला ठेवून मूळ मुद्द्याबद्दल आणखी एक गोष्ट सांगतो. तुम्ही शहरात राहात असलात तर तुमचं शिक्षण, कला, छंद कुठल्याही क्षेत्रातला असो, तुम्ही पुरेशी मेहनत करायला तयार असलात तर त्यात पुरेसे पैसे नक्की मिळतात. अगदी मध्यमवर्गीय आयुष्य जगायला पुरेसे. खेड्यात मात्र त्या ज्ञानाचं, कलेचं पैशात रूपांतर होईल याची खात्री नाही.

पण जेव्हा अशी साधनं नव्हती तेव्हा म्हणजे आमच्या काळातल्या माणसांचं बघा. आवड काय नि आयुष्यभराचा उद्योगधंदा काय, क्वचितच साम्य असायचं. निवृत्त झाल्यावर हवं ते करण्याचीच तेव्हा पद्धत होती. आमच्या पिढीत स्वतःच्या आवडीचं आणि पैसे मिळविण्याचं क्षेत्र ज्यांचं एकच आहे असे लोक विरळाच.

मल्टिपल इंटरेस्ट, मल्टिपल टॅलंट असलेल्या मुलांनी शिक्षणाची कुठची शाखा निवडावी, असा प्रश्न पडतो. शक्य असलं, जरूर वाटली तर ॲप्टिट्यूड टेस्ट जरूर करावी. काही प्रमाणात उपयोग होतो. आय.क्यू. टेस्टचंही असंच.

काही प्रमाणात उपयोग होतो. त्यावर संपूर्ण अवलंबून राहू नये. स्वतःला काय आवडतं, ते करावं ही मुख्य गोष्ट. आवडतं काय, हे शोधण्यासाठी अनेक गोष्टी करून बघाव्या लागतात. ओळखीच्या लोकांशी, नोकरीतल्या, व्यवसायातल्या सगळ्यांशी बोलायला पाहिजे. पालकांनी ही गोष्ट समजून घ्यायला पाहिजे. प्रथम मगाशी सांगितलेला महत्त्वाचा नियम शिक्षणाच्या बाबतीत कायम लक्षात ठेवायचा. 'जे आवडतं ते येतं, ते आणखी आवडत जातं नि अधिक येत जातं. पण सुरुवात आवडीपासून होते.' अमेरिकन आणि ब्रिटिश शिक्षणपद्धतीत आणि भारताच्या शिक्षणाच्या अवस्थेतला मुख्य फरक या गोष्टीची समज हा आहे.

माझ्याकडे एकजण काम करायचा. तांत्रिक ज्ञान आणि बुद्धिमत्ता बेताची, पण स्वभावानी चांगला आणि दिसायला चांगला. त्याला त्यावेळच्या बाजाराप्रमाणे मी पगार देत होतो, पण त्याची पैशाची गरज जास्त होती. बाजार ज्या पद्धतीनी बदलत चालला होता, त्यावरून मला दिसत होतं की बांधकामाच्या क्षेत्राशी संबंधित वस्तू विकणारा विक्रेता होणं हा एकच जास्त पैसे मिळविण्याचा मार्ग आहे. हा मुलगा विक्रेता म्हणून काम करायला या महिन्यात जातो का पुढच्या महिन्यात जातो एवढाच प्रश्न होता. माझ्या अंदाजाप्रमाणे तो दोन महिन्यांत गेला आणि आता तो पुन्हा इंजिनियरिंगकडे वळून परत फिरणं शक्य नाही इतका पगार तिथे त्याला मिळतो.

तीन प्रकारची माणसं आपल्याला सापडतात. भलतंच काहीतरी (आवडीपेक्षा निराळं) करून आयुष्य रेटणारी. नावडतं काम करून चरितार्थ चालवणारी, पण आवडतं काम फावल्या वेळेत करत राहणारी. आणि अर्थात तिसरा प्रकार म्हणजे आवडीचंच काम आयुष्यभर करून पैसे मिळवणारी. मी आणि शोभा दोघांनीही कायम आवडेल तेच काम करत पैसे मिळवले. याबद्दल आम्ही स्वतःला भाग्यवान मानतो. पसंत न पडलेली कामं सोडून देण्याचं धारिष्ट्य आमच्याकडे होतं. शोभाच्या तुलनेत माझा झगडा जास्त काळ मात्र चालला.

माझ्या ओळखीचे, निरनिराळ्या क्षेत्रातले अनेक लोक आपल्या व्यवसायाचा धंदा उघडून बसलेले असतात. दुकान, ऑफिस, हॉस्पिटलसारख्या प्रचंड मालमत्ता करून ठेवलेल्या असतात. त्यांच्या घरी लहानपणापासूनच्या बोलण्यामुळे मुलांवर हळूहळू परिणाम होतच राहतो. दुकानदाराच्या मुलाला दुकानात काम करणं सर्वांत सोयीचं हे स्पष्ट असतं. 'आर्किटेक्टचा मुलगा वडलांचीच फर्म चालवायचा विचार करतो. डॉक्टरनी हॉस्पिटल बांधून ठेवलेलं असलं की काय

करायचं हे स्पष्ट असतं. मेडिकल कॉलेजला प्रवेश मिळविण्यासाठी परगावचं हॉस्टेल, डोनेशन या मार्गानी शेवटी ते धंद्यात उतरतातच.

धंदाच करायचा, नोकरी नाही असं ठरवून संपूर्ण कुटुंबाची वाताहत करणारे बरेच मराठी लोक माझ्या ओळखीचे आहेत. कित्येक ठिकाणी अत्यंत जवळच्या नातेवाइकांकडून धंद्यात फसवणूक झाल्याची उदाहरणं आहेत. सचोटीनी धंदा करायचा आणि तरी तो लोकांच्या पसंतीला पडला पाहिजे, भागीदारांशी जुळवून घ्यायला पाहिजे हे खरोखरच खूप मोठं कसब आहे आणि ते लाखात एकाकडेच आढळतं.

एक गोष्ट आपल्या सगळ्यांना पूर्णपणे माहीत असते की, कुठल्याही कामाचा 'धंदा' झाला की त्याविषयीची भावना संपते. 'सुगरण' असलेल्या बाईनी 'केटरिंग सर्व्हिस' चालू केली की स्वयंपाकाविषयीची भावना संपलीच समजायची. सगळ्या धंद्यांत हे काही प्रमाणात आपण मान्य केलेलं असतं, पण ते डोळ्यांदेखत झालं की खुपतं. एका मान्यवर रेस्टॉरंटच्या स्वयंपाकगृहात माझ्या डोळ्यांसमोर, चिकन बिर्याणी धक्का लागून खाली फरशीवर पडली. वेटरनी काय केलं असेल? शांतपणे खाली वाकून बशीत भरून तो गिऱ्हाइकाला 'सर्व्ह' करायला घेऊन गेला. स्वतः तो वेटर तशी चिकन बिर्याणी खाणार नाही. पण गिऱ्हाइकाला मात्र ते कदापि कळलं नाही पाहिजे. सध्याच्या धंदा करणाऱ्या सर्वसाधारण माणसाच्या वागणुकीचं वर्णन असं करतात. 'प्रेमात आणि युद्धात सर्व काही माफ असतं'च्या ऐवजी सुधारित वाक्प्रचार असा आहे, 'प्रेमात, युद्धात आणि धंद्यात सर्व काही माफ असतं.'

वकील, टॅक्स कन्सल्टंट वगैरे सगळे याच मार्गानी जातात. 'आवडतं ते येतं, आवडेल तेच करावं, वगैरे तत्त्वं त्यांच्या मुलामुलींसाठी उपयोगी नसतात. कधीकधी घरातली कर्ती पुरुषमंडळी निर्णयाची जबरदस्ती करतात. मी असं अनेक घरांच्यात झालेलं बघितलेलं आहे की, 10 वी, 12 वी नंतर मुलगी काहीतरी कलाक्षेत्रातली करिअर करायची म्हणत होती, पण वडलांनी घरात चक्क फर्मान काढलं की सरळ आधी मुकाटपणे बी.कॉम. करायचं नि त्यानंतर इतर काय ती नाटकं करायची. खुद्द आमच्या कुटुंबात मात्र आम्ही अनेक बंधनांपासून मुक्त प्रकारची लोकं असल्यानी शोनीलचा व्यवसाय बांधकामाशी अजिबात संबंध नसलेला आणि आभाचंही क्षेत्र मी आणि शोभापेक्षा निराळंच असं आहे.

अनौपचारिक शिक्षण हा शब्द शिक्षणक्षेत्राला नवा नाही. प्रत्यक्ष लोकांना उपयोगी पडेल असं काम लोकांच्यात मिसळून कोणी करायला लागलं तर विद्वान लोकं काही बोलत नाहीत, पण अशा माणसाला ते त्यांच्या गटात सामील करून घेत नाहीत. कारण त्यांच्या मते असं काम कमी दर्जाचं असतं. अगदी स्पष्ट सांगायचं तर 'ॲकॅडमीशियन्स' विरुद्ध 'फील्डवर्कर्स' असं वातावरण तयार होतं. शिक्षणक्षेत्राच्या दृष्टीनी हे फार चुकीचं आणि वाईट आहे. शेवटी ज्ञान हे सामान्य लोकांनी त्याचा उपयोग करावा म्हणून असतं. विद्वानांनी विद्वानांशी बोलणं एवढ्यापुरती ज्ञानाला मर्यादा असणं योग्य नाही.

शहरातली प्रचंड लोकसंख्या, एवढी निरनिराळी क्षेत्रं आणि त्यात निर्माण झालेल्या गरजा बघितल्या की खरोखरीच पटतं की तुमच्यात तेवढी गुणवत्ता, चिकाटी आणि धाडस असलं तर तुम्ही काहीही करत असा, तुम्ही पुरेसे पैसे मिळवू शकाल. शिक्षण क्षेत्रात अनेकांना अनेक अडचणी असतात. आमच्या ओळखीची एक व्यक्ती शिक्षणामधल्या अडचणी सोडविण्याचाच व्यवसाय करते.

आणखी एका क्षेत्राला यापुढे भारतातच काय, जगात कधीही यापुढे खूप मागणी असणार आहे. 'मार्केटिंग'. म्हणजेच कुठची वस्तू खपेल हे शोधून काढणं आणि खपवणं. कुठचीही म्हणजे कुठचीही गोष्ट, चांगली असली तरी ती लोकांपर्यंत कशी पोहोचवणार हा प्रश्न असतोच. मगाशी आपण मराठी माणसांनी केलेल्या आणि फसलेल्या धंद्यांविषयी बोलत होतो ना, मराठी लोकांचं मार्केटिंग कमी पडतं, मार्केट सर्व्हे केलेला नसतो हे एक महत्त्वाचं अपयशामागचं कारण आहे. एखाद्या माणसाकडे ही जिद्द असली तर मार्केट सर्व्हेचा व्यवसाय अतिशय उत्तम आहे. त्याला प्रचंड मागणी सध्यासुद्धा आहे. नंतरही असणार.

शिक्षण आणि त्यापुढे करिअर याचा विचार करताना मला एक गोष्ट सारखी वाटत राहते. शिकताना मजा आली पाहिजे. कारण प्रत्येक विषय छानच असतो. नंतर करिअर करतानाही प्रत्येक काम छानच असतं. त्यामुळे रोज कामाचा आनंद मिळाला पाहिजे. प्रत्यक्षात तसं होत नाही याची खंत वाटते. मग मला सरासरी माणसाच्या कामाच्या वेळेची सगळी गणितं आणि त्यातल्या आनंदाचं प्रमाण समोर दिसायला लागतं.

सरासरी माणूस वयाची विशी ते साठी असं 40 वर्षं काम करतो. त्याचा हिशेब बघूया. प्रत्येक वर्षी सरासरी माणूस 250 दिवस कामावर जातो असं दिसतं आणि रोज 8 तास कामावर असतो. म्हणजेच दरवर्षी 2000 तास

कामावर हजर होतो. अशी 40 वर्षं मानली तर सबंध आयुष्यात तो ८०,००० तास काम करतो. ते काम निष्ठेनी केलं तरच आनंद मिळतो.

प्रत्यक्षात तसं आढळत नाही. एकूण आयुष्यभरातल्या ८०,००० तासांपैकी 25 टक्के कामंदेखील कामावरच्या निष्ठेनी होत नाहीत. त्यामुळे आनंद मिळत नाही. नाइलाजानी कामावर हजर होणाऱ्यांची संख्या प्रचंड आहे. खुद्द कामाचं तर या प्रकरणात नुकसान होतंच, शिवाय त्या आनंदाला मुकल्यामुळे ती व्यक्ती, ते कुटुंब आयुष्यभर अस्वस्थ असतं.

●

शिकताना मजा आली पाहिजे. कारण प्रत्येक विषय छानच असतो. नंतर करिअर करतानाही प्रत्येक काम छानच असतं. त्यामुळे रोज कामाचा आनंद मिळाला पाहिजे.

9) भागीदारीतली करिअर

आमच्या ओळखीचे एक फळांचे दुकानदार आहेत. त्यांचे निरनिराळे 4 धंदे आहेत आणि 8 भाऊ तो धंदा बघतात. सगळा व्यवहार रोखीत असतो. कागदोपत्री भागीदारी वगैरे काही नाही. सगळे एकत्र राहतात. आळीपाळीनी धंदे सांभाळतात. 8 भाऊ एकत्र धंदा करतात म्हटल्यावर ते सरासरी हिंदू कुटुंब नसणार हे सांगण्याचीच गरज नाही. एकमेकांवर पूर्ण विश्वास हे तर धंद्याचं मर्म आहे. कागदोपत्री भागीदारी नसली तरी त्यांना मर्म कळलेलं आहे हे नक्की. कारण भागीदारीचे काही नियम आहेत. मध्यम आवक असली तर भागीदारी टिकते. जास्त पैसे किंवा फार कमी पैसे म्हणजे कुठच्याही भागीदारीला धोका.

विश्वबंधुत्व, वैश्विक समानता ह्या कल्पना किती अशक्य आहेत, हे भागीदारीच्या या नियमावरून कळतं. मराठी लोकांचे भागीदारीमधले धंदे या विषयावर भविष्यात स्वतंत्र सविस्तर अभ्यास आणि लिखाण करण्याचा माझा विचार आहे. साधारण शंभर मधला एक भागीदारीतला धंदा टिकतो असं प्रमाण आहे. बाकीचे नव्याण्णव एकत्र असताना 'घाटे असोसिएट्स' असतात. स्वतंत्रपणे हे लोक गुणवान असतात. चांगला धंदाही करतात.

इतर कोणाशी तरी जुळवून घेऊन भागीदारीत व्यवसाय/धंदा करणं ही निराळी मानसिकता असते. नोकरी ही फक्त एकट्यानी करायची असते. नवरा-बायको अशा जोडप्याला मिळून नेमणूक होणं आणि जोडप्याचा पगार ठरणं ही क्वचित घडणारी गोष्ट आहे. इतर म्हणजे कोण, याचा इथे अगदी थोडा संबंध असतो. नवरा-बायको भागीदार ही जोडी जुळू शकते. कारण एरवीच्या आयुष्यातही त्यांची पैशाची भागीदारी असतेच. निराळी अडचण अशी येऊ शकते की दिवस-रात्र दोघांच्यात एकच विषय यामुळे संसार निरस होऊ शकतो.

सख्ख्या किंवा चुलत-आते-मामे भांवडांच्यात भागीदारीचं उदाहरणही काही प्रमाणात असतं. अशी भागीदारी टिकण्याचं प्रमाण थोडं कमी असतं. आपण इथे भागीदारीबद्दल बोलतो आहोत ते फक्त मुद्दा समजावण्यासाठी. सरकारी कायद्याप्रमाणे भागीदारी, प्रायव्हेट लिमिटेड, पब्लिक लिमिटेड असे अनेक प्रकार आहेत. पण त्या सगळ्यांना आपण भागीदारी म्हणतो आहोत. योग्य ती मानसिकता तपासूनच तो निर्णय घ्यावा एवढंच म्हणणं आहे.

●

10) तीन मिनिटांचा खेळ

जीवनसाथमधल्या एका उपयोगी खेळासारख्या वाटणाऱ्या कार्यक्रमाचा मगाशी मी उल्लेख केला होता. त्याच्याविषयी जरा सांगतो. कार्यक्रमाचं नाव '3 मिनिटांत आपल्या कामाविषयी सांगणं.'

या कार्यक्रमात काही जोडीदाराच्या शोधात असलेले अविवाहित लोक आहेत. त्यांना हा कार्यक्रम कसा उपयोगी पडेल ते प्रथम समजावतो.

जे मुलगा-मुलगी जोडीदार निवडीच्या उद्देशानी प्रथम भेटतील त्यांना ती व्यक्ती काय करते, हे विचारण्याएवढाच रस असतो. फार लांबण कोणी लावली तरी त्या व्यक्तीविषयी वाईट मत होतं. नुसता पगार सांगणं हे चुकीचं आहे. प्रत्येक काम करणाऱ्या माणसाच्या आयुष्यातला जागेपणचा सर्वांत जास्त वेळ कामाच्या ठिकाणी जात असतो. त्याविषयी काही न बोलणं हे चूकच आहे. स्वतःच्या कामाकडे बघण्याची वृत्ती ही आयुष्याकडे, संसाराकडे बघण्याच्या वृत्तीचा महत्त्वाचा भाग आहे. या सगळ्याचा अर्थ असा की आपल्या कामाविषयी सांगायचं, पण ते अगदी थोडक्यात सांगता आलं पाहिजे. थोडक्यात याची व्याख्या 3 मिनिटं ही मी ठरवलेली आहे.

जीवनसाथच्या मिश्रगटात सरासरी 25 माणसं असतात. कार्यक्रम सुरू व्हायला 15 मिनिटं ते अर्धा तास, मध्यंतरासाठी 15 मिनिटं आणि शेवटी प्रश्नोत्तरं, कोणाला लवकर जायचं असतं त्यामुळे 15 मिनिटं वजा होतात. शेवटी 3 तासातला 1 तास जातोच वाया. 2 ते 5 अशा 3 तासांपैकी 2 तास म्हणजे 120 मिनिटं हाताशी येतात. 30 माणसं धरून 120 मिनिटांचा हिशेब प्रत्येकी 4 मिनिटं असा होतो. त्यातलं 1 मिनिट शंकांसाठी वाया जातं असं ठरवून मी 3 मिनिटांच्या निर्णयापर्यंत पोहोचलो. त्याखेरीज आपल्याला स्वारस्य नसताना किंवा दुसऱ्याबद्दलचं स्वतःचं धोरण ठरलेलं नसताना दुसऱ्याचं बोलणं ऐकण्याची मर्यादा 3 मिनिटांपेक्षा जास्त असू शकत नाही, असं मानसशास्त्रातल्या प्रयोगातलं निरीक्षण आहे. 3 मिनिटं हा अंदाज अगदी योग्य ठरला हे मी इथे मुद्दामून नमूद करतो. इतर कुठच्याही गटात हा कार्यक्रम जरूर घेऊन बघावा.

आपण जिथे काम करतो त्या ठिकाणी आपण काय करतो, काय केलं

याचा वृत्तांत वरिष्ठांना द्यावा लागतो आणि कनिष्ठांकडून घ्यावा लागतो. रिपोर्ट देताना किंवा घेताना 'आपलं म्हणणं थोडक्यात सांगा' अशा पाटीकडे सतत लक्ष हवं. ते नाही जमलं तर खऱ्या महत्त्वाच्या मुद्द्यापर्यंत पोहोचण्याआधीच समोरच्याचा आपल्या बोलण्यामधला रस संपलेला असण्याची खूप शक्यता आहे. थोडक्यात सांगितल्यावर सविस्तर सांगण्याची वेळ नंतर केव्हातरी येते तेव्हा जरूर सविस्तर सांगावं. त्याचीही तयारी आवश्यकच असते. समोरचा माणूस आपल्याच क्षेत्रातला असला तर त्याला कसं आणि काय सांगायचं यासाठी 3 मिनिटांच्या या सरावाचा फायदा होतो.

शेवटी कुठच्याही प्रकारचं ज्ञान असो, दुसऱ्याला त्याच्यामधे रस निर्माण करावा लागतो. निराळ्या भाषेत सांगायचं तर खूप ज्ञान असलं तरी ते विकावं लागतंच. ते विकण्याच्या कलेसाठी हा 3 मिनिटांचा सराव अतिशय फायद्याचा ठरतो. सामाजिक वर्तुळात आपल्यासमोर अनेक वर्गातली, अनेक वयाची, निरनिराळ्या क्षमतांची माणसं भेटतात. तुम्ही काय करता, मी काय करतो वगैरे बोलणं चालतं. आपण काय करतो हे कळण्यात समोरच्याला बेताचाच रस असतो.

कुठच्याही संवादाची 3 मर्मं लक्षात ठेवून बोललं तरच ते उपयोगी ठरतं. 1) थोडक्यात 2) स्पष्ट 3) गोड. आपण काय करतो हे अर्धा तास सांगणं सोपं, पण 3 मिनिटांत सांगणं जास्त कठीण असतं. मी स्वतःच्या कामाबद्दल प्रथम सांगतो म्हणजे या सगळ्याची पद्धत आणि अर्थ समजायला मदत होईल. अडीच मिनिटांचा गजर दर वेळेला वाजवण्याची सोय करूया म्हणजे आवरतं घेण्याची सूचना आधी प्रत्येकाला मिळेल. मला देखील ती उपयोगी पडेल.

मी स्वतः 3 गोष्टी करतो. समुपदेशन, बांधकाम व्यवस्थापन मार्गदर्शन आणि इंग्लिश संभाषण वर्ग. त्यापैकी वैवाहिक समुपदेशन जीवनसाथमधल्या सगळ्यांना माहीत आहे. त्यामुळे बांधकाम व्यवस्थापन हा विषय आज मी निवडलेला आहे.

फिलाडेल्फिया यू.एस.ए. इथे मी 1969 साली बांधकाम व्यवस्थापनशास्त्र शिकलो. ते मी अजूनही शिकवतो. कन्स्ट्रक्शन स्टाफ मोटिव्हेटर असं काम मी करतो.

त्या काळात देखील अमेरिकेत आर.सी.सी. एवढं वापरत नव्हते, पण पद्धत म्हणून आम्हाला शिकवलं. दुसरा प्रकार लोखंडी इमारती. परदेशात सर्व उंच इमारती लोखंडी असतात. फायर प्रूफिंगसाठी त्यावर कोटिंग चढवावं लागतं.

तिसरा प्रकार लाकडी घरं. शहराचा मुख्य मध्यवर्ती भाग सोडला तर परदेशातल्या बाकीच्या निवासी इमारती लाकडाच्याच असतात.

भारतात लोखंडी इमारतींची मी फार कमी कामं केली. जरा जास्त लाकडी वाडे दुरुस्त्या केल्या. आणि जास्तीत जास्त प्रमाणात आर.सी.सी. इमारती बांधल्या. चांगल्या दर्जाची आणि जलद इमारत कशी बांधायची, याचं इंजिनियरिंग शास्त्र मला माहीत होतं. स्लॅब करण्यासाठी 21 दिवस लागतात हे खरं आहे, पण तंत्र माहीत असेल तर स्लॅब जरुरीप्रमाणे 8 दिवसांत, 4 दिवसांत, 2 दिवसांत, 1 दिवसात पण होते. या जादूसारख्या वाटणाऱ्या शास्त्राचं व्यवस्थापन म्हणजे लेबर सायकॉलॉजी मी शिकलो. बॉस माणसाशी वागण्याची तंत्रं निराळी, सुपरवायझरशी वागण्याची निराळी आणि लेबरशी वागण्याची निराळी. या सर्व गोष्टींचा एकत्र वापर म्हणजे बांधकाम व्यवस्थापनशास्त्र.

एवढं सांगताना बरोब्बर 3 मिनिटं झाली. मग एक एक करून प्रत्येकानी आपलं काम समजावून सांगितलं. 25-30 लोकांपैकी फारच कमी लोकांना 3 मिनिटांत ते जमलं. काहींचं 3 मिनिटं संपून गेली तरी संपेचना. काहींना 1 मिनिटदेखील फार वाटायला लागलं.

●●●

3

परदेश

माझ्या वयाच्या 15 ते 23 वर्षांपर्यंत म्हणजे 8 वर्षं मी मुंबईत होतो. 5 वर्षं कॉलेजमधे असताना आणि नंतरच्या नोकरीच्या काळात मी इतर मित्रमंडळींच्या मानानी निराळा होतो एवढं मला कळत होतं. मी उंच, मजबूत, हिरव्या डोळ्यांचा हे झालं बाह्यरूपाचं वर्णन. त्याखेरीज मी अतिशय अभ्यासू, मेहनती, तत्त्वनिष्ठ आणि आग्रही होतो. ज्या शब्दांत या गोष्टी मी आत्ता वर्णन करतोय त्या शब्दांत तेव्हा करू शकलो नसतो. बरोबरीच्या मित्रांनाही बेताचंच समजत होतं बहुतेक. तत्त्वनिष्ठ, कर्मकांडविरोधी, नास्तिक आणि आग्रही या सगळ्याला तेव्हासुद्धा एक साधा शब्द होता. 'विक्षिप्त'. मित्रमंडळींना एक गोष्ट कळायची की हे दुर्गुण नाहीयत. उलट कौतुकास्पद गुण आहेत. पण असं कौतुकही शब्दांत करण्याची तेव्हा पद्धत नव्हती.

एक गोष्ट मात्र मित्र मधूनमधून म्हणायचे. ती म्हणजे 'तू आपला फॉरेनला जा. तिथे तुझं बरोबर जमेल.' त्याचा अर्थ मला तेव्हा अजिबात कळला नव्हता तो प्रत्यक्ष मी 22 व्या वर्षी इंग्लंडला गेलो तेव्हा कळला. खरोखरीच भारत आणि विलायत (नेमकी शब्दाची व्युत्पत्ती मला अजूनही माहीत नाही, पण त्याचा अर्थ गोऱ्या लोकांचा देश) यांत खूप तफावत होती. त्या काळी म्हणजे 47 वर्षांपूर्वी तिथे जाणाऱ्या भारतीयांची संख्या कमी असायची. त्या मानानी आता संख्या खूप आहे. तरीही वातावरणात तफावत आहेच.

'फॉरेन'बद्दल दोन गोष्टी मी अगदी लहानपणापासून ऐकलेल्या होत्या. एक म्हणजे तिथे स्त्री-पुरुष दोघंही दारू पितात, सिगारेट ओढतात आणि मिठ्या मारून शेकडो लोक एकत्र नाच करतात. दुसरी गोष्ट म्हणजे तिथे पोळीऐवजी ब्रेड खातात नि ते लोक मांसाहारी असतात.

या दोन्ही गोष्टींची खरी उत्तरं अशी. भारतात दारू पिऊन रस्त्यावर आडवी पडलेली माणसं जशी दिसतात तशी तिथे वर्षातून एखाद्या वेळेला बघायला मिळतात, ती पण बहुतेक वेळेला काळी हबशी असतात. सगळे गोरे लोक जवळजवळ रोज दारू पितात, पण थोडी पितात. विलायतेच्या संपूर्ण इतिहासात दारुबंदी हा विषय पण कधी कोणाच्या डोक्यात आला नाही. स्त्री-पुरुष दोघंही सिगारेट पितात हे खरं आहे.

ब्रेडबद्दल समजावून सांगतो. तिथे लाटून केलेली चपाती, भाकरी, पुरी अशा प्रकारचा पदार्थच नसतो. जेवणातला मुख्य भाग मांस. गाय किंवा बैलाचं मांस, डुकराचं, बकरीचं किंवा टर्की, कोंबडी असं काहीतरी. काही प्रमाणात मासे. मांस शिजवलेलं असतं, पण मसाला वापरत नाहीत. मीठ आणि मिरपूड स्वतःच्या आवडीनुसार प्रत्येकजण टाकून घेतो. त्याच्याबरोबर सॅलड भरपूर प्रमाणात असतं. भाज्यांचे प्रकार कमी असतात. त्यांचे तुकडे कच्चे किंवा उकडून खातात. या सगळ्याबरोबर ब्रेडचा एखादा तुकडा चवबदल म्हणून फक्त खातात. जेवणाच्या मधे, नंतर पाणी पिण्याची पद्धतच नसते. काही लोक थोडी वाइन किंवा बिअर पितात. भारतात जसं ग्लासभर गरम दूध पिणारी अनेक माणसं असतात तशी तिथे अगदी थोडी लोकं थंड किंवा कच्चं दूध पितात. खाण्या-पिण्याबद्दल आणखी खूप सांगता येईल पण ते नंतर संदर्भाप्रमाणे सांगीन.

परदेश या विषयाबद्दलचे आमचे विचार प्रथम स्पष्ट करतो. भारतातल्या राजकीय, सामाजिक, आर्थिक परिस्थितीला कंटाळून परदेशात जाण्याचा मोह आम्ही समजू शकतो. आम्ही दोघं, मी आणि शोभा यू.एस.ए. ग्रीन कार्ड होल्डर्स होतो. तिथे आम्ही कायम राहू शकलो असतो. तिथे आर्थिक सुबत्ता होती.

तीन मुख्य कारणांमुळे आम्ही भारतात परतण्याचा निर्णय घेतला. सर्वांत महत्त्वाचं कारण म्हणजे आमच्या काळात म्हणजे 35-40 वर्षांपूर्वी तिथे मी स्वतःचा व्यवसाय करण्याची काही शक्यता नव्हती आणि मला मात्र स्वतःचा व्यवसायच करायचा होता. दुसरं कारण शोभाच्या आवडीच्या विषयात तिला तिथे करिअर करणं अशक्य वाटत होतं आणि तिसरी गोष्ट म्हणजे डिस्क्रिमिनेशन. काही झालं तरी तो गोऱ्यांचा (कॉकेशियन) देश होता. तिथे काळे लोक असले तरी त्यांना सामाजिक स्थान नव्हतं. सन्मानानी जगता येत नव्हतं. वर्णभेदाच्या इतिहासात आता आपण शिरायला नको. काही झालं तरी 'सावळे' म्हणजे दुय्यम नागरिक म्हणून केवळ सुबत्तेसाठी तिथे राहणं आम्हाला अशक्य वाटत होतं.

याविषयी आपण स्वतंत्रपणी बोलणार असल्यामुळे आता यावर आणखी सांगत नाही.

मी आणि शोभानी ठरवलं होतं की पुरेशी रक्कम बँकेत साठवून मग भारतात कायम वास्तव्यासाठी परत यायचं. किती पैसे म्हणजे पुरेसे हे ठरवणं हीच अडचण होती. तिथल्या मित्रांना विचारलं की म्हणायचे, 'कशाला भारतात परत जाता? इथे छान आहे की!' भारतातल्या मित्रांना, आई-वडलांना विचारलं तर म्हणायचे, 'या दरिद्री देशात कशाला येता?' आई-वडलांना मला भेटावंसं वाटायचं पण त्यासाठी फार तर मधेमधे चक्कर मारावी, असं त्यांना वाटायचं. माझे वडील पक्के नोकरी एके नोकरीवाले असल्यामुळे स्वतःच्या व्यवसायासाठी परत भारतात येण्याच्या कल्पनेलाच त्यांचा विरोध होता.

थोडक्यात, काहीतरी अंदाजानी निर्णय घेण्यावाचून आमच्यासमोर दुसरा मार्ग नव्हता. आणखी एखादं वर्ष थांबलं तर आणखी पैसे साठले असते हे गणित आम्हालाही समजत होतं, त्याचबरोबर भारतात पोचल्यावर मूल हवं असाही विचार असल्यामुळे लवकर यावं असंही वाटत होतं. मधे आम्हाला बराच मोठा युरोप-अमेरिका खंडाचा प्रवास करायचा होता आणि तेव्हा मूल नको होतं. मित्र सांगत होते की, एका तरी मुलाचा जन्म अमेरिकेत होऊ दे म्हणजे मुलाला कायद्याप्रमाणे अमेरिकन नागरिकत्व मिळतं. पुढे गरज वाटली तर मुलाचे पालक म्हणून पुन्हा अमेरिकेत येता येतं. मला आणि शोभाला या गोष्टीचं अजिबात महत्त्व वाटत नव्हतं. शेवटी काहीतरी अंदाज करून आम्ही भारतात यायला निघालो.

ठरल्याप्रमाणे आम्ही भरपूर प्रवास केला. त्यात एक गोष्ट फार जाणवली ती सांगतो. महायुद्धांनंतर यूनोची स्थापना झाली आणि जागतिक शांततेसाठी प्रयत्न चालू झाले. अनेक तत्त्वचिंतकांनी निराळ्या भाषेत विश्वबंधुत्वाची कल्पना आधीच मांडली होती. यूनोमधल्या काही देशांमधल्या एका गटानी सबंध जगभर वापरण्याची एक भाषा असावी यासाठी प्रयत्न केले. अनेकांना हे माहिती नसतं, पण 'एस्पेरांटो' नावाची एक जागतिक भाषा अस्तित्वात आहे. त्याची लिपी इंग्रजीसारखी आहे आणि भाषेमधे इंग्लिश, स्पॅनिश, लॅटिन, जर्मन, फ्रेंच, हिंदी, अरेबियन अशा अनेक भाषांमधले शब्द आहेत. ती भाषा कुठचाही एक देश वापरत नाही.

आम्ही एवढ्या निरनिराळ्या देशांत हिंडताना वाटलं की जागतिक भाषेप्रमाणेच हिंडणाऱ्या माणसांसाठी जागतिक चलनाची गरज आहे. त्यावरही काम झालं होतं पण ते यशस्वी झालं नाही. त्यानंतर अनेक वर्षांनी युरोपात मात्र अनेक देशांचं

मिळून एक चलन 'यूरो' अस्तित्वात आलं आणि त्यानी व्यवस्थित जम बसवला. या जागतिक चलनाच्या कल्पनेनी कोणाचं काहीच नुकसान न होता प्रवास करणाऱ्या लोकांची सोय होईल.

इंग्लंडमधे मी नोकरी करायचो तिथे आणि यू.एस.ए.मधे शोभाच्या आणि माझ्या ऑफिसमधे काम करताना एक गंमत रोज चालायची, ती सांगतो. आमच्या काळात तिकडे इलेक्ट्रिक कॅलक्युलेटर्स असायचे. सध्यासारखे खिशात मावणारे इलेक्ट्रॉनिक कॅलक्युलेटर्स सर्रास वापरात नव्हते. ते आकारानी मोठे असायचे पण प्रत्येक ऑफिसमधे हमखास असायचे. कॉम्प्युटर्स मात्र अजिबात नव्हतेच. तेव्हा कॉम्प्युटरचा शोधच लागलेला नव्हता. यासंबंधीचा एक गमतीचा पण अर्थपूर्ण विचार सांगतो. संपूर्ण मानवाच्या इतिहासाचे दोनच भाग मानले जायला हवेत. कॉम्प्युटरच्या शोधापूर्वी आणि शोधानंतर. नीट विचार केला की लक्षात येतं, यात फार तथ्य आहे.

तर मी तुम्हाला कॅलक्युलेटर्सची गंमत सांगत होतो, इंग्लंड-अमेरिकेत सगळीजणं कॅलक्युलेटरवर आकडेमोड करायची आणि हातानी लिखाण करायच्या ऐवजी टाइपरायटर वापरायची. आमच्या काळी आमच्या पिढीतल्या प्रत्येकाचे दोन ते तीस पर्यंत पाढे पाठ असायचे आणि त्याखेरीज सव्वाकी, औटकी, निमकीही पाठ असायची. ऑफिसमधे आकडेमोडीचा प्रसंग रोजच यायचा आणि आमच्या पाढ्यांची लोकांना जादूगिरीच वाटायची. साधा नव्वा आठे बहात्तर हा गुणाकारसुद्धा अमेरिकन माणसांना कॅलक्युलेटरशिवाय करता येत नव्हता. टायपिंगच्या सवयीमुळे त्यांचं हस्ताक्षर अतिशय वाईट असायचं. माझं इंग्लिश हस्ताक्षर ही पण त्यांच्या दृष्टीनी अजबच गोष्ट होती. मराठी अर्थातच त्यांना कळायचं नाही.

संपूर्ण विलायतेत आणखी एक गोष्ट भारतापेक्षा खूप खास आहे ती म्हणजे स्वावलंबन. स्वावलंबनापाठोपाठ आत्मसन्मान येतोच. आपल्याकडे जसा प्रत्येक ऑफिसमधे सांगकाम्या शिपाई असतो तशी तिथे पद्धतच नाही. ऑफिसमधे ठरावीक ठिकाणी पाणी, चहाचं सामान, कॉफी, गरम पाणी वगैरे ठेवलेलं असतं आणि ऑफिसमधला सगळ्यात मोठा साहेबही तिथे जाऊन स्वतः कॉफी करून घेतो. कोणी कोणाला खाजगी कामं सांगत नाही. दुसऱ्याला गृहीत धरत नाही. स्वतःकडची सिगारेट संपल्यामुळे दुसऱ्याकडून सिगरेट घेतली तर त्याचे पैसे खिशातून काढून लगेच समोर ठेवतात. 'अमेरिकनायझेशन'मधल्या काही गोष्टी

आम्हाला आवडत नाहीत, पण ज्या गोष्टी पसंत पडलेल्या आहेत, भारतीयांनी शिकण्याजोग्या आहेत त्या म्हणजे स्वावलंबन आणि आत्मसन्मान.

विलायतेमधे आपल्यासारखा कापूस फार कमी प्रमाणात होतो. सुती कपडे असतात पण खूप महाग असतात. कापूस पिंजून त्याची गादी-उशी बनवणं ही गोष्ट तर तिथे माहितीच नाही. खरं म्हणजे शोभाला आणि मला कापसाचीच गादी आणि उशी आवडते पण जिथे जी गोष्ट बनत नाही, मिळत नाही ती डोक्यातून काढून टाकणं योग्य होतं.

आमच्या कुटुंबाविषयी या संदर्भातली माहिती देणं जरूर आहे. मुलगा ऱ्होड्स् स्कॉलरशिपवर पीएच.डी. करण्यासाठी इंग्लंडमधे ऑक्स्फर्डला गेला. तो पीएच.डी. झाला, तिथेच नोकरी करायला लागला नि तिथेच शिकणाऱ्या ग्रीक मुलीच्या प्रेमात पडून तिथेच राह्यला. पुढे 'ब्रिटिश सिटिझन' झाला. तो कायम वास्तव्यासाठी भारतात येणं जवळजवळ अशक्य वाटतं. मुलीचं लग्न यू.एस.ए.मधे राहाणाऱ्या मूळच्या मुंबईच्या मराठी कुटुंबातल्या मुलाशी 'विवाह अभ्यास मंडळा'च्या माध्यमातून ठरलं आणि ती यू.एस.ए.ला गेली. बरीच वर्षं तिकडे राहून भारतात परतायचा निर्णय पक्का करून पुढे ती दोघं त्यांच्या मुलांसकट पुण्यात स्थायिक झाली.

शोभाचा मोठा भाऊ, आमचे त्या वेळचे आमच्याबरोबर असणारे अनेक मित्र तिथेच राहिले. आणखी काही वर्षं राहू म्हणता म्हणता तिथे त्यांना मुलं झाली, तिथेच जन्मली, वाढली, शिकली नि पुढे त्यांना भारतात येऊन कायमचं स्थायिक होणं अशक्य झालं. अशी आमची इंग्लंड, यू.एस.ए., कॅनडा, ऑस्ट्रेलिया, न्युझीलंड इकडेतिकडे बरीच मित्रमंडळी आहेत. पुढे दुबई, अबुधाबी अलआइनमधे आम्ही असल्यामुळे तिकडेही मित्र आहेत.

या विलायती प्रगत देशांमधे काम करण्यामुळे एक महत्त्वाचा संस्कार माणसावर होतो. तो म्हणजे काही न करता नुसतं बसून कामाच्या ठिकाणी दिवस काढायचा नाही. तिथलं महत्त्वाचं तत्त्व आहे, 'प्रोड्यूस ऑर पेरिश'. म्हणजे 'काम दाखवा किंवा निघून जा.'

या सगळ्यापुढे आमचं मत पक्कं झालं ते सांगतो. परदेशी काही काळ राहण्याचा अनुभव चांगला आहे, जरूर जावं. पण काही वर्षांसाठी. मग भारतातच येऊन कामधंदा, सामाजिक काम करावं. इथल्या असेल त्या 'परिस्थितीला' सामोरं जाऊन व्यवसाय करण्यातच शौर्य आहे. आता त्यापुढे मात्र गेल्या चाळीस

वर्षांतली भारताची ‘परिस्थिती’ बघून आमच्या पुढच्या पिढ्यांना हा सल्ला आम्ही छातीठोकपणी देऊ शकत नाही.

एक मुद्दा इथे मांडतो. परदेशी जाण्याबद्दल, जायला, राहायला मिळण्याबद्दल पूर्वी खूप आकर्षण असायचं, तेवढं आता राहिलेलं नाही. अनेक मुली परदेशातला नवरा नको असं ठरवतात. लग्नानंतर परदेशात काही वर्षं राहायचं तर, जास्त वर्षं परदेशात राहायचा प्रसंग आला तर, नवरा-बायकोनी, सबंध कुटुंबानी त्यातल्या सर्व बाबींचा विचार करून निर्णय घ्यायला हवा. थोडक्यात कशाची काय किंमत मोजावी लागेल याची पूर्ण माहिती घ्यावी. अभ्यास मंडळात येणाऱ्या तरुण मुलामुलींच्यात परदेश याविषयी समतोल विचार क्वचित दिसतो. काहींना परदेश या कल्पनेचं वेड असतं, तर काही अजिबात परदेशात जायला तयार नसतात. याविषयीची समज वाढावी म्हणून सविस्तर चर्चा चालते.

मलेशिया, थायलंड, मॉरिशस, फिजी वगैरे देशांत मुळात पैसे फार मिळत नाहीत. लोक या देशांचा स्टेपिंग स्टोन म्हणून उपयोग करतात. काही भारतीय तिथे अनेक पिढ्यांपासून राहत आहेत. आणखी एक प्रकार आहे तो म्हणजे येऊन जाऊन काम करणाऱ्यांचा. तो संख्येनी फार कमी. शिवाय त्यात दगदग फार. कौटुंबिक आयुष्यावर त्याचा खूप परिणाम होतो. आम्ही दोघं इंग्लंड, अमेरिका, गल्फ या ठिकाणी बरीच वर्षं कामासाठी राहिलेलो होतो त्यामुळे आणखी एक गोष्ट आम्ही खात्रीशीरपणे सांगू शकतो. ह्या जगावर गोऱ्या कातडीच्या लोकांचं राज्य आहे हे सतत जाणवतं. भारतीयांना जगात दुय्यमच स्थान आहे.

या सगळ्याचा सारांश नक्की आहे. परदेशात स्थायिक म्हणजे पैशांसाठी. एरवी खरोखर राहाण्याजोगा देश कुठचा याचं उत्तर कायम मायभूमी असंच आहे. आपला देश म्हणजे स्वस्थता असण्याची शक्यता एवढाच याचा मर्यादित अर्थ आहे. एरवी सर्व सुखं आहेत असा देशच नाही. लोकशाही राष्ट्रांच्यात निराळे प्रश्न, तर हुकुमशाही देशांच्यात निराळे प्रश्न आहेत. कम्युनिझमची आणखी निराळी तऱ्हा. या तीनखेरीज देश चालवण्याचा चौथा पर्याय अजून मानवजातीला सापडलेला नाही आणि सध्याच्या तीनही पद्धतींत भयानक अडचणी आहेत. परदेशात सगळं सुख हे खरं नाही, हे कळावं म्हणून हे मुद्दामून सांगतो आहोत. निवड तुम्हीच करायचीय. विलायतेत भारतापेक्षा कामाची शिस्त, पद्धतशीरपणा मात्र जास्त आहे.

बांधकामातल्या, इंजिनिअरिंगमधल्या अफलातून गोष्टी तिथे बघायला मिळतात हे खरं आहे. लंडनमधल्या प्रसिद्ध विंबल्डन स्टेडियमवर सरकतं छप्पर आहे. पाऊस येणार असं कळलं की ते बंद करतात. इंग्लंडमधे आणि ऑस्ट्रेलियात क्रिकेट हा खेळ खूप लोकप्रिय आहे. भारतातही आहे हे मला मान्य आहे, पण भारतातल्या इंजिनिअरिंगमधे अजून तेवढी प्रगती झालेली नाही. इंग्लंड, ऑस्ट्रेलियाची गोष्ट निराळी. पुढच्या दशकात तिथे 'इनडोअर क्रिकेट स्टेडिअम' झालं तरी मला आश्चर्य वाटणार नाही.

सरकारी पातळीवरही ती शिस्त, कार्यक्षमता दिसते. इंग्लंड देश छोटा आहे, यू.एस.ए. फार मोठा आहे. पण दोन्हीकडची टपालसेवा उत्कृष्ट आहे. फार झटपट आणि खात्रीशीरपणे पत्रं इकडची तिकडे पोचतात. इंग्लंडमधे तर मला आठवतंय, तोंडी बोलून काही ठरलं की संबंधित माणसं ठरलेल्या गोष्टी पत्रात लिहून 'कन्फर्मेशन'साठी टपालानी पाठवतात. त्या लगेच दुसऱ्या दिवशी पोचतात. मी जिथे नोकरीसाठी मुलाखतीला गेलो होतो तिथे माझी तोंडी नेमणूक झाली. तशा नेमणुकीचं पत्र दुसऱ्या दिवशी सकाळी माझ्याकडे पोचलेलं होतं.

सगळीकडे विलायतेमधे एक गोष्ट प्रकर्षानी जाणवते. रात्र झाली की इथेही रस्त्यावरचे दिवे निदान शहरांच्यात असतात. विलायतेतले दिवे खूप प्रकाशमान असतात. त्या दिव्यांच्या तुलनेत भारतातल्या शहरांतले रस्त्यावरचे दिवे म्हणजे मिणमिणते कंदील भासतात.

एक माहिती म्हणून सांगतो, पाश्चात्त्य लोक चपला वापरत नाहीत. बंद बूटच वापरतात. तिथल्या काही लोकांना एव्हाना भारतीय चपला माहीत झाल्या आहेत. ते त्या गंमत म्हणून वापरतात. विलायतेतले भारतीय लोक मात्र घरात चपला, सपाता वापरताना दिसतात.

विलायती लोकांच्या पोषाखाबद्दलही खूप गमती सांगण्याजोग्या आहेत. बायका स्कर्ट, पिन-अ-फोर, फ्रॉक असं वापरतात आणि पाय उघडे असतात. सुरुवातीला प्रचंड थंडीत रस्त्यावरून आपण जात असताना या बायका पाय उघडे कसे टाकतात हा प्रश्न पडायचा. मग कळलं की, पायाचा सुबक आकार पुरुषांनी बघावा म्हणून ही पद्धत पडली आणि थंडीपासून संरक्षणासाठी 'नायलॉन स्टॉकिंग्ज' असतात. ते पूर्ण पारदर्शक असतात किंवा राखाडी काळसर असेही मिळतात.

शोभा फिलाडेल्फियात पोचल्यावर आमच्या लग्नानंतर काही महिन्यांत

काम करायला रोज बाहेर जायला लागली. हवामानातली थंडी वाढल्यावर स्टॉकिंग्ज घेतले, वापरायला सुरुवात केली. मग तिच्या लक्षात आलं की, जुन्या वळणाच्या बायका परंपरेमुळे स्टॉकिंग्ज वापरतात आणि आधुनिक मुली पँट-टॉप वापरतात. शोभानी मग पँट-टॉप वापरायचं ठरवलं. जास्त थंडीत शोभा स्टॉकिंग्ज आणि त्यावर पँट असं वापरायची. त्यानंतर पुन्हा ऋतु बदलला की स्कर्ट, फ्रॉक यांचा वापर करायची. साधारण वर्ष-दीड वर्षात स्टॉकिंग्जशिवाय उघड्या पायांनी हिंडण्याइतपत धीटपणा आला. मुख्य म्हणजे कोणी कोणाच्या पोषाखाबद्दल, वैयक्तिक आयुष्याबद्दल बोलतच नाही हे लक्षात आल्यामुळे चांगलं वाटलं. विलायत आणि भारत यांतला हा एक मोठा फरक कळला.

पुरुषांच्या पोषाखाबद्दलही रिवाज होते, पण कमी आणि थोडे शिथिल होते. पँटमधे खोचलेला फुल शर्ट, गळ्यात टाय आणि पायात बूट असा रिवाज होता. यावर कुठल्यातरी रंगाचा कोटही लागायचा. मी हळूहळू कोट वापरेनासा झालो. मग टाय वापरेनासा झालो. मग हाफ शर्ट वापरायला सुरुवात केली. त्यानंतर पँटमधे न खोचण्याचा मॅनिला किंवा बुशशर्ट वापरायला लागलो. चामड्याच्या बुटांऐवजी कापडी बूट वापरले. माझं काम उत्तम असल्यामुळे मला यावरून कधीच कोणी काही म्हणालं नाही. मी त्याचा पुरेपूर गैरफायदा घेतला.

पुरुषांच्या बाबतीतली आणखी एक गमतीची गोष्ट सांगतो. भारतातले सगळे सनातन पुरुष एकजात मिशा ठेवायचे. मिशा आणि वडील हयात असण्याचा भारतीय संस्कृतीनी संबंध जोडला होता. शिवाय मिशा म्हणजे मर्दानगी असाही समज दृढ होता. अजूनही अगदी सध्याच्या काळात भारतीय मुलगे, पुरुष यांच्यात मिशा ठेवणाऱ्यांचं प्रमाण खूप आहे. याउलट पाश्चात्त्य पुरुषांच्यात मिशावाले पुरुषच क्वचित दिसतात. दाढी-मिशा स्वतः घरी कापण्याच्या सोयी विलायतेत जास्त आहेत. उत्तम दर्जाचे 'इलेक्ट्रिक रेझर्स' मिळतात. न्हाव्याची दुकानं मात्र अगदी कमी प्रमाणात सापडतात. शब्दकोशात 'बार्बर' शब्द असतो, पण प्रत्यक्ष बार्बर सहज दिसतच नाही.

विलायतेत काही ठिकाणी खूप पाऊस पडतो. अशा ठिकाणी एका विशिष्ट प्रकारची छत्री तिथल्या बाजारात मिळते. ती पारदर्शक मऊ प्लास्टिकची असते. ती खूप गोलाकार, जवळजवळ कंबरेपर्यंत खाली येणारी असते. पावसापासून खूप चांगलं संरक्षण होतं आणि पारदर्शकपणामुळे छत्री बाजूला न करता, न मिटता समोरचं दिसतं. खरं म्हणजे तशी छत्री भारतातल्या पावसाळी भागासाठी

फारच सोयीची होईल. इथे बनवायला हवी कोणीतरी.

मी प्रथम इंग्लंडमधे गेलो ती गोष्ट 47 वर्षं जुनी आहे, पण गंमत वाटेल तुम्हाला. इंग्लंडमधे थोडासा उन्हाळा सोडला तर वर्षभर पाऊस आणि थंडी असते. इथल्यासारखा तिथे घाम यायचा नाही. इथे रोज आंघोळ करणं डोक्यात बसलं होतं. तिथे गरम पाणी करण्यासाठी सारखी नाणी टाकून ते गरम करावं लागायचं. हळूहळू फक्त शनिवारी-रविवारी आंघोळ इथपर्यंत बदल झाला. त्याच्याही पुढे एक पाऊल टाकून शेवटी मी आठवड्यातून फक्त रविवारी आंघोळ करायला लागलो. चौकशी केल्यावर कळलं, ब्रिटिश माणसं नेहमीच आठवड्यातून एकदा आंघोळ करायची. आपल्याकडे जशा शासनातर्फे कुटुंब नियोजनाच्या, पोलिओ डोसच्या जाहिराती असतात तसा तिथे ‘आंघोळ करावी, त्यानी आरोग्याला फायदा होतो,’ असा प्रचार असायचा.

आणखी एका गोष्टीला इंग्लंडमधे सुरुवात झाली. डोक्यावरचे केस गळायला लागले. सगळे मित्र ही तक्रार करायचे. तिथल्या पाण्यात बहुधा खूप क्लोरीन असायचं. किंवा इतर काहीतरी असेल, कारण इथल्या क्लोरीनसारखा खूप वास यायचा नाही.

इंग्लंडमधे जवळजवळ बारा महिने थंडी असल्यामुळे एक खूप मजेशीर युक्ती त्या काळी 47 वर्षांपूर्वी वापरायचे. सबंध घराला हीटिंग असायचं. पण स्वैपाकघराला लागून एक खोली असायची. त्याला हीटिंग नसायचं आणि ती मुख्य इमारतीच्या बाहेर काढलेली असायची. त्या खोलीला लार्ड म्हणायचे. ती नेहमी थंड राहायची. जणू काही रेफ्रिजिरेटर. आता बदललेल्या काळात फ्लॅटस् असले की लार्ड नसतं, रेफ्रिजिरेटर असतो. आमच्या मुलाकडे रो-हाऊस आहे, पण लार्ड नाही, फ्रीज आहे.

इंग्लंडमधे ज्या ऑफिसमधे मी काम करायचो तिथली एक गंमत सांगतो. एका सोमवारी खूप सर्दी झालेली असताना मी ऑफिसला गेलो. भारतात मी कष्टाळू, कामावर प्रचंड निष्ठा असलेला, जबाबदारीनी वागणारा, अतिशय मेहनती म्हणून सगळ्यांना माहिती होतो. मी कधीच काम न टाळणारा, तब्येतीच्या अडचणींच्या सबबी न सांगणारा असा शूर म्हणून मान्यता पावलेला होतो. या माझ्या शौर्याच्या कैफातच मी सर्दीनी जर्जर अवस्थेत ऑफिसमधे पोचलो होतो. माझी अपेक्षा होती की, माझ्या वाट्याला खूप कौतुकाची, स्तुतीची संभाषणं येतील. प्रत्यक्षात चांगल्या सभ्य ब्रिटिश शब्दांत मला सांगण्यात आलं

की, मी सर्दी झालेली असताना कामाला आलो हे शौर्य महत्त्वाचं नाही. माझ्यामुळे इतरांना सर्दीची लागण होईल याची भीती हे जास्त महत्त्वाचं आहे, त्यामुळे मी लवकरात लवकर घरी जावं आणि बरं झाल्याशिवाय येऊ नये. त्या घटनेसरशी मला भारत आणि पाश्चात्त्य देश यांच्यामधला एक महत्त्वाचा फरक कळला. पाश्चात्त्य देशात प्रत्येक माणसाच्या स्वस्थतेला, आरोग्याला महत्त्व आहे. एकूणच माणसाच्या जिवाला किंमत आहे, भारतात माणसाला किंमत नाही.

सारांशात, मला वाटतं की, पाश्चात्त्य जगात काम करून, काही वर्षं नोकरी, व्यवसाय, धंदा काही करण्याचा अनुभव उपयोगाचा आहे. त्याबरोबर पैसे मिळतात ही चांगली गोष्ट आहे. काही वर्षं परदेशात काम करून इथे यावं हा सर्वांत शहाणपणा आहे. परदेशातल्या अनुभवामुळे दृष्टी रुंदावते. क्षितिज विस्तारतं. कूपमंडूक वृत्ती काढून टाकायला मदत होते. हे सगळं केव्हा होतं, तर तिथल्या लोकांशी वागणं, बोलणं, व्यवहार करणं, गप्पा मारणं असे अनुभव घेतले तर. नुसतं कंडक्टेड टूरबरोबर 15-20 दिवस मजा करून पर्यटन स्थळं बघून दृष्टी रुंदावत नाही.

वाईट भाग असा की, भारतात काम करणारे मध्यमवर्गीय, उच्च मध्यमवर्गीय, श्रीमंत फक्त तेवढंच करू शकतात. कंडक्टेड टूर या गोष्टीला त्यांच्याजवळ पर्यायच नसतो. काहींची मुलं परदेशात स्थायिक असतात त्यांना मात्र जरा जास्त अर्थपूर्ण मोठ्या सहली करता येतात. तेही जास्तीतजास्त सहा महिन्याचा काळ. मुलांना सुटी असेल तेव्हा आणि ते हिंडवतील तेवढं. दुसऱ्या देशात स्थायिक व्हायचा अर्थ स्वतःला वेळेवर कळणं जरुरीचं आहे. आपण तिथे अल्पसंख्याकच असणार. सांस्कृतिकदृष्ट्या आपण तिथल्या समाजामधे एकटे पडणार हे उघड आहे.

जगात 165 देश आहेत. त्यांपैकी 35 देशांचा भरपूर प्रवास मी नि शोभानी स्वतःची गाडी चालवत केलेला आहे. साधारण आठ महिने आम्ही या प्रवासासाठी घराबाहेर होतो. जरुरीप्रमाणे गाडीत किंवा आमच्याजवळच्या तंबूत आम्ही राह्यचो. हे सांगण्याचा उद्देश इथे प्रवासवर्णन सुरू करण्याचा नाही, तर गोऱ्या लोकांच्या देशाची, सामाजिक परिस्थितीची आम्हाला चांगली समज यायला उपयोग झाला हे सांगण्यापुरता आहे. देशाटनातून पांडित्य याचं महत्त्व आम्हाला व्यवस्थित समजलं. त्याचा उपयोग अभ्यास मंडळ चालवायला नक्कीच झाला. राहणीमान, सांस्कृतिक वातावरण, स्त्री-पुरुष नात्यासंबंधीच्या भूमिका याविषयी मुद्देसूद माहिती पुढे मी देतोच आहे. एवढ्या देशांची मला

माहिती आहे त्यामुळे त्यांचा उल्लेखांच्यात समावेश आहे. अरब देश, इंग्लंड, यू.एस.ए., कॅनडा, युरोप, स्कँडिनेव्हिया, ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड, जपान, दक्षिण आफ्रिका.

अविवाहित असताना जेव्हा मी इंग्लंडमधे राहत होतो, तेव्हा बराच काळ एका 'ब्रिटिश' कुटुंबामधेच राहून नोकरीला जायचो. शनिवार-रविवारी लंडनच्या मित्रमंडळींकडे जायचो. तिथे माझ्या खूप आधीपासून चालत असलेलं महाराष्ट्र मंडळ होतं. 'इंग्लंडमधे राहत असलेल्या भारतीयांचे प्रश्न' याबद्दल माझे विचार चालू होते, पण महाराष्ट्र मंडळाला अशा विषयात काही रस नव्हता. त्यांचे सगळे कार्यक्रम सण आणि करमणूक या सदरातले होते. पुढे लग्नानंतर यू.एस.ए.मधे मी आणि शोभा फिलाडेल्फियामधे राहायचो. तेव्हा न्यूयॉर्कमधे महाराष्ट्र मंडळ होतं, पण फिलाडेल्फियात नव्हतं. फिलाडेल्फिया महाराष्ट्र मंडळाच्या संस्थापक मित्रमंडळींच्यात आम्ही दोघं होतो. बाकीची परिस्थिती तशीच. पार्ट्या, गाण्या-नाटकांचे कार्यक्रम, गणपती उत्सव, नवरात्र, दिवाळी साजरी करण्यापलीकडे प्रकरण जाईना.

मी तर निरीश्वरवादी, सण-समारंभविरोधी, कर्मकांडविरोधी, निधर्मी असल्यामुळे मला ते कठीण जात होतं. शोभा माझ्याइतकी आग्रही स्वभावाची नसल्यामुळे ती याबद्दलची तिची भूमिका ठरवण्याच्या प्रक्रियेत होती. तिचा मंडळाच्या किंवा माझ्या विचारांना विरोध नव्हता. आम्ही भारतात परत येण्याचा निर्णय घेण्यापैकी एक कारण हेही होतं. गंभीर विषयांवर चर्चा करणाऱ्यांचा गट तिथे जमवण्यात आम्ही अपयशी ठरलो.

विवाहाबद्दल इतर जगात काय चालतं ते आता बघूया. विलायतेत (इंग्लंड, अमेरिका, ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड, कॅनडा, युरोप) आणि यासारखे, जिथे जिथे लोक अनेक वर्षं नोकरी-धंद्यासाठी जातात, त्या सगळ्या गोऱ्या लोकांच्या देशात प्रेमविवाह हा एकच प्रकार असल्यामुळे ज्याची कोणाशी तेवढी सलगी होत नाही, तो किंवा ती अविवाहित राहतात. माझ्या ओळखीचे अनेक गोरे मित्र-मैत्रिणी 'बघून' लग्नाबद्दल आश्चर्य व्यक्त करतात. त्यांना असा प्रश्न पडतो, की एकमेकांची खूप जवळून ओळख असल्याशिवाय लग्न करण्याचा निर्णय घेणं कसं शक्य आहे? गोऱ्या लोकांची तरुण पिढी तर लैंगिक संबंध केल्याशिवाय आणि त्याविषयी समाधानाची खात्री झाल्याशिवाय लग्न अशक्य समजतात.

त्याचबरोबर ज्यांचं कोणाशी सूत जमत नाही आणि अविवाहित राहाण्याची

पाळी येते, अशा गोऱ्या लोकांना भारतात 'बघून' लग्नाची पद्धत असल्याचं खूप कौतुक वाटतं, घरचे लोक चक्क जोडीदार निवडायला मदत करतात म्हणजे त्यांच्या दृष्टिकोनातून फारच झालं! विलायतेत मैत्री असल्याशिवाय लग्न ठरवणं शक्य नाही, याचाच अर्थ, एकाच गावात, एकाच विभागात मुलगा-मुलगी असल्याशिवाय लग्न जमणं अशक्यच. त्यामुळे अनुरूप जोडीदार लांब कुठेतरी असला, तर गाठ कशी पडणार, हा प्रश्न सुटूच शकत नाही.

अनेक गोऱ्या पाश्चात्त्यांशी बोलल्यावरही लग्नगाठ पडावी म्हणून मी जो परिचयोत्तर विवाहाचा तिसरा नवीन मार्ग शोधलाय, त्याचं त्यांना महत्त्व आणि कौतुक वाटतं. अनेक मध्यमवर्गीय मराठी मुलामुलींशी आणि त्यांच्या पालकांशी तर मी आणि शोभा सारखंच बोलत असतो या विषयावर. या दोन्ही पद्धतींचा काहीतरी मध्य शोधलाच पाहिजे हे आमच्या ध्यानात आलं आणि गेली काही वर्षं तो मार्ग शोधण्याची धडपड आम्ही केली. अभ्यास मंडळाच्या सहाय्यानी परिचयोत्तर विवाह जमला तर सर्वात चांगलं.

जगात काय चालतं हे सांगताना आणखी एका गोष्टीचा आवर्जून उल्लेख करायला पाहिजे. परदेशातलं, विशेषतः अमेरिकेतलं स्थळ याबद्दलचं जे प्रचंड आकर्षण मुलामुलींच्या मनात असतं त्याविषयी सविस्तर चर्चा आम्ही करतो. त्यातले फायदे आणि तोटे नीट कळलेले असले की, निर्णय ज्यानी-त्यानी घ्यावा हे सूत्र अगदी पक्कं असतं.

आता आणखी एका निराळ्या गोष्टीबद्दल सांगतो. आपली बरीच महाराष्ट्रीय मंडळी इंग्लंड, अमेरिकेत स्थायिक आहेत. त्यांच्याकडे सुबत्ता आहे, पण त्यांचे कौटुंबिक, भावनिक प्रश्न किचकट आहेत. पूर्वी आणि नुकत्याच तिथे आम्ही कार्यशाळा घेतल्या तेव्हा हे प्रश्न पुन्हा समोर आले. इथलीच पुरुषप्रधान कुटुंबं तिथे गेली आहेत. तिथल्या मुलींना योग्य नवरा शोधणं कठीण होतंय कारण भारतीय मुलांच्या दृष्टीनी त्या जड मोती होतात. गोरी मुलं भारतात वाढलेल्या भारतीय मुलींशी लग्न करतायत् असं क्वचित सापडतं. तिथल्या भारतीय घरांच्यात आपल्याकडचे सगळे कौटुंबिक प्रश्न आहेतच.

त्याशिवाय काही जास्तीचे प्रश्न आहेत. तिथे स्थायिक झालेल्या मुलग्यांचा प्रश्न एवढा गंभीर नाही कारण त्यांना भारतातल्या मुली मिळतात. भारतात चरितार्थ हा आयुष्यातला सर्वांत मोठा प्रश्न असल्यानी अमेरिकेतलं मुलाचं स्थळ म्हणजे हात स्वर्गाला पोचले अशी सर्वसाधारण भावना असते. यात क्वचित

अपवाद असतात ह्याची मला कल्पना आहे.

तिथल्या मुलींच्या जोडीदार शोधण्यातल्या अडचणी मात्र निराळ्याच प्रकारच्या आहेत. तिकडचे भारतीय मुलगे गोऱ्या मुलींच्या मागे हिंडताना त्यांनी बघितलेले असतात त्यामुळे त्यांना नवरे म्हणून ते पसंत नसतात. गोरे मुलगे आपल्या सावळ्या, छोटेखानी भारतीय मुली मैत्रिणी म्हणून मान्य करतात, पण लग्नासाठी नाही. फक्त मजेसाठी. अमेरिकेत जायला मिळेल म्हणून भारतीय मुलगे त्यांच्याशी लग्न करायला तयार असतात, पण त्यांचं एक दिवससुद्धा पटणं कठीण आहे. संस्कृती, भाषा, सवयी, सुबत्तेचं वातावरण, कुटुंबरचना, स्त्री-पुरुष मैत्रीबद्दलच्या कल्पना सगळ्या गोष्टी इतक्या निराळ्या आहेत की ते सहज जुळणं जवळजवळ अशक्यच आहे. पुन्हा हा इथला मुलगा तिथे अल्पसंख्याक असल्यामुळे इतरांच्या साच्यातच त्याला बसावं लागणार नि पुरुषप्रधान मनाला ते सहन होणं फार कठीण आहे. अपवाद म्हणून तशा एखाद्या मुलाशी अशा मुली लग्न करू शकतात पण त्यांचं प्रमाण फार कमी असतं. माझ्या प्रत्यक्ष माहितीत तर एकच असं उदाहरण आहे. काळ्यांशी लग्नाला आपल्या मुली आणि त्यांचे आईवडील तयार नसतात. थोडक्यात मुलींना 'सूटेबल बॉय' मिळतच नाही.

परदेशातच जन्मलेल्या आणि वाढलेल्या भारतीय मुलांना आयुष्यात फार मोठ्या झगड्याला तोंड द्यावं लागतं. घरातली आणि उंबऱ्याबाहेरची संस्कृती यात फार तफावत असते. अनेक तरुण भारतीय मुलं सांगतात की, त्यांना अधांतरी तरंगल्याची भावना असते. सुबत्ता असते, पण सांस्कृतिक अस्वस्थता जाणवते.

तात्पुरते असो, काही वर्षांसाठी असो नाहीतर कायम वास्तव्यासाठी असो, जिथे आपण जाऊ तिथल्या निराळ्या संस्कृतीशी जुळवून घेतच आपल्याला कामं करावी लागतात. माझ्याबरोबर जे लोक परदेशात 47 वर्षांपूर्वी गेले त्यांची आपापल्या कुटुंबांची बेटं होती. एका गावात जवळपास राहाणाऱ्यांचा कंपू तयार व्हायचा. शनिवार-रविवार सुटी असायची. या लेखात आधी उल्लेख केल्याप्रमाणे सण, उत्सव, करमणुकीचे कार्यक्रम मधूनमधून असायचे. त्याव्यतिरिक्त शनिवार-रविवारी दोन कुटुंबांबरोबर सहली किंवा एकमेकांकडे जेवायला जाणं असा कार्यक्रम असायचा.

अमेरिकन लोकं आसपास अगदी शेजारच्या फ्लॅटमधे राहात असली तर पॅसेजमधे गाठ पडेल तेवढीच. एकमेकांकडे जाणं-येणं नसायचं. भागवतांनी

कानिटकरांकडे जायचं, पुढच्या वेळेला देशपांडेंकडे, मग सगळ्यांनी मिळून भागवतांकडे अशी ही सांस्कृतिक बेटं होती. समाजात मिसळण्याचा प्रश्नच नव्हता. तिथे जेव्हा मुलांचे जन्म झाले तेव्हा सगळं बदललं. पाश्चात्य संस्कृतीशी खरा परिचय व्हायला लागला. अमेरिकन, इटालियन, चायनीज, गोरे, काळे सगळे लोक हळूहळू मुलांमुळे मिसळायला लागले. खरा प्रश्न आला तो मुलांच्या लग्नाच्या वयात. भारतीयच काय कोणाशीही प्रेमसंबंध, लैंगिक संबंध आणि कदाचित लग्न ही शक्यता निर्माण झाली.

हे झालं पाश्चात्त्य संस्कृतीचं सर्वसाधारण वर्णन. पण देशा-देशातली परिस्थिती निराळी, हवामान निराळं, सरकारी धोरणं निराळी. जेवढी माहिती मला आहे तेवढी त्रोटकपणे इथे द्यायचा प्रयत्न करतो. संस्कार हा प्रश्न निघाला की धर्माचा संबंध येतो. अनेक धर्मांचा एकत्रित तौलनिक अभ्यास माझा नाही. त्यात मूळ वंशाचाही संबंध येतो.

मुळात मानवाचे तीनच मूळ वंश जगाला माहीत आहेत. कॉकेशियन म्हणजे गोरे, मंगोलियन म्हणजे पिवळे चपट्या चेहऱ्याचे आणि नीग्रॉइड म्हणजे हबशी किंवा काळे. भारत देश या तीनही वंशांच्या मिश्रणांनी भरलेला आहे. मानववंशशास्त्राचे अनेक अभ्यासक अनेक शक्यता सांगतात, पण नेमकं काही सिद्ध करणं कठीण आहे. प्रत्येक खंडावरचे जे आदिवासी होते, उदा. अमेरिकन रेड इंडियन्स, ऑस्ट्रेलियातले अबोरिजिनीज्, भारतातले जंगलात राहाणारे आदिवासी, पॅसिफिक महासागरातल्या बेटावरचे आदिवासी, यांच्याबद्दल नेमकं काही सांगणंच कठीण आहे. अशा अनेक निरनिराळ्या लोकांबरोबर शारीरिक संबंध, लग्नं, पुढच्या पिढीतली मिश्र प्रजा हे सगळं सर्व पिढ्यांच्यात अटळ होतं.

इंग्लंडसकट युरोपातले सगळे देश छोट्या क्षेत्रफळाचे आहेत. हवामानवैविध्य खूप आहे. उत्तरेकडे थंडी तर दक्षिण युरोपात तुलनेनी उकाडा असा प्रकार आहे. भाषावैविध्यदेखील खूप. त्यातल्या सगळ्या गोऱ्या कातडीच्या लोकांना अहंगंड आहे. पूर्वी इंग्लंडनी अर्ध्या जगावर राज्य केलं. अजूनही सबंध जग गोरी लोकंच चालवतात, हलवतात. त्यांना सभ्यपणाचे सगळे बाह्य उपचार अवगत आहेत आणि मनात अहंकारही आहे. इतर जगाविषयी बेपर्वाई आहे. तिथे लोकसंख्येचा प्रश्न नाही त्यामुळे भारताच्या तुलनेत सुबत्ता आहे. व्यक्तिस्वातंत्र्य आहे.

विलायतेत स्त्री-पुरुष समानतेचं प्रमाण, स्त्री-दाक्षिण्याचं प्रमाण भारतापेक्षा जास्त आहे. सामाजिक शिस्तीचं प्रमाण भारतापेक्षा बरंच जास्त असतं. रहदारीचे

नियम पाळणं, रस्ते, स्वच्छता, दुकानं, पोलीस यंत्रणा इथल्यापेक्षा बरीच सरस असते. भारतीयांच्या दृष्टिकेनातून गोऱ्या लोकांच्या देशात काही धोके संभवतात. आपल्या भारतीय लोकांना तिथल्या समाजात दुय्यम स्थान असतं. भारतीय मुलांच्या मनातल्या गोऱ्या मुलींविषयीच्या आकर्षणामुळे बाह्य सौंदर्याला भुलण्याचा धोका असतो. लग्नाआधी डेटिंग आणि शारीरिक संबंध ठेवण्याच्या पद्धतीमुळे मुलगे सापळ्यात अडकू शकतात. सांस्कृतिकदृष्ट्या पाश्चात्त्यांमधे समावेश होऊ शकत नाही आणि भारतापासूनही तुटलेले अशा अवस्थेतले अधांतरी भारतीय लोक असंख्य असतात.

मराठी, हिंदी सिनेमामधे दिसणारी समारंभाची दृश्यं म्हणजेच त्यांच्या दृष्टीनी भारतीय संस्कृती असते. भारतीय लोक स्कँडिनेव्हियात जाऊ शकतात, पण कायम वास्तव्यासाठी नाही. जपानमधे, आफ्रिकेत, ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंडमधे जाऊ शकतात. फिजी आयलंडवरही भारतीय वंशाचे खूप लोक आहेत. सिंगापूर, मलेशिया, थायलंड, इंडोनेशियातही आहेत. पण तिथे अमेरिकेच्या तुलनेत पैसे कमी मिळतात, त्याशिवाय भाषेचेही प्रश्न असतात. तिथली भाषा शिकली नाही तर लोकांच्यात मिसळता येत नाही कारण त्यांच्या इंग्लिशच्या ज्ञानाची बोंबच असते.

अरबी-आखाती देश हे या सगळ्यांपेक्षा निराळंच प्रकरण आहे. मी स्वतः तिथे प्रोजेक्ट मॅनेजर म्हणून काही वर्षं काढल्यामुळे मला तिथली बारकाव्यानी माहिती आहे. एक तर भारतापासून जवळ, अडीच तासांच्या अंतरावर आणि बऱ्यापैकी पैसे कमावण्याची संधी असते. सांस्कृतिकदृष्ट्या हे देश सरळसरळ वाईट आहेत. स्त्री-पुरुष समानता जवळजवळ शून्य. अधिकृतरीत्या मुस्लिम राष्ट्र म्हणून जाहीर केलेलं. अरेबियन लोक मूळचे जहाजं लुटणारे चाचे होते. अर्थातच ती लुटारू संस्कृती त्यांच्यात भिनलेली असते. प्रत्येक गोष्टीला अपवाद असतात तसे त्यांच्यापैकीही काही सज्जन लोक असतातच.

आखाती देशातलं हवामान भयानक असतं. प्रचंड उकाडा आणि आर्द्रता. तिथल्या वाळूच्या जमिनीत गोडं पाणी नाही, पाऊस पडत नाही, त्यामुळे शेती, भाजीपाला जवळजवळ नाहीच. तेलामुळे आखाती देशांपैकी काही देश अकस्मात खूप श्रीमंत बनले. तिथले मूळचे अरब नीग्रो वंशाचे होते. गोऱ्या लोकांनी त्यांच्यावर आक्रमण करून त्यांना दबावाखाली आणलं नि स्वतः अरब राजे म्हणजे शेख बनले. ते लोक शेकडो वर्षांपूर्वी तुर्कस्तान, अफगाणिस्तान, इराक इकडून दक्षिणेकडे घुसले असं मानतात.

आखाती देशांपैकी दुबई हे राज्य सर्वांत प्रसिद्ध, भारतीय लोकांची खूप लोकसंख्या असलेलं आहे. मुस्लिम राष्ट्र असलं तरी एवढं कडवं नाही. सौदी अरेबिया जास्त कडवं, कट्टर मुस्लिम राष्ट्र आहे. सगळ्या आखाती देशांच्यात भारतीयांना सुखसोयी आहेत, पैसे चांगले मिळतात, पण सामाजिक स्थान अगदी खालचं. सामाजिक स्थानाची उतरंड ही अशी असते. एक नंबरवर–तिथले मूळचे गोऱ्या-सावळ्या, काळ्या रंगाचे अरब. जमीन, फ्लॅट याचे मालकी हक्क फक्त त्यांनाच मिळू शकतात. बाकीच्यांना जागा भाड्यानी घ्याव्या लागतात. धंद्याच्या मालकीचं तसंच. धंद्याची मालकी अरब नागरिकाचीच लागते. इतरांना त्यांच्याबरोबर भागीदारी करूनच धंदा करता येतो.

दुसऱ्या क्रमांकावर इंग्रज लोक. तिसऱ्या क्रमांकावर तेल नसलेले इतर अरब देश आहेत तिथले लोक. मुख्य म्हणजे त्यांची भाषा अरबी-फारसीच असते. चौथ्या स्थानावर इतर देश (म्हणजेच बहुतांश भारतीय) यांच्यामधले मुस्लिम लोक. मुख्य म्हणजे त्यांची उर्दू लिपी अरेबियन लिपीसारखीच असते. त्यामुळे त्यांना वाचता येतं आणि शेवटी पाचव्या सामाजिक स्तरावर मुस्लिम नसलेले इतर लोक म्हणजेच भारतीय हिंदू. आखाती देशात काहीच पिकत, बनत नसल्यामुळे जगभराचा माल तिथे विकला जातो. प्राप्तीकर, विक्रीकर अशा प्रकारचे करच नसतात. पैशाचे व्यवहार चेकनी किंवा रोखीत केले याला महत्त्व नाही, पांढरा, काळा पैसा असं काही नसतंच.

परदेश या विषयावर बोलताना एक गोष्ट सांगायची राहिली. विलायतेत गेल्यावर तिथे लगेच नोकरी मिळाली नाही तर शिक्षणाला न शोभणारं काम काही काळ करावं लागतं. इथून तिथला खर्च भागण्याइतके पैसे पाठवणं बहुतेकांना शक्य नसतं. तिथे गेलेल्याला सर्वांत सोपा मार्ग म्हणजे कुठेतरी वेटरचं काम करणं. असं अनेक लोक करतात आणि ती गोष्ट इथल्या कुटुंबाला सांगतच नाहीत. काय काम विचारलं की काहीतरी थाप मारतात. थोड्याच काळात प्रश्न मिटतो आणि शिक्षणाला शोभणारं काम चालू होतं. माझा एक मित्र काही काळ टॅक्सी ड्रायव्हर होता, एक पोस्टमन होता, अनेकजण वेटर होते.

जे लोक पुरेसे शिकलेले नसतात पण परदेशात जाऊन स्थायिक होतात त्यांची परिस्थिती निराळीच असते. इंग्लंड, यू.एस.ए. आणि यू.ए.ई. इथल्या व्हिसा नियमांची मला चांगली माहिती आहे कारण तिकडे मी अनेक वर्षं काढली आहेत. त्या देशाचं त्या त्या काळात जे परराष्ट्रधोरण असेल त्याप्रमाणे कॉन्सुलेटस्‌ना

सूचना मिळतात. ज्या काळात ज्या प्रकारच्या लोकांची देशाला गरज असते तसा व्हीसा देण्याचा कोटा ठरतो. ज्या काळात मी परदेशात होतो त्या काळात अशिक्षित शारीरिक श्रम करणाऱ्यांचीही जरूर असायची. त्यामुळे त्यांना व्हीसा मिळायचा. काही काळ नर्सेसची, काही काळ डॉक्टरांची गरज होती. मला परदेशातलं वर्क परमिट मिळालं कारण तेव्हा बांधकाम क्षेत्रातल्या लोकांची गरज होती.

एवढं सविस्तर सांगण्याचं कारण आहे. इंग्लंडमधे स्थायिक झालेले, पण कष्टकरी वर्गातले लोक पूर्वी खूप असायचे. लग्नासाठी मुलगी शोधायला इथे यायचे. इथल्या लोकांना भारताबाहेर कुठेही माणूस राहात असला तरी तो फॉरेनला असतो एवढंच समजायचं. तेव्हाच काय, अजूनही कित्येकांना जगात एवढे निरनिराळे देश आहेत याची कल्पनाच नसते. जळगाव, जर्मनी हे त्यातल्या 'ज' मुळे शेजारी शेजारी काही अंतरावर असतील इतपतच कल्पना करण्याइतकं त्यांचं ज्ञान असतं. टी.व्ही.मुळे अमेरिका, स्वित्झर्लंड, दुबई अशी काही नावं माहिती झालेली असतात. सांगायचा मुद्दा असा की, तिथे तो मुलगा झाडू मारण्याचं काम करत असला तर आपण 'क्लीनिंग इंजिनिअर' आहोत असं सांगायचा. लग्न होऊन मुलगी तिथे गेली तरी कनिष्ठ मध्यमवर्गीय मुलीला काही फरक पडायचा नाही. सुशिक्षित घरच्या एखाद्या मुलीनी अशा फॉरेनच्या मुलाशी लग्न केलेलं असलं तर तक्रारी, कुरबुरी, फसवल्याचे आरोप व्हायचे, पण घटस्फोट व्हायचे नाहीत. कारण मुलींनाही परदेशात राहाण्याचं आकर्षण असायचं.

आता सध्या चीन, फिलिपाइन्स, कोरिया, श्रीलंका, पाकिस्तान, बांगलादेशवरून लेबर बोलावणं सोपं झाल्यामुळे भारतीय कामगारांना व्हीसा मिळेनासा झाला. शिक्षणाच्या अटी वाढल्या. तरी जे पूर्वी कामगार म्हणून गेले त्यांना त्या देशाचे रहिवासी म्हणून कायम राहाण्यात काही अडचण नाही. त्यांची मुलं शिकली. कधी कधी ही मुलं आपले वडील काय करतात किंवा काय करायचे याबद्दल खोटं बोलतात पण त्यानी एवढं बिघडत नाही. चाळीस वर्षांपूर्वी आणि आता यामधे आणखीन मोठा फरक म्हणजे पूर्वी एखाद्या मुलाविषयी माहिती काढणं शक्य नव्हतं, प्रत्यक्ष जाऊन बघणं शक्य नव्हतं. आता माहिती काढणं निदान शक्य असतं, कारण निरनिराळ्या भागात ओळखीचे काही लोक असतात, इंटरनेट, फोन, ई-मेलमुळे खूप फरक पडतो.

इथे जमलेल्या लोकांना मी असं सुचवतो की, त्यांनी जमेल तेव्हा परदेश या गोष्टीचा अनुभव घ्यावा. व्हीसा मिळणं जिथे तुलनेनी सोपं आहे असे भारताजवळ बरेच देश आहेत. नेपाळ, सीलोन, ब्रह्मदेश, थायलंड, सिंगापूर, दुबई, इस्त्रायल कितीतरी. कंडक्टेड टूर घेण्याऐवजी तिथल्या गरजू कुटुंबात राहण्याचा प्रयत्न करावा.

परदेश हा विषय सुरुवातीला एवढा पुरेसा आहे. अगदी शेवटचं एक सांगतो, आमचा मुलगा शोनील गेली 17 वर्षं इंग्लंडला आहे. त्याचं काम, त्याचं महत्त्व, त्याचा हुद्दा, सन्मान या सगळ्यांचा आम्हाला अभिमान वाटतो. पण प्रत्यक्ष सहवास फार कमी झाला याची खूप हुरहुर वाटते आणि याला काही इलाज आहे असंही वाटत नाही. तो फार दिवस इथे येऊन राहू शकत नाही, आम्ही फार दिवस तिकडे जाऊन राहू शकत नाही.

जीवनसाथ आणि पालक विद्यापीठ या दोन संस्थांशी आमचं लग्न लागलेलं आहे ना!

●●●

4

बचत

1) बचत

बचत या विषयाबद्दल प्रथमच मला कबूल करायला पाहिजे की नियमित बचत जमते आणि जमत नाही हे स्वभावाचे दोन प्रकार आहेत. मी स्वतः अनेक वेळा प्रयत्न केले पण मी मुळात नियमित बचत प्रकारचा माणूस नाही हेच खरं. विचार केला तर हे अगदी निश्चित आहे की रोजच्या मिळकतीतले थोडेसे पैसे बाजूला ठेवणं हे प्रत्येक माणसाला शक्य असतं. तो कितीही छोट्या किंवा मोठ्या रकमेचा प्रश्न असो. मी परदेशात असताना तरुणपणी नोकरी करायचो त्यामुळे नियमित बचत व्हायची, पण भारतात परतल्यावर व्यवसायात सगळं बदललं. आता ही रक्कम सगळीच्या सगळी धंद्यात घालू कारण आता तसं करण्याला इलाजच नाही, बचत वगैरे सगळं बरोबर आहे पण ती पुढच्या महिन्यात करू असं होत गेलं. माझा सबंध कारकिर्दीचा आलेख चढ-उताराचा आहे. भरपूर पैसे मिळवले, भरपूर घालवले. गेल्या काही वर्षांत मी पैसे गुंतवायला लागतील असा धंदा बंद केला आणि फक्त सल्लामसलत, तीही 'वन मॅन कन्सल्टन्सी' चालू केली तेव्हा जरा स्थिर आलेख झाला.

काही दुकानदारांकडे रोज ठराविक वेळेला बँकेचा माणूस येऊन ठराविक रक्कम घेऊन जातो ही पद्धत मला फार आवडते. अशीच पद्धत घराला लागू करणारे फार कमी आहेत. कनिष्ठ मध्यम वर्ग नियमितपणे लॉटरीची तिकिटं घेताना मी बघतो. त्यात मात्र काही अर्थ नाही. 'कौन बनेगा करोडपती' यात भाग

घ्यायला मिळणं हे काहींचं स्वप्न असतं. काही भिशीवर भरवसा ठेवतात. भिशीमधेही जुगार असतो, पण धोका नसतो. शेवटी का होईना स्वतःचा नंबर लागतोच. एकदम एकरकमी पैसे मिळाले की त्याचा उपयोग काय करायचा हे कुटुंबानी ठरवून ठेवलेलं असतं. या सगळ्यातली लॉटरी ही गोष्ट फसवी आहे हे काहींना कळतं, पण कष्टकरी वर्ग त्यातून सुटणं फार कठीण असतं.

आमची पुढची पिढी याबाबतीत आमच्यापेक्षा चांगली आहे. आमच्या जावयाला नियमित बचतीची चांगली समज आहे नि आग्रह आहे, शिस्त आहे. मुलगी या बाबतीत अगदी निराळी आहे, पण ती नवऱ्यावर सगळं सोडून निश्चिंत असते. मुलगा आणि सून हे ब्रिटिश पद्धतीनी बचत करतात. त्यांची सगळी पद्धतच निराळी. घर घ्यायचं, हप्ते भरत राहायचं. इंग्लंडमधे तुमची प्राप्ती चांगली असली की कर्जं मिळतात, पण ती आयुर्विम्याला थेट जोडून टाकतात.

जोडीदार निवडीच्या वेळेपासून संपूर्ण कुटुंबाचे बचतीचे प्रकार, विचारसरणी समजावून घ्यायला पाहिजे असं माझं पक्कं मत झालेलं आहे. अशा गोष्टी कुठच्या टप्प्यात विचारायच्या, सांगायच्या ही खुबी मात्र महत्त्वाची आहे. मिळकत आणि खर्च याच्या प्रमाणाची समज हाही आर्थिक व्यक्तिमत्त्वाचाच प्रकार असतो. काही लोक खूप पैसे मिळाल्यावर खूप खर्च करतात तर काही खूप पैसे मिळवूनही कमी खर्च करण्याइतके संयमी असतात. मिळकत कमी पण खर्च फार त्यामुळे प्रत्येक महिना उधारीवर चालू असेही खूप लोक असतात. प्रत्यक्ष पैसे मिळण्याच्या आधीच यांचे खर्चाचे त्यापेक्षा मोठे आकडे तयार असतात. काहींना चेकही दिलेले असतात आणि 'जरा थांबा, केव्हा चेक भरायचा ते मी कळवतो' प्रकरण अखंड चालू असतं आणि अगदी थोडेच लोक असे असतात की ज्यांची मिळकत कमी, गरजा कमी त्यामुळे खर्चही कमी. लग्नापूर्वी यांपैकी कुठल्या प्रकारात कोण आहे हे कळलं तर फार छान.

किराणा दुकानदार नेहमी सांगतात की, महिन्याच्या 15-20 तारखेपासून दुकानामधली गर्दी कमी होते. शेवटचे 10 दिवस तर विक्री अगदी कमी होते. हेच आपल्या समाजाचं आर्थिक चित्र आहे.

मी अर्थव्यवस्थेचा अभ्यासक नाही. तरीही एक कल्पना मागे सुचली, काही लोकांशी बोललो, मग जनमानस वार्तापत्रात ती लिहिली. ती कल्पना अशी. प्राप्तिकर ही कल्पना पूर्णपणे कटाप करून खरेदीकर लागू करावा.

प्रत्येकाला, गरीब किंवा श्रीमंत, खरेदी करायलाच लागते. जो काही कर सरकारपर्यंत पोचवायचा असेल तो खरेदी करतानाच द्यायला लागला पाहिजे. अत्यावश्यक वस्तूंवर शून्य, अगदी कमीपासून चैनीच्या वस्तूंवर भरपूर प्रमाणात कर अशी रचना सरकारनी छापून जाहीर करावी. सगळं सरकारी नियंत्रण या पद्धतीनी दुकानदारांवर आणि विक्री करणाऱ्यांवर असेल. खरेदी करणाऱ्यांवर नसेल. सरकारला हवे तेवढे पैसे मिळतील, कर दिल्यावाचून कोणाचीही सुटका नसेल.

जेव्हा मी मागे अनेक वर्षांपूर्वी अनेक कर-सल्लागारांशी बोललो तेव्हा त्यांचं म्हणणं पडलं की सरकारला दुकानदारांविषयी खात्री नाही आणि मुख्य म्हणजे स्वतःच्या यंत्रणेवर विश्वास नाही हे धोरण न बदलण्यामागचं मुख्य कारण असावं. जेव्हा असा बदल करायचा ठरेल त्यावेळेला आर्थिक वर्षही बदलून टाकून 1 जानेवारी ते 31 डिसेंबर करावं. सामान्य माणसाचा याच्याशी काही संबंध येणारच नाही. सरकारी तपासनीस यंत्रणा आणि विक्री करणारे या दोघांचंच 'काय ते' चालू असेल. 'काय ते' म्हणजे भ्रष्टाचार का सरळ सरळ नियंत्रण व्यवस्था हाच खरा प्रश्न.

समजा असं कधी घडलंच तर सामान्य, गरीब, कनिष्ठमध्यमवर्गीय, मध्यम मध्यमवर्गीय यांचं रोजचं आयुष्य खूप सुसह्य होऊ शकेल यासाठी विवाह आणि आर्थिक व्यक्तिमत्त्व या विषयात या मुद्द्याचा उल्लेख आलेला आहे. ज्यांना यातलं समजतं त्यांनी या कल्पनेचा अधिक अभ्यास करावा, त्यातल्या अडचणी सांगाव्यात, टीका करावी, मला काही अडचण नाही, माझी भावना म्हणजे फक्त लोकांच्या होणाऱ्या हालाविषयीची कळकळ आहे एवढंच.

गेल्या काही वर्षांत महागाई प्रचंड वाढली तसे जमिनींचेही भाव प्रचंड वाढले. त्याचे अनेक दुष्परिणाम नजरेसमोर येतात. फ्लॅटस् विकत घेणं परवडेनासं झालं हे आपण आधी बोललो. जमिनीचे भाव वाढल्यामुळे मात्र आणखी निराळ्या प्रकारचे घोटाळे झाले. अनेक कवडीमोल जमिनी शहरात स्थायिक झालेल्यांनी 'हक्कसोडपत्रानी' गावातल्या भाऊबंदांना देऊन टाकल्या होत्या. त्यांच्या मनात लोभ निर्माण झाला. मोठ्या एकत्र कुटुंबांच्यात भाऊबंदकी चालू झाली.

स्वतःच्या जमिनी असलेले अनेकजण बिल्डर झाले. अनधिकृत बांधकामांचं

पीक आलं. अनेक खऱ्याखुऱ्या बिल्डर्सनी जमिनीच्या मालकांबरोबर भागीदाऱ्या केल्या. अनेक ठिकाणी शहराबाहेरच्या जमिनी शहरात आल्या. काही झोन बदलले, रेसिडेन्शल झोन राजकारण्यांनी मुद्दामून करून घेतले. परवापर्यंत 'नोकरी बघून द्या' म्हणून मागे लागणारी अर्धशिक्षित तरुण पोरं एकदम श्रीमंत होऊन गाड्या उडवायला लागली. एवढे पैसे कधीच बघितलेले नसल्यामुळे अनेकांची 'बाई-बाटली' वाढली. पार बिघडलेल्या अशा मस्तवाल अर्धशिक्षित तरुणांची फौज उपद्रवी बनली. काही राजकारणात शिरले. शेवटी कौटुंबिक अस्वास्थ्य वाढलं आणि नासाडीच झाली.

पैसे मिळवणं, राखणं, वाढवणं ही एक कला आहे आणि नशिबाचा प्रश्न आहे हे आपण मागे बोललो. पैसे स्वतःसाठी, कुटुंबासाठी, स्वतःच्या म्हातारपणासाठी मिळवायला हवेत इथपर्यंत काही शंका नाही. पण पुढच्या पिढीसाठी म्हणजे मुलांसाठी पैसे मिळवून ठेवणं चांगलं का नाही याबद्दल विचार करताना प्रश्न निर्माण होतात. ज्यांना आयतं धन, राज्य म्हणजेच सत्ता मिळाली त्यांचं काय झालं हे इतिहासात सगळं सापडतं. उद्योजकांचा आढावा घेतला तर जो माणूस प्रथम शून्यातून मोठा उद्योग उभा करतो त्याच्याजवळ कला, हुशारी, मेहनत आणि नशीब, सगळं असल्यामुळेच तो मोठा धंदा उभा करतो. त्या हिमतीला आपण वंदनच करतो आहोत. त्याच उद्योजकाची पुढची पिढी बघितली तर सगळा धंदा आयता मिळालेला असल्यामुळे ते सगळे गुण आढळत नाहीत. आणखी त्यांच्याही पुढच्या पिढीची पाहणी केली तरी तेच.

सारांश असा निघायला लागतो की, स्वतः शून्यातून खूप पैसे मिळवणं याचं कौतुक असलं तरी पुढे काय याबद्दल शंका निर्माण होते. उद्योजकांकडून आता आपण साध्या मध्यमवर्गीय माणसाकडे वळूया. खूप पैसे, इमले बांधून पुढच्या पिढीसाठी ठेवून आपण खरोखर त्यांना मदत करतो आहोत का? शून्यातून संसार उभा केल्याचा जर मला इतका आनंद मिळाला तर तोच आनंद त्यांना मिळायला नको का? हा प्रश्न इथे टांगता सोडून मी आत्ता थांबणार आहे. पुढे 'ज्येष्ठ नागरिकांसाठी' आणि 'म्हातारपण, परावलंबित्व, मृत्यू, इच्छामरण' वगैरे लेखांत त्याविषयी सविस्तर चर्चा आहे.

अभ्यास मंडळात एकदा मोकळेपणानी बोलणाऱ्यांचा ग्रुप जमला की एरवी ज्या गोष्टी लोक एकमेकांना सांगत नाहीत त्याही सांगतात. उदाहरणार्थ, पगार

सांगायला एरवी कोणी तयार नसतं आणि तो विचारायचा नसतो. वय पण सांगायचं नसतं आणि विचारायचं नसतं. हे दोन्ही पाश्चात्त्य संकेत आहेत, पण इथे जमलेल्या गटात या दोन्ही गोष्टी मोकळेपणानी सांगतात. पगार सांगितला की गुंतवणुकींविषयी चर्चा होते. बचत किती हे निघतं. मी मुद्दामून पुढे निवृत्तीच्या कल्पनेविषयी विचारतो. शक्यतोवर ती फार दूरची गोष्ट असल्यामुळे विचार केलेला नाही सांगतात. प्रत्यक्षात निवृत्तीच्या कल्पनांवरून सध्याचं आर्थिक व्यक्तिमत्त्व कळतं. मग त्याचं खेळात रूपांतर केलं की ते जमतं. लोक आई-वडलांना रोलमॉडेल मानायला तयार असतात, पण आई-वडलांच्या निवृत्तीच्या कल्पनांविषयी बहुतेकांना काही माहिती नसते. या निमित्तानी घरी हा विषय काढून त्याविषयी पुढाकार घेऊन बोलायला लागणार हे कळतं.

भारत सरकार लवकर सी.एस.आर. (कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी) कायदा करणार असं गेली एक-दोन वर्षं ऐकत होतो. लोक खूप प्रमाणात चुकीचं वागायला लागल्यामुळे सरकारला कायदे करावे लागतात. खूप मोठा धंदा करणाऱ्या उद्योगांच्या नफ्याच्या काही टक्के भाग सामाजिक हितासाठी खर्च केलाच पाहिजे असा कायदा येण्याआधीच अनेक वर्षं काही उद्योगांनी समाजोपयोगी कामांना सुरुवात केली. यातून व्यक्त होतं ते त्या उद्योगामागच्या प्रमुख व्यक्तीचं किंवा गटाचं आर्थिक व्यक्तिमत्त्व.

याच्या उलटही काही उदाहरणं आहेत. ज्या सामाजिक कामांवर खर्च करायला प्रत्यक्षात टाळाटाळ केली ती कामं प्रत्यक्षात कंपनीच्या खर्चात सी.एस.आर. म्हणून दाखवली जातात. अशा निरुपयोगी कामांवर खर्च करणं, खरं म्हणजे कुठचाही खर्च केलेला आवडत नाही, असं उघड म्हणणारी माणसं अतिश्रीमंत असतात हे बघून आश्चर्य वाटतं. अशा माणसांबद्दल विनोदानी लोक काय काय बोलतात. गरिबीमुळे हवालदिल असल्यामुळे त्यांच्या हातून सामाजिक कामाकडे लक्ष देणं झालं नाही अशी चेष्टा करतात.

माझ्या ओळखीत पैशानी प्रचंड श्रीमंत, पण कौटुंबिक समृद्धीच्या बाबतीत अतिशय गरीब अशी उदाहरणं आहेत. तुमच्याही माहितीचे असे लोक असतील. त्यांच्याकडे बघून काय करायचं नाही हे आपल्याला कळेल.

माझ्या एका ओळखीच्या कुटुंबाकडे साधारण दहा कोटी रुपयांची मालमत्ता आहे. चौघांचं स्वतंत्र कुटुंब. नवरा-बायको आणि एक मुलगा, एक मुलगी.

जमीन विकून दहा कोटी आल्यामुळे त्यातल्या नंबर दोनच्या भागाचं काय करायचं, इथपासून प्रश्नांना सुरुवात झाली. खरं म्हणजे आधी प्रश्न होतेच ते त्यापेक्षा गंभीर बनले. बायको माहेरची मुळातली गडगंज श्रीमंतांपैकी. लग्नानंतर नवरा सारखा परदेशात. धड संसार कधी झालाच नाही. दोन्ही मुलांच्या वाट्याला वडील कधी आले नाहीत. बायकोचा मुळात स्वभाव वस्तूंच्या सोसाचा, हट्टी आणि पालकत्वाची समज अजिबात नसलेला. नवरा घरी आल्यानंतर जवळजवळ कायम दारूत बुडालेला. नवरा-बायकोचं पटत नाही. आईचं आणि मुलांचं पटत नाही. मुलांच्या तब्येतीवर ह्याचे खूप वाईट परिणाम झालेले आहेतच. अशा कुटुंबानी सधन असल्यामुळे चौघांच्या नावानी स्वतंत्र बचत केली असती तर निराळं चित्र दिसलं असतं.

दुसरं एक उदाहरण सांगतो. पुणे शहराच्या कसबा पेठेत प्रचंड मोठा वाडा मालकीचा. त्यात ऑफिसेस, खूप बिऱ्हाडं, बिऱ्हाडांशी संबंध अतिशय बिघडलेले. अशा अवस्थेतल्या एका वाड्याशी म्हणजेच त्याच्या मालकांशी माझा कन्स्ट्रक्शन मॅनेजमेंट कन्सल्टंट म्हणून संबंध आला. बांधकामासंबंधी प्रत्येक विषय निघाला की माझ्यादेखत ती पाच भावंडं इतकी भांडायची तर एरवी किती भांडत असतील. त्यांचे आणि त्यांच्या भाचरांचे संबंधही वाईट. त्यामुळे एकमेकांच्यात सारखे डावपेच आणि षड्‌यंत्रं अखंड चालू. ह्या सगळ्या वातावरणामुळे वाडा विकण्याची त्यांची इच्छा असून हिश्श्याबद्दल एकमत होईना. त्यामुळे कुठचाही बिल्डर वाडा घ्यायला तयार नव्हता.

ह्या अवस्थेत माझ्यादेखत पाच-सहा वर्षं गेली. दर पावसाळ्यामधे भाडेकरूंच्या गळण्यासंबंधी तक्रारी, जुन्या मातीच्या बांधकामाच्या भागाची पडझड, असे प्रसंग घडायचे. भाडेकरूंच्या भीतीमुळे दुरुस्ती तर करायलाच लागायची. प्रत्येक दुरुस्तीच्या वेळेला भावंडांच्यातली भांडणं विकोपाला जायची कारण पैसे कोणी घालायचे हा प्रश्न सुटत नसे. त्यामुळे दुरुस्तीला उशीर व्हायचा. आणखीन पडझड व्हायची आणि भांडणं चिघळायची. माझी सल्ल्याची फी कोणी द्यायची हाही प्रश्न असायचा. मी त्यांना माझी व्याख्या स्पष्ट सांगितली होती की, जो कोणी मला बोलावणं पाठवेल त्याला माझी फी द्यावी लागेल. काही वर्षांनी मीच अशी कामं थांबवली आणि ही सल्लामसलत बंद झाली. पुढे एवढ्या लोभी, पाताळयंत्री भावंडांनी शेवटी एक बिल्डर गाठला.

त्या बिल्डरची कथा हा ह्याचा पुढचा भाग आहे. अति लोभी वृत्तीमुळे बिल्डरशी केलेल्या घासाघीशीत सगळ्या भावंडांच्या असं लक्षात आलं की रोख घेऊन बाहेर पडण्यापेक्षा भविष्यात होणाऱ्या बांधकामामधे हक्क ठेवणं जास्त फायद्याचं आहे. त्या मधल्या टप्प्यावर एकदा माझी गाठ पडली. त्यांनी हकीकत सांगितली तेव्हा मी त्यांना रोख घेऊन बाहेर पडण्याचा सल्ला दिला होता. तो कोणीही मानला नाही आणि बिल्डरकडून किरकोळ रक्कम आगाऊ घेऊन बाकीच्या जागेचा करार करून बिल्डरला ताबा देऊन हे लोक बाहेर पडले. त्यालाही काही वर्षं झाली. बिल्डर आणि त्याचा भागीदार ह्यांच्यात भांडणं होऊन सगळा प्रकल्प रखडला. सारांशात, कोट्यवधी रुपयांची मालमत्ता असून पाचही भावंडं किरकोळ पैसे घेऊन कुठच्यातरी खुराड्यासारख्या जागेत बिल्डरचे प्रश्न संपण्याची वाट बघत थांबून आहेत. अशा तऱ्हेनी वागण्याऐवजी या कुटुंबानी बचतीचा मार्ग स्वीकारला असता तर?

माझ्या एवढ्या वर्षांच्या बांधकाम-सल्लागार व्यवसायात अशी आणखीनही काही उदाहरणं आहेत. पण मतितार्थ कळायला ही दोन उदाहरणं पुरेशी आहेत. मोहामुळे श्रीमंत असून गरीब अशी तुमच्याही माहितीची काही कुटुंबं असतील. त्यांना आठवून बघा. आयुष्य शिकण्यासाठी हे आपले खरे शिक्षक आहेत.

मी भारताबद्दल, त्यात महाराष्ट्राबद्दल आणि त्यातही पश्चिम महाराष्ट्राबद्दल काही सांगितलं तर त्याला जास्त अर्थ आहे कारण तिथे माझी ये-जा जास्त झाली. मी महाराष्ट्रभर, भारतभर भरपूर हिंडलोय् पण त्या तुलनेत कमी. कदाचित तिकडची परिस्थिती थोडी निराळी असू शकेल. आणि सरधोपटपणी मी असं म्हणतोय की अल्पबचत हे अनेक प्रश्नांना, काळज्यांना उत्तर आहे.

जीवनसाथ चालू केल्यापासून मी शेकडो, हजारोंना अशा बचतीची जादू वर्णन करून सांगत आलोय, पण बहुधा मी ते पुरेसं परिणामकारक पद्धतीनी सांगू शकलो नाही. 'तुम्ही स्वतः तक्ता बनवून बघा,' असं मी अनेक वेळा बोललो आहे, पण कोणी ते मनावर घेतलं नाही. त्यामुळे मी स्वतःच तो जादूचा तक्ता इथे द्यायचं ठरवलं आहे.

मध्यमवर्गीय मुलाला, मुलीला, विवाहितांना किंवा कुटुंबाला मिळून रोज रु. 100/- बाजूला टाकणं शक्य आहे असं गृहीत धरून राष्ट्रीय बँकेत सुरक्षित गुंतवणूक करून दर महिनाअखेर एफ.डी. करायची असा हिशेब दाखवलेला आहे. अनेक ठेवी होतील पण हिशेब एकत्र दाखवला आहे.

1 ल्या महिनाअखेर	रु. 3,000 बँकेत 9% व्याजानी ठेवणं.	
2 ऱ्या महिनाअखेर	रु. 3000 × 9% व्याज रु. 22/- रु. 3000 + रु. 22 = रु. 3,022 + 3000 साठलेले = एकूण	 3,022/- 6,022/-
3 ऱ्या महिनाअखेर	रु. 6,022 × 9% = व्याज रु. 45/- रु. 6,022 + रु. 45 + रु. 3000 साठलेले = एकूण	 रु. 9067/-
4 थ्या महिनाअखेर	रु. 9,067 × 9% = व्याज रु. 68/- रु. 9,067 + रु. 68 + 3000 साठलेले = एकूण	 रु. 12,135/-
5 व्या महिन्याअखेर	रु. 12,135 × 9% = व्याज रु. 91/- रु. 12,135 + रु. 91 + 3000 साठलेले = एकूण	 रु. 15,226/-
6 व्या महिनाअखेर	रु. 15,226 × 9% = व्याज रु. 114/- रु. 15,226 + 114 + साठलेले 3000 =	 रु. 18,340/-
7 व्या महिनाअखेर	रु. 18,340 × 9% = व्याज रु. 137/- रु. 18,340 + 137 + साठलेले 3000 =	 रु. 21,477/-
8 व्या महिनाअखेर	रु. 21,447 × 9% = व्याज रु. 161/- रु. 21,447 + 161 + साठलेले 3000 =	 रु. 24,638/-
9 व्या महिनाअखेर	रु. 24,638 × 9% = व्याज रु. 185/- रु. 24,638 + 185 + साठलेले 3000 =	 रु. 27,823/-
10 व्या महिनाअखेर	रु. 27,823 × 9% = व्याज रु. 208/- रु. 27,823 + 208 + साठलेले 3000 =	 रु. 31,031/-
11 व्या महिनाअखेर	रु. 31,031 × 9% = व्याज रु. 232/- रु. 31,031 + 232 + साठलेले 3000 =	 रु. 34,263/-
12 व्या महिनाअखेर	रु. 34,263 × 9% = व्याज रु. 256/- रु. 34,263 + 256 + साठलेले 3000 =	 रु. 37,500/-

1 ल्या वर्षाअखेर	आत्तापर्यंत साठलेली रक्कम	रु. 37,500/-
2 ऱ्या वर्षाअखेर	रु. 37,500 × 9% व्याज = रु. 3375/- एकूण 37,500 + 3375 + साठवलेले 37,500 =	रु. 78,375/-
3 ऱ्या वर्षाअखेर	78,335 × 9% व्याज = रु. 7053/- एकूण 78,375 + 7053 + साठवलेले 37,500 =	रु. 1,22,928/-
4 थ्या वर्षाअखेर	1,22,928 × 9% व्याज = रु. 11,063/- एकूण 1,22,928 + 11,063 + साठवलेले 37,500 =	रु. 1,71,491/-
5 व्या वर्षाअखेर	1,71,491 × 9% व्याज = रु. 15,434/- एकूण 1,71,491 + 15,434 + साठवलेले 37,500 =	रु. 2,24,425/-
6 व्या वर्षाअखेर	2,24,425 × 9% व्याज = रु. 20,198/- एकूण 2,24,425 + 20,198 + साठवलेले 37,500 =	रु. 2,82,123/-
7 व्या वर्षाअखेर	2,82,123 × 9% व्याज = रु. 25,391/- एकूण 2,82,123 + 25,391 + साठवलेले 37,500 =	रु. 3,45,014/-
8 व्या वर्षाअखेर	3,45,014 × 9% व्याज = रु. 31,051/- एकूण 3,45,014 + 31,051 + साठवलेले 37,500 =	रु. 4,13,565/-
9 व्या वर्षाअखेर	4,13,565 × 9% व्याज = रु. 37220/- एकूण 4,13,565 + 37,220 + साठवलेले 37,500 =	रु. 4,88,285/-
10 व्या वर्षाअखेर	4,88,285 × 9% व्याज = रु. 43,945/- एकूण 4,88,285 + 43,745 + साठवलेले 37,500 =	रु. 5,69,730/-
11 व्या वर्षाअखेर	5,69,730 × 9% व्याज = रु. 51,275/- एकूण 5,69,730 + 51,275 + साठवलेले 37,500 =	रु. 6,58,505/-
12 व्या वर्षाअखेर	6,58,505 × 9% व्याज = रु. 59,265/- एकूण 6,58,505 + 59,265 + साठवलेले 37,500 =	रु. 7,55,270/-
13 व्या वर्षाअखेर	7,55,270 × 9% व्याज = रु. 67,974/- एकूण 7,55,270 + 67,974 + साठवलेले 37,500 =	रु. 8,60,744/-

14 व्या वर्षाअखेर	8,60,744 × 9% व्याज = रु. 77,466/- एकूण 8,60,744 + 77,466 + साठवलेले 37,500 =	रु. 9,75,710/-
15 व्या वर्षाअखेर	9,75,710 × 9% व्याज = रु. 87,813/- एकूण 9,75,710 + 87,813 + साठवलेले 37,500 =	रु. 11,01,023/-
16 व्या वर्षाअखेर	11,01,023 × 9% व्याज = रु. 99,092/- एकूण 11,01,023 + 99092 + साठवलेले 37,500 =	रु. 12,37,615/-
17 व्या वर्षाअखेर	12,37,615 × 9% व्याज = रु. 1,11,385/- एकूण 12,37,615 + 1,11,385 + साठवलेले 37,500 =	रु. 13,86,500/-
18 व्या वर्षाअखेर	13,86,500 × 9% व्याज = रु. 1,24,785/- एकूण 13,86,500 + 1,24,785 + साठवलेले 37,500 =	रु. 15,48,785/-
19 व्या वर्षाअखेर	15,48,785 × 9% व्याज = रु. 1,39,390/- एकूण 15,48,785 + 1,39,390 + साठवलेले 37,500 =	रु. 17,25,675/-
20 व्या वर्षाअखेर	17,25,675 × 9% व्याज = रु. 1,55,310/- एकूण 17,25,675 + 1,55,310 + साठवलेले 37,500 =	रु. 19,18,485/-
21 व्या वर्षाअखेर	19,18,485 × 9% व्याज = रु. 1,72,663/- एकूण 19,18,485 + 1,72,663 + साठवलेले 37,500 =	रु. 21,28,648/-
22 व्या वर्षाअखेर	21,28,648 × 9% व्याज = रु. 1,91,578/- एकूण 21,28,648 + 1,91,578 + साठवलेले 37,500 =	रु. 23,57,726/-
23 व्या वर्षाअखेर	23,57,726 × 9% व्याज = रु. 2,12,195/- एकूण 23,57,726 + 2,12,195 + साठवलेले 37,500 =	रु. 26,07,421/-
24 व्या वर्षाअखेर	26,07,421 × 9% व्याज = रु. 2,34,667/- एकूण 26,07,421 + 2,34,667 + साठवलेले 37,500 =	रु. 28,79,588/-
25 व्या वर्षाअखेर	28,79,588 × 9% व्याज = रु. 2,59,162/- एकूण 28,79,588 + 2,59,162 + साठवलेले 37,500 =	31,76,250/-

'राऊंड फिगर'च्या भाषेत याला एकतीस लाख म्हणूया. 25 व्या वर्षी एखादा मुलगा, मुलगी नोकरी, धंद्याला लागले तर 50 व्या वर्षापर्यंत एकतीस लाख रुपये जमा झालेले असतील. पथ्य एकच. ते पैसे 25 वर्षं कुठल्याही परिस्थितीत काढायचे नाहीत. पैसे ठेवणं, काढणं यासाठीचा बँक अकाउंट निराळा हवा.

या सगळ्या गणितात तरुण माणसाला राष्ट्रीय बँकेत मुदत ठेव केल्यावर जेवढं व्याज मिळेल तेवढंच म्हणजे 9% धरलेलं आहे. प्रत्यक्षात यापेक्षा पैसे वाढतीलच, कमी होणार नाहीत अशा प्रकारे गणित केलं आहे.

हा मजकूर वाचणाऱ्याचं आज कितीही वय असो, स्फूर्ती मिळत असेल तर लगेच अशी बचत चालू करावी. पैसे काढण्याचा मोहच होऊ नये म्हणून दुसऱ्या कोणाचं तरी नाव आपल्या ठेवीवर लावावं. त्या दुसऱ्या माणसाची सही मिळाल्याशिवाय ठेव बंद करता येणार नाही, पैसे काढता येणार नाहीत अशी व्यवस्था करावी. त्या दुसऱ्याचं काम 'आणीबाणी' व्यतिरिक्त सहीला नकार देणं हेच आहे.

●

2) विमा

मी विमा एजंट नाही. खुद्द माझ्या कुटुंबाच्या विम्याचा जेवढा माझा सबंध आला तेवढंच त्यातलं माझं ज्ञान आहे. पण जीवनसाथ अभ्यास मंडळाच्या निमित्तानी नकारात्मक विचार ह्याविषयी मला चांगली माहिती आहे. आयुष्यामधे त्रास देणाऱ्या, मनस्ताप देणाऱ्या छोट्या किंवा मोठ्या अपघाताची शक्यता आणि त्याचा तपशीलात केलेला विचार हा कितीही नकारात्मक असला तरी फायद्याचा असतो हे मला पक्कं माहीत आहे. खरं म्हणजे काही काही चुकीचे विचार आणि त्यातून निघालेली चुकीची वाक्यं आपल्या डोक्यात पक्की बसली आहेत. 'सकारात्मक दृष्टिकोन ठेवा, वाईट गोष्टींचा विचारच करू नका, कायम शुभ बोला.' असं मी हजार वेळेला ऐकलेलं आहे. माझ्या लहानपणी विमा एजंट म्हणजे मृत्यूविषयी अभद्र बोलणारा माणूस म्हणून त्याला घरात प्रवेशही नसायचा. जशा जशा वाईट गोष्टी स्वतःच्या आयुष्यात आणि आसपास घडणाऱ्या माणूस अनुभवतो, तसं त्याला विमा ह्या शब्दाचं महत्त्व कळत जातं.

अगदी लहान मुलांना नकारात्मक गोष्टी सांगू नयेत हे मला पटतं कारण मुळात त्यांना त्या कळणारच नाहीत. किती वर्षांपासून नकारात्मक गोष्टी मुलाला कळू शकतात ह्याचं वय आठच्या आसपास असं मानसशास्त्र सांगतं. माझं मत असं की, सात ते आठ वर्षांच्या मुलांबरोबर मधूनमधून सबंध कुटुंबानी एकत्र बसून कुटुंबाच्या अडचणींविषयी जरूर चर्चा कराव्यात. पैशाचे प्रश्न, गुंतवणुकी, तब्येतीच्या काळज्या, घरात वृद्ध व्यक्ती असल्या तर त्यांची आजारपणं, परावलंबित्व हे सगळं मुलांच्यादेखत जरूर बोलावं.

आपल्याला माहिती आहे की, म्हातारपण म्हणजे मृत्यूच्या आधीची पायरी. मृत्यूबद्दलच्या कल्पनांना कृतीचं स्वरूप देणं जरूर आहे. मृत्यूपूर्वी करण्याची इच्छापत्र, आयुर्विमा, आरोग्यविमा ह्या सगळ्यांची चर्चा मुलांच्यादेखत करावी. नातेवाईकांच्यात कोणी विधवा किंवा विधुर असेल तर त्यांच्याशी कसं वागायचं ह्याच्या शिक्षणाचीही आपल्या समाजाला गरज आहे. हे सगळं एवढं सविस्तर सांगण्याचा उद्देश लहानपणापासून नकारात्मक विचारांची शक्यता समोर आलेली असली तर मोठेपणी माणूस योग्य निर्णय घेतो. निदान तशी शक्यता वाढते. तो

वेळेवर आयुर्विमा, आरोग्यविमा ह्या सगळ्यांविषयी जागरूक होऊन कृती करतो. जसे इतर क्षेत्रांमधे चांगले-वाईट लोक असतात तसे विमा एजंटांमधेही असतात. पॉलिसी खरेदी करेपर्यंत खूप मागे लागणारे आणि नंतर येणाऱ्या अडचणींच्या बाबतीत दुर्लक्ष करणारेही असतात. प्रत्यक्षात विमा, त्याचे हप्ते हा बचतीचाच एक प्रकार आहे.

मी लहानपणापासून अशी वाक्यं ऐकलीयत, तुम्हीही ऐकली असतील. ज्येष्ठ, वयस्कर, तरुण कोणीही असलं तरी ही वाक्यं आपल्या वाट्याला येतातच. 'पैसे काय, आपण वर घेऊन जाणार आहोत का? माणूस निष्कांचन जन्माला येतो आणि निष्कांचन अवस्थेतच वर जातो, नंगे आलो नंगे जायचं,' वगैरे. सगळ्याचा सारांश एकच– पैशाला महत्त्व देऊ नये. ही अशी वाक्यं जाता-येता ऐकायची आणि ऐकवायची, प्रत्यक्षात याच्या थेट विरुद्ध वागायचं. पैशासाठी खोटं बोलायचं, घासाघीस करायची, एकमेकांवर कुरघोडी करायची, खुशाल भावंडांशी भांडायचं, संस्थांमधे घाणेरडी राजकारणं करायची, पैसे मागत हिंडायचं. संस्था, नियतकालिकं, सामाजिक चळवळ यांचं नाव वापरून स्वतःच्या पैशाची सोय करायची. कष्टकऱ्यांना पैसे कापीन अशा धमक्या देत राहायचं आणि पैशासाठी हुंड्यावरून सुनांना छळायचं, काय काय अशा प्रकारच्या बातम्या दिवसभर ऐकाव्या लागतात. या समाजाच्या आर्थिक व्यक्तिमत्त्वाचं नेमकं काय वर्णन करायचं?

खरी गोष्ट अशी आहे की जवळजवळ प्रत्येक त्रासदायक किंवा नकारात्मक गोष्टीचा विमा उतरवता येतो. त्या सगळ्याची माहिती काढावी. विमा या कल्पनेकडे नकारात्मक पद्धतीनी बघू नये.

●●●

जीवनसाथ पुस्तक संच
संपूर्ण यादी

पुस्तक क्र.	पुस्तकाचं नाव
1.	विवाह अभ्यास म्हणजे नेमकं काय ● कौटुंबिक विसंवाद
2.	जोडीदाराची निवड ● लैंगिक शिक्षण
3.	व्यक्तिमत्त्व विकासाचा खरा अर्थ ● पुरुष पालकांचं शिक्षण
4.	आर्थिक व्यक्तिमत्त्व ● करीअरचं नियोजन
5.	व्यवस्थापनशास्त्र – वैवाहिक आणि रोजच्या आयुष्यातलं
6.	स्वावलंबन, आत्मसन्मान ● स्त्री-पुरुष असमानतेची रूपं
7.	उत्सवी प्रवृत्ती ● लग्नसमारंभ

8.	खरे उपयोगी संस्कार ● सर्वांनी करण्याजोगं समाजकार्य
9.	रोजच्या आयुष्यातलं तत्त्वज्ञान ● समतोल विचारांचं महत्त्व
10.	ज्येष्ठांशी संवाद ● मृत्यूसंबंधी स्पष्ट विचार
11.	समुपदेशनाच्या अनेक नव्या पद्धती ● जीवनसाथ समुपदेशन संस्था
12.	कौटुंबिक स्वास्थ्यासाठी उपाय ● जीवनसाथमधले खेळ

जीवनसाथ संचामधली अनिल भागवत यांची इतर पुस्तकं

पुस्तक-1

विवाह अभ्यास म्हणजे नेमकं काय

●

कौटुंबिक विसंवाद

या पुस्तकाचा सविस्तर अनुक्रम

---

1) विवाह अभ्यास मंडळ म्हणजे नेमकं काय?

1. या कल्पनेची थोडक्यात ओळख 2. विवाहाचा तत्त्वज्ञानाशी संबंध 3. वैवाहिक आयुष्यासाठीची काही महत्त्वाची तत्त्वं 4. रोजच्या आयुष्यातली साधी तत्त्वं 5. भावनांविषयीचा अभ्यास 6. विचारांचं भावनेत रूपांतर 7. भावनांवर नियंत्रण 8. कुटुंबाबरोबरच्या आयुष्याचं महत्त्व 9. व्यवस्थापनशास्त्राचा उपयोग 10. कुटुंबाचं समुपदेशन 11. आपुलकी, प्रेम, या भावना व्यक्त करणं 12. नाती सांभाळण्यासाठीची तत्त्वं आणि तंत्रं 13. प्रश्न सोडवण्याची पद्धत– मिश्रगट कार्यशाळा म्हणजेच 'ग्रुप काउन्सेलिंग' वर्कशॉप्स 14. खरं बोलणं 15. पैशाबद्दलची विचारसरणी 16. स्वावलंबन आणि आत्मसन्मान 17. स्त्री-पुरुष समतेची आणि समानतेची समज 18. लोकशाहीचं मूल्य आणि स्वतंत्र किंवा एकत्र कुटुंब 19. उत्सव, समारंभ याबद्दल भूमिका 20. असणं, दिसणं आणि दाखवणं 21. आधुनिक आणि पारंपरिक 22. वैयक्तिक समुपदेशन 23. या पुस्तकासंबंधीच्या सूचना

2) कुटुंबातले आणि नवराबायकोमधले मतभेद म्हणजेच कौटुंबिक विसंवाद

1. प्रश्नाचा नेमका शोध आणि उपायाचा शोध 2. विवाहाच्या इतिहासात आणि तत्त्वज्ञानात काय सांगितलंय 3. कौटुंबिक विसंवाद या विषयातली आकडेवारी 4. विचार, भावना यांचे गट आणि नवरा-बायकोचं नातं 5. कुटुंबातली इतर नाती / एकत्र कुटुंब 6. पैशावरून वाद 7. आत्मसन्मानावरून वाद 8. मुलांसंबंधीचे वाद 9. सासर-माहेर याविषयी वाद 10. स्त्री-पुरुष समानतेची समज नसण्यावरून विसंवाद 11. आधुनिक किंवा पारंपरिक विचारांमुळे विसंवाद 12. व्यसनं आणि भांडणं 13. नवराबायको आणि कुटुंबातले समाईक धागे 14. कुटुंबासाठी वेळ देणं 15. व्यवस्थापन कौशल्यांचा वापर 16. विवाहाचा अर्थ कळणं 17. सर्वात महत्त्वाची गोष्ट– संवाद 18. राग, धमक्या, रागवारागवी, रुसणं 19. मारहाण– हिंसेचे प्रकार 20. लग्न ठरवण्याची पद्धत– सगळ्याचं मूळ 21. लग्नाचा करार 22. मानसशास्त्राची मदत 23. करण्याजोग्या गोष्टी 24. खरं प्रेम म्हणजे काय ते न समजणं 25. भांडणांचं टोक– घटस्फोट

3) मी आणि शोभामधले विसंवाद

4) मी आणि शोभा यांचं सहजीवन, आम्ही काढलेले उपाय

5) राग आवरण्याचे मार्ग

6) आभार

●

पुस्तक-2

जोडीदाराची निवड

●

लैंगिक शिक्षण

या पुस्तकाचा सविस्तर अनुक्रम

---

1) प्रथमदर्शनी प्रेम आणि प्रेमप्रकरणं

1. नैसर्गिक स्त्री-पुरुष आकर्षण 2. प्रथमदर्शनी प्रेम 3. एकतर्फी प्रेम 4. नॉर्मल - ॲबनॉर्मल तारुण्य 5. दुतर्फी प्रेम प्रकरण 6. लग्न ठरवणं – साखरपुडा वगैरे 7. अविचाराची शक्यता 8. लग्न मोडणं/प्रेमभंग 9. विवाहबाह्य आकर्षण/ प्रेमप्रकरण 10. खरं प्रेम म्हणजे काय?

2) विमुक्त जीवन

3) अविवाहितांचं आयुष्य

1. अविवाहितांच्या आयुष्याचा अभ्यास 2. विवाहाचा इतिहास 3. काही अविवाहितांची उदाहरणं 4. जीवनसाथमधे अविवाहितांच्या प्रश्नाबद्दल काय असतं? 5. समतोलपणी वागणाऱ्या अविवाहितांची उदाहरणं 6. लिव्ह-इन रिलेशनशिप (लग्नाविना एकत्र राहणं) 7. लग्न करण्याविषयी माझं स्वतःचं मत

4) अविवाहितांच्या मुलाखती

5) लग्न कशासाठी?

6) लग्नाचं योग्य वय

7) वधू-वर सूचक मंडळं आणि मेळावे

1. वधू-वर सूचक मंडळं 2. मेळावे, खेळ, सहल आणि जीवनसाथचे प्रयत्न

8) जोडीदाराची निवड

1. दुनिया जिसे कहते है वो जादू का खिलौना है – सध्याचा प्रश्न 2. स्वस्थ वैवाहिक आयुष्याचं ध्येय 3. निवडीसाठी किती काळ योग्य? 4. लेखी

प्रश्नावलीच्या देवघेवीची कल्पना 5. प्राथमिक प्रश्नावली 6. सविस्तर प्रश्नावली– बाह्यरूप 7. सविस्तर प्रश्नावली– पत्रिका 8. सविस्तर प्रश्नावली– शिक्षण/ व्यासंग 9. सविस्तर प्रश्नावली– आरोग्य 10. सविस्तर प्रश्नावली– स्वभाव 11. सविस्तर प्रश्नावली– पैशांबद्दलची विचारसरणी 12. सविस्तर प्रश्नावली– मासिक प्राप्ती 13. सविस्तर प्रश्नावली– स्त्री-पुरुष समानता 14. सविस्तर प्रश्नावली– स्त्री-पुरुष लैंगिक संबंध 15. सविस्तर प्रश्नावली– कुटुंब 16. सविस्तर प्रश्नावली– मुलं 17. सविस्तर प्रश्नावली– लग्न समारंभ 18. सविस्तर प्रश्नावली– वैवाहिक आयुष्याचं सार 19. सविस्तर प्रश्नावली– महत्त्व कशाला? 20. त्रोटक सविस्तर माहिती 21. भावी जोडीदाराच्या प्रत्यक्ष भेटीपूर्वीचे पर्याय 22. जोडीदाराबद्दल अंतिम निर्णयप्रक्रिया 23. जीवनसाथची कार्यशाळा नेमकी कशी असते? 24. निवडक गटाचं जोडीदाराच्या निवडीसाठी समुपदेशन 25. जोडीदार ठरल्यावर लग्नापूर्वीची बौद्धिक चाचणी (मॅरेज मॅच्युरिटी इंडिकेटर) 26. अविचाराची शक्यता 27. लग्न ठरल्यानंतरची कर्तव्यं 28. जोडीदाराची निवड या कार्यशाळेत वापरायचे खेळ

9) लैंगिक शिक्षणाची गरज

1. या लेखाची पार्श्वभूमी 2. भारतातलं पारंपरिक कामशास्त्र आणि जगातली परिस्थिती 3. तत्त्वज्ञान आणि मानसशास्त्राची लैंगिक संबंधाबद्दलची भूमिका 4. सध्याच्या प्रश्नाचं स्वरूप 5. लैंगिक शिक्षणाची कार्यशाळा 6. लैंगिक संबंधातलं समुपदेशन

10) लैंगिक शिक्षण– जन्मापासून 5 वर्षांपर्यंतच्या मुलामुलींबद्दल

11) लैंगिक शिक्षण– 5 ते 10 वर्षांपर्यंतच्या मुला-मुलींसाठी

12) लैंगिक शिक्षण– 10 ते 16 वयापर्यंतच्या मुला-मुलींसाठी

13) लैंगिक शिक्षण – तरुणांसाठी – लग्नापूर्वी

1. सध्याची परिस्थिती 2. लैंगिक भावनांचा गोंधळ 3. मुलग्यांच्या विकृत गप्पा 4. हस्तमैथुन 5. वेश्येकडे जाण्याचा मोह 6. मुलींच्या मनातल्या कल्पना 7. मुलगे आणि मुली यांची चांगली मैत्री 8. लैंगिक शिक्षणाची अविवाहितांसाठी कार्यशाळा 9. चुकीच्या गोष्टींची शक्यता– रेव्ह पार्टी 10. प्रेमभंग आणि लग्नापूर्वी लैंगिक संबंध 11. लग्नापूर्वी लैंगिक संबंधाबद्दल वैयक्तिक समुपदेशन 12. परदेशातली परिस्थिती 13. लैंगिक संबंधांमागची मानसशास्त्रीय बैठक

14) लैंगिक शिक्षण– जोडीदाराच्या निवडीनंतर पण लग्नाआधी

1. द्विधा मनःस्थितीचे परिणाम 2. वैद्यकीय तपासणी

15) लैंगिक शिक्षण– लग्न झाल्यापासून मूल होईपर्यंतचा काळ

1. लग्नानंतरची पहिली रात्र 2. लैंगिक संबंधांबद्दलचं अज्ञान 3. स्त्रीची मासिक पाळी 4. स्त्री-पुरुषांची मानसिक बैठक 5. लैंगिक समस्यांबद्दलचं मिश्रगट समुपदेशन 6. लैंगिक संबंधातल्या अडचणी आणि उपाय 7. प्रणय म्हणजेच 'फोरप्ले'चं महत्त्व 8. लैंगिक संबंधात स्त्रीचं समाधान 9. समलिंगी, उभयलिंगी आकर्षण वाटणारे स्त्री-पुरुष 10. अविश्वास– जोडीदारावर, समाजावर 11. लैंगिक अतृप्तीचे परिणाम 12. गर्भ राहणं 13. आनंददायी लैंगिक संबंधांसाठी काही सूचना

16) लैंगिक संबंध– मध्यमवयीन स्त्री-पुरुषांचा

1. स्त्री-पुरुषांची लैंगिक गरज 2. लैंगिक संबंधांतून निवृत्ती 3. स्वप्नरंजन 4. लैंगिक उपासमार 5. नसबंदी 6. पुढच्या पिढीचं भवितव्य

17) लैंगिक संबंध– ज्येष्ठांचा आणि लैंगिक विकृती

1. ज्येष्ठांचा लैंगिक संबंध 2. लैंगिक विकृती

18) आभार

●

पुस्तक-3

व्यक्तिमत्त्व विकासाचा खरा अर्थ

●

पुरुष पालकांचं शिक्षण

या पुस्तकाचा सविस्तर अनुक्रम

---

1) संवादकला

1. संवादामागचं तत्त्वज्ञान 2. मानसशास्त्रातला एक महत्त्वाचा प्रयोग 3. चांगला संवाद म्हणजे काय? 4. आयुष्यभरातल्या सगळ्या नात्यांचे फक्त 3 गट 5. जोडीदाराबरोबरचा किंवा जवळच्या व्यक्तीबरोबरचा संवाद 6. संवादातल्या चुकांची उदाहरणं 7. व्यवसाय, धंदा, दुकानदारी यामधले संवाद 8. चांगला संवाद– त्यासाठीचे मार्ग आणि तंत्रं 9. संवादकलेबद्दलच्या गटचर्चा 10. संवादातल्या भाषेचा प्रश्न आणि हावभाव, हालचाली यांच्यामधून संवाद

2) व्यक्तिमत्त्व विकास

1. आत्मविश्वास– व्यक्तिमत्त्वाचा पाया 2. बाह्यरूप 3. बोलणं 4. चेहऱ्यावरचे भाव 5. चुकीच्या लकबी 6. फसवेगिरी - खोटेपणा 7. कुचाळक्या - एक विकृती 8. अंगचे कलागुण 9. छंदापासून व्यसनापर्यंत 10. शिस्त आणि व्यवस्थापन 11. आयुष्याचा संतुलित दृष्टिकोन 12. अष्टपैलू– चतुरस्त्र– अष्टावधानी व्यक्ती 13. विकासाचे दोन मार्ग 14. मिश्रगट समुपदेशनाचे व्यक्तिमत्त्वासाठी फायदे

3) खरं बोलणं – अठ्ठ्याण्णव टक्के

4) नकार देण्याची कला

5) मी केलेल्या चुका

6) मी जोडीदाराकडून/विशिष्ट व्यक्तीकडून काय शिकलो/शिकले

7) इ.क्यू. (इमोशनल कोशंट) म्हणजेच भावनिक गुणांक

1. भावनिक गुणांकाची (इ.क्यू.) मूळ कल्पना 2. स्त्रियांच्या आणि पुरुषांच्या भावनांकातला फरक 3. भावनांक सुधारण्याचं शिक्षण 4. समुपदेशनातले अनुभव 5. शोभा आणि मी यांचं उदाहरण 6. भावनांक आणि समाजकार्य यांचा संबंध 7. भावनांकावर वय, आरोग्य यांचा परिणाम

8) पुरुष पालकांचं शिक्षण

1. माझं स्वतःचं लहानपण 2. पालक शिक्षणाची थिअरी आणि प्रॅक्टिस 3. शोभाचं आणि माझं पालक-शिक्षणातलं काम 4. मूल कशासाठी? 5. मुलाची शारीरिक वाढ 6. सर्वसाधारण पुरुष पालकाची सध्याची वागणूक 7. पालकत्वाचे नवे प्रश्न / उपायांचा शोध 8. मुलांना अपमानास्पद वागणूक 9. मुलं बिघडण्याची कारणं 10. आईवडलांचं एकमेकांशी नातं 11. आजोबांची भूमिका 12. शिक्षण-शाळा-अभ्यास-समुपदेशन 13. मुलांचा भाषाविकास 14. मुलांना केलेल्या शिक्षा 15. मुलांना स्वच्छतेचं शिक्षण 16. मुलांसाठी लैंगिक शिक्षण 17. मुलांसाठी वेळ काढणं 18. मुलांची पैशाबद्दलची समज 19. मुलांचे खेळ - आरोग्य 20. मुलांमुळे करिअरमधे खंड 21. भावंडांचे संबंध 22. समाजाचं मुलांकडे दुर्लक्ष 23. संस्कार 24. ‘स्पेशल’ मुलं 25. तरुणांचे पालक म्हणून जबाबदाऱ्या 26. पालकत्वामागचा समतोल विचार

9) आभार

●

टीप : जीवनसाथ पुस्तक संचातल्या पुस्तक क्र. 4 चा सविस्तर अनुक्रम या पुस्तकाच्या सुरुवातीच्या भागात दिला आहे.

पुस्तक-5

व्यवस्थापनशास्त्र – वैवाहिक आणि रोजच्या आयुष्यातलं

या पुस्तकाचा सविस्तर अनुक्रम

1) विवाह आणि रोजचं आयुष्य यातलं व्यवस्थापन

1. व्यवस्थापनाचं आयुष्यात महत्त्व 2. थिअरी आणि प्रॅक्टिस 3. विवेकनिष्ठ विचारसरणी– थंड डोक्यानी विचाराची क्षमता 4. आत्मसन्मान आणि नियोजन 5. वैवाहिक आयुष्यातलं व्यवस्थापन 6. कुटुंब आणि व्यवस्थापनशास्त्र 7. कायदे, नियम, संकेत पाळण्याचं महत्त्व 8. संस्था आणि लोकांबरोबर काम 9. कामावर नेमलेल्यांशी लोकशाहीनी वागणं 10. काम न होण्याची कारणं 11. अग्रक्रम ठरवणं, एकाग्रता आणि कल्पकता 12. शारीरिक थकवा– मानसिक थकवा– उपाय 13. जबाबदारी, बेपर्वाई आणि तज्ज्ञसत्ता 14. प्रशिक्षण 15. कामाआधीची तयारी– कामाच्या टप्प्याचं नियोजन 16. उलगडा - एक महत्त्वाची गोष्ट 17. पैशाचे व्यवहार - कराराचं महत्त्व 18. भरवशाची वागणूक - डायरी सिस्टिम 19. नकारात्मक विचारांची तयारी 20. लिहिण्याचं महत्त्व 21. अतिजलद बांधकामाचं तंत्र 22. वेळ पाळणं 23. बक्षीस आणि शासन 24. व्यवस्थापनशास्त्र आणि इतर व्यवसाय 25. फोन, मोबाईल फोन आणि व्यवस्थापनशास्त्र 26. कामाचा दर्जा : वस्तूंचं व्यवस्थापन आणि सुबकपणा 27. बांधकामाचा दर्जा बद्दलच्या गैरसमजुती 28. खाद्यपदार्थांचा दर्जा 29. वागणुकीचा दर्जा 30. पोशाख आणि त्याचे खिसे 31. बॅगचा वापर 32. घरातल्या वस्तू 33. लिखाणाची शिस्त, सुबकपणा 34. टॉलरन्स म्हणजेच सवलती 35. चेकलिस्ट 36. व्यवस्थापनाची कार्यशाळा

2) आभार

●

पुस्तक-6

स्वावलंबन, आत्मसन्मान

●

स्त्री-पुरुष असमानतेची रूपं

या पुस्तकाचा सविस्तर अनुक्रम

---

1) स्वावलंबन आणि आत्मसन्मान

1. लेखामागची मूळ कल्पना 2. समाजाची सध्याची परिस्थिती 3. इतर सजीव सृष्टी, वनस्पती, प्राणी आणि मानव 4. स्वावलंबन आणि पालकत्व 5. स्वावलंबन आणि वैवाहिक आयुष्य 6. रोजच्या आयुष्यातलं स्वावलंबन 7. स्वावलंबन, आत्मसन्मान आणि तत्त्वचिंतन 8. पैशाबद्दलचं स्वावलंबन 9. आजारपण, म्हातारपण यातलं स्वावलंबन 10. काही खास उदाहरणं 11. स्वावलंबन आणि भेटवस्तू, बक्षीशी, भीक वगैरे 12. निष्कर्ष

2) लोकशाहीची समज आणि रोजचं कौटुंबिक आयुष्य

3) एकत्र किंवा स्वतंत्र कुटुंब

4) अंतिम निर्णय कोणाचा?

5) स्त्री-पुरुष समानतेच्या प्रवासातली असमानतेची रूपं

1. गर्भधारणेपासून 5 व्या वर्षांपर्यंतची असमानता 2. अपत्याच्या 5 ते 10 वयामधली असमानता 3. अपत्याचं वय 10 वर्षांच्या पुढे ते शिक्षण पूर्ण करून कमवायला लागेपर्यंतची असमानता 4. नोकरी, धंदा, व्यवसायात, 'मिळवती बायको' या विषयातली असमानता 5. घरच्या आणि समाजातल्या वातावरणातली असमानता 6. लग्न ठरवतानाची असमानता 7. प्रत्यक्ष लग्न समारंभातली असमानता 8. लग्नानंतरचं एक ते दीड वर्ष किंवा मूल झाल्यावरची असमानता 9. पालकत्वातली असमानता 10. आपल्या मुलांच्या लग्नाच्या वेळची असमानता 11. म्हातारपणातली असमानता 12. जोडीदाराच्या मृत्यूनंतरची असमानता 13. स्त्री-पुरुष समानतेच्या प्रवासाच्या अभ्यासाचा निष्कर्ष

6) आभार

●

पुस्तक-7

उत्सवी प्रवृत्ती

●

लग्नसमारंभ

या पुस्तकाचा सविस्तर अनुक्रम

---

1) आयुष्यातले आनंद

1. आयुष्यातल्या आनंदाबद्दलचं तत्त्वचिंतन 2. शरीराविषयीचे आनंद 3. पैसे आणि चरितार्थाविषयीचे आनंद 4. स्त्री-पुरुष संबंधांबद्दलचे आनंद 5. आत्मसन्मानासंबंधीचे आनंद 6. सौंदर्य, कला, खेळ यातून मिळणारा आनंद 7. मित्र आणि कुटुंबीयांसंबंधीचे आनंद 8. अभिमान न वाटण्याजोगे आनंद 9. आनंदाचे अनुभव– लक्षात ठेवण्याच्या गोष्टी

2) उत्सवी प्रवृत्ती

1. मुळातली मानसिक बैठक 2. वाढदिवस

3) लग्नसमारंभ

1. लेखामागची मूळ कल्पना 2. जोडीदाराच्या शोधासाठी, हौसेसाठी 3. लग्नसमारंभाच्या आधीची तयारी 4. लग्नसमारंभामागची व्यावहारिक कारणं 5. भेटवस्तू प्रकरण 6. परंपरांचा पगडा - मुहूर्त, विधी वगैरे 7. लग्नसमारंभातली स्त्री-पुरुष असमानता 8. लग्नसमारंभामधली सामाजिक अनैतिकता 9. लग्नसमारंभ आणि पर्यावरणाची हानी 10. अपरिपक्व विचार 11. रास्त पद्धतीचे विवेकनिष्ठ प्रयत्न

4) विवाहाच्या लेखी कराराची कल्पना

5) आभार

●

पुस्तक-8

खरे उपयोगी संस्कार

●

सर्वांनी करण्याजोगं समाजकार्य

या पुस्तकाचा सविस्तर अनुक्रम

---

1) दैवी शक्तींविषयी सत्यशोधकाची भूमिका

1. ईश्वर इत्यादी पॅकेज मधून मुक्ती 2. जन्मापासून पॅकेजबद्दलचे प्रश्न 3. पॅकेजबद्दल स्वतःची भूमिका 4. सध्याच्या प्रश्नांना उपाय 5. तत्त्वज्ञानाची गोडी 6. माणसांचे प्रकार 7. विवेकनिष्ठतेचे निकष 8. खरा मार्ग

2) ईश्वरवादाबद्दलचा समतोल विचार

1. सर्वांत महत्त्वाची गोष्ट 2. ईश्वर या कल्पनेचा जन्म आणि कल्पनाविस्तार 3. देव एक का अनेक 4. ईश्वराची भीती– चूप बस संस्कृती 5. मूर्तिपूजा 6. ईश्वर– एक वैयक्तिक कल्पना 7. ईश्वरवादाचे प्रसारक– ईश्वराचे दलाल, व्यापारी 8. दैवी शक्तींचे इतर प्रकार 9. विवाहाचा, एकूण आयुष्याचा ईश्वराशी संबंध 10. प्रार्थना 11. जगातली परिस्थिती 12. भूत, पिशाच्च, करणी वगैरे 13. रास्त, विवेकनिष्ठ, समतोल विचार

3) धर्माविषयी समतोल विचार

4) जातीविषयी समतोल विचार

5) पुनर्जन्माविषयी समतोल विचार

6) नशीब, ज्योतिष-पत्रिका याबद्दल समतोल विचार

7) शपथ– शुभ-अशुभ याबद्दल समतोल विचार

8) रूढी– परंपरा– चालीरीती– व्रतवैकल्यं– कर्मकांडांबद्दल चर्चा

1. या लेखामागची मूळ कल्पना 2. सध्याची रूढींबद्दलची परिस्थिती 3. दैवी शक्तींवरचा विश्वास 4. नाट– पायगुण, शकुन वगैरे 5. बारसं, वाढदिवस, मुंज

इत्यादी 6. खाण्यापिण्याबद्दलच्या रूढी 7. लग्नसमारंभाशी जोडलेल्या रूढी 8. पोषाखाच्या रूढी 9. हिंसा-अहिंसा 10. नमस्कारासंबंधी रूढी 11. सामाजिक कार्यक्रमातल्या रूढी 12. रूढीमधले झालेले आणि करण्याजोगे बदल 13. पाप-पुण्य, मृत्यूसंबंधीच्या रूढी 14. कुटुंबकारणातल्या आणि सामाजिक अधिकाराच्या रूढी 15. काय बदल करता येतील?

9) आधुनिक-पारंपरिक म्हणजे नेमकं काय?

1. या लेखामागची कल्पना 2. बाह्यरूपातली पारंपरिकता किंवा आधुनिकता 3. मनातली आणि विचारातली पारंपरिकता किंवा आधुनिकता 4. निष्कर्ष

10) खरे संस्कार म्हणजे नेमकं काय?

1. आहाराविषयीचे संस्कार 2. आरोग्याविषयीचे संस्कार 3. पोषाखाविषयीचे संस्कार 4. निवाऱ्यासंबंधीचे संस्कार 5. विवाहासंबंधीचे संस्कार 6. मुलांवरचे संस्कार 7. पैशांबद्दलचे संस्कार 8. कामाबद्दलचे संस्कार 9. अभिरुचीचे संस्कार 10. मृत्युसंबंधीचे संस्कार 11. संस्कारांबद्दल करण्याजोग्या गोष्टी

11) स्वतःची होकारांची आणि नकारांची यादी

12) समाजकार्यांच्या दिशा

1. या लेखामागची कल्पना 2. 'फंडिंग' असलेली कामं 3. सामाजिक प्रथा बदलण्याची कामं 4. धार्मिक प्रकारची सामाजिक कामं 5. शिक्षणक्षेत्रासाठी सामाजिक कामं 6. बालकांच्या हक्कांसंबंधी कामं 7. पत्रकारितेमधून सामाजिक काम 8. ग्राहकहितासाठी सामाजिक काम 9. शहरी सुविधांसाठी चळवळ 10. वैद्यकीय क्षेत्रातली सामाजिक कामं 11. शिष्यवृत्त्यांसाठी, पारितोषिकांसाठी पैशाची सोय 12. नैसर्गिक आपत्तीनंतरची कामं 13. शहरांमधल्या झोपडपट्ट्यांच्यामधे काम 14. पर्यावरण रक्षण-शिक्षण 15. कोणालाही जमतील अशी साधी कामं

13) आभार

●

पुस्तक-9 (नऊ)

रोजच्या आयुष्यातलं तत्त्वज्ञान

●

समतोल विचारांचं महत्त्व

या पुस्तकाचा सविस्तर अनुक्रम

---

1) रोजच्या आयुष्यातलं तत्त्वज्ञान

1. मूळ कल्पना 2. तत्त्वज्ञान विवेकनिष्ठ विचारसरणी आणि आयुष्य 3. तत्त्वज्ञानाचा इतिहास 4. ज्ञान देण्याचा आणि घेण्याचा आनंद 5. डॉ. ह. ना. फडणीस यांच्याबरोबरचा अभ्यास 6. ए. नागराज यांची मध्यस्थ दर्शनाची कल्पना

2) पर्यावरण – साधी राहणी आणि आरोग्य वगैरे

1. पर्यावरणाशी निगडित तत्त्वचिंतन 2. साधी राहणी 3. स्वच्छता 4. आरोग्य आणि व्यायाम 5. वैद्यकीय क्षेत्र आणि सामान्य माणूस 6. ऊर्जेची गणितं 7. पर्यावरण विषयाबद्दलचे प्रश्न 8. पर्यावरणातलं संशोधन आणि अंमलबजावणी

3) सावकाश काम करणारे अपायकारक घटक आणि त्यावर उपाय

1. या लेखामागची कल्पना 2. हवा 3. पाणी 4. अन्न 5. पेय 6. मलमूत्र 7. झोप 8. व्यसनं 9. औषधं आणि आरोग्य सुविधा 10. व्यायाम 11. शिक्षण 12. कपडे 13. सौंदर्यप्रसाधनं 14. काम 15. प्रवास 16. पैसे 17. उपकरणं 18. तंत्रज्ञान 19. करमणूक 20. प्रसारमाध्यमं 21. कुटुंबातला बेबनाव 22. सारांश

4) इतर महत्त्वाचे प्रश्न

1. शहरीकरण 2. जनमानस ट्रस्ट 3. तज्ज्ञसत्ता 4. माणसांचे वैचारिक प्रकार – सा प बं द 5. देशाटन 6. भाषा 7. प्रसारमाध्यमं 8. खरं आणि न्याय्य 9. दुष्टाशी गाठ 10. सामाजिक संघटनांमागचं तत्त्वज्ञान

5) सरकार

6) राजकीय लोकशाही

7) बहुमत

8) सहकारी संस्था

9) राजकारण

10) निवडणूक

11) राष्ट्र

12) राष्ट्रीय एकात्मता, विश्वबंधुत्व/विश्वशांती

13) कायदा आणि पोलीस यंत्रणा

14) स्वतःच्या आयुष्याविषयी समतोल विचार

15) आभार

●

पुस्तक-10

ज्येष्ठांशी संवाद

●

मृत्यूसंबंधी स्पष्ट विचार

या पुस्तकाचा सविस्तर अनुक्रम

---

1) ज्येष्ठांशी संवाद

1. पिढीतल्या फरकाचा अभ्यास कशासाठी? 2. सध्याची परिस्थिती 3. मुलांच्या लग्नाविषयी ज्येष्ठांची भूमिका 4. लग्न जुळवणारे मध्यस्थ 5. पारंपरिक संस्कार 6. पैशाबद्दलच्या विचारसणीतला फरक 7. आहारामधले फरक 8. सामाजिक जाणिवेतला फरक 9. एकत्र का विभक्त कुटुंब? 10. स्वावलंबनाविषयी दृष्टिकोनात फरक 11. घरातल्या सोयी 12. स्वतःच्या मुलांच्या संसारात लक्ष 13. पालकत्वाविषयीचा दृष्टिकोन 14. प्रेमाची समज 15. मैत्रीबद्दलच्या कल्पना 16. भाषेचे प्रश्न 17. संवादकलेची समज 18. आधुनिक साधनं 19. आधुनिक दृष्टिकोन 20. म्हातारपणाची समज 21. मृत्युपत्र 22. निष्कर्ष

2) नकारात्मक विचारांची शक्ती

1. मूळ भूमिका 2. मृत्युपत्राचा नमुना (विल) 3. इच्छामरण पत्र (लिव्हिंग विल)

3) मृत्यूविषयी स्पष्ट विचार

1. म्हातारपणापासून मृत्यूपर्यंतचा प्रवास 2. जवळच्या नातेवाइकांची आजारपणं आणि मृत्यू 3. जोडीदाराच्या मृत्यूविषयी स्पष्ट विचार 4. स्वतःच्या मृत्यूविषयी स्पष्ट विचार

4) आभार

●

पुस्तक-11

समुपदेशनाच्या अनेक नव्या पद्धती

●

जीवनसाथ समुपदेशन संस्था

या पुस्तकाचा सविस्तर अनुक्रम

---

1) जीवनसाथचा आणि आमचा अभ्यास प्रवास

1. विवाह अभ्यास मंडळाची सुरुवात 2. मार्ग शोधताना

2) ग्रुप काउन्सेलिंग

1. या लेखामागची मूळ कल्पना 2. ज्ञान मिळवण्याच्या पायऱ्या, प्रकार आणि मर्यादा 3. विचार आणि भावना साठवण्याची क्षमता 4. काउन्सेलिंगचे इतर प्रकार– त्यांच्या मर्यादा 5. ग्रुपमधे केव्हा दाखल व्हावं? 6. ग्रुपमधले चर्चेचे विषय 7. ग्रुपमधल्या प्रश्नावल्या 8. ग्रुप चालवण्याच्या पद्धतीबद्दल 9. व्यवस्थापनशास्त्राची मदत 10. ग्रुपचे संस्कार - विवाहाचा खरा अर्थ 11. लग्नानंतरचं दोघांचं स्वतंत्र विश्व 12. ग्रुपचा उपयोग– 'सपोर्ट ग्रुप' 13. ग्रुप काउन्सेलिंगमधल्या अडचणी 14. विवाहासंबंधीची इतर कामं 15. निष्कर्ष

3) निवडक गटाचं सहसमुपदेशन (को-काऊन्सेलिंग)

4) विवाह अभ्यास मंडळ ते अभ्यास मंडळ

1. सध्याची परिस्थिती आणि या लेखामागची मूळ कल्पना 2. या एकूण विषयाचे भाग 3. या पुस्तकाबद्दलची धोरणं आणि कारणं 4. एक परिणामकारक मार्ग– अभ्यास मंडळ 5. जीवनसाथशी निगडित इतर तज्ज्ञ 6. सामान्य माणसाचा दृष्टिकोन – एक महत्त्वाची गोष्ट 7. तत्त्वज्ञानाची शिकवण 8. मानसशास्त्राची मदत 9. व्यवस्थापनशास्त्राची देणगी 10. डोळे उघडणारे आकडे 11. पिढीपिढीतला फरक 12. वैयक्तिक समुपदेशनाचं काम

5) वैयक्तिक समुपदेशन

1. या लेखाची मूळ कल्पना 2. घरातल्या किंवा ओळखीतल्या ज्येष्ठांचा सल्ला 3. मार्गदर्शन आणि समुपदेशनातला फरक 4. समुपदेशनातली मूलतत्त्वं किंवा गृहितं 5. भारत आणि पाश्चात्त्य देशातली परिस्थिती 6. समुपदेशकाची खास कौशल्यं– ऐकणं, बोलणं 7. समुपदेशनाची सुरुवात आणि प्रगती 8. समुपदेशकानी स्वतःविषयी सांगणं 9. समुपदेशनाचे प्रकार 10. क्रिटिकल ॲनॅलिसिस पद्धतीचं समुपदेशन 11. आत्मविश्वास वाढविण्यासाठी समुपदेशन 12. समुपदेशनातली तंत्रं 13. समुपदेशनातली पथ्यं 14. समुपदेशनातल्या अडचणी 15. समुपदेशकांच्या श्रेणी 16. विवाहपूर्व समुपदेशन 17. घटस्फोटापूर्वीचं समुपदेशन 18. ग्रुप काऊन्सेलिंग– एक उत्तम पर्याय 19. निष्कर्ष

6) रिफर्ड काऊन्सेलिंग ऊर्फ अप्रत्यक्ष समुपदेशन किंवा कॅरम बोर्ड काऊन्सेलिंग

7) जागा-पद्धत-व्यवहार, सूत्रधार तयार करणं वगैरे

8) या पुस्तकाचा उपयोग

9) अभ्यास मंडळात न येण्याची कारणं

10) आभार

●

पुस्तक-12

कौटुंबिक स्वास्थ्यासाठी उपाय,

●

जीवनसाथमधले खेळ

या पुस्तकाचा सविस्तर अनुक्रम

---

1) व्यक्तिमत्त्वाचे सहा प्रकार

2) व्यक्तिमत्त्वाचे सोळा प्रकार

3) व्यक्तिमत्त्वाचे दोन प्रकार

4) विवाहितांच्या मुलाखती

5) क्रिटिकल ॲनॅलिसिस - काउन्सेलिंग

1. या पद्धतीमागची मूळ कल्पना 2. वास्तववादी विचारांची चाचणी 3. नमुना प्रश्नांचं क्रिटिकल ॲनॅलिसिस 4. क्रिटिकल ॲनॅलिसिस - उपयोगी तक्ते

6) स्वतःच्या आयुष्यातले निराशेचे प्रसंग-उपाय म्हणजेच 'सेल्फ काउन्सेलिंग'

7) समुपदेशनाची उदाहरणं (केस स्टडीज)

8) सूत्रसंचालन करण्याचं प्रशिक्षण

9) खेळ

1. या विषयाबद्दलच्या लिखाणाचा उद्देश 2. काही महत्त्वाचे अर्थपूर्ण खेळ 3. चेंडूचे खेळ 4. कागद आणि पुठ्ठ्याचे खेळ 5. रुमालाचे खेळ 6. इतर वस्तू वापरून खेळ 7. वस्तूंशिवाय केवळ शारीरिक हालचालींचे खेळ 8. केवळ हात वापरण्याचे खेळ 9. विवाहासंबंधीचे आणि आयुष्यासंबंधीचे फक्त बोलण्याचे खेळ 10. बोलण्याचे इतर खेळ 11. गोलचर्चेचे खेळ 12. प्रसंग चर्चा 13. विधानावर चर्चा 14. स्वतःविषयी बोलण्याचे खेळ 15. एक महत्त्वाचा खेळ – कॅटॅगरीज

10) मानसोपचारतज्ज्ञाची गरज (सायकायाट्रिक ट्रीटमेंट)

11) यापुढच्या कामाच्या दिशा

12) आभार

●

अनिल भागवत यांनी लिहिलेली आणखी पुस्तकं

पुस्तक-1

घर पाहावं बांधून (पाचवी आवृत्ती)

- प्रस्तावना
- प्रमोटर बिल्डर्सविषयी
- आर्किटेक्ट्स्‌विषयी
- बिल्डिंग कॉट्रॅक्टरविषयी
- आर. सी. सी. डिझायनरविषयी
- मटेरियल सप्लायरविषयी
- बांधकाम कामगारांविषयी
- पेटी कॉट्रॅक्टर्सविषयी
- गळणारं छप्पर
- ॲग्रीमेंटवर सही
- सिस्टिम बिल्डिंग
- बांधकाम आणि सरकार
- बांधकाम, कर्ज, सरकारी कर आणि आपण
- कन्स्ट्रक्शन मॅनेजमेंट कन्सल्टंटविषयी
- बांधकामातले तांत्रिक शब्द आणि चेकलिस्ट

पुस्तक-2

लग्न पाहावं करून (उपलब्ध नाही)

पुस्तक-3

व्यवस्थापनशास्त्र तुमच्यासाठी (दुसरी आवृत्ती)

- मॉनिटरिंग मॅनेजमेंट - एक आवश्यक व्यवस्थापनशास्त्र
- मॉनिटरिंग मॅनेजमेंटची मूलतत्त्वं
- मॉनिटरिंग मॅनेजमेंटमधल्या महत्त्वाच्या गोष्टी आणि फायलिंग
- मॉनिटरिंग मॅनेजमेंट आणि कामगार
- क्वालिटी मॅनेजमेंट आणि सुपरवायझर
- स्पीड मॅनेजमेंट - एक जादूसारखं तंत्र
- कॉस्ट मॅनेजमेंट
- मॉनिटरिंग मॅनेजमेंट आणि इतर तज्ज्ञ
- मॉनिटरिंग मॅनेजमेंट आणि मालक
- डिझास्टर मॅनेजमेंट - आपत्ती निवारणशास्त्र
- मॉनिटरिंग मॅनेजमेंट - मोहीम फत्ते करण्याचं शास्त्र
- मॉनिटरिंग मॅनेजमेंट - बहुउपयोगीशास्त्र
- तुम्ही कोणीही असा - ते वापरता येईल

●

लेखक अनिल भागवत यांचे ऋणी आहेत.

- डॉ. उल्हास लुकतुके - 1997 साली जीवनसाथ सुरू करताना स्पष्ट विचारांची जीवनभर साथ हा उद्देश स्पष्ट होता, पण त्याची सुरुवात करण्यासाठी यांची खूप मदत झाली.
- जीवनसाथ - मुंबई शाखा माझ्या आईसाठी सुरू केली. मुंबईतल्या लोकांना या अभ्यासाची प्रचंड गरज होती, अजूनही आहे. तिच्या घरीच कार्यक्रम व्हायचे.
- मुंबई जीवनसाथचा भक्कम आधार होता सुशील आणि विनीता हाटे. त्यांची निष्ठा, संयोजनकौशल्य आणि आमची वैयक्तिक मैत्री मला खूप महत्त्वाची वाटते.
- पुण्यातलं जीवनसाथ अभ्यास मंडळ पहिल्या दिवसापासून जोरातच चाललं. बरीच वर्षं ते शनिवार पेठेतल्या आमच्या घरी होतं. आता आमच्याच कर्वेनगरच्या घरी अभ्यास मंडळ चालतं. गेली दोन वर्षं मी हा पुस्तकसंच लिहीत असताना मला अनेकांनी मदत केली. त्यातल्या काहींनी या पुस्तकांसाठी काही विषयांसाठी मजकूर लिहिला, काहींनी टायपिंगची, डिक्टेशन घेऊन लिहिण्याची मदत केली. मजकुरावरच्या त्यांच्या प्रतिक्रियादेखील महत्त्वाच्या होत्या. त्यांची नावं मी आडनावाच्या आद्याक्षरांच्या क्रमानी देतोय. ती आद्याक्षरं इंग्लिश अल्फाबेटाप्रमाणे रचली आहेत.

  बोकील डॉ. आशा, बोरोटीकर तुषार, भोइटे आमोद, दंडवते मानसी, डिंबळे रामभाऊ, देगवेकर दिलीप, देशपांडे केशव, देवराज शिल्पा, गोवित्रीकर सुनीति, जाधव विजय, कानेटकर श्रद्धा, कुळकर्णी पौर्णिमा,

क्षेमकल्याणी ममता, लिमये हर्षद, लिमये गौरी गोळे, मेढेकर शैवल, मोहाडीकर डॉ. लीना, मुद्‌गल दीपा, मुद्‌गल स्मिता, मुळे अंजली, म्हैसकर मकरंद, नागपूरकर माधव, पाटणकर राजेश, पाटील मोहिनी, पाटील स्मिता, पाटील विक्रांत, राऊळ श्यामल, रावराणे गीता, साठे आशा, शुक्ल डॉ. भूषण, संचेती अपूर्वा, संचेती आदिती, वळसंगकर अनिल, तेलंग डॉ. नीलू.

- जीवनसाथ अभ्यास मंडळाचे सगळे सभासद. जीवनसाथ समुपदेशन केंद्राचे सगळे समुपदेशनार्थी.
- शोभा तर या पुस्तकसंचाच्या थोड्या भागाची सह-लेखिकाच आहे. मी आमच्या वैवाहिक आयुष्यात तिच्यावर केलेल्या अन्यायाचा मी अनेक ठिकाणी उल्लेख केलाच आहे. शिवाय या पुस्तक-प्रक्रियेच्या दोन वर्षांच्या काळातही तिच्या मदतीशिवाय, टीकेशिवाय, सूचनांशिवाय आणि प्रोत्साहनाशिवाय मी इथपर्यंत पोचलोच नसतो.

  शोनील आणि आभामुळे तर जीवनसाथ संस्था सुरू झाली. अनास्तेसिया, श्रेयस आणि आमची नातवंडं ओजस, तुहिन आणि डॉमिनिक यांना पुढे त्यांच्या आयुष्यात माझ्या या कार्यशाळांचा आणि त्याबद्दलच्या लिखाणाचा उपयोग व्हावा हा माझा ऊर्जास्रोत होता.
- हे पुस्तक या अवस्थेपर्यंत आणण्यात श्री. हेमंत जोशी आणि सौ. संगीता सरदेसाई यांचा मोठा वाटा आहे.
- मी पुस्तकसंचात म्हटलं आहे तेच पुन्हा सांगतो. वाचकांच्या प्रतिक्रिया नाव, फोटो पत्त्यासह पुढच्या आवृत्तीत छापणार आहे. कौतूक, टीका दोन्हीचं स्वागत असेल. अशा प्रत्येकाचं माझ्यावर ऋण असणार आहे.

– अनिल भागवत
वैवाहिक आणि कौटुंबिक समुपदेशक

'आयुष्यात येणाऱ्या प्रत्येक प्रश्नाचं खरं मर्म एकच – चांगल्या-वाईट अनेक घटना तुमच्या वाट्याला आयुष्यभर येणार. त्यांची हाताळणी कशी करायची हे दुसरी कुठचीही शक्ती किंवा व्यक्ती ठरवणार नसते. ते तुम्ही स्वतः ठरवायचं असतं. त्यासाठी त्या घटनेच्या सर्व अंगांचा अभ्यास स्वतःला करावा लागतो. त्या अभ्यासासाठी जीवनभर स्पष्ट विचारांची साथ लागते. म्हणजेच जीवनसाथ.'

या पुस्तकाविषयी

भारतीय शिक्षणाच्या अवस्थेचं एका निराळ्या पद्धतीनी असं वर्णन करतात. शिक्षण हा विषय निघाला की त्यातली पहिली पायरी म्हणजे शिकावंसं वाटणं. भारताला ही पहिली पायरी जमलेली नाही. प्रत्येकाला शिकावंसं वाटेल असं वातावरण नाही. दुसरी पायरी म्हणजे अनेक गोष्टी करून बघून आपल्याला काय शिकायला आवडेल ते ठरवणं. त्याची देखील भारतात सगळी पंचाईत आहे. तिसरी पायरी म्हणजे जे आवडेल ते शिकणं. या पायरीपर्यंत बहुतेक लोक पोहोचतच नाहीत. त्यामुळे त्याबद्दलचा प्रश्नच येत नाही. सारांशात, शिक्षणाच्या बाबतीत सबंध भारत देश पार नापास आहे. लेखकानी त्यावर काही उपायही सांगितले आहेत.

स्वतःच्या करीअरची काळजी प्रत्येकाला असतेच. त्याच्याविषयी रास्त विचार म्हणजे काय याविषयी कसा विचार करावा, कसा निर्णय घ्यावा याविषयी लेखकानी मानसशास्त्रीय विवेचन केलं आहे.

परदेश याबद्दल स्वानुभवावर आधारलेलं समतोल चित्र वाचकाला अनेक प्रकारचे निर्णय घ्यायला खूप मदत करतं.

अल्पबचत याविषयी लेखकानी दिलेली माहिती आणि विचार अक्षरशः आयुष्य बदलून टाकणारे आहेत.